***अग्रीम नोंदवहीमध्ये खात्यास पुर्वी दिलेल्या अग्रीमाच्या नोंदी खातेनिहाय नोंदविल्या जात नाहीत. नोंदवहीमध्ये फक्त त्या आर्थिक वर्षामध्ये दिलेल्या अग्रीमाच्याच नोंदी केल्या जातात. खात्याने चालु वर्षात किती रकमेचे कोणत्या वर्षाचे समायोजन केले आहेत याची गोषवारा काढला जात नाही. आर्थिक वर्ष समाप्तीनंतर खात्यास अदा अग्रीम रक्कम, समायोजित रक्कम व प्रलंबित अग्रीम रक्कम याचा गोषवारा नोंदवहीमध्ये नोंदविला जात नाही. मनपाचे वेगवेगळ्या खात्यास दिलेले अग्रीमे रक्कम रु.60,64,21,663/- इतके 2003-04 पासून प्रलंबित आहेत. सन 2003-04 पुर्वी प्रलंबित अग्रीमे नसल्याबाबत खात्याने प्रमाणीत केलेले नाही. अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेली रक्कम व वर्गीकरण नोंदविण्यात आलेली रक्कम यामध्ये रक्कम रु.1,12,43,562/- इतकी तफावत आहे. अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या अग्रीमे ही कोणत्या प्रमाणकान्वये प्रदान केली आहेत त्याचा प्रमाणक क्रमांक व दिनाक नमूद करणेत येत नाही. मुंबई वित्तीय नियमावली 1959 मधील नियम क्र.142 नुसार अग्रीम मंजुर करताना पुर्वीची अग्रीमे समायोजित केल्याशिवाय पुढील अग्रीम देण्यात येऊ नये असे असताना खात्याने पुर्वीचे खात्याकडे अग्रीमे प्रलंबित असताना पुन्हा अग्रीमे देण्यात आली आहेत. मनपाचे अधिकरी व कर्मचारी यांना घर बांधणीसाठी अग्रिम रक्कम रु.15,49,237/- इतका देण्यात आल्याचे दिसुन येत असुन इतरही प्रयोजनसाठी अग्रिम देण्यात आला असल्यस अशा सर्व वैयक्तिक कर्मच्या-याच्या नावे दिलेल्या अग्रिम रक्कमांची व प्रलंबित अग्रीमांची माहीती व अभिलेख मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर केली नाही.***

सोलापुर मनपा अंतर्गत असणारे लेखा विभागामर्फत अग्रीम नोंदवही ठेवण्यात येत आहे. 2014-15 या अर्थिक वर्षात नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या

त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.74 दि.10/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मुले6/लेखा परिक्षण/74/2017 दि.26/12/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)अग्रीम नोंदवहीमध्ये खात्यास दिलेल्या अग्रीमाच्या नोंदी खातेनिहाय नोंदविल्या जातात. नोंदवहीमध्ये फक्त त्या आर्थिक वर्षामध्ये दिलेल्या अग्रीमाच्याच नोंदी केल्या जातात. परंतु त्या खात्यास यापुर्वी देण्यात आलेल्या अग्रीमापैकी किती अग्रीमे प्रलंबित आहेत याच्या नोंदी केल्या जात नाहीत. त्यामुळे खात्याकडे किती अग्रीमे प्रलंबित आहेत याची तपासणी करता येत नाही.

पुर्वीचे प्रलंबित अग्रीमाची नोंद पुढील वर्षाच्या अग्रीम नोंदवहीत प्रलंबित दाखविण्यात येते असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

अनुपालनासोबत अभिलेखे सादर केले नसल्याने अनुपालन मान्य करता येत नाही.

2) अग्रीम नोंदवह्या ह्या प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येत आहे. खात्याने सादर केलेले समायोजित प्रमाणाकाची नोंद ही ज्या वर्षात अग्रीम घेण्यात आले आहे त्या वर्षाच्या नोंदवहीमध्ये नोंदविले जाते. त्यामुळे खात्याने चालु वर्षात किती रक्कमेचे समायोजन केले आहे याची खात्री करता येत नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार कार्यवाही करणेत येत असल्याचे कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) आर्थिक वर्ष समाप्तीनंतर खात्यास अदा अग्रीम रक्कम, समायोजित रक्कम व प्रलंबित अग्रीम रक्कम याचा गोषवारा नोंदवहीमध्ये नोंदविला जात नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार दक्षता घेण्यात असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) खात्याने प्रलंबित अग्रीमाची सादर केलेल्या माहीतीची तपासणी केली असता लेखापरीक्षण कालावधीपर्यंत मनपाचे वेगवेगळ्या खात्याकडे रक्कम रु.67,60,39,267/- इतके प्रलंबित आहेत. सदरची रक्कम ही 2003-04 या अर्थिक वर्षापासून प्रलंबित आहे. प्रलंबित अग्रीमे हे प्रदिर्घ कालावधीसाठी समायोजित केले नसल्याने त्याचा गैरवापर होण्याची शक्यता नाकरता येत नाही. तरि प्रलंबित अग्रीमे समायोजित करणेबाबत खात्याकडे पाठपुरवा करण्यात यावा. प्रलंबित अग्रिम रक्कम रु.67,60,39,267/- ही खात्याकडे असल्याने ती मनपाच्या लेख्याबाहेर राहत असून त्यामुळे मनपाचे अर्थिक नुकसान होत नाही याची लेखापरिक्षणास खात्री पटवावी.

प्रलंबित अग्रीमे समायोजन करण्याकरीता पाठपुरवा करण्यात येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

5) सन 2003-04 पुर्वी प्रलंबित अग्रीमे नसल्याबाबत खात्याने खुलासा केलेला नाही. त्याबाबत मनपाच्या अभिलेखावरुन 2003-04 पुर्वी प्रलंबित अग्रीमे नसल्याबाबत प्रमाणित करण्यात यावे.

प्रलंबित अग्रीमाबाबत अभिलेख्याची पडताळणी करण्यात येत असल्याचे खात्याने कळविल्याने

आक्षेप कायम करण्यात येत आहे.

6) अग्रीम नोंदवहीमध्ये माहे मार्च 2015 मध्ये रक्कम रु.3,08,40,025/- इतके खातेप्रमुखाना दिल्याच्या नोंदी करण्यात आल्या आहेत व वर्गवारी नोंदवहीमध्ये अग्रीम या लेखाशिर्षाखाली रक्कम रु.1,95,96,463/- इतकी नमूद करण्यात आली आहे. अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेली रक्कम व वर्गीकरण नोंदविण्यात आलेली रक्कम यामध्ये रक्कम रु.1,12,43,562/- इतकी तफावत आहे. तफावतीबाबत ताळमेळ घेऊन सविस्तर तपशील सादर करावा. अशा प्रकारे इतर महिन्यामध्ये नोंदविण्यात आलेल्या रकमेबाबत ताळमेळ घेऊन तफावत नसल्याबाबत खात्री पटवावी.

अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेली रक्कम व वर्गीकरण नोंदविण्यात आलेली रक्कम याबाबत ताळमेळ घेण्यात येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

7) अग्रीम नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या अग्रीमे ही कोणत्या प्रमाणकान्वये प्रदान केली आहेत त्याचा प्रमाणक क्रमांक व दिनाक अग्रीम नोंदवहीमध्ये नमूद करणेत येत नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार सन 2015-16 पासून कार्यवाही करणेत येत आहे असे खात्याने कळविले आहे.

8) मुंबई वित्तीय नियमावली 1959 मधील नियम क्र.142 नुसार अग्रीम मंजुर करताना पुर्वीची अग्रीमे समायोजित केल्याशिवाय पुढील अग्रीम देण्यात येऊ नये असे असताना खात्याने पुर्वीचे खात्याकडे अग्रीमे प्रलंबित असताना पुन्हा अग्रीमे देण्यात आली आहेत हे नियमबाह्य आहे.

मनपाच्या विविध विभागास मुख्यलेखापाल कार्यालयाकडून अग्रीम मंजूर करण्यात येत नसून अग्रीम मंजूर केल्यानंतर त्याचे आदेश मुख्यलेखापाल यांचे स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येते व त्याचे धनादेश देण्यात येतात. अग्रीम मंजूरीचे प्रस्ताव खाते प्रमुख रास्तपणे मंजुरीसाठी मा.आयुक्त, मा.अतिरीक्त आयुक्त, उपायुक्त तसेच सहाय्यक आयुक्त (स./म.) यांचेकडे सादर करुन ते मंजुर करून आदा करण्यासाठी मुख्यलेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात येतात असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

आक्षेपात नमूद केलेनुसार खात्याने संयुक्तीक अनुपालन सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

9) मनपाच्या वित्तिय वर्ष 2017-18 च्या अंदाजपत्रकामध्ये वित्तिय वर्ष 2014-15 चे नक्की आकडे म्हणुन मनपा सेवकांना घर बांधणीसाठी रक्कम रु.15,49,237/- इतका अग्रीम दिल्याचे नमुद करण्यात आले आहे. त्यनुसार मनपाचे अधिकरी व कर्मचारी यांना घर बांधणीसाठी अग्रिम देण्यात आल्याचे दिसुन येत असुन इतरही प्रयोजनसाठी अग्रिम देण्यात आला असल्यस अशा सर्व वैयक्तिक कर्मच्या-याच्या नावे दिलेल्या अग्रिम रक्कमांची व प्रलंबित अग्रीमांची माहीती व अभिलेख मागणी करुनही लेखापरीक्षणास सादर केली नाही. तरी ती सादर करावी.

आक्षेपात नमूद केलेले अभिलेखे सादर करणेत येत आहे असे खात्याने कळविले आहे. अनुपालनासोबत अभिलेखे सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

### *4 शासकीय निधीच्या रोखवही व रेखांकन करताना आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***सोलापूर महानगरपालिकेकडील शासकीय निधीच्या रोखवही व प्रमाणके रोखंकनासाठी उपलब्ध झाली नाहीत. रक्कम रु.9547/- चा खर्च जादा नोंदवला व जादा रक्कलम आहरित केली करण्यात आले. रु.700/- ने रक्कम कमी आदाईत केली. प्रमाणक क्र.84 दिनांक 01/01/2015 ची एकुण रक्कम 7,18,773/- असताना रोकडवहीस सदर प्रमाणकाचा खर्च रु.10,18,773/- नोंदविला आहे. डे बुक मध्ये जमा खर्चाचे व्यवहार ज्या बँकामध्ये केले जातात त्या बँक खात्यातील शिल्लक रक्कमेशी दरमहा ताळमेळ घेतला नाही. रोकडवही दिवसअखेर जमा खर्च व दिवसअखेर शिल्लक रक्कम यांच्या नोंदी घेऊन त्या मुख्यलेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्या नाहीत. रोखवह्या मधील नोंदी (जमा व खर्चाच्या) मुख्यलेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्या नाही. मार्च 2014 मधील रोजकीर्द (डे बुक) राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता 2005 अथवा महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियमानुसार विहित नमुन्यात ठेवली नसल्याचे आढळून आले.***

सोलापूर महानगरपालिकेकडील शासकीय निधीच्या रोखवही व प्रमाणके यांची रेखांकन तपासणी केली असता, खालील प्रमाणे उणिवा आढळुन आल्याने याबाबत अर्धसमास क्र.40 दि.25/07/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

1) खालील प्रमाणकाद्वारे रोखवहीस खर्च नोंदवला आहे. परंतु सदरची प्रमाणके लेखापरीक्षणास रेखांकनासाठी उपलब्ध झाली नाहीत.

| अ.क्र | निधीचे नाव | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कंम | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 13 वे वित्त आयोग | 27 | 08/07/2014 | 5,61,58,883/- | आयुक्त सोमपा (म.सु.ज.न.अ. (रस्ते) च्या मनपा हिश्यासाठी रक्कम वर्ग) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2. | 13 वे वित्त आयोग | 63 | 30/10/2014 | 4,72,61,595/- | आयुक्त सोमपा (म.सु.ज.न.अ. (रस्ते) च्या मनपा हिश्यासाठी रक्कम वर्ग) |
| 3. | 13 वे वित्त आयोग | 71 | 08/12/2014 | 1,22,28,787/- | आयुक्त सोमपा (म.सु.ज.(मलनित्सारण) योजनेकामी वर्ग) |
| 4. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थानन (जिल्हास्तर) | 20 | 18/02/2015 | 9,82,088/- | वैष्णवी कंन्ट्रनक्शन (मोदी स्मणशानभुमी सुधारणा) |
| 5. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थानन (जिल्हास्तर) | 22 | 03/03/2015 | 11,88,522/- | वैष्णवी कंन्ट्ररक्शन (पद्मशाली स्मशानभुमी सुधारणा) |
| 6. | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान (जिल्हास्तर) | 26 | 09/03/2015 | 33,55,426/- | श्रीकृष्ण कंन्ट्रक्शन (बाळीवेस ते टिळक चौक ड्रेनेज लाईन घालणे) |

2) तेरावा वित्त आयोग या शासकीय निधीच्या रोकडवही मध्ये दि.11/06/2014 रोजी प्रमाणक क्र.18 व 19 मधील कामगार कल्याण उपकर (रोख) ची एकूण रक्कम 18,814/- ऐवजी धनादेश क्रमांक 19034 ने रु.28,361/- ने रक्कम काढली, त्यामुळे रक्कम रु.9547/- चा खर्च जादा नोंदवला व जादा रक्कम आहरित केली असल्याचे आढळुन आले.

3) तसेच प्रमाणक क्र.54 दि.07/10/14 मध्ये सेसची रक्कम रु.1747/- असताना रोकडवहीत रु.1,047/- नमुद करुन धनादेश काढल्याने रु.700/- ने रक्कम कमी आदाईत केली.

4) 13 वा वि.आयोग प्रमाणक क्र.84 दिनांक 01/01/2015 ची एकुण रक्कम 7,18,773/- असताना रोकडवहीस सदर प्रमाणकाचा खर्च रु.10,18,773/- नोंदविला आहे.

5) मासिक गोषवारे,वार्षिक गोषवारे, महिना निहाय बँक ताळमेळ रोकाडवहीस नोंदविला नाही. डे बुक मध्ये जमा खर्चाचे व्यवहार ज्या बँकामध्ये केले जातात त्या बँक खात्यातील शिल्लक रक्कमेशी दरमहा ताळमेळ घेतला नाही. रा.ले.ख. नि. 2005 मधील परिच्छेद 30.5 ते 30.8 मधील कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 51(3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोखवहीतील जमा खर्चाच्या नोंदी बरोबर बँक पासबुक / विविध नोंदीशी तुलना करून ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

6) रोकडवही दिवसअखेर जमा खर्च व दिवसअखेर शिल्लक रक्कम यांच्या नोंदी घेऊन त्या मुख्यलेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्या नाहीत.

7) रोखवहया मधील नोंदी (जमा व खर्चाच्या) मुख्यलेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्या नसल्याने सदर नोंदी बाबतच्या योग्यतेबाबत लेखापरीक्षणास खात्री होत नाही.

8) मार्च 2014 मधील रोजकीर्द (डे बुक) राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता 2005 अथवा महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियमानुसार विहित नमुन्यात ठेवली नसल्याचे आढळून आले.

## *5 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत सोलापूर शहरात ड्रेनेज व्यवस्था सुधारणे (मलवितरिका टाकणे), कामातील अनियमिततेबाबत (2014-15)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्णजयं शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 118260828.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1829985.00/-

***पूर्वीचे मक्तेदार मे.एस.एम.सी.आय.पी.एल. यांनी पूर्ण केलेल्या कामाचा व पुरवठा केलेल्या मालाचा रीतसर पंचनामा करून, मोजमाप पुस्तिकेत रेकॉर्डिंग करून त्याची नोंद योग्य त्या रजिस्टरला घेवुन त्याचा वापर नवीन मक्तेदारास करण्याची परवानगी देणे आवश्यक होते, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. बयाणा रक्कम रु.86,00,000/- व सुरुवातीची सुरक्षा अनामत रु.2,43,14,100/- ही रोख स्वरुपात किवा धनादेशाने न घेता त्यांची रु.100/- च्या मुद्रांक पेपरावर बँक ग्यारंटी घेतली आहे. रु.1000 ला रु. 5/- मुद्रांक शुल्क प्रमाणे रु.24,314/- च्या मुद्रांक पेपरवर सुरक्षा अनामत ची बँक ग्यारंटी घेणे आवश्यक होते. मुळ मक्क्ता रु.152,41,47,130/- चा असताना नवीन प्राप्त दोन्ही कामांच्या निविदानुसार प्रकल्पाचा होणारा एकूण खर्च रु.220,13,70,033/- एवढ्यावर गेला. त्यामुळे मुळ प्रकल्प किमतीत रु.59,70,04,633/- एवढी वाढ झाली. निविदा अट क्र.83 नुसार सदरच्या कामाचे त्रयस्थ संस्थेमार्फत लेखापरीक्षण होणे आवश्यक आहे. करारनामा न करता कामाचा आदेश देणे नियमबाहय आहे. स्थानिक संस्था कराची रक्कम रु.16,37,119/- वसूल करण्यात यावी. पाईप खरेदीची चलने नस्तीत उपलब्ध नाहीत. साठा नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आली नाही. सदरच्या कामासाठी 2729.05 घ.मी. एवढा मुरुम बाहेरून पुरवला असून त्याचे स्वामित्वधन रक्कम रु.1,92,866/- ठेकादाराकडून वसुल करण्यात यावी.***

ठेकेदाराचे नाव :- दास ऑफशोअर एन्ज़िनीअर प्रा.ली.

करारनामा :- दि.12.06.2014 मुद्रांक शुल्क = रक्कम रु.500000/-

निविदा मान्यता :मा.स्थायी समिती यांच्याकडील ठराव क्र.15 दि.12.05.2014 अन्वये.

प्राकलन :- रु.85,76,37,336/- निविदा मंजूर दर :- 05.50% कमी दराने.

पुगप मान्यता- स्थापत्य समिती ठ.क्र.10 दि.18/05/2011.

कामाचा आदेश :- सार्व. आरोग्य अभियंता विभाग कार्या. जा. क्र. साआअ/जनि/263 दि. 12/06/2014.

कामाचा कालावधी- 18 महिने. Trial Run Period= 12 महिने
Defect liability Period= 18 महिने
लेखापरीक्षण कालावधीत एकुण खर्च:- रक्कम- रु.11,82,60,828/-
सल्लागार- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
मोजमाप पुस्तिका क्र.458, 459, 461, 475, 477, 476, 474.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत सोलापूर शहरात ड्रेनेज व्यवस्था सुधारणे या कामाचा ठेका निविदा काढून (प्राकलन:-रु.1,60,43,65,400/-) ठेकेदार मे.एस.एम.सी.आय.पी.एल. यांना देण्यात आले होते, परंतु ठेकेदाराने काम संथ गतिने व अर्धवट (38%) केल्याने हे काम त्याच्याकडून महापालिकेने निविदा अटी व शर्तीस अधीन राहून कलम 3(क) अन्वये काढून घेतले व उर्वरित कामाचे दोन भागात वर्गीकरण केले.

अ) मलनिस्सारण केंद्रे बांधणे.- estimate रु.81,17,26,841/-
ब) मलवितरण नलिका टाकणे.- estimate रु.85,76,37,336/-
सदरच्या दोन्ही कामांसाठी दोन स्वतंत्र निविदा मागवून काम ठेकेदारांना करण्यास दिले.

त्यापैकी मलवितरण नलिका टाकणे या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता खालील उणीवा निदर्शनास आल्या याबाबत अर्धसमास क्रमांक 03 दि.02/05/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने पत्र जा.क्र. साआअ/जनि/377 दिनांक 19/07/2017 अन्वये अनुपालन प्राप्त झाले असून त्यामधील बाबी विचारात घेऊन लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

1. पूर्वीचा ठेकेदाराने कोणकोणत्या बाबींचे काम केले व कोणत्या बाबींचे काम प्रलंबित ठेवले हे नव्याने उर्वरित कामांसाठी काढण्यात आलेल्या BOQ/प्राकलनावरून लक्षात येत नाही. पूर्वीचे मक्तेदार मे.एस.एम.सी.आय.पी.एल. यांनी पूर्ण केलेल्या कामाचा व पुरवठा केलेल्या मालाचा रीतसर पंचनामा करून, मोजमाप पुस्तिकेत रेकॉर्डिंग करून त्याची नोंद योग्य त्या रजिस्टरला घेवुन त्याचा वापर नवीन मक्तेदारास करण्याची परवानगी देणे आवश्यक होते, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. आवश्यक अभिलेखे अनुपालनासोबत जोडली नाहीत.

2. बयाणा रक्कम रु.86,00,000/- व सुरुवातीची सुरक्षा अनामत रु.2,43,14,100/- ही रोख स्वरुपात किवा धनादेशाने न घेता त्यांची रु.100/- च्या मुद्रांक पेपरावर बँक ग्यारंटी घेतली आहे. रु.1000 ला रु. 5/- मुद्रांक शुल्क प्रमाणे रु.24,314/- च्या मुद्रांक पेपरवर सुरक्षा अनामत ची बँक ग्यारंटी घेणे आवश्यक होते. निविदा अट क्र.2:2:0 नुसार रु.100/- च्या मुद्रांक पेपरावर बँक ग्यारंटी घेतल्याचे अनुपालनामध्ये नमूद केले आहे, परंतु शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक होते.

3. पूर्वीच्या एकत्रित कामाचा मक्ता हा रु.152,41,47,130/- (प्राकलन :- रु.160,43,65,400/-) होता. मक्तेदाराने 38% काम पूर्ण (नस्तीवरून) केल्याने त्याच्या काळात रु.57,91,75,909/- चा खर्च झाला व नंतर सदरचे काम विभाजित करून आलेल्या निविदांनुसार मक्ताची रक्कम रु.81,04,67,283/- व 81,17,26,841/- आहे. म्हणजेच मुळ मक्क्ता रु.152,41,47,130/- चा असताना नवीन प्राप्त दोन्ही कामांच्या निविदानुसार प्रकल्पाचा होणारा एकूण खर्च रु.220,13,70,033/-(57,91,75,909 + 81,04,67,283 + 81,17,26,841) एवढ्यावर गेला. त्यामुळे मुळ प्रकल्प किमतीत रु.59,70,04,633/- एवढी वाढ झाली. कामाचे स्वरुपात बदल

न होता खर्चात वाढ कशी झाली, याचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. तसेच वाढीव खर्च हा महानगरपालिकेस करावा लागणार असल्याने याबाबत काय आर्थिक तरतूद केली? ते स्पष्ट करावे. निविदा फी रु.1,00,00/- मनपा फंडात जमा केल्याची दिसून येत नाही. विभागाने अनुपालनामध्ये प्रकल्पास नव्याने रक्कम रु. 187.36 कोटी ची मंजुरी मिळालेचे नमूद केले आहे, परंतु मंजुरीची प्रत उपलब्ध केली नाही. तसेच 2011 साली नव्याने निविदा राबवल्याने दरवाढीपेक्षा 2009-10 च्या DSR दरापेक्षा 52.75% जास्त दराने मक्ता मंजूर केला असल्याचे अनुपालनामध्ये नमूद केले आहे, परंतु तुलनात्मक तक्ता व इतर अभिलेख जोडले नाहीत. निविदा फी रु.1,00,00/- मनपा फंडात जमा केल्याची पावती सोबत जोडली नाही.

4. निविदा अट क्र.83 नुसार सदरच्या कामाचे त्रयस्थ संस्थेमार्फत लेखापरीक्षण होणे आवश्यक आहे. विभागाने अनुपालनामध्ये कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,पुणे (COEP) कडून लेखापरीक्षण केलेचे नमूद केले आहे, परंतु सोबत अहवाल जोडला नाही.

5. सदरच्या कामाचा करारनामा नस्तीत नाही. करारनामा न करता कामाचा आदेश देणे नियमबाह्य आहे. विभागाने अनुपालनामध्ये करारनामा नस्तीत असल्याचे नमूद केले आहे, परंतु तो नस्तीत नसल्याने सदरचा आक्षेप घेतला असून करारनामा दाखवण्याची जबाबदारी विभागाची आहे.

6. खरेदी केलेल्या पाईपच्या किमतीवर 3.20% दराने स्थानिक संस्था कर कपात केला नाही, त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पाईपचा व्यास | किंमत | 3.20% LBT रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | 450 mm | 97878 | 3132 |
| 2 | 600 mm | 5672835 | 181531 |
| 3 | 900 mm | 850281 | 27209 |
| 4 | 1200 mm | 3546516 | 113489 |
| 5 | 1400 mm | 7877148 | 252069 |
| 6 | 1000 mm | 24243195 | 775782 |
| 7 | 700 mm | 100854 | 3227 |
| 8 | 200 mm | 6685835 | 213946 |
| 9 | 250 mm | 114338 | 3659 |
| 10 | 300 mm | 1475291 | 47209 |
| 11 | 350 mm | 495810 | 15866 |
| | | 5,11,59,981/- | 16,37,119/- |

सदरची रक्कम रु.16,37,119/- वसूल करण्यात यावी. विभागाने अनुपालनामध्ये रक्कम रु. 20,26,168/- वसूल केल्याचे नमूद केले आहे, परंतु अनुपालनासोबत कोणतीही कागदपत्रे जोडली नाहीत. तसेच उर्वरित

रक्कम वसूल करावी.

7. पाईप खरेदीची चलने नस्तीत उपलब्ध नाहीत. साठा नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आली नाही. विभागाने अनुपालनामध्ये मूळ चलनांची स्वतंत्र नस्ती करणेत आल्याचे नमूद केले असून ती लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही.

8. सदरच्या कामासाठी 2729.05 घ.मी. एवढा मुरुम बाहेरून पुरवला असून त्याचे स्वामित्वधन (964.33ब्रास*200=1,92,866/-) रक्कम रु. 1,92,866/- ठेकादाराकडून वसुल करण्यात यावी. विभागाने अनुपालनामध्ये रनिग बिल 21 ते 24 मधून सदरची रक्कम वसूल केल्याचे नमूद केले आहे, परंतु अनुपालनासोबत कोणतीही कागदपत्रे जोडली नाहीत.

वसुलपात्र रक्कम= रु.18,29,985/-

DGPAGPM8503 (Ref No : 4, Hmm No : 03)

## *6 टाकळी सोरेगाव दरम्याबन चे 1200 एमएम व्यासाचे पाईप लाईन करीता नोंदणी येथे बीपीटी (बँक प्रेशर टँक) बांधणे या कामातील अनियमितता...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4575332.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4575332.00/-

***करारनामा नस्तीत आढळुन आला नाही. काम मुदतीत पुर्ण झाले नाही. सदर कामास मा.आयुक्त यांची दंडनिय / विनादंड मुदतवाढ मिळाल्याचे नस्तीत आढळुन आले नाही. कामास मुदतवाढ देण्याबाबतचा अर्ज नस्तीत आढळुन आला नाही. मुदतीत काम पुर्ण न होऊ शकल्यास पटण्याजोगी कारणे न दिल्यास दंडात्मक कार्यवाही मा. आयुक्त यांचे मान्यतेने करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झाली नाही.***

टाकळी सोरेगाव दरम्यान चे 1200 एमएम व्यासाचे पाईप लाईन करीता नोंदणी येथे बीपीटी (बँक प्रेशर टँक) बांधणे या कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामात अनियमितता आढळून आल्याने याबाबत अर्धसमास क्र.33 दि.30/06/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

**कामाचा तपशिल**

**1) पुर्वगणकपत्रक (अंदाजपत्रक) रु.71,92,081/-**

**2) निविदा रक्कम रु. - 65,59,081/-**

**3) मंजूर निविदा - 8% जादा**

**4) मक्तेदार - श्रीकांत आर सोनी**

**5) निधी - 13 वा वित्त आयोग**

**6) निविदा मंजूरी - स्थायी समिती ठराव क्र. 280**

**7) कामाचे आदेश - साआअ/जवि/652, दि.09/09/2014.**

**8) कामाची मुदत - 120 दिवस**

**सदर कामावर वित्तीय वर्ष 2014-2015 मध्ये खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.**

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | दिनांक | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 69 | 02/12/2014 | रु.6,54,535/- |
| 2 | 81 | 23/12/2014 | रु. 18,25,370/- |
| 3 | 99 | 03/03/2015 | रु. 14,63,090/- |
| 4 | 108 | 25/03/2015 | रु. 6,32,337/- |
| | | एकूण | रु.45,75,332/- |

सदर कामाची नस्ती, मोजमाप नोंदवही यांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्यात.

1) करारनामा नस्तीत आढळुन आला नाही.

2) सदर कामाची मुदत कामाचे आदेश दि.09/09/2014 पासुन 120 दिवस म्हणजे दि.09/01/2015 पर्यंत असताना काम मुदतीत पुर्ण झाले नाही.

3) मक्तेदारास दिलेल्या दि.29/11/2014 व दि.03/12/2014 च्या नोटीसी प्रमाणे दि.20/11/2014 पर्यंत फक्त राफ्ट फाऊंडेशनचे काम पुर्ण झाल्याने कामाची प्रगती योग्य नसल्याबाबत कळविले होते. त्यास मक्तेदाराने दि.16/12/2014 चे पत्रानुसार वाळुचे दर वाढल्याने व वाळु उपलब्ध नसल्याने काम बंद पडल्याचे नमुद करत जादा रक्कम मंजूर करणेस विनंती केली आहे. यावरुन सदरचे काम मुदतीत पुर्ण झालेले नाही.

4) कामाची मुदत 09/01/2015 पर्यंत असताना काम मुदतीत पुर्ण झाल्याचा काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीत आढळुन आला नाही. सदर कामास मा. आयुक्त यांची दंडनिय / विनादंड मुदतवाढ मिळाल्याचे नस्तीत आढळुन आले नाही.

5) निविदा अटी व शर्ती प्रमाणे कामास विलंब झाल्यास ज्या कारणामुळे विलंब झाला ते नमुद करुन मुदत संपण्यापुर्वी 15 दिवसाचे आत मक्तेदाराने अर्ज सादर करुन मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु असा अर्ज नस्तीत आढळुन आला नाही.

6) मक्तेदाराने मुदतीत काम पुर्ण न केल्यास व मुदतीत काम पुर्ण न होऊ शकल्यास पटण्याजोगी कारणे न दिल्यास दंडात्मक कार्यवाही मा. आयुक्त यांचे मान्यतेने करणे आवश्यक असताना अशी

कार्यवाही झाली नाही.
आक्षेपाधीन रक्कम रु.- 4575332/-

DATRNDM7201 (Ref No : 143, Hmm No : 33)

## *7 एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत भगवान नगर येथील घरकुले बांधणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 16**

*लेखा शीर्ष : एकात्मिक गृहनिर्माण शासन निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 31301.00/-

***मोबीलायजेशन अडव्हॉन्स रक्कम रु. 4548679/- साठी दिनांक 12/03/2013 ते 31/05/2013 कालावधीसाठी व्याज दर 14.5 % या दराने र.रु.144080/- व्याज वसूल पात्र होत आहे. परंतु दुसऱ्या धावत्या देयकातून र.रु.142279/- व्याजाची रक्कम वसूली केलेली आहे. उर्वरीत व्याजाची र.रु.1801/- मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावी. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमाप पुस्तकातील मोजमापाची तपासणी करणे. झोपडपट्टीची जागा ही शासकीय मालकीची असून तीचे मनपाकडे हस्तांतर झाल्या बाबतची कागद पत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली नाहीत. कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार पहिले 10 लाखास रु.100/- व त्यापुढील प्रत्येक लाखास रु.100/- प्रमाणे रु.1,15,500 /- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.86000/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित रक्कम रु .29,500 /- ची संबंधीताकडून वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. वाटप केलेल्या घरकुलांच्या ताबा पावती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. स्टीलचा नकाशा नस्तीमध्ये अढळ होत नाही. त्यामुळे कामास वापरणेत आलेले स्टील बरोबर असल्याची तपासणी करता आली. विभागाची ईमारत नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.***

महापालिकेच्या एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रमा अंतर्गत घरकुले बांधणे व परिसर सुधारणे या कामाची देयक नस्ती व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 28 दि. 22/06/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले

असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मक्तेदार श्री एस. बी. खाकाळ यास निविदा अटी व शर्ती नुसार आदेश क्र 6/16, 14 /10.01.2013 नुसार र.रु.7000000/- मोबीलायजेशन अडव्हॉन्स मंजूर करण्यात आला आहे. पहिल्या धावत्या देयकातून मोबीलायजेशन अडव्हॉन्स पोटी दिनांक 10/01/2013 ते 12/03/2013 व्याज दर 14.5 % या दराने व्याज व देयक रकमेच्या 25% अशी रक्कम रु. र 2451321/- वसूल केलेली आहे. उर्वरित मोबीलायजेशन अडव्हॉन्स रक्कम रु.,4548679/- साठी दिनांक 12/03/2013 ते 31/05/2013 कालावधीसाठी व्याज दर 14.5 % या दराने र.रु.144080/- व्याज वसूल पात्र होत आहे. परंतु दुसऱ्या धावत्या देयकातून र.रु.142279/- व्याजाची रक्कम वसूली केलेली आहे. उर्वरीत व्याजाची र.रु.1801/- मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावी .

2) महाराष्ट्र सार्वजनिक बाधकाम नियमावलीतील परिशिष्ट क्र.24 नुसार कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमाप पुस्तकातील मोजमापाची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कार्यकारी अभियंता यांनी व उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकातील मोजमापाची तपासणी केली नाही.

3) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावली नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याआधारे कामाच्या बाबींच्या अंदाजपत्रकात समावेश करणे अपेक्षित आहे. परंतु सदर अहवालाची प्रत निविदा नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

4) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावली परिशिष्ट-24 मधील अ.क्र.12,13 व 15 अन्वये बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईच्या कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्यक आहे. तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्या रोख प्रमाणकाचा क्र.दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे. तथापि मोजमाप पुस्तकातील मोजमापे कर्णरेषेने खोडली नसून गोषवारा तयार केलेली नाही. तसेच गोषवा-याखाली काम पूर्णत्वाचा दिनांक नमुद केलेला नाही.

5) कामासाठी वापरण्यात आलेले स्वाक्षरी नकाशे, एल सेक्शन अंदाजपत्रक संचिकेत आढळून आलेले नाहीत.

6) संबंधित कामाच्या बाबतीत थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) सदरच्या झोपडपट्टीची जागा ही शासकीय मालकीची असून तीचे मनपाकडे हस्तांतर झाल्या बाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली नाहीत.

8) सदरील कामास 3 वेळा मुदत वाढ देवूनही काम अपूर्ण आहे. निविदा अटी व शर्ती क्र. 21 नुसार प्रती दिन र.रु.1000/- दंडाची कार्यवाही केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

9) सदर कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार पहिले 10 लाखास रु.100/- व त्यापुढील प्रत्येक लाखास रु.100/- प्रमाणे रु.1,15,500 /- चे मुंद्राकावर करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.86000/- चे मुंद्राकावर करारनामा करण्यात आला आहे. तरी उर्वरित रक्कम रु.29,500 /- ची संबंधीताकडून वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

10) सदर योजनेंतर्गत 371 सदनिका बांधण्यात आल्या आहेत. त्यापैकी 343 सदनिकांचे लॉटरी पद्धतीने वाटप करण्यात आले आहे. परंतु वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यापैकी 28 लाभार्थी अपात्र ठरले आहेत. त्यामुळे लॉटरी पद्धतीने वाटप करण्यापूर्वीचे लाभार्थी निवडीचे सर्वेक्षण हे सदोष झालेले आहे असे दिसते.

सबब 28 घरकुले बांधकाम पूर्ण होऊन विनावापर पडून आहेत.

11) वाटप केलेल्या घरकुलांच्या ताबा पावती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

12) शा.नि.25 जून 2007 अन्वये सदरील योजने अंतर्गत निर्माण झालेली मालमत्ता सुस्थितीत व देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी असे सूचित केलेले आहे. परतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. सबब शा.नि.यातील तरतुदीचे पालन झालेले नाही.

13) लेखापरीक्षणास सन 2011-12 चा डी.एस.आर.उपलब्ध करून देण्यात आला नसल्याने मोजमाप पुस्तकातील दरांची पडताळणी करता आली नाही.

14) स्टीलचा नकाशा नस्तीमध्ये अढळ होत नाही. त्यामुळे कामास वापरण्यात आलेले स्टील बरोबर असल्याची तपासणी करता आली.

15) निविदा अटी/शर्तीनुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा 1970 व कंत्राटी कामगार कायदा नियम 1971 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना कंत्राटातील नमूद कामगारांचा भविष्य निर्वाह निधी, इ.एस.आय. त्यांचे खाती जमा केलेबाबत तसेच किमान वेतन कायद्यानुसार कामगारांना वेतन दिल्याची कागदपत्रे तपासणीस उपलब्ध झाली नाहीत.

16) विभागाची ईमारत नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही.

वसुल पात्र रक्कम : व्याज र.रु. 1801/

मुद्रांक शुल्क 29500/-

DATVRKM8002 (Ref No : 15, Hmm No : 28)

## *8 प्र.क्र. 68 लोधीपुलाजवळ गलिच्छ वस्ती येथे विविध सुधारणा या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष : गलिच्छ वस्ती सुधारण शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 105168.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 84289.00/-

***मोजमाप नोंदवहीत काम चालू झाल्याबाबत घेतलेल्या नोंदी व प्रत्यक्ष सुरु झालेले काम यामध्ये विसंगती दिसत असून काम विलंबाने सुरु केल्याचे दिसत आहे. विमा रक्कम रु.50984/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.31295/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे. स्टीलची सविस्तर मोजमापे घेतलेली नाहीत. स्टीलचा नकाशा नस्तीमध्ये अढळ होत नाही. त्यामुळे कामास वापरणेत आलेले स्टील बरोबर असल्याची तपासणी करता आली नाही. त्या ठिकाणी माईल्ड स्टील 0.40 मे.टन व टॉरस्टील 1.20 मे.टन फक्त एवढेच नमूद केले आहे. त्यामुळे स्टीलची मापे अंदाजे घेतली***

***आहेत. स्टील खरेदीची चलने उपलब्ध केलेली नाहीत.***

महापालिकेच्या नगर अभियंता विभागाने गलिच्छ वस्ती सुधारणा योजना अंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांचेकडील क्र.सावि/९/नपा/आरआर/383/12/दिनांक6/12/2012 चे प्रशासकीय आदेशान्वये प्र.क्र. 68 लोधीपुरा गलिच्छ वस्ती सुधारणा करणे या कामाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या कामाची निविदा नस्ती, मोजमाप पुस्तिका व पहिले धावते देयकाची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.31 दि. 22/06/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता, विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मोजमाप पुस्तिका न. 01 मध्ये पान क्र. 84 वरील गोषवाऱ्याची रक्कम रु.16,85,389/- होत आहे. परंतु मक्तेदारास रक्कम रु.16,87,399/- अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे मक्तेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु.2,010/- वसूल करून शासना खाती भरणा करावी.

2) मोजमाप पुस्तिका न. 01 मध्ये पान क्र. 84 वरील नोंदी नुसार दिनांक 25/9/2013 कामास सुरवात झाल्याचे नमूद केले आहे. परंतु सार्व. अभियंता यांचे दिनांक 25/10/2013 (कार्यादेश दिल्यानंतर 30 दिवसानंतर ) व 9/12/2013 (कार्यादेश दिल्यानंतर 84 दिवसानंतर ) व नगर अभियंता यांचे 10/12/2013 च्या पत्रान्वये (कार्यादेश दिल्यानंतर 85 दिवसानंतर ) मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांना 48 तासांत काम चालू करण्याचे आदेश दिलेला आहे, अन्यथा सुरक्षित रक्कम वसुली करण्यात येईल, असे कळविले आहे. म्हणजेच मोजमाप नोंदवहीत काम चालू झाल्याबाबत घेतलेल्या नोंदी व प्रत्यक्ष सुरु झालेले काम यामध्ये विसंगती दिसत असून काम विलंबाने सुरु केल्याचे दिसत आहे. विलंबाने काम सुरु करूनही मक्तेदारावर दंडात्मक कार्यवाही किंवा विलंबापोटी दंड वसूल केलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास 1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनी-2300/सहविमा/जिप-2 दि. दि.07 जानेवारी 2004 नुसार मंजूर निविदा रकमेच्या 1% विमा कामासाठी व कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा निधीत भरणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. धावत्या बिलातून 1% विमा रक्कम वसूल केलेली नाही. मक्तेदाराकडून विमा रक्कम रु.50,984/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.

4) महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र.108 कामगार-7, दिनांक 17/06/2010 अन्वये उपकराची रक्कम 1 टक्का वसूल करणे आवश्यक आहे. परंतु पहिल्या धावत्या बिलातून रक्कम रु.31,295/- वसूल केलेली नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.31,295/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे.

5) सार्जनिक बांधकाम नियमावली मधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये मापे सविस्तर लिहिणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तिका न.01मध्ये पान क्र.93वरील आयटम न.12 नुसार स्टीलच्या संबधीत आहे

.परंतु स्टीलची सविस्तर मोजमापे घेतलेली नाहीत. स्टीलचा नकाशा नस्तीमध्ये अढळ होत नाही. त्यामुळे कामास वापरणेत आलेले स्टील बरोबर असल्याची तपासणी करता आली नाही. त्या ठिकाणी माईल्ड स्टील 0.40 मे.टन व टॉरस्टील 1.20 मे.टन फक्त एवढेच नमूद केले आहे. त्यामुळे स्टीलची मापे अंदाजे घेतली आहेत. स्टील खरेदीची चलने उपलब्ध केलेली नाहीत. स्टीलच्या वापरासाठी प्रदान करणेत आलेली रक्कम रु.105168/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

6) कामाचे फोटो नस्तीत उपलब्ध नाहीत, त्यामुळे प्रशासकीय मान्येते मधील अटीचे पालन होत नाही.

वसुलपात्र रक्कम 1)विमा रक्कम रु. 50984/-
2)उपकर रक्कम रु. 31295/-
3)अतिप्रदान रक्कम रु..2010/-
एकूण वसूलपात्र रक्कम =84289/-
आक्षेपधिन रक्कम= स्टीलच्या वापरसाठी प्रदान करणेत आलेली रक्कम रु. 1,05,168 /-

DATVRKM8002 (Ref No : 18, Hmm No : 31)

## *9 मनपा हद्दीतील बुधवारपेठ सि.स.नं. 8746/1अ, बाळीवेस राजूबाई मॅटर्निटी होम बांधा, वापरा व हस्तांतरित करा कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष : बांधा, वापरा व हस्ता मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***कामाची जागा मनपाचे ताब्यात नसताना विकसकास आदेश देणेत आले आहेत. कामाची मुदत संपली असली तरी काम पूर्ण केले नाही. विकसकासकाने कामास विलंब केला असल्याने दंडाची कार्यवाही केली नाही. कामामध्ये वाढ केल्याने त्यास फेर बांधकाम परवानगी घेणेत आली नाही. मनपास निश्चित कोणता गाळा द्यायचा आहे याबाबत करारनाम्यात उल्लेख केलेला नाही. विकासकाकडून काम पूर्ण करण्यास जेवढा विलंब केला जाईल भविष्यात तेवढा कालावधीसाठी मनपा मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्नापासून वंचित राहणार आहे. तसेच इमारतीचे आयुर्मान कमी होत आहे.***

मनपा हद्दीतील बुधवारपेठ सि.स.नं. 8746/1अ, बाळीवेस राजूबाई मॅटर्निटी होम बांधा, वापरा व हस्तांतरित करा कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.
1.कामाची मूळ किंमत रक्कम रु.3.00 कोटी.

2. एकूण बांधकाम - 3599.00 चौ. मी. बांधणे.

3. काम मंजूर - मनपा सर्वसाधारण समिती ठराव क्र. 202 दि.21/11/2008.

4. काम करणेसाठी मनपाची ऑफार रक्कम रु. 51.00 लाख.

5. काम मंजूर रक्कम रु.55.00 लाख.

6. काम मंजूर - स्थायी समिती ठराव क्र.2792 दि.26/02/2010.

7. ठेकेदाराचे नाव - मे.मंत्री चंडक कान्स्ट्रक्शन.

8. आदेश क्र. नअ/एचओ/31 दि. 06/04/2010.

9. काम पूर्ण करणेचा कालावधी - 24 महिने.

10. इमारत वापरणेचा कालावधी - 30 वर्षे.

11. मनापास बांधून द्यावयाचे क्षेत्रफळ - 1) तळघर - 300 चौ. मी. पार्किंग

2) दुसरा मजला - 295 चौ. मी. वाणिज्य व हॉस्पिटल

3) तिसरा मजला - 295 चौ. मी. वाणिज्य व हॉस्पिटल

4) चौथा मजला - 731 चौ. मी. हॉस्पिटल

एकूण - 1321 चौ. मी.

12. बांधकाम परवाना क्र. 1677 दि. 29/01/2011.

सदर कामाची नस्तीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.54 दि.14/08/2017 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.नअ/नागरीकामे/985 दि.18/09/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)मनपाने काम करणेसाठी विकसकास कामाचे आदेश दि.06/04/2010 रोजी देण्यात आले असून कामाची जागा दि.13/10/2011 रोजी त्यांना ताब्यात दिली आहे. कामाची जागा विकसकास ताब्यात न देता कामाचे आदेश देणे हे नियमबाह्य आहे.

निविदा प्रक्रिया पूर्ण होईतोपर्यंत अतिक्रमणीत जागा रिकामी करून घेता येईल या आशेने कार्यवाही करणेत आली आहे. भाडेपट्ट्याने दिलेल्या जागेस अनुसरून अद्यापही हायकोर्टात रिट पिटीशन व्दारा दावा चालू आहे. असे खात्याने कळविले आहे.

निविदेची कार्यवाही करून विकसकास कामाची जागा ताब्यात नसताना कामाचे आदेश देणे हे नियमबाह्य असल्याने खात्याने सादर केलेले अनुपालन संयुक्तिक नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2) करारनाम्याप्रमाणे सदरचे काम जागा ताब्यात दिल्यानंतर 24 महिन्यात म्हणजे दि.12/10/2013 अखेर संपूर्णतः पूर्ण करणेचे होते. परंतु ते लेखापरीक्षण कालावधीत म्हणजे माहे.जुलै 2017 अखेर पूर्ण केलेले नाही.

कामाची जागा मनपाचे नाव दाखल करणेस विलंब झाला असून विकासकाकडून विलंबाबाबत दंड आकारणी चालू आहे असे खात्याने कळविले आहे.

विकासकाकडून दंडाची रक्कम वसूल केलीची प्रत्यक्ष कार्यवाही केली नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) करारनामा दि.31/03/2010 मधील अट क्र.5 नुसार मनपास 1321 चौ. मी. बांधून द्यावयाचे बांधकाम हे 18 महिन्यात म्हणजे दि.12/04/2013 अखेर पूर्ण करून देण्याचे होते. कामास विलंब झाल्यास दररोज रक्कम रु.1,000/- इतका दंड आकारला जाईल अशी तरतूद आहे. विकासकाने सदरचे काम मुदतीत केले नसल्याने त्यांचेकडून दंडाची वसुली करणे आवश्यक होते. परंतु मनपाने संबधीताकडून दंडाची वसुली केलेली नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार कार्यवाही चालू असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

4) मा.आयुक्त यांचेकडे सादर केलेला अहवाल क्र.2526 दि.20/12/2013 नुसार कामामध्ये वाढ केल्याने त्यास फेर बांधकाम परवानगी घेणेत आली आहे असे नमूद केले आहे. परंतु कामाचे नस्तीमध्ये वाढीव बांधकामाचे बांधकाम परवानगी, नवीन करारनामा, बांधकाम परवानानुसार वाढीव प्रिमियम मनापास भरल्याचे चलन इ. कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.

फेर प्रस्तावास बांधकाम परवाना प्राप्त होणेचे आहे असे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणायत येत आहे.

5) विकासकाने मुदतीत काम केले नसल्याने नागरिकांना हॉस्पिटलच्या सेवेचा लाभ मिळालेला नाही.

काम पूर्ण करून हॉस्पिटलच्या सेवेचा लाभ देण्यात येईल असे खात्याने कळविले असल्याने आक्षेप कायम करण्यत येत आहे.

6) मनपास निश्चित कोणता गाळा द्यायचा ? हे करारनाम्यामध्ये नमूद केले नाही.

करारपत्रात क्षेत्रफळ नमूद केले आहे असे खात्याने कळविले आहे. आक्षेपानुसार अनुपालन सादर केले नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

7) विकासकाकडून काम पूर्ण करण्यास जेवढा विलंब केला जाईल भविष्यात तेवढा कालावधीसाठी मनपा मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्नापासून वंचित राहणार आहे. तसेच इमारतीचे आयुर्मान कमी होत आहे.

योजना सत्वर पूर्ण करून घेणेत येत आहे असे खात्याने कळविले आहे. काम पूर्ण केले नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 32, Hmm No : 54)

## *10 मनपा हद्दीतील टी.पी. 4 फायनल प्लॉट नं. 89 मनपा शाळा क्र.27 समोरील जागेमध्ये BOT तत्वावर शाळा व बस टर्मिनल बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :BOT मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***विकासकाने काम मुदतीत केले नसल्याने त्यांचेकडून दंडाची वसुली केली नाही. कामाची जागा अतिक्रमणामुळे मनपाचे ताब्यात नसताना मनपाने विकासकाशी करारनामा केला आहे. विकासकाने मुदतीत काम केले नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेचा व परिवहन विभागास बस टर्मिनलचा लाभ मिळालेला नाही. विकासकाकडून काम पूर्ण करण्यास जेवढा विलंब केला जाईल भविष्यात तेवढा कालावधीसाठी मनपास मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्नापासून वंचित राहणार आहे. तसेच इमारतीचे आयुर्मान कमी होत आहे.***

मनपा हद्दीतील टी.पी. 4 फायनल प्लॉट नं. 89 मनपा शाळा क्र.27 समोरील जागेमध्ये BOT तत्वावर शाळा व बस टर्मिनल बांधणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.कामाची मूळ किंमत रक्कम रु.7.19 कोटी.

2. एकूण बांधकाम - 7636.00 चौ. मी. बांधणे.

3. काम मंजूर - मनपा सर्वसाधारण समिती ठराव क्र. 149 दि.09/08/2010.

4. काम करणेसाठी मनपाची ऑफार रक्कम रु. 1.64 कोटी.

5. काम मंजूर रक्कम रु.1.08 कोटी.

6. काम मंजूर - स्थायी समिती ठराव क्र. 896 दि.30/10/2010.

7. ठेकेदाराचे नाव - मे. विशाल निर्मिती, पुणे.

8. आदेश क्र. नअ/एचओ/2351 दि. 14/02/2011.

9. काम पूर्ण करणेचा कालावधी - 24 महिने.

10. इमारत वापरणेचा कालावधी - 29 वर्षे 11 महिने.

11. मनापास बांधून द्यावयाचे क्षेत्रफळ - 1) शाळासाठी - 847.14 चौ. मी.
2) बस टर्मिनलसाठी - 1080.00 चौ. मी.
एकूण - 1927.14 चौ. मी.

12. बांधकाम परवाना क्र. 1042 दि. 30/08/2010.

13. कामाचा करारनामा - दि. 01/02/2011.

14. विकासकाच्या जागा ताब्यात दिल्याचा दि. 04/10/2012.

सदर कामाच्या नस्तीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.56 दि.14/08/2017 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.नअ/नागरीकामे/986 दि.18/09/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) करारनामा मधील अट क्र.12 नुसार मनपस 1927.14 चौ. मी. बांधून द्यावयाचे बांधकाम हे जागा ताब्यात दिल्यापासून 24 महिन्यात म्हणजे दि.03/10/2014 अखेर पूर्ण करून देण्याचे होते. कामास विलंब झाल्यास दररोज रक्कम रु.1,000/- इतका दंड आकारला जाईल अशी तरतूद आहे. विकासकाने सदरचे काम मुदतीत केले नसल्याने त्यांचेकडून दंडाची वसुली करणे आवश्यक होते. परंतु मनपाने संबधीताकडून दंडाची वसुली केलेली नाही.

कामाची जागा प्रॉपर्टी कार्डवर मनपाचे नाव दाखल केले नसल्याने काम तहकूब ठेवणेत आले आहे त्यामुळे दंडाची आकारणी करणेत आले नाही असे खात्याने कळविले आहे. खात्याने केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

2) सदर कामाची जागा अतिक्रमणामुळे मनपाचे ताब्यात नसताना मनपाने विकासकाशी करारनामा केला आहे हे नियमबाह्य आहे.

जागेवरील अतिक्रमणे पोलीस बंदोबस्त व पर्यायी व्यवस्था करून जागा ताब्यात घेण्यास विलंब लागला असे खात्याने कळविले आहे.

जागा ताब्यात नसताना विकासकाशी करारनामा करणे योग्य नसल्याने खुलासा मान्य करता येत नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) विकासकाने मुदतीत काम केले नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेचा व परिवहन विभागास बस टर्मिनलचा लाभ मिळालेला नाही.

कामाची जागा प्रॉपर्टी कार्डवर मनपाचे नाव दाखल केले नसल्याने कामास विलंब झाला असे खात्याने कळविले आहे.

कामाची जागा प्रॉपर्टी कार्डवर मनपाचे नाव दाखल कधी दाखल केले याबाबत खुलासा केला नाही व विलंबाबाबत सविस्तर स्पष्टीकरण केले नसल्याने अनुपालन मान्य करता येत नाही.

4) विकासकाकडून काम पूर्ण करण्यास जेवढा विलंब केला जाईल भविष्यात तेवढा कालावधीसाठी मनपास मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्नापासून वंचित राहणार आहे. तसेच इमारतीचे आयुर्मान कमी होत आहे.

बांधकाम चालू असल्याचे खात्याने कळविले असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 33, Hmm No : 56)

## *11 महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे कंपाउंड वॉल बांधणे (बाहेरून) कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष : भांडवली कामे. मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4418218.00/-

***कामाच्या बी1 मधील निविदा अटी व शर्ती नस्तीसोबत जोडण्यात आल्या नाहीत. कामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतल्याचे कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून आली नाही. ठेकेदारास अग्रीम देण्यास अटी व शर्ती मध्ये उल्लेख केला नसताना अग्रीम देण्यात आला आहे. तसेच अग्रीम देणेबाबत स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली नाही. अग्रीमाची रक्कम देणे करारनाम्यामध्ये अट नसल्याने त्या रकमेवर व्याजाची रक्कम परिगणना करून वसूल करण्यात यावी. कामास वापराणेत आलेले वाळु, खडी, मुरूम इ. साहित्याचा शासकीय प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल नस्तीमध्ये नाही. काम लेखापरीक्षणाचे कालावधी म्हणजे माहे. जून 2017 पर्यंत अपुर्ण होते. कामास मुदतवाढ मंजूर न करता कामाचे देयक प्रदान केल्याचे दिसून येत आहे. कामास सक्षम प्राधिकाऱ्याची व स्थायी समितीची निविदा मान्यता घेण्यात आली नसल्याचे दिसून येत आहे. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.***

महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे कंपाउंड वॉल बाहेरून बांधणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.81,33,.518/-

2. निविदा रक्कम रु.73,94,107/-

3. निविदा मान्यता - मा.आयुक्त यांची मान्य टिपणी दि.31/01/2014

4. लेखाशिर्ष - भांडवली कामे.

5. निधी - मनपा.

6. ठेकेदाराचे नाव - मे.सागर कन्स्ट्रक्शन.

7. कार्यारंभ आदेश क्र. नअ/2061 दि.21/02/2014 (3% कमी दराने)

8. कामाचा कालावधी - 90 दिवस.(21/02/2014 ते 21/052014)

9. एकूण खर्च रु.44,18,218/- (आगाऊ रक्कम रु. 33,61,539/-)

10. मोजमाप पुस्तक क्र.29.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 50 दि.04/08/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)कामाच्या बी1 मधील निविदा अटी व शर्ती नस्तीसोबत जोडण्यात आल्या नाहीत.

2) सदर कामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतल्याचे कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून आली नाही.

3) ठेकेदारास कामापोटी अज्ञापत्रक क्र.6/1075 दि.24/02/2014 अन्वये रक्कम रु.18,40,000/- खात्यामार्फत आगाऊ प्रदान करण्यात आले आहे. पूर्वीचा अग्रीम सामोजित न करता पुन्हा अज्ञापत्रक क्र.6/43 दि.23/04/2014 अन्वये रक्कम रु.15,21,539/- खात्यामार्फत आगाऊ प्रदान करण्यात आले आहे. ठेकेदारास अग्रीम देण्यास अटी व शर्ती मध्ये उल्लेख केला नसताना अग्रीम देण्यात आला आहे. तसेच अग्रीम देणेबाबत स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली नाही. अग्रीमाची रक्कम देणे काररनाम्यामध्ये अट नसल्याने त्या रकमेवर व्याजाची रक्कम परिगणना करून वसूल करण्यात यावी.

4) कामास वापराणेत आलेले वाळु, खडी, मुरूम इ. साहित्याचा शासकीय प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल नस्तीमध्ये नाही.

5) सदरचे काम लेखापरीक्षणाचे कालावधी माहे. जून 2017 पर्यंत अपुर्ण असल्याने कामावर खर्च करण्यात आलेली रक्कम रु.44,18,218/- गुंतून पडली आहे. त्यामुळे सदराची रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

6) काम पूर्ण करण्याची मूळ मुदत दि.21/05/2014 अखेर होती. कामाचे पहिले देयकाची मोजमाप पुस्तकातील नोंदी पाहता दि.26/06/2014 पर्यंत काम केल्याचे नमूद करण्यात आले आहे. कामास मुदतवाढ मंजूर न करता कामाचे देयक प्रदान केल्याचे दिसून येत आहे.

7) कामाची तातडी पाहता कामाची जाहीर निविदा न काढता निविदा निश्चित करण्यात आली आहे. तदनंतर महाराष्ट्र महापालिका अधिनियमामधील तरतुदीनुसार 45 दिवसाचे आत सदर कामास सक्षम प्राधिकाऱ्याची व स्थायी समितीची निविदा मान्यता घेण्यात आली नसल्याचे दिसून येत आहे.

8) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 37, Hmm No : 50)

### *12 घनकचरा विभागासाठी वित्तीय वर्ष 2014-15 साठी खरेदी करण्यात आलेल्या 1.1 घनमिटरचे कंटेनर, 4.5 घनमिटरचे कंटेनर व Handcart इ. च्या खरेदीमधील अनियमितताबाबत..*

सोलापूर महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष :13 वा वित्त आयोग शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 12518755.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 12518755.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 609132.00/-

***सदरच्या साहित्याच्या खरेदीची आवश्यकता असल्याचे विभागाचे अभिप्राय नस्तीत दिसून आले नाहीत. सदरच्या कामाची निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक असताना निविदेची अट शिथिल केली आहे. तसेच सदरच्या दरांची बाजारभावाप्रमाणे दराशी तुलना केली नाही. निधी उपलब्ध नसताना खरेदी प्रस्तावित केली आहे. हे नियमबाहय आहे. साहित्याचे स्पेसिफिकेशनमध्ये बदल करण्यात आल्याने पूर्वीच्या दराने खरेदी करणे चुकीचे असून निविदा मागवल्या असत्या तर निविदेमध्ये ठेकेदारांद्वारे दर कमी नमूद केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. Test Report नसताना बिले अदा केल्याने रक्कम रु.1,25,18,755/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. सदरच्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही. स्पेसिफिकेशननुसार माल पुरवल्याबाबतचा आरोग्याधिकारी यांचा दाखला नस्तीत प्रकरणी समाविष्ट नाही. देयक अदा करताना 5% मूल्यवर्धित कराची रक्कम पुरवठादाराच्या दरामध्ये समाविष्ट करून दिले आहेत. त्यामुळे पुरवठादारास रक्कम रु.6,09,132/- चे अतिप्रदान झाले.***

**कामाचा तपशील -:**

मंजूर पुरवठादाराचे 2013-14 मधील खरेदीचे दर

तक्ता -

| अ.क्र. | खरेदीची बाब | पुरवठादाराचे नांव | पूर्वीचे दर |
|---|---|---|---|
| 1 | 1.1 घनमिटरचे कंटेनर | प्रगती स्टील फेब्रीकेशन व फायबर्स | 19,985/- |
| 2 | 4.5 घनमिटरचे कंटेनर | प्रगती स्टील फेब्रीकेशन व फायबर्स | 43,434/- |
| 3. | Handcart, 100lit. Capacity | प्रगती स्टील फेब्रीकेशन व फायबर्स | 7200/- |

महानगरपालिका सोलापुर येथे आरोग्य खात्यामार्फत 2014-15 साठी टिपणी क्र.182/ दि.02/09/2014 नुसार 2013-14 मधील अखर्चित रक्कम रु.28,34,292/- मधून खालीलप्रमाणे जाहीर प्रसिद्धीद्वारे निविदेची अट मा. स्थायी समितीकडून शिथिल करून खरेदी करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला.

तक्ता- A)

| अ.क्र. | खरेदीची बाब | नग | खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 1.1 घनमिटरचे कंटेनर | 35 | 6,99,475/- |
| 2 | 4.5 घनमिटरचे कंटेनर | 20 | 8,68,180/- |
| 3. | Handcart, 100lit. Capacity | 172 | 12,38,400/- |
| | एकूण खर्च | | 28,06,055/- |

तथापि जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेमधून 50.00 लाख निधी व मनपा निधीमधून 50.00 लाख निधी उपलब्ध करून वरील तक्ता A मधील नगांची तसेच खालील तक्ता B मधील प्रस्तावित खरेदीस करण्याबाबत स्थायी समितीकडे प्रस्ताव सदर केला. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र.279 दि.09/09/14 नुसार तक्ता A व B मधील खरेदीस पूर्वीच्या मक्तेदाराकडून (प्रगती स्टील फेब्रीकेशन व फायबर्स) खरेदी करण्यास व जाहीर प्रसिदधीकारणाची अट शिथिल करण्यास मान्यता देण्यात आली.

तक्ता- B)

| अ.क्र. | खरेदीची बाब | नग | खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | 1.1 घनमिटरचे कंटेनर | 160 | 31,97,600/- |
| 2 | 4.5 घनमिटरचे कंटेनर | 150 | 65,15,100/- |
| | एकूण खर्च | | 97,12,700/- |

प्रस्तावित एकूण खरेदी = रक्कम रु.1,25,18,755/-

उपरोक्त खर्चाची नस्तीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळल्या.

1) सदरच्या साहित्याच्या खरेदीची आवश्यता असल्याचे विभागाचे अभिप्राय नस्तीत दिसून आले नाहीत. आवश्यकतेबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

2) सदरच्या कामाची निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक असताना निविदेची अट शिथिल केली आहे. तसेच सदरच्या दरांची बाजारभावाप्रमाणे दराशी तुलना केली नाही.

3) निधी उपलब्ध नसताना खरेदी प्रस्तावित केली आहे. हे नियमबाह्य आहे.

4) साहित्याचे स्पेसिफिकेशनमध्ये बदल करण्यात आल्याने पूर्वीच्या दराने खरेदी करणे चुकीचे असून निविदा मागवल्या असत्या तर निविदेमध्ये ठेकेदारांद्वारे दर कमी नमूद केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. निविदा न मागवल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त झाले नाहीत.

5) साहित्याचे स्पेसिफिकेशनमध्ये बदल करण्यात आल्याने विधी सल्लागार यांचे अभिप्राय जा.क्र./विस/अभि/14/I/383 दि.16/02/15 नुसार नव्याने करारनामा करणे आवश्यक होते, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

6) देयके अदा करण्यापूर्वी साहित्याचा महाराष्ट्र शासन औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर यांचेकडून Test Report तपासुन घेतलेला नाही. त्यामुळे साहित्याच्या दर्जाची खात्री पटत नाही. Test Report नसताना बिले अदा केल्याने रक्कम रु.1,25,18,755/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

7) कामाचा जुना करारनामा व पुरवठा आदेश नस्तीत उपलब्ध झाले नाहीत, ती उपलब्ध करावीत.

8) मालाचा पुरवठा केल्याबाबतची डिलिव्हरी चलने नस्तीत नसल्याने मालाचा केव्हा पुरवठा केला? याची खात्री होत नाही.

9) सदरच्या कामांची रक्कम रु.1,25,18,755/- च्या खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे देयकातून कपात करावयाच्या रक्कमांची तपासणी करता आली नाही.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | बिल क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | 1.1 घनमिटरचे कंटेनर | 08 | 25.06.14 | 17,98,650/- |
| 2. | 4.5 घनमिटरचे कंटेनर | 03 | 26.05.13 | 16,07,058/- |
| 3. | Handcart | 12 | 15.07.14 | 12,60,000/- |
| | एकूण खरेदीची रक्कम | | | 46,65,708/- |

10) सदरच्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही.

11) स्पेसिफिकेशननुसार माल पुरवल्याबाबतचा आरोग्याधिकारी यांचा दाखला नस्तीत प्रकरणी समाविष्ट नाही.

12) डी.एस. विभागाकडील साठा नोंदवहीची तपासणी केली असता पृष्ठ क्र. 94, 95 व 99 वर खालीलप्रमाणे नोंदी आढळून आल्या.

| पृ. क्र. | बाब | प्राप्त नग | प्रमानक क्र. व दिनांक | माल मिळाल्याचा दिनांक | रक्कम रु.( निविदा दर + 5% विक्रीकर) |
|---|---|---|---|---|---|
| 94 | 4.5 घनमीटरचे कंटेनर | 20 | 17/2014-15 | 71/दि.9.12.14 | 868680 + 43434 |
| 99 | 1.1 घनमीटरचे कंटेनर | 160 | 28/दि.13/09/14 | 28/दि.13/09/14 | 3045332+152266 |
| 95 | 1.1 घनमीटरचे कंटेनर | 35 | 16/2014-15 | 70/ दि.9.12.14 | 699475 + 41269 |
| 99 | 4.5 घनमीटरचे कंटेनर | 150 | 29/ दि.2/6/16 | 16/ दि.26/8/15 | 6204836+310243 |
| 96 | Handcart | 172 | 4/दि.6/05/15 | 5/दि.29/5/15 | 1238400 + 61920 |

1) उपरोक्त नोंदीवरून मालाचा पुरवठा विलंबाने केलेला दिसत आहे, परंतु करारनामा व पुरवठा आदेश उपलब्ध न झाल्याने विलंब आकाराची गणना करता आली नाही, तथापि विलंब आकाराची गणना करून पुरवठादाराकडून विलंब दंड वसूल करणेत यावा.

2) निविदा अट क्र.5 नुसार निविदाकारांनी निविदा दर हे सर्व करासहित नमूद कारानेबाबर कळवले होते, परंतु देयक अदा करताना 5% मूल्यवर्धित कराची रक्कम पुरवठादाराच्या दरामध्ये समाविष्ट करून दिले आहेत. त्यामुळे पुरवठादारास रक्कम रु.6,09,132/- चे अतिप्रदान झालेचे दिसत आहे.

DGPAGPM8503 (Ref No : 41, Hmm No : 104)

## *13 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घराघरातून कचरा संकलन, वर्गीकरण व वाहतूक मक्त्यातील अनियमितता......*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 20**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 13684704.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 23245786.00/-

***सोलापूर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून लेखापरीक्षणाकरिता अभिलेख उपलब्ध झाले. त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे आढळून येते. सदरच्या निविदेचा तांत्रिक लिफाफा व फॉयन्सील बीड उपलब्ध झालेले नाही, सदरच्या कामाचा DPR लेखापरिक्षण करताना उपलब्ध करून देण्यांत आला नाही. 12 व्या वित्त आयोगाकडून रक्कम रु.6,00,39,378/- एवढा निधी प्राप्त झाला असून या कामावरील वार्षिक खर्च रु.9,39,00,000/-एवढा असल्याने सदर प्राप्त निधी आठ महिन्याकरिता पूरणार असल्याने उर्वरित कालावधीकरिता निधीची तरतुद कोणत्या लेखाशिर्षातुन करण्यात आली याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही. शासन निर्णय नगरविकास,विभाग,क्र. घनव्य /1006/प्र.क्र. 53/ नवि.16 दिनांक 26/10/2006 परिच्छेद क्र 28 नुसार कंत्रादारांना द्यावयाची रक्कमेचे दर हे टनावर आधारित नसावेत असे स्पष्ट नमूद असतांना मनपा ने प्रती टन 650/-प्रमाणे दर मंजुर केले हे नियमबाह्य आहे. सदर कामाचे Third Party Audit करणे आवश्यक असतांना Third Party Audit केलेले आढळून येत नाही. विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. प्रविनी -2300/सहविमा/ जिप-2 दि.07 जानेवारी 2004 नुसार मंजूर निविदा रकमेच्या 1% विमा कामासाठी व कामगाराच्या सुरक्षेसाठी विमा निधीत भरणे आवश्यक असून 1% प्रमाणे विमा रक्कम वसूल केलेली नाही. त्यामुळे विमा रक्कम रु.1,14,30,393/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्र.बीसीए-2009 /प्रक्र108/कामगार7 दिनांक17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1% प्रमाणे उपकरची रक्कम रु.1,14,30,393/- वसुल करुन शासकीय निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे. शासन निर्णय 2006 च्या निर्णयातील परिच्छेद 78 ते 80 अ नुसार ही प्रक्रिया आर्थिकदृष्ट्या परवडणारी असावी यासाठी सर्व स्तरावरील कचरा उत्पादकाकडून सेवाकर वसुलीबाबत कार्यवाही केलेली नाही. सदरच्या कच-याव्दारे डेब्रिज गोळा करावयचा नसल्याने स्वतंत्ररित्या डेब्रिज विल्हेवाट बाबत कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत हे नस्तीमध्ये आढळून येत नाही. वाहनाचे लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे प्रत्र नस्तीला आहे. परंतु कॉम्पॅक्टरचे भाडे दर पत्रामध्ये नमूद नाही. P.W.D. मॅन्युअलतील पृष्ठ क्र 87 परिच्छेद क्र 214 नुसार सुरक्षा रक्कम ही 50% काम सुरु करण्यापूर्वी व 50% बिलातून कपात करणे आवश्यक आहे, परंतु देयकाच्या रक्कमेच्या 2% रक्कम वसूल केलेली आहे. सुरक्षा***

| |
|---|
| ***रक्कमेचे बँक FD तपासणी करिता उपलब्ध झालेली नाही. वजन काटा प्रमाणीत केल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध झालेली नाही. वजनाची बिले पुरविण्यात आलेली नाहीत. सोलापूर बॉयोएर्नजी वेस्ट 300 टन अधिकवजा 20 % असून किती कचरा बॉयोएर्नजी वेस्टला दिला याचा अभिलेख उपलब्ध झालेला नाही. बजेट अभिप्राय जा क्र मुले-6/359 दि. 27/12/2011 नुसार रक्कम रु.60039378/- एवढी तरतूद होती, याऐवजी डेब्रिज व हिरवा कचरा यासाठी किती दर ठरविला व किती रक्कम खर्च केली याची माहिती उपलब्ध झालेली नाही. थर्डपार्टी तांत्रिक लेखापरीक्षण याचा उल्लेख करारामध्ये नाही. शासन निर्णय नगरविकास,विभाग,क्र.घनव्य/1006/ प्र.क्र.53/नवि.16 दिनांक 26/10/2006 परिच्छेद क्र 59 ते 69 मध्ये असलेल्या तरतुदी नुसार खाजगी क्षेत्राचा सहभाग असणे आवश्यक आहे. परंतू त्यानुसार अंबलबजावणी केलेली आढळून येत नाही. सर्व कचरा वाहनाचे Net weight (रिकाम्या गाड्याचे) वजन प्रमाणीत केल्याबाबतचा अभिलेख नस्तीत आढळत नाही. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची-1 मधील तरतुदी नुसार करारनामा करतांना 10 लाखाच्या कामाकरिता रु.100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखाकरिता 100/- यानुसार रक्कम रु.114,30,39,315/- च्या करारनाम्याकरिता फक्त रक्कम रु.1,15,000/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला असल्याने, मुद्रांक शुल्काची रक्कम रु.385000/- वसूलपात्र आहे.*** |

सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घराघरातून कचरा संकलन, वर्गीकरण व वाहतूक याकरिता जाहीर सोलापूर महानगरपालिकेकडून निविदा मागविल्या असता तीन वेळा जाहीर निविदेस पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने तीन वेळेस निविदा प्रक्रिया रद्दबदल ठरल्याने दि.18/07/2011 रोजी चौथ्या वेळेस जाहीर निविदा प्रसिध्द केली असता तीन निविदा पुढीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्यात (1) मे. समीक्षा क्न्स्ट्रक्शन कंपनी ठाणे प्रती टन दर रु.650/- (2)रॅमके एन्व्हीरो प्रती टन दर रु.756/- (3) अजिंक्य बायोफर्ट प्रती टन दर रु.950/- त्यापैकी मे.समीक्षा क्न्स्ट्रक्शन कंपनी ठाणे प्रती टन दर रु.650/- कमी असल्याने त्यांची निविदा मान्य करण्यात आली. सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे वित्तीय वर्ष 2014-15 मधील घराघरातून कचरा संकलन,वर्गीकरण व वाहतूक निविदाबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

## कामाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| 01 | मक्तेदाराचे नाव | मे समीक्षा क्न्स्टक्शन कंपनी ठाणे |
| 02 | मक्त्याची रक्कम | 114,30,39,315/- |
| 03 | स्थायी सभेची मान्यता | विषय क्र 1060 ठराव क्र 1074 अन्वये दिनांक 24/02/12 नुसार मान्यता |
| 04 | बजेट तरतूद 2013-2014 | मुख्य लेखापाल जा क्र मुले-6/359 दि.27/12/2011 12 व्या वित्त आयोगातंर्गत अनुदान रक्कम रु.60039378/- |
| 05 | निविदा जाहिरात दिनांक | दि.18/07/2011 |

| | | |
|---|---|---|
| 06 | दैनिकाचे नाव | मुंबई सकाळ, टाईम्स ऑफ इंडिया |
| 07 | सुरक्षा रक्कम | रु.22860786/- एकूण किमंतीच्या 2% |
| 08 | कामाचा कालावधी | 10 वर्षाकरिता |
| 09 | करारनामा मुद्रांक शुल्क | 115000/- |
| 10 | कार्यादेश | जा क्र 44 दि. 08/06/2012 |
| 11 | धावते / अंतिम देयक रक्कम | 01. देयक क्र. 83/30.12.2014 रु.813982/-<br>02. देयक क्र. 84/30.12.2014 रु.1169623/-<br>03. देयक क्र. 85/30.12.2014 रु.673851/-<br>04. देयक क्र. 86/30.12.2014 रु.1774992/-<br>05. देयक क्र. 87/30.12.2014 रु.1362174/-<br>06. देयक क्र. 88/30.12.2014 रु.1214363/-<br>07. देयक क्र. 89/30.12.2014 रु.1221486/-<br>08. देयक क्र. 90/30.12.2014 रु.915113/-<br>09. देयक क्र. 91/30.12.2014 रु.936315/-<br>10. देयक क्र. 92/30.12.2014 रु.1529835/-<br>11. देयक क्र. 93/30.12.2014 रु.962638/-<br>12. देयक क्र. 95/03.01.2015 रु.1110332/- |

सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे वित्तीय वर्ष 2014-2015 च्या लेखापरीक्षा निविदा नस्ती उपप्रमाणके व इतर अनुषंगिक अभिलेख सोलापूर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून लेखापरीक्षणाकरिता अभिलेख उपलब्ध झाले. सदर अभिलेख्याचे लेखापरीक्षण केले असता निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्र.163 दि.14/06/2018 अन्वये खुलासा मागविला असता लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही त्यामुळे सदरचे आक्षेप खालीलप्रमाणे कायम ठेवण्यात येत आहेत.

1. सदरच्या निविदेचा तांत्रिक लिफाफा व फॉयन्सील बीड लेखापरीक्षाणास उपलब्ध झालेले नाही.

2. सदरच्या कामाचा DPR लेखापरिक्षणा करिता उपलब्ध करून देण्यात आला नाही.
3. 12 व्या वित्त आयोगाकडून रक्कम रु.6,00,39,378/- एवढा निधी प्राप्त झाला असून या कामावरील वार्षिक खर्च रु.9,39,00,000/- एवढा असल्याने सदर प्राप्त निधी आठ महिन्याकरिता पूरणार असल्याने उर्वरित कालावधीकरिता निधीची तरतुद कोणत्या लेखाशिर्षातुन करण्यात आली. याबाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.
4. शासन निर्णय नगरविकास,विभाग,क्र.घनव्य /1006/प्र.क्र.53/नवि.16 दि. 26/10/2006 परिच्छेद क्र 28 नुसार कंत्रादारांना द्यावयाची रक्कमेचे दर हे टनावर आधारित नसावेत असे स्पष्ट नमूद असतांना मनपाने प्रती टन 650/- प्रमाणे दर मंजुर केले आहेत, हे नियमबाह्य आहे.
5. सदर कामाचे Third Party Audit करणे आवश्यक असतांना Third Party Audit केलेले आढळून येत नाही.
6. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनी-2300/सहविमा/जिप-2 दि. 07 जानेवारी 2004 नुसार मंजूर निविदा रकमेच्या 1% विमा कामासाठी व कामगाराच्या सुरक्षेसाठी विमा निधीत रक्कम भरणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये आढळले नाही. 1% प्रमाणे विमा रक्कम वसूल केलेली नाही. त्यामुळे विमा रक्कम रु.1,14,30,393/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.
7. उद्योग उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्र.बी सी ए -2009 /प्रक्र 108/कामगार 7 दि.17/06/2010 नुसार कामगार कल्याण उपकर 1% वसुल करणे आवश्यक आहे. परंतु सदर रक्कम वसूल केलेली आढळून येत नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकरची रक्कम रु.1,14,30,393/- वसुल करुन शासकीय निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.
8. शासन निर्णय 2006 च्या निर्णयातील परिच्छेद 78 ते 80 अ नुसार ही प्रक्रिया आर्थिकदृष्ट्या परवडणारी असावी यासाठी सर्व स्तरावरील कचरा उत्पादकाकडून सेवाकर वसुलीबाबत कार्यवाही केलेली नाही.
9. सदरच्या कच-याव्दारे डेब्रिज गोळा करावयचा नसल्याने स्वतंत्ररित्या डेब्रिज विल्हेवाट बाबत कोणत्या उपाययोजना केल्यात? हे नस्तीमध्ये आढळून येत नाही.
10. वाहनाचे लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.
11. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे पत्र नस्तीला आहे. परंतु कॅम्पॅटर चे भाडे दर पत्रामध्ये नमूद नाही.
12. P.W.D. मॅन्युअलमधील पृष्ठ क्र 87 परिच्छेद क्र 214 नुसार सुरक्षा रक्कम ही 50% काम सुरु करण्यापूर्वी व 50% बिलातून कपात करणे आवश्यक आहे. परंतु रक्कमेच्या 2% रक्कम वसूल केलेली आहे.

13. सुरक्षा रक्कमेचे बँक FD तपासणी करिता उपलब्ध झालेली नाही.
14. वजन काटा प्रमाणीत केल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध झालेली नाही. गोळा केलेल्या कच-याची वजनाची बिले पुरविण्यात आलेली नाहीत.
15. सोलापूर बॉयोएर्नजी वेस्ट 300 टन अधिकवजा 20 % असून किती कचरा बॉयोएर्नजी वेस्टला दिला ? याचे अभिलेख उपलब्ध झालेले नाही.
16. डेब्रिज व हिरवा कचरा यासाठी किती दर ठरविला व किती रक्कम खर्च केली याची माहिती उपलब्ध झालेली नाही.
17. त्रयस्थ संस्था तांत्रिक लेखापरीक्षण याचा उल्लेख करारनाम्यामध्ये नाही.
18. शासन निर्णय नगरविकास,विभाग,क्र.घनव्य /1006/प्र.क्र.53/नवि.16 दिनांक 26/10/2006 परिच्छेद क्र 59 ते 69 मध्ये असलेल्या तरतुदी नुसार खाजगी क्षेत्राचा सहभाग असणे आवश्यक आहे, डेब्रिज व मोठया कंपन्यासाठी खाजगी क्षेत्र व सेवाभावी संघटनाचे कचरा वेचक समुह यांचाही सहभाग असावा असे नमूद आहे. परंतू या बाबतची अंबलबजावणी केलेली आढळून येत नाही.
19. सर्व कचरा वाहनाचे Net Weight (रिकाम्या गाड्याचे) वजन प्रमाणीत केल्याबाबतचे अभिलेख नस्तीत आढळत नाहीत.
20. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची-1 मधील तरतुदी नुसार करारनामा करतांना 10 लाखाच्या कामाकरिता रु.100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखाकरिता 100/- यानुसार रक्कम रु.114,30,39,315/- च्या करारनाम्याकरिता रक्कम रु. 11,42,100/- एवढ्या रक्कमेचे मुद्रांक शुल्क आकारावयाचे होते, परंतु सदर नियमातील तरतुदी नुसार मुद्रांक शुल्काची कमाल मर्यादा 5 लाख असताना मक्तेदाराने फक्त रक्कम रु 1,15,000/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला असल्याने, कमी पडलेली मुद्रांक शुल्काची रक्कम रु.385000/- वसूलपात्र आहे.

    एकूण वसूल पात्र रक्कम रु.385000+11430393+11430393=2,32,45,786/-

DATYMKM6601 (Ref No : 127, Hmm No : 163)

## *14 आग सुरक्षा निधीचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून त्या निधीमधील खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :आग सुरक्षा निधी मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 25 तसेच महाराष्ट्र*** |

***शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.704/अस दिनांक 23/09/2009 नुसार अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी आग सुरक्षा निधी (Fire Protection Fund) निर्माण करणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक असतांना स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात येवून त्याचा स्वतंत्र लेखा ठेवण्यात आलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असणारे अग्निशमन विभागाचे 2014-15 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता सदर अनियमिततेबाबत अर्धसमास क्रमांक 96, दि.13/12/17 अन्वये विभागास विचारणा करण्यात आली. विभागाने कोणताही खुलासा अद्यापपर्यंत सादर केला नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 मधील कलम 25 तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. 704/अस दिनांक 23/09/2009 नुसार अग्निशमन सेवा विकसित करण्यासाठी **आग सुरक्षा निधी** (Fire Protection Fund) निर्माण करणे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना बंधनकारक आहे. त्याचे स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात यावे व त्यामध्ये हा निधी जमा करण्यात यावा. तसेच अशाप्रकारे आग सुरक्षा निधीमध्ये जमा होणा-या रकमेचा जानेवारी ते जून व जुलै ते डिसेंबर असा सहामाही अहवाल प्रत्येक वर्षाच्या जानेवारी व जुलैमध्ये संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार यांना पत्राव्दारे पाठवावा असे कळविण्यात आले आहे. परंतु सोलापूर मनपाने अशी कार्यवाही 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये केल्याचे दिसून आले नाही. त्यामुले सदर निधित किती रक्कम जमा करण्यात आली याची पडताळणी करता आली नाही.

2) सदर निधीमधून प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 च्या कलम 25(3) नुसार अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यात यावीत. काही प्रमाणात अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर खर्च भागविण्यासाठी वापरण्यात यावी, अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर निधी स्वतंत्र लेखाशिर्षामध्ये ठेवला नसल्यामुळे हा निधी वरील प्रयोजानासाठीच खर्च केल्याची पडताळणी करता आली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 44, Hmm No : 96)

## *15 स्त्री सेवकांसाठी खरेदी करण्यात आलेल्या गणवेश (कापड) खरेदीबाबत अनियमितता (2014-15)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 11**

सोलापूर महानगरपालिका

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1468280.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1468280.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 109400.00/-

***संपतकुमार सोमाणी यांची न्युनतम दर असलेली निवीदा न स्विकारता जास्त दराची असलेली निवीदा कापड तपासणी समीतीच्या पसंतीनुसार गणवेशाची खरेदी केली असल्याने रक्कम रु. 55,600/- चे महानगपालिकेचे नुकसान झालेले आहे. शासन निर्णय दिनांक 2/01/1992 नुसार स्त्री गणवेश महाराष्ट राज्य वस्त्र उदयोंग महामंडळ यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना जाहीर निविदा मागवून खाजगी पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यात आलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. मतंसं/ नस्ती-2012/ प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार 3 लाखावरील खरेदीसाठी ई - निवीदा काढलेली नाही. प्रशासकिय मान्यतेपेक्षा रु.488280/- ची जादा खरेदी केली आहे. Test Report नसताना बिले अदा केल्याने रक्कम रु.1468280/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे. खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. देयकातून वसूलपात्र रक्कम रु.1,09,400/- संबंधितांकडून वसूल करावी.***

**महानगरपालिका सोलापुर येथे स्त्री सेवकांना सामान्य प्रशासन विभाग (भांडार शाखा) यांच्याकडून दर दोन वर्षांनी गणवेश(कापड) पुरविला जातो.**

**वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 करिता दोन वर्षाकरिता स्त्रीसेवकांना गणवेश (कापड) खरेदीकरिता खालील प्रमाणे कापडाची आवश्यकता नमूद केली आहे.**

| अ.क्र. | कापडाचा तपशील | पदाचे नांव | कापडाचे नग |
|---|---|---|---|
| 1 | रंगीत सुती साडया | झाडुवाली/सफाई कामगार | 2000 नग |
| 2 | पांढरी पॉलिस्टर साडी | मेट्रा, मिडवाईफ शिपाई सेवीका | 200 नग |
| 3 | पांढरी सुती साडी | आया, फिमेल अटेंडट | 160 नग |
| 4 | रंगीत सुती ब्लाऊज पिसेस | झाडुवाली/सफाई कामगार | 2000 नग |
| 5 | पांढरे सुती ब्लाऊज पिसेस | मेट्रा, मिडवाईफ, आया,फिमेलअटेंडट शिपाई सेवीका | 360 नग |

संचार व पुढारी या दोन दैनिकामध्ये दिनांक 17/08/13 ला जाहिरात दिली आहे. मुख्य लेखापरिक्षक यांचे समक्ष तीन निविदा प्राप्त दिनांक 6/9/2013 ला प्राप्त झाले आहेत. सदर निविदा त्याच दिवशी 5.15. मी. वाजता उघडली.

तक्ता-अ

| अ.क्र. | मक्तेदारांचे नांव | साडीचा प्रकार |
|---|---|---|
| 1 | आनंद साडी सेंटर | नऊवारी सुती साडयाकरीता |
| 2 | माहेश्वरी साडी सेंटर | नऊवारी सुती साडयाकरीता |
| 3 | राजशेखर विरप्पा शिवपुरी साडी सेंटर | नऊवारी सुती साडयाकरीता |

तक्ता-ब

| अ.क्र. | मक्तेदारांचे नांव | साडीचा प्रकार |
|---|---|---|
| 1 | धनलक्ष्मी एंटरप्रायजेस | पांढरे सुती साडया,पांढरे प्लॅस्टीक साडया,रंगीत सुती ब्लाऊज पीस, पांढरे सुती ब्लाऊज पीस |
| 2 | एस गोवर्धनदास ॲन्ड कंपनी | पांढरे सुती साडया,पांढरे प्लॅस्टीक साडया,रंगीत सुती ब्लाऊज पीस, पांढरे सुती ब्लाऊज पीस |
| 3 | संपतकुमार सोमाणी | पांढरे सुती साडया,पांढरे प्लॅस्टीक साडया,रंगीत सुती ब्लाऊज पीस, पांढरे सुती ब्लाऊज पीस |

मा. सहाय्यक आयुक्त (स) यांनी सदर निविदाकारासोबत खालीलप्रमाणे कापड समितीने जे कापड पंसत केले, त्यांच्यासोबत वाटाघाटी करुन दर निश्चित केले आहेत.

तक्ता-अ

| अ.क्र. | साडी प्रकार | नग | मक्तेदाराचे नांव | टेंडर दर | वाटाघाटीचे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | रंगीत सुती साडी | 1000 | आनंद साडी सेंटर | 615 | 595 | 595000 |
| 2 | रंगीत सुती साडी | 1000 | माहेश्वरी साडी सेंटर | 621 | 595 | 595000 |
| | एकूण खरेदीची रक्कम | | | | | 1190000 |

तक्ता-ब

| अ.क्र. | साडी प्रकार | नग | मक्तेदाराचे नांव | टेंडर दर | वाटाघाटीचे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पांढरे पॉलिस्टर व रंगीत पॉलिस्टर साडया | 200 | एस गोवर्धनदास ॲन्ड कंपनी | 445 | 435 | 87000 |
| 2 | पांढरे सुती साडया | 160 | संपतकुमार सोमाणी | 470 | 465 | 74000 |
| 3 | रंगीत ब्लाऊज पीस | 2000 | एस गोवर्धनदास ॲन्ड कंपनी | 31 | 50 | 100000 |
| 4 | पांढरे ब्लाऊज पीस | 360 | एस गोवर्धनदास ॲन्ड कंपनी | 50 | 48 | 17280 |

सदरच्या कामाच्या नस्तीची तपासणी केली असता काही आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास क्रमांक 90 दि.24/11/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणतेही अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

1. तक्ता -ब मध्ये तीन निवीदाधाराक धनलक्ष्मी एंटरप्रायजेस, एस गोवर्धनदास ॲन्ड कंपनी,

संपतकुमार सोमाणी यापैकी संपतकुमार सोमाणी यांची न्युनतम दर असलेली निवीदा न स्विकारता जास्त दराची असलेली निवीदा कापड तपासणी समीतीच्या पसंतीनुसार गणवेशाची खरेदी केली असल्याने खालील प्रमाणे महानगपालिकेचे नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | तपशील | मक्तेदाराचे नांव | मक्तेदाराचे नांव | फरक | नुकसानीची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पांढरे पॉलिस्टर साडया 9 वारी प्लेन (50*50) | एस गोवर्धनदास 200 नग कांचन साडी वाटाघाटीचे दर रु.435 | संपतकुमार सोमाणी 200 नग कांचन साडी रु.337 | 98 प्रती नगा प्रमाणे | 19600 |
| 2 | रंगीत सुती 100% सुती 80 से.मी. ब्लाऊज पीस | एस गोवर्धनदास 2000 नग ब्लाऊज पीस वाटाघाटीचे दर रु.50 | संपतकुमार सोमाणी 2000 नग ब्लाऊज पीस वाटाघाटीचे दर रु.50 | 18 | 36000 |
| | एकूण नुकसानीची रक्कम रु. | | | | 55600 |

2. एस गोवर्धनदास ॲन्ड कंपनी यांच्या निविदेमध्ये रंगीत सुती 100% सुती 80 से.मी. ब्लाऊज पीसेस 2000 नगाकरीता मुळ दर 31/- असताना वाटाघाटीमध्ये जास्त दर रु.50/- घेतल्याने 2000 नगाकरीता प्रती नग रु.19 जादा प्रदान केल्याने रक्कम रु.38000/- चे अतिप्रदान झाले आहे, त्यामुळे सदराची रक्कम वसूल करावी.

3. वित्तीय वर्ष 2013-14 साठी स्त्री सेवकांसाठी गणवेश खरेदीबाबत सामान्य प्रशासन विभाग (भांडार शाखा) येथील अभिलेख्याची तपासणी केली असता शासन निर्णय दिनांक 2/01/1992 नुसार स्त्री गणवेश महाराष्ट राज्य वस्त्र उदयोंग महामंडळ यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असताना जाहीर निविदा मागवून खाजगी पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यात आलेली आहे.

4. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39दिनांक 16/01/2013 नुसार 3 लाखावरील खरेदीसाठी ई - निवीदा काढलेली नाही.

5. निविदा काढण्यापु (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजार मुल्य काढले असते तर त्याप्रमाणे निविदा मधील न्युनतम दर व बाजारमुल्य यांचेशी तुलना करुन वाटाघाटी केल्या

असत्या तर महानगरपपालिका निधीची बचत झाली असती.

6. मनपाने कापडाच्या गुणवत्तेबाबत निविदेत उल्लेख उदा. जाडी, लांबी,Strenth वैगेरे करुन निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने निविदा प्रसिध्दी करताना मक्तेदारानी कापड प्रकार वेगवेगळा न दर्शविता तो एकाच कंपनीचा दर्जाचा नमुद करणे आवश्यक होते. तथा दिपाली, दोघोडा साडीचा प्रकार दर्शविला. तसेच पांढरे सुती साडयामध्ये दिपश्री, दिपाली साडीप्रकार नमुद केला आहे. तसेच रंगीत सुती ब्लाऊज पिसेस मध्ये मिनी गोल्ड, पुजा, क्लासीक, फेमिना, रंजन असा वेगवेगळया प्रकारचा कापड निविदामध्ये नमुद केला. त्यामुळे एकाच गुणवत्तेच्या कापडाच्या दराची तुलना न होता वेगवेगळया Qualities च्या कापडाच्या दरांची तुलना केली व त्याची गुणवत्ता व दर नेहमी भिन्य असल्यामुळे कापडाची किंमत देखील भिन्य ठरते, त्यामुळे निविदा प्रक्रिया सदोष ठरली आहे.

7. करारनाम्यातील अ.क्र.7 नुसार निविदेतील मंजुर निविदाकार यांचा स्त्री गणवेशाचे कापड टेक्स्टाईल युनीटकडून (Test Report) तपासुन कापडाचा दर्जा कसा आहे तो प्राप्त करुन घेतलेला नाही. त्यामुळे कापडाच्या योग्यतेची खात्री पटत नाही. Test Report नसताना बिले अदा केल्याने रक्कम रु.1468280/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

8. प्रशासकिय मान्यता रु 980000/- असुन खरेदी रक्कम 1468280 ची केलेली आहे. त्यामुळे प्रशासकिय मान्यतेपेक्षा रु.488280/- ची जादा खरेदी केली आहे. हे नियमबाह्य आहे.

9. ज्या कामगारांना गणवेशाचे कापड वाटप केलेले आहे. त्याची पोहोच घेतलेली नाहीत. त्यामुळे गणवेश वाटपाची खात्री पटत नाही. साठा रजिष्टरवरुन मार्च 2012 ला गणवेशाचा साठा किती शिल्लक होता. तसेच वाटप केलेला साठा व मार्च 2015 अखेर शिल्लक साठा याची माहीती विवरणपत्रामध्ये भरुन निरीक्षण पथकास त्वरीत सादर करावी.

10. मुंबई दुकान कायदा 1948 नुसार ठेकेदाराने दुकानाचे नोंदणी केलेली नाही. तरीही त्याची निविदा मान्य केली आहे. हे नियमबाहय आहे.

11. खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. केवळ खालील दोन प्रमाणके उपलब्ध झाले.

(1) प्रमाणक सा.प्र.1/9 दिनांक 31/7/14, रक्कम रु.5,95,000/- ठेकेदार- आनंद साडी सेंटर या प्रमाणकामधून 2% आयकर रु.11900/-, 2% विक्रीकर रक्कम रु.11900/- व स्थानिक संस्था कर 2% रक्कम रु.11900/- अशी एकूण रक्कम रु.35700/- वसुलपात्र आहे.

(2) प्रमाणक सा.प्र.1/92 दिनांक 31/7/14, रक्कम रु.5,95,000/- ठेकेदार- माहेश्वरी साडी सेंटर यांच्या प्रमाणकामधून 2% आयकर रु.11900/-, 2% विक्रीकर रक्कम रु.11900/- व

स्थानिक संस्था कर 2% रक्कम रु.11900/- अशी एकूण रक्कम रु.35700/- वसुलपात्र आहे.

एकूण वसूलपात्र रक्कम = रु.1,09,400/-

DGPAGPM8503 (Ref No : 45, Hmm No : 90)

## *16 विभागीय अधिकारी, विभागीय कार्यालय -1 यांचेकडून खर्चाची व जमेची अभिलेख लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करून दिले नसल्याबाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 2642347.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2642347.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय क्र. -1 मध्ये वित्तीय वर्ष 2014-15 चे लेखापरीक्षण करण्याकरिता पुढील अभिलेख लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करुण देण्यात आलेला नाही. (1) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम,1998 (सन 1999 चा अधिनियम 20) नुसार नोंदणी करण्यात आलेल्या विवाह नोंदणीबाबतचे प्रमाणपत्र, किर्दनोदी, रोकड वही, पावती पुस्तके. (2) मांडव फी, सामान फी यांचे पावती पुस्तक, चलन पुस्तके, किर्दनोंद वही. (3) नविन नळ कनेक्शन , ड्रेनेज दुरुस्ती पावती पुस्तके, चलन पुस्तके, किर्दनोंद वही (4) वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये अनेक विकास कामे करण्यात आलेली आहेत. त्याकामाच्या नस्त्या व मोजमाप पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय क्र.-1 मध्ये वित्तीय वर्ष 2014-15 चे लेखापरीक्षण करण्याकरिता खालील अभिलेख उपलब्ध करून देणे करिता अर्ध समास पत्र क्र.132 दि.26/03/2018 कळविले असता खालील अभिलेख लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध झालेले नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

3) महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम,1998 (सन 1999 चा अधिनियम 20) नुसार नोंदणी करण्यात आलेल्या विवाह नोंदणीबाबतचे प्रमाणपत्र, किर्दनोदी रोकड वही, पावती पुस्तके.

2) मांडव फी, सामान फी यांचे पावती पुस्तक, चलन पुस्तके किर्दनोंद वही.

3) नविन नळ कनेक्शन , ड्रेनेज दुरुस्ती पावती पुस्तके, चलन पुस्तके, किर्दनोंद वही.
4) विभागीय कार्यालय -1 यांचे कडून वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये बरीच कामे करण्यात आलेली आहे. त्यापैकी खालील कामाच्या नस्ती व मोजमाप पुस्तक लेखापरीक्षण करण्याकरिता उपलब्ध करुण देण्यात आले नाही.

| अ.क्र. | बिल क्र. व दिनांक | कामाचे नावं | रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | 33/ 27.6 .2014 | बरामोती चौक ते अंबिका चौक खड्डे दुरुस्त करणे | रु.189174/- |
| 2. | 58/ 24.7.2014 | विविध आकाराचे चौकोनी हेवी ड्युटी मेनहोल कव्हर पुरवठा करणे. | रु.160519/- |
| 3 | 655/5.12.2014 | प्र.क्र.8 (ब) सार्वजनिक संडास व मुताऱ्या दुरुस्त करणे. | रु.134383/- |
| 4 | 276/19.3.2015 | प्र.क्र.27 वीर सावरकर तलाव येथे ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे. . | रु.169466/- |
| 5 | 277/19.3.2015 | प्र.क्र.27 मुक्ते पेव्हेलीयन बाहेरून रंग सफेदी करणे व किरकोळ दुरुस्ती करणे. | रु.199989/- |
| 6 | 278/19.3.2015 | प्र.क्र.12 मनोहर झोपडपट्टी तमाल शाळा येथे ड्रेनेज लाईन घालणे . | रु.180888/- |
| 7 | 34/10.7.2014 | प्र.क्र.27 जैनोधिक चाळ बंडगर घर ते करकोठी घर पिठाची गिरणी पर्यंत ड्रेनेज लाईन घालणे . | रु.376231/- |
| 8 | 306/27.3.2015 | कोन्सील हॉल व इंद्र भुवन करिता पाण्याची पाईप लाईन घालणे. | रु.114592/- |
| 9 | 283/ 25.3.2015 | सुरज लॉज ते जी. एम. चौक मिलिंद नगर पाईप लाईन बदलणे. | रु.195800/- |
| 10 | 285 /25.3.2015 | प्र.क्र.7 शहीद वस्ती सावळगी बोळ येथे ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे. | रु.183407/- |
| 11 | 112/1.10.2014 | प्र.क्र.9 मराठा वस्ती ड्रेनेज लाईन घालणे. | रु.150614/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | 64/11.8.2014 | प्र.क्र.9 मधील पाटील नगर ड्रेनेज लाईन घालणे. | रु.387294/- |
| 13 | 275/19.3.2015 | प्र.क्र.27 मधील कोटणीस स्मारक निवास किरकोळ दुरुस्ती करणे. | रु.199990/- |
| | एकूण | | रु.26,42,342/- |

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा (सुधारणा) अधिनियम 2011 मधील कलम 6 नुसार अभिलेख्याची लेखापरीक्षणसाठी मागणी करण्यात येवूनही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 2011 मधील कलम 7 नुसार अभिलेखे , कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्याची जबाबदारी स्थानिक संस्थेची असून या मध्ये कसूर झाल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्ष अधीनियम 2011 मधील कलम 8 अन्वये रु.25,000/- पर्यंतची दंडाची तरतुद आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 81, Hmm No : 132)

## *17 शहरातील वृक्षरोपण करिता विविध जातिवंत 6 ते 8 फुट उंचीची रोपे खरेदी निविदेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 16**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1202000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1202000.00/-

***रोपे खरेदीची निविदा प्रक्रिया राबविण्यापूर्वी मा.स्थायी समिती तसा ठराव पास करणे आवश्यक असताना तसा ठराव पास न करताच निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. नगर सचिव कार्यालयाचे पत्र क्र.जाव /नस/18 अ /593 दि.14/11/2014 अन्वये मा.स्थायी समिती सभा नोव्हे.-2014 कार्यालय पत्रिका क्र.32 दि.1/11/2014 रोजीचे सभेत विषय क्र.467 वर दाखल असून सदरची सभा तहकूब झालेली असल्याने अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत नगर सचिव कार्यालयाकडून कळविण्यात आले. त्यापूर्वीच सुभद्रा नर्सरी यांना वृक्षरोपण करिता रोपे खरेदीची कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असल्याने करण्यात आलेली खरेदी नियमबाह्य आहे. तरतुदी बाबतचा अभिप्राय मुख्यालेखापाल कार्यालयाकडून घेण्यात आलेले नाही. मा.मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय नस्तीत उपलब्ध झाले नाहीत. सुभद्रा नर्सरी यांनी नोंदणी प्रमाणपत्र सादर केलेले नसताना, त्यांची निविदा मंजूर करण्यात आली. दिनांक 09/09/2014 रोजी च्या करारपत्रावर मक्त्तेदाराने स्वाक्षरी केलेली नाही. दिनांक 09/09/2014 रोजी च्या करारपत्रावर साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या***

***नाहीत. सुभद्रा नर्सरी यांनी टेंडर फॉर्म मध्ये माहिती अपुरी भरली आहे. टेंडर नोटीस मध्ये खरेदीची किंमत अंदाजे रक्कम रु.10.00 लक्ष असताना सुभद्रा नर्सरी यांनी 2014-15 या वित्तीय वर्षात रक्कम रु.12.02 लक्ष ची देयके सादर केली. शासन निर्णय दि.19.01.2013 अन्वये 10 लाखावरील कामांसाठी ई- निविदा राबविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात कोणत्या प्रकारची रोपे लावणे शक्य आहे. याबाबत कृषीतज्ञ यांचा सल्ला न घेता एकूण 71 जातीची फळझाडे, खरेदी करण्यात आली. बाजार मूल्य न काढताच जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. झाडे पुरविण्यायाबाबतचे साठा रजिस्टर उपलब्ध करून देण्यात आले नाही. सुभद्रा नर्सरी यांनी किती झाडे पुरविली व पुरविलेल्या झाडांपैकी किती झाडे जगली याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही. मक्तेदाराने पुरवठा केलेल्या रोपे खरेदीची डिलिव्हरी चलन नस्तीवर आढळून आलेली नाही. सुभद्रा नर्सरी यांनी वित्तीय वर्षात रक्कम रु.12.02 लक्ष ची देयके सादर केलेली असल्याने सदर देयकाची प्रमाणके उद्यान विभागाकडून उपलब्ध झालेली नसल्याने देयकामधून कोण–कोणत्या कपाती करण्यात आल्या याची माहिती उपलब्ध झाली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून 2014-15 या वित्तीय वर्षात शहरातील वृक्षारोपण करिता विविध जातिवंत 6 ते 8 फुट उंचीची रोपे खरेदी करण्याकरिता मागविण्यात आलेल्या निविदा नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे त्रृटी आढळून आलेल्या असल्याने यासंदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 153 दिनांक 24/04/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

1. शहरातील वृक्षारोपण करिता विविध जातिवंत 6 ते 8 फुट उंचीची रोपे खरेदीची निविदा प्रक्रिया राबविण्यापूर्वी मा.स्थायी समिती तसा ठराव पास करणे आवश्यक असताना तसा ठराव पास न करताच निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असल्याने सदर निविदा प्रक्रिया नियमबाह्य ठरविण्यात येत आहे.

2. नगर सचिव कार्यालयाचे पत्र क्र.जाव /नस/18 अ /593दि.14/11/2014 अन्वये मा.स्थायी समिती सभा नोव्हे.-2014 कार्यालय पत्रिका क्र.32 दि.1/11/2014 रोजीचे सभेत विषय क्र.467 वर दाखल असून सदरची सभा झालेली असल्याने, सदर प्रकरणी महाराष्ट्र अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत नगर सचिव कार्यालयाकडून कळविण्यात आले. त्यापूर्वीच सुभद्रा नर्सरी वृक्षरोपण करिता विविध जातिवंत 6 ते 8 फुट उंचीची रोपे खरेदीची कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असल्याने करण्यात आलेली खरेदी नियमबाह्य आहे.

3. विविध जातिवंत 6 ते 8 फुट उंचीची रोपे खरेदी करण्याकरिता 2014-15 या वर्षात किती तरतूद आहे. याबाबतचा अभिप्राय मुख्यालेखापाल कार्यालयाकडून घेण्यात आलेले नाहीत.

4. मा.मुख्य लेखापरीक्षक यांचे अभिप्राय नस्ती मध्ये उपलब्ध झाला नाही.

5. टेंडर नोटीस मध्ये मक्त्तेदाराने नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याची अट नमूद केली असताना, सुभद्रा नर्सरी यांनी नोंदणी प्रमाणपत्र सादर केलेले नसताना त्यांची निविदा मंजूर करण्यात आली.

6. अटी व शर्ती प्रमाणे मक्त्तेदाराने सुभद्रा नर्सरी यांनी दिनांक 09/09/2014 रोजी च्या करारपत्रावर मक्त्तेदाराने स्वाक्षरी केलेली नाही.

7. दिनांक 09/09/2014 रोजी च्या करारपत्रावर साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या नाहीत.
8. सुभद्रा नर्सरी यांनी टेंडर फॉर्म मध्ये खालील माहिती अपुरी भरण्यात आलेली आहे.

(अ) पूर्वानुभावाबद्दलची तपशीलवार माहिती :- नर्सरी

(ब) यापूर्वी रोपे विक्री ठेक्याने घेतला होता का ?

घेतला असल्यास त्याबाबतचे माहिती :- माहिती भरली नाही.

(क) निविदेतील सर्व अटी शर्ती मला मान्य आहेत :- माहिती भरली नाही.

9. टेंडर नोटीस मध्ये खरेदीची अंदाजे रक्कम 10.00 लक्ष असताना सुभद्रा नर्सरी यांनी 2014-15 या वित्तीय वर्षात रक्कम रु.12.02 लक्ष ची देयके सादर करण्यात आली.
10. शासन निर्णय दि.19.01.13. अन्वये 10 लाखावरील कामांसाठी ई-निविदा राबविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.
11. सोलापूर महानगरपालिका हद्द हि अवकक्षण क्षेत्रात येत असल्यामुळे या क्षेत्रात कोणत्या प्रकारची रोपे लावणे शक्य आहे. याबाबत कृषीतज्ञ यांचे कडून त्याबाबतचा सल्ला घेवून त्या प्रकारचीच रोपे टेंडर फॉर्म मधील तक्त्यामध्ये नमूद करणे आवश्यक असताना, तसे न करता एकूण 71 जातीची फळझाडे, फुलझाडे, वेली, शोभेची झाडे ईत्यादी चे वर्णन टेंडर फॉर्म मधील तक्त्यामध्ये करण्यात आले. त्यामुळे अनावश्यक झाडाची खरेदी झाल्याचे दिसून येते.
12. शहरातील वृक्ष रोपणाकरिता मक्तेदाराकडून मागविण्यात येणाऱ्या रोपांचे दर बाजार मुल्य काढून तशी जाहिरात देणे आवश्यक असताना, तसे बाजार मूल्य उद्यान विभागाकडून न काढताच जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. त्यामुळे खरेदी करण्यात आलेली झाडे बाजार मूल्य च्या आधारे झालेली नसल्याचे सिद्ध होते.
13. सुभद्रा नर्सरी यांनी कोण कोणत्या जातीची किती झाडे कोणत्या तारखेला पुरविण्यात आली व पुरविण्यात आलेली झाडे कोणत्या ठिकाणी लावण्यात आली याबाबतचे साठा रजिस्टर उपलब्ध करून देण्यात आले नाही.
14. सुभद्रा नर्सरी यांनी किती झाडे पुरविली व पुरविलेल्या झाडांपैकी किती झाडे जगली याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही.
15. मक्तेदाराने पुरवठा केलेल्या रोपे खरेदीची डिलिव्हरी चलन नस्तीवर आढळून आलेली नाही. त्यामुळे कोणती रोपे कोणत्या दिनांकास किती रोपे प्राप्त झाली याबाबत पडताळणी लेखापरीक्षणास करता आली नाही.
16. सुभद्रा नर्सरी यांनी वित्तीय वर्षात रक्कम रु.12.02 लक्ष ची देयके सादर केलेली असल्याने सदर देयकाची प्रमाणके उद्यान विभागाकडून उपलब्ध झालेली नसल्याने देयकामधून कोण-कोणत्या कापती करण्यात आल्या याची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे यावरील झालेला खर्च रक्कम रु.12.02 लक्ष आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 83, Hmm No : 153)

## *18 उद्यान विभागाकरिता खरेदी करण्यात आलेल्या लोखंडी ट्रीगार्ड निविदेतील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 992740.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 992740.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 992740.00/-

***लोखंडी ट्रीगार्ड खरेदीच्या जाहिरातीमध्ये लोखंडी ट्रीगार्ड बाबतचा तपशील (Specification) देण्यात आलेले नाहीत. लोखंडी ट्रीगार्ड खरेदीची संख्या नमूद करण्यात आली नाही. बाजार मूल्य न काढताच निविदा मागविण्यात आल्या. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रक्कम रु.5.00 लक्ष तरतूद असताना, अमरदीप कन्स्ट्रक्शन यांनी वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रक्कम रु.9,92,740/- ची लोखंडी ट्रीगार्ड देयके उद्यान विभागाकडे सादर केली. नगर सेवकाच्या लोखंडी ट्रीगार्डची मागणी पत्रे नस्तीत दिसून आलेली नाहीत. 510 लोखंडी ट्रीगार्डच्या आवश्यक्तेबाबतचा अभिलेख नस्तीत दिसून आला नाही. स्थायी समिती ने ठराव क्र.157 दि.06/08/2014 मध्ये सुचविल्या प्रमाणे लोखंडी ट्रीगार्ड बाबतची फोटोसह माहिती पुढील स्थायी समितीच्या बैठकी मध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना केली असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. निविदे मध्ये कामाचा कालावधी 3 महिने दिलेला असताना दि.28/08/2014 च्या वर्क ऑर्डर कामाची, मुदत वर्क ऑर्डर दिल्यापासून 1 वर्ष राहील असे नियमबाहय पद्धतीने करण्यात आले. वर्षातील एकूण खरेदीची माहिती उपलब्ध केली नाही. अमरदीप कन्स्ट्रक्शन यांचे कडून कोणत्या तारखेला किती लोखंडी ट्रीगार्ड प्राप्त झाले याबाबतचे डीलीव्हरी चलने नस्तीसाेबत दिसून आलेली नाहीत. त्यामुळे खरेदीची किमत रक्कम रु. 9,92,740/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. 510 लोखंडी ट्रीगार्ड कोणत्या प्रभागात पुरविण्यात आलेली आहे याबाबतची नोंद स्टाॅक रजिस्टर मध्ये नाही. लोखंडी ट्रीगार्ड कोणकोणत्या जागेत बसविण्यात आलेली आहे. याबाबतची माहिती नस्ती उपलब्ध झालेली नाही. रक्कम रु.9,92,740/- ची प्रमाणके लेखापरीक्षणाकरिता उपलव्ध करुन देण्यात आली नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून 2013-14 या वित्तीय वर्षात लोखंडी ट्रीगार्ड खरेदीसाठी मनपाने दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रामध्ये दि.05/01/2014 रोजी जाहिर निविदा मागविण्यात आले होती. निविदा सादर करण्याचा कालावधी दि.05/01/2014 ते 16/01/2014 असा होता. जाहिर निविदानुसार 3 मक्तेदाराने निविदा सादर केल्या् असून पात्र निविदाधारकाने दिलेल्या दराची तुलना करुन लघुत्तम दराचे निविदाधारक अमरदीप कन्स्ट्रशन , सोलापूर यांचेशी वाटाघाटी करुन दर रु.980/- प्रति नग प्रमाणे निविदा मंजूर करण्यात आली आहे. सदरची निविदा स्थायी समिती ठराव क्र.157 दि.06/08/2014

अन्वये मंजूर करुन त्यांना नगर अभियंता यांचे पत्र क्र. जा.क्र.नाअ /23 दि.28/08/2014 अन्वये लोखंडी ट्रीगार्ड पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत. उद्यान विभागामार्फत लोखंडी ट्रीगार्ड खरेदी कामाची नस्ती तपासणी केली असता खालील अनियमिता आढळुन आलेल्या असल्याने याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 155 दिनांक 24/04/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

1) सदर कामाची जाहिर निविदा पहाता जाहिरातीमध्ये लोखंडी ट्रीगार्डचा तपशील (Specification) देण्यात आलेली नाहीत. उदा. लोखंडी ट्रीगार्ड साईज, पत्र्याचा गेज, बसवून देण्याची कार्यवाही, कोणी निविदा सादर करावी, इ. याबाबतचा तपशील देण्यात आलेला नाही.

2) निविदा प्रसिद्धी मध्ये किती लोखंडी ट्रीगार्ड खरेदी करावयाचे आहे याबाबतची लोखंडी ट्रीगार्ड खरेदी ची संख्या नमूद करणे आवश्यक असताना, निविदेमध्ये लोखंडी ट्रीगार्ड खरेदी ची संख्या नमूद करण्यात आली नाही.

3) निविदा प्रसिद्धीकरण्यापुर्वी लोखंडी ट्रीगार्डचे बाजार मूल्य ठरवून त्याप्रमाणे निविदा मागविणे आवश्यक असताना लोखंडी ट्रीगार्डचे बाजार मूल्य न काढताच निविदा मागविण्यात आल्या.

4) मुख्यलेखापाल कार्यालयाचे पत्र क्र.मुले-6/अंदाज 3127/ दि.3/12/2013 अन्वये लोखंडी ट्रीगार्ड खरेदी करिता वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रक्कम रु.5.00 लक्ष तरतूद असताना, अमरदीप कन्स्ट्रक्शन यांनी वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रक्कम रु.9,92,740/- ची देयके उद्यान विभागाकडे सादर केली. एकूण किती खर्च झाला व 5 लाखापेक्षा जास्त रक्कमेच्या खरेदीची तरतूद नसताना, वाढीव होणारा खर्च कोणत्या तरतुदी मधून करण्यात आला याबाबतची माहिती लेखापरीक्षाणास उपलब्ध करुण देण्यात आली नाही.

5) नगर सेवकाच्या लोखंडी ट्रीगार्डची मागणी पत्रे नस्तीत दिसून आलेली नाही. 510 लोखंडी ट्रीगार्डच्या आवश्यक्तेबाबतचा अभिलेख नस्तीत दिसून आला नाही.

6) स्थायी समिती ने ठराव क्र.157 दि.06/08/2014 मध्ये सुचविल्या प्रमाणे लोखंडी ट्रीगार्ड आजला कोणकोणत्या ठिकाणी ठेवण्यात आलेले आहे याची यादी तयार करून अंदाजपत्रकातील खर्ची रक्कम , तपशील, मक्तेदारचे नावं, किती ट्रीगार्ड खरेदी करून कोणत्या ठिकाणी बसविण्यात आलेले आहे, त्याची फोटोसह माहिती पुढील स्थायी समितीच्या बैठकी मध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना केली असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) जाहीर निविदेमध्ये कामाचा कालावधी 3 महिने दिलेला असताना दि.28/08/2014 च्या वर्क ऑर्डर कामाची, मुदत वर्क ऑर्डर दिल्यापासून 1 वर्ष राहील असे नमूद करण्यात आले. या विसंगती बाबत विभागाकडून खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

8)मक्तेदाराने केलेल्या दि.26/08/2014 च्या करारपत्रामधील अट क्र.12 मध्ये सदरचा मक्ता हा वार्षिक मक्ता असून सदर कामाचे वर्क ऑर्डर दिल्यानंतर एकूण 510 नग इतके तीन महिन्याचे मुदतीत पुरवठा करणेचा असून तद्नंतर जसजसे आपणास वर्क ऑर्डर देण्यात येईल तसतसे मालाचा पुरवठा तीस दिवसात करणेचा आहे, असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यानुसार वर्षातील एकूण किती ट्रीगार्ड खरेदी करण्यात आले, याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

9)अमरदीप कन्स्ट्रक्शन यांनी बिल क्र.0768 दि.11/03/2015 अन्वये रक्कम रु.4,92,940/- व बिल क्र.0773 दि.16/03/2015 अन्वये रक्कम रु.4,99,800/- चे देयक सादर केलेले असल्याचे बिल रजिस्टर मधून दिसून येते. परंतु अमरदीप कन्स्ट्रक्शन यांचे कडून कोणत्या तारखेला किती लोखंडी ट्रीगार्ड प्राप्त झाले याबाबतचे डीलीव्हरी चलन नस्तीत दिसून आली नाहीत. त्यामुळे खरेदीची किमत रक्कम रु.9,92,740/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिका

10)अमरदीप कन्स्ट्रशन ,यांनी बिल क्र.0773 दि.16/03/2015 अन्वये रक्कम रु.4,99,800/- ची 510 लोखंडी ट्रीगार्ड पुरविण्यात आल्याबाबतची नोंद साठा रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली असून सदरची 510 लोखंडी ट्रीगार्ड कोणत्या प्रभागात पुरविण्यात आलेली आहेत, याबाबतची नोंद साठा रजिस्टर मध्ये नाही.
11)अमरदीप कन्स्ट्रक्शन यांनी पुरवठा केलेली लोखंडी ट्रीगार्ड कोणकोणत्या जागेत बसविण्यात आलेली आहेत. याबाबतची माहिती नस्ती उपलब्ध झालेली नाही.
12)अमरदीप कन्स्ट्रक्शन यांचे कडून खरेदी केलेल्या लोखंडी ट्रीगार्डच्या रक्कम रु. 9,92,740/- ची प्रमाणके लेखापरीक्षणाकरिता उपलव्ध करून देण्यात आली नाहीत.

FDSDKPM7201 (Ref No : 84, Hmm No : 155)

## *19 कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत शासनाकडून मिळणारे वेतन अनुदानाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1695231.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1695231.00/-

***कुटुंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत शासनाकडून अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनापोटी 100 टक्के अनुदान प्राप्त होते. सन 2004-05 ते 2015 पर्यंत वेतन अनुदान रक्कम रु.1,56,07,864/- प्रलंबित आहे. सदर अनुदान शासनाकडुन प्राप्त करुन घेणे प्रलंबित आहे.***

राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमा अंतर्गत केंद्र व राज्य शासनाचे मार्गदर्शक सुचनेनुसार कार्यरत नागरी कुटुंब कल्याण केंद्र, नागरी आरोग्य केंद्राना सहाय्यक अनुदान राज्य शासनाकडुन वितरीत करण्यात येते. सदर योजना 100 टक्के केंद्रशासन पुरस्कृत योजना असुन केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सहाय्यक अनुदान स्वरुपात सर्व सबधित स्वायत्ता व स्वयंसेवी संस्थाना अनुदान देणेत येते.

अतिरिक्त संचालक,आरोग्य सेवा व कुटुंब कल्याण पुणे यांचे पत्रा जा.क्र.461-65/पुणे दिनांक 02/01/2006 चे अ.क्र.7 (फ) नुसार वित्तीय वर्ष संपलेनंतर अनुदानाचे लगेच लेखापरिक्षण करुन घेणे गरजेचे आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही.

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे यांचे दिनांक 3/7/2010 चे पत्रान्वये 2004 ते 2015 पर्यंतचे वेतन अनुदान महानगरपालिकेने लेखापरिक्षण करुन त्याचा अहवाल सादर न केल्याने प्रलंबित असलेले वेतन जे महानगरपालिका निधीमधुन रक्कम रु.1,56,07,864/- खर्च करणेत आलेला आहे. शासनाकडुन अनुदानाची मागणी केली नसल्याने महानगरपालिकेने वेतनावर केलेला खर्च गुंतुन पडलेला आहे. याबाबत निरीक्षण

पथकास खुलासा सादर करावा.

वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत कुटुंब कल्याण विभागात खालील प्रमाणे अधिकारी/कर्मचारी कार्यरत होते.

| अ.क्र. | तपशील | वार्षिक वेतन | पदाची संख्या | एकूण् रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकीय अधिकारी | 500943 | 1 | 500943 |
| 2 | साख्यिकी सहाय्यक | 601260 | 1 | 601260 |
| 3 | समन्वयक | -- | 0 | 0 |
| 4 | पी.एच.एन. | -- | 0 | -- |
| 5 | कनिष्ठ श्रेणी लिपिक | 299611 | 1 | 299611 |
| 6 | ए.एन.एम | माहीती सादर करावी. | 4 | -- |
| 7 | शिपाई | 293417 | 1 | 293417 |
| | एकूण | | | 1695231 |

शासनाकडुन रक्कम रु.16,95,231/- अनुदानाची मागणी केली नसल्याने महानगरपालिकेने वेतनावर केलेला खर्च गुंतुन पडलेला आहे.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.120 दिनांक 22/01/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.आअ/कुकशस/735दिनांक 6/2/2018 नुसार खुलासा सादर केलेला आहे. विभागाने शासनाकडुन अनुदान प्राप्त करुन घेण्यात येईल असा खुलासा सादर केलेला असल्याने, अनुदान प्राप्त होई पर्यंत वरील वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 109, Hmm No : 120)

## *20 अतिक्रमण विभागाचे अभिलेखे उपलब्ध न झालेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अतिक्रमण विभागाकडील 2014-15 मध्ये विभागाने धोकादायक इमारतीचे पाडकाम झालेले किती प्रकरणे आहेत. तसेच सदर कालावधीत किती अतिक्रमण तोडण्यात आलेली आहे. दंडापोटी किती रक्कम महानगरपालिका लेख्यात जमा झालेली आहे. याचा तपशील निरीक्षण पथकास वारंवार मागणी करुन सुध्दा तपासण्याकरीता उपलब्ध झालेला नाही.***

अतिक्रमण विभागाकडील 2014-15 मध्ये विभागाने धोकादायक इमारतीचे पाडकाम झालेले किती प्रकरणे आहेत. तसेच सदर कालावधीत किती अतिक्रमण तोडण्यात आलेली आहे. दंडापोटी किती रक्कम महानगरपालिका लेख्यात जमा झालेली आहे. याचा तपशील निरीक्षण पथकास वारंवार मागणी करुन सुध्दा तपासण्या करीता उपलब्ण्ध झालेला नाही. महानगरपालिका कार्यक्षेत्रात 4 ज्यु.इंजिनियर कार्यरत असुन त्यांचेकडील धोकादायक इमारतीचे पाडकाम झालेले प्रकरणे मागणी करुन तपासण्याकरीता मिळालेले नाही . वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र. 157 दिनांक 03/05/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 136, Hmm No : 157)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## *21 खासदार निधीमधील कामे- 1)प्र. क्र.44 कृषीनगर येथे मनपाच्या जागेत सभागृह बांधणे. 2)प्र. क्र.30 थोरली इरन्ना वस्ती येथे मनपाच्या जागेत व्यायामशाळा बांधणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1400102.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 7540.00/-

***कामास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेतल्याची दिसून येत नाही. प्रशासकीय मान्यतेमधील अट क्र.11 नुसार कामाचे फोटो नस्तीत आढळून आले नाहीत. सदरच्या कामाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नावी-20 दि.20/03/2009 नुसार त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही. ठेकेदाराकडून 1% ची रक्कम रु.7,540/- वसुल करून शासन खाती भरणे आवश्यक आहे. विद्‍युत सोयी सुविधा नसताना सभागृहाचा वापर होऊ शकत नाही, त्यामुळे त्याच्या विनियोगाबाबत खात्री होत नाही. कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमाप पुस्तकातील मोजमापाची तपासणी केली नाही.***

ठेकेदाराचे नाव:- सचिन घनाते.

प्रशासकीय मान्यता- जिल्हाधिकारी कार्या. पत्र क्र. नियोजन/19/खास्थाविका/सस-3/2013-14/42/ प्र.क्र.4/ सी.आर.151 व 293/152 दि.19.09.2014.

| अक्र. | कामाची बाब | प्र.क्र .44 कृषीनगर येथे मनपाच्या जागेत सभागृह बांधणे | प्र.क्र .30 थोरली इरन्ना वस्ती येथे मनपाच्या जागेत व्यायामशाळा बांधणे. |
|---|---|---|---|
| 1 | प्राकलन | रु.7,00,000/- | 7,00,102/- |
| 2 | स्थायी समिती मान्यता | ठराव क्र.290 दि.11/09/14. | ठराव क्र.289 दि.11/09/14. |
| 3 | करारनामा | दि.16/05/14. | दि.16/05/14. |
| 4 | कामाचा आदेश | जा/नअ.क्र.340 दि.19/05/14 | जा/नअ.क्र.341 दि.19/05/14. |
| 5 | निविदा मंजूर दर | 2% कमीने | 2% कमीने |
| 6 | पु.ग.प. मान्यता | ठराव क्र.229 दि.17/02/14. | ठराव क्र.230 दि.17/02/14. |

मोजमाप पुस्तिका क्र. 15.

सदरच्या प्र. क्र.44 कृषीनगर येथे मनपाच्या जागेत सभागृह बांधणे व प्र. क्र.30 थोरली इरन्ना वस्ती येथे मनपाच्या जागेत व्यायामशाळा बांधणे या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता खालील उणीवा निदर्शनास आल्या याबाबत अर्धसमास क्रमांक 39 दि. 17/07/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाचे अनुपालन प्राप्त झाले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

1. सदरच्या कामास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेतल्याची दिसून येत नाही. हे नियमबाह्य आहे.
2. प्रशासकीय मान्यतेमधील अट क्र.11 नुसार कामाचे फोटो नस्तीत आढळून आले नाहीत.
3. सदरच्या कामाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नावी-20 दि.20/03/2009 नुसार त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही.
4. सदरच्या कामातून 1% कामगार कल्याण उपकर कपात केला नाही, त्यामुळे ठेकेदाराकडून 1% ची रक्कम रु.7,540/- ठेकेदाराकडून वसुल करून शासन खाती भरणे आवश्यक आहे.
5. सदरच्या सभागृहासाठी विद्युतची (electrification) सोय केल्याचे दिसत नाही, विद्युत सोयी सुविधा नसताना सभागृहाचा वापर होऊ शकत नाही, त्यामुळे त्याच्या विनियोगाबाबत खात्री होत नाही.
6. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 180 प्रमाणे बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठ् लाल शाईच्या कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्यवक आहे. तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्याने रोख प्रमाणकाचा क्र. दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम परिशिष्ट -24 मधील अ.क्र.12,13 व 15 अन्वये मोजमाप पुस्तकात मापे उतरल्यानंतर शेवटी गोषवारा तयार करणे अनिवार्य असून त्यामध्ये केलेल्या कामाच्या मोजमापाच्या् प्रत्येक बाबींची संख्या, दर, युनिट व रक्कम दर्शविणे आवश्यक आहे. तथापि मोजमाप पुस्तकातील मोजमापे कर्णरेषेने खोडली नाहीत. तसेच गोषवा-याखाली काम पूर्णत्वाचा दिनांक नमुद केलेला नाही.
7. महाराष्ट्र सार्वजनिक बाधकाम नियमावलीतील परिशिष्ट क्र.24 नुसार कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमाप पुस्तकातील मोजमापाची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकातील मोजमापाची तपासणी केली नाही.

एकूण वसूलपात्ररक्कम =रु.7540/-

DGPAGPM8503 (Ref No : 3, Hmm No : 39)

## *22 महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या कामासाठी विशेष अनुदान अंतर्गत भाग-ड मधील रस्ते करणे. (2014-15)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : रस्ते अनुदान शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1335995.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 79691.00/-

***स्थानिक संस्था कराची आकारणी कमी दराने केलेने अतिप्रदान रक्कम रु.79,691/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.***

ठेकेदाराचे नाव :- सुनिल बेत.
करारनामा :- दि.21.01.2015 मुद्रांक शुल्क = रक्कम रु.2000/-
निविदा मान्यता :मा.स्थायी समिती यांच्याकडील ठराव क्र. 559 दि.07.01.2015 अन्वये
प्राकलन :- रु.27,21,495.55/- निविदा मंजूर दर :- 0.1% कमी दराने.
निविदा रक्कम- रु.13,35,995/-
पुगप मान्यता- स्थापत्य समिती ठ.क्र.199 दि.17/02/2014.
कामाचा आदेश :- नगर अभियंता कार्या. जा. क्र. नअ/१०५ दि.21/01/2015.
कामाचा कालावधी- 5 महिने.
मोजमाप पुस्तिका क्र. 584.
कामाची स्थिती- लेखापरीक्षण कालावधी मार्च 2015 पर्यंत काम अपुर्ण आहे.

सदरच्या महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या कामासाठी विशेष अनुदान अंतर्गत भाग-ड मधील रस्ते करणे यातील तीन कामाची नस्ती , मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उनिवाबाबत अर्धसमास क्रमांक 25 दि. 20/06/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाचे पत्र जावक क्र.नअ./एच ओ/467 दिनांक 03/07/2017 अन्वये सादर केलेला खुलासा/ अनुपालन विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. प्राकलन ( Estimate) तयार करताना कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या दरांचे (दरसुचीतील बसिक दर) दर पृथक्करण करताना साहित्याच्या दरावर 4% स्थानिक संस्था कर आकारणी करून साहित्याचा दर निश्चित केला आहे. नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना दि.06/08/2012 मधी नियम 5 नुसार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये काम हाती घेणाऱ्या कोणत्याही व्यापा-याला किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किमतीवर त्याच्या कंत्राटी मूल्याच्या एकूण किमतीवर 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर वसुल करावा असे नमूद आहे. त्यानुसार कंत्राटदाराच्या देयकामधून 0.25% दराप्रमाणे स्थानिक संस्था कराची रक्कम वसुल केली आहे. परंतु दर पृथक्करण करताना 4% दराने स्थानिक संस्था कर वाढवून दर मंजूर केल्याने खालीलप्रमाणे ठेकेदारासअतिप्रदान झाले आहे.

| मोजमाप पुस्तक क्र. व | कामावर खर्ची पडलेली | अंदाजपत्रकात 4% दराने LBT | कंत्राटदारास अदा केलेली | कंत्राटदाराकडून वसुल केलेली LBT ची | अतिप्रदानाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|

| पृष्ठ क्र. | एकूण रक्कम रु. | समाविष्ट केलेल्या बाबींची एकूण रक्कम रु. | LBTची 4% रक्कम रु. | रक्कम रु. | |
|---|---|---|---|---|---|
| कामाचे नाव :- प्र.क्र.28 अ मधील सलगर वस्ती येथील अंतर्गत रस्ते करणे. | | | | | |
| 6-1/584 | 7,40,110 | 7,35,654 | 29,426 | 1850 | 27,576 |
| कामाचे नाव :- प्र.क्र.28 ब जाधव घर ते लिमयेवाडी मस्जिद ते बाल हनुमान दुकान ते भैरू वस्ती अंतर्गत रस्ते करणे. | | | | | |
| 13-7/584 | 7,98,776 | 7,27,696 | 29,108 | 1997 | 27,111 |
| कामाचे नाव :-प्रभाग क्र. 32 अ उपलोप घर ते गांधी बंगला सात रस्त्यापर्यंत रस्ते करणे. | | | | | |
| -14/584 16 | 7,93,872 | 6,66,865 | 26,675 | 1667 | 25,008 |
| एकूण | | | 85,205 | 5514 | 79,691 |

सदरची अतिप्रदान रक्कम रु.79,691/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे. तसेच इतर नस्तींची तपासणी करून त्यामधील सदरची अनियमितता मुख्य लेखापरीक्षकांच्या मान्यतेने दूर करण्यात यावी.

DGPAGPM8503 (Ref No : 5, Hmm No : 27)

## *23 भाग- बी मधील प्रभाग क्र. 47 डीसीसी बँक क्वालनी, छत्रपती शिवाजी महाराज सोसायटी व परिसर येथे रस्ता करणे. (2014-15)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : रस्ते अनुदान शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1085069.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 40488.00/-

***खोदाईतून निघालेला माल/साहित्य कोठे वाहतुक केला याची नोंद नस्तीत नाही. तसेच वाहतुकीची चलने नस्तीत आढळून आली नाहीत, त्यामुळे खोदाईतून निघालेले साहित्य वाहतुकीच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही. 24 घ.मी. साठी रक्कम रु.1618/- चे अतिप्रदान झाले असून ते ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावेत.***

***सदरच्या कामाची शासन निर्णय दि.19/01/13 अन्वये ई- निविदा प्रणाली राबवण्यात आली नाही. सदरच्या कामाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नावी-20 दि.20/03/2009 नुसार त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही. स्थानिक संस्था कराची रक्कम कमी दराने वसुली केल्याने ठेकेदारास रक्कम रु.38,870/- चे अतिप्रदान झाले आहे.***

ठेकेदाराचे नाव :- सुनिल घाटगे.
करारनामा :- दि.06.09.2014, मुद्रांक शुल्क = रक्कम रु.1300/-
निविदा मान्यता :मा. स्थायी समिती यांच्याकडील ठराव क्र. 204 दि.28.08.2014 अन्वये.
प्रशासकीय मान्यता;- मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.260 दि.30/12/2014
प्राकलन :- रु.13,92,387/- निविदा मंजूर दर :- 4.05% कमी दराने.
निविदा रक्कम- रु.13,35,995/-
पुगप मान्यता- स्थापत्य समिती ठ.क्र.199 दि.17/02/2014.
कामाचा आदेश :- नगर अभियंता कार्या. जा. क्र. नअ/48 दि.06/09/2014.
कामाचा कालावधी- 5 महिने.
पहिले धावते देयक रक्कम- रु.4,84,584/-
दुसरे धावते देयक रक्कम- रु.6,00,485/-
मोजमाप पुस्तिका क्र. 584.

सदरच्या भाग- बी मधील प्रभाग क्र. 47 डीसीसी बँक क्वालनी, छत्रपती शिवाजी महाराज सोसायटी व परिसर येथे रस्ता करणे. (2014-15) या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उनिवाबाबत अर्धसमास क्रमांक 26 दि. 20/06/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाचे पत्र जावक क्र.नअ./एच ओ/464 दिनांक 03/07/2017 अन्वये सादर केलेला खुलासा/ अनुपालन विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. खोदाईतून निघालेला माल/साहित्य कोठे वाहतुक केला याची नोंद नस्तीत नाही. तसेच वाहतुकीची चलने नस्तीत आढळून आली नाहीत, त्यामुळे खोदाईतून निघालेले साहित्य वाहतुकीच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही. विभागाने अनुपालनामध्ये सदरचा माल हा माती मिश्रित असल्याचे नमूद केले आहे परंतु वाहतुकीची चलने सादर केली नाहीत.

)) 2. खोदाईतून निघालेल्या माल हा 100 घ.मि. पेक्षा कमी क्वांटीटीचा असल्याने त्याला PWD दरसूचीनुसार 95.70/घ.मी. दराने रक्कम अदा करणे आवश्यक असताना रक्कम रु. 149.50/घ.मी. दराने ठेकेदारास रक्कम अदा केली आहे. त्यामुळे 24 घ.मी. साठी रक्कम रु.1618/- चे अतिप्रदान झाले असून ते ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावेत. विभागाने अनुपालनामध्ये म्यनुअल खोदाईच्या दराने म्हणजेच 95.70/घ.मी. दराने रक्कम अदा केली असल्याचे कळवले आहे, परंतु अभिलेख सादर केली नाहीत. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

3. सदरच्या कामाची शासन निर्णय दि.19/01/13 अन्वये ई-निविदा प्रणाली राबवण्यात आली नाही. विभागाने अनुपालनामध्ये शासन नियमाप्रमाणे ई-निविदा प्रणाली राबवण्यात आली असल्याचे नमूद केले आहे, परंतु पुरेसे अभिलेख सादर केली नाहीत. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

4. सदरच्या कामाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नावी-20 दि.20/03/2009 नुसार

त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही. विभागाने अनुपालनामध्ये एस.जी.एस संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण नमूद केले आहे, परंतु अहवाल सादर केले नाहीत. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

5. प्राकलन (Estimate) तयार करताना कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या दरांचे (दरसुचीतील बसिक दर) दर पृथक्करण करताना साहित्याच्या दरावर 4% स्थानिक संस्था कर आकारणी करून साहित्याचा दर निश्चित केला आहे. परंतु ठेकेदारास देयके प्रदान करताना देयकाच्या रक्कमेमध्ये 0.25% स्थानिक संस्था कराची रक्कम वसुल केली आहे. कमी दराने वसुली केल्याने ठेकेदारास रक्कम रु.38,870/- चे अतिप्रदान झाले आहे. विभागाने अनुपालनामध्ये वसुली करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे, परंतु प्रत्यक्ष वसुली केली नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

एकूण वसुलपात्र रक्कम – रु.40,488/-

DGPAGPM8503 (Ref No : 6, Hmm No : 26)

## *24 भाग- बी मधील प्रभाग क्र. 47 सदिच्छानगर व शाहूनगर रस्ता करणे. (2014-15)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : रस्ते अनुदान शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1085069.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 31880.00/-

***खोदाईतून निघालेला माल/साहित्य कोठे वाहतुक केला याची नोंद नस्तीत नाही. तसेच वाहतुकीची चलने सादर केली नाहीत. PWD दरसूचीनुसार 95.70/घ.मी. दराने रक्कम अदा करणे आवश्यक असताना रक्कम रु. 149.50/घ.मी. दराने ठेकेदारास रक्कम अदा केली आहे. त्यामुळे 30 घ.मी. साठी रक्कम रु.1618/- चे अतिप्रदान झाले. सदरच्या कामाची शासन निर्णय दि.19/01/13 अन्वये ई-निविदा प्रणाली राबवण्यात आली नाही. सदरच्या कामाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण 2008/1338/ प्र.क्र.171/08/ नावी-20 दि.20/03/2009 नुसार त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही. स्थानिक संस्था कराची रक्कम कमी दराने वसुली केल्याने ठेकेदारास रक्कम रु. 30,262.40/- चे अतिप्रदान झाले आहे.***

ठेकेदाराचे नाव :- सुनिल घाटगे.

करारनामा :- दि.06.09.2014 मुद्रांक शुल्क = रक्कम रु.1300/-

निविदा मान्यता :मा.स्थायी समिती यांच्याकडील ठराव क्र. 204 दि.28.08.2014 अन्वये.

प्रशासकीय मान्यता;- मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.260 दि.30/12/2014

प्राकलन :- रु.13,92,387/- निविदा मंजूर दर :- 4.05% कमी दराने.

प्राप्त निविदा- 3, पात्र निविदा - 3, निविदा रक्कम- रु.13,35,995/-

पुगप मान्यता- स्थापत्य समिती ठ.क्र.199 दि.17/02/2014.

कामाचा आदेश :- नगर अभियंता कार्या. जा. क्र. नअ/48 दि.06/09/2014.

कामाचा कालावधी- 5 महिने.

पहिले धावते देयक रक्कम- रु.4,84,584/-

दुसरे धावते देयक रक्कम- रु.6,00,485/-

कामाची स्थिती- लेखापरीक्षण कालावधी मार्च 2015 पर्यंत काम अपुर्ण आहे.

मोजमाप पुस्तिका क्र. 584. सदरच्या भाग 47 .क्र प्रभाग मधील बी -सदिच्छानगर व शाहूनगर रस्ता करणे या कामाची नस्ती, मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 25 दि. 20/06/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाचे पत्र जावक क्र.नअ./एच ओ/464 दिनांक 03/07/2017 अन्वये सादर केलेला खुलासा/ अनुपालन विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. खोदाईतून निघालेला माल/साहित्य कोठे वाहतुक केला याची नोंद नस्तीत नाही. तसेच वाहतुकीची चलने नस्तीत आढळून आली नाहीत, त्यामुळे खोदाईतून निघालेले साहित्य वाहतुकीच्या योग्यतेबाबत खात्री होत नाही. विभागाने अनुपालनामध्ये सदरचा माल हा माती मिश्रित असल्याचे नमूद केले आहे परंतु वाहतुकीची चलने सादर केली नाहीत.
2. खोदाईतून निघालेल्या माल हा 100 घ.मि. पेक्षा कमी क्वांटीटीचा असल्याने त्याला PWD दरसूचीनुसार 95.70/घ.मी. दराने रक्कम अदा करणे आवश्यक असताना रक्कम रु. 149.50/घ.मी. दराने ठेकेदारास रक्कम अदा केली आहे. त्यामुळे 30 घ.मी. साठी रक्कम रु.1618/- चे अतिप्रदान झाले असून ते ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावेत. विभागाने अनुपालनामध्ये म्यनुअल खोदाईच्या दराने म्हणजेच 95.70/घ.मी. दराने रक्कम अदा केली असल्याचे कळवले आहे, परंतु अभिलेख सादर केली नाहीत. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.
3. सदरच्या कामाची शासन निर्णय दि.19/01/13 अन्वये ई-निविदा प्रणाली राबवण्यात आली नाही. विभागाने अनुपालनामध्ये शासन नियमाप्रमाणे ई-निविदा प्रणाली राबवण्यात आली असल्याचे नमूद केले आहे, परंतु अभिलेख सादर केली नाहीत. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.
4. सदरच्या कामाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नावी-20 दि.20/03/2009 नुसार त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण केले नाही. विभागाने अनुपालनामध्ये एस.जी.एस संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण नमूद केले आहे, परंतु अहवाल सादर केले नाहीत. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.
5. प्राकलन (Estimate) तयार करताना कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या दरांचे (दरसुचीतील बसिक दर) दर पृथक्करण करताना साहित्याच्या दरावर 4% स्थानिक संस्था कर आकारणी करून साहित्याचा दर निश्चित केला आहे. परंतु ठेकेदारास देयके प्रदान करताना देयकाच्या रक्कमेमध्ये 0.25% दराने स्थानिक संस्था कराची रक्कम वसुल केली आहे. स्थानिक संस्था कराची रक्कम कमी दराने वसुली केल्याने ठेकेदारास रक्कम रु. 30,262.40/- चे अतिप्रदान झाले आहे. विभागाने अनुपालनामध्ये वसुली करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे, परंतु प्रत्यक्ष वसुली केली नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

एकूण वासुल्पत्र रक्कम – रु.31,880/-

DGPAGPM8503 (Ref No : 7, Hmm No : 25)

## *25 रमाई घरकुल योजनेअंतर्गत झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष : रमाई घरकुल योजना शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***प्रथम टप्प्यातील 710 लाभार्थ्यांची लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली मूळ यादी प्रमाणित व साक्षांकित केलेली नाही.मार्च 2015अखेर पर्यंत बारा हजार कुटुंबांचे सर्वेक्षण झालेले असून साधारणपणे तेरा हजार कुटुंबांचे सर्वेक्षण झालेले नाही. सन 2013-14 व 2014-15 या दोन आर्थिक वर्षामध्ये घरकुल निर्माण समितीच्या कमीत कमी 24 आढावा बैठका व्हायला पाहिजे होत्या परंतु प्रत्यक्षात 4 बैठका झालेल्या आहेत. प्रत्यक्षात मार्च 2015 अखेर पर्यंत 945 लाभार्थ्यांना रमाई घरकुल योजनेचा लाभ देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत 988 लाभार्थी पात्र असूनही लाभांपासून वंचित आहेत. विभागाकडील लाभ दिलेल्या काही निवडक लाभार्थ्यांच्या नस्ती तपासल्या असता असे निदर्शनास आले आहे की लाभार्थ्यांचे जातीचे दाखले न बघताच त्यांना लाभ दिलेल्या आहे. 710 घरकुलांपैकी 523 घरकुले मार्च 2015 पर्यंत पुर्ण झालेली तसेच 175 घरकुलांचे काम चालु होते. यापैकी महापालिकेने एकाही घरकुलांना बांधकाम परवानगी देवून नियमित करुन घेतलेले नाहीत.शासन निर्णय क्र.9 मार्च 2010 मुद्दा क्र 23(ब) नुसार, घर पुर्ण झाल्यानंतर प्रवेश व्दाराजवळ सामाजिक न्याय विभागांच्या अर्थ सहाय्यातून घर बांधण्यात आले आहे असा नामफलक लावण्यात यावा असे स्पष्ट निर्देश असतानाही काही लाभार्थ्यांच्या नस्तीमध्ये कोनशिला न लावता बसवलेले फोटो जोडलेले असतानाही अंतिम (अनुदान) हप्ता मंजुर केलेले आहे. विभागाकडील लाभ दिलेल्या काही निवडक लाभार्थ्यांच्या नस्ती तपासल्या असता असे निदर्शनास आले आहे की काही लाभार्थ्यांना जातीचे दाखले न बघताचा त्यांना लाभ दिलेला आहे***

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना शा.नि.क्र./बीसीएच 2008/प्रक्र.36/ आवक-2, दिनांक 15 नोव्हेंसबर 2008 व शा.नि.क्र.बीसीएच-2009/प्रक्र.159/मावक-2, दिनांक 9 मार्च 2010 नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी सुधारीत घरकुल योजनेस शासनाने मान्यता दिलेली आहे.सोलापूर महापालिके अंतर्गत सन 2013-14 ते 2014-15 या कालावधी मध्ये रमाई घरकुल योजनेअंतर्गत 59 नवीन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. लेखापरीक्षणा दरम्यान या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.29 दि.22/06/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय

नोंदविण्यात येत आहेत.

1) अनुसूचित जाती व नवबौध्दत घटकांसाठी घरकुल योजना शा.नि.क्र./बीसीएच 2008/प्रक्र.36/ आवक-2, दिनांक 15 नोव्हेंसबर 2008नुसार समाज कल्याण विभागाकडून निवडलेल्या प्रथम टप्प्यातील 710 लाभार्थ्यांची लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली मूळ यादीप्रमाणित व साक्षांकित केलेली नाही. त्यामुळे निवडलेल्या लाभार्थ्यांनाच लाभ दिल्या बाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) दिनांक 31 मार्च 2015 पर्यंत सदर योजने अंतर्गत 13139 अनुसूचित जाती व नव बौध्द कुटुंबाचे सर्वेक्षण झालेले आहे.सोलापूर महापालिका अंतर्गत साधारणपणे पंचवीस हजार कुटुंबे आहेत. मार्च 2015अखेर पर्यंत बारा हजार कुटुंबांचे सर्वेक्षण झालेले असून साधारणपणे तेरा हजार कुटुंबांचे सर्वेक्षण झालेले नाही.

3) शासन निर्णय 9 मार्च 2010, मुद्दा क्रमांक 15 व शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बीसीएच-2009/प्र.क्र.159/मावक2, दिनांक 7 जुलै, 2010 नुसार, घरकुल निर्माण समितीची दर महिन्याला किमान एकदा आढावा बैठक घेवून योजनेची अंमलबजावणी सुलभ होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करावे असे सूचित केलेले आहे. परंतु सन 2013-14 व 2014-15 या दोन आर्थिक वर्षाच्या मध्ये कमीत कमी 24 आढावा बैठका व्हायला पाहिजे होत्या परंतु प्रत्यक्षात 4 बैठका झालेल्या आहेत. रमाई घरकुल योजनेची प्रगती मंद गतीने होऊन शासन निर्णयातील तरतुदींचे पालन झालेले नाही.

4) ब्रॅन्ड द विस्टां मास कम्युनिकेशनने सन 2011 मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार 1942 पात्र लाभार्थ्यांची यादी घोषित केले होती. परंतु प्रत्यक्षात मार्च 2015 अखेर पर्यंत 945 लाभार्थ्याना रमाई घरकुल योजनेचा लाभ देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत 988 लाभार्थी पात्र असूनही लाभांपासून वंचित आहेत. सबब संबंधित विभागाचे योजनेच्या कामास गती देणे आवश्यतक आहे.

5) सन 2013-14 या वर्षामध्ये नवीन 59 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला. (लाभार्थी निवडीची प्रक्रिया व निकष हे सन 2005-06 मध्ये घेण्यात आलेल्या दारिद्रय रेषेखालील सर्वेक्षणानुसार केलेले आहे. दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांची निवड ही सन 2005-06 च्या बी.पी.एल. सर्वेक्षणानुसार करण्यात आलेली आहे.सन 2011 मध्ये ब्रॅन्ड द विस्टां मास कम्युनिकेशन एजन्सी कडून सर्वेक्षण करताना सन 2005-06 च्या बी.पी.एल.सर्वेक्षणाचा निकष ग्राह्य धरण्यात आलेला आहे. शासन निर्णय 9 मार्च 2010 मुद्दा क्र 4(अ)(3) व 4(ब) 4 उत्पन्नाचा दाखला अनिवार्य आहे. सबब योजनेचा लाभ हा प्राधान्याने दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना प्रथम व नंतर दारिद्रय रेषेवरील लाभार्थ्यांना द्यायचा आहे.दरम्यानच्या 9 वर्षा मध्ये आज ज्या 59 लाभार्थ्यांना घरकुल मंजूर केले आहे. त्यातील काही लाभार्थी दारिद्रय रेषेच्या वर आल्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु उत्पन्नाची दाखले हे विभागाव्दारे प्रत्यक्ष लाभ मंजुर करतेवेळी विचारात घेतलेले नाहीत. त्यामुळे दारिद्रय रेषेखालील काही लाभार्थी योजनेपासून वंचित राहत आहेत. त्याची खात्री करुन अनुपालन सादर करावे. सबब शा.नि.9 मार्च 2010 मुद्दा 4(ब), 4 तरतुदीचे पालन होत नाही.

6) विभागाकडील लाभ दिलेल्या काही निवडक लाभार्थ्यांच्या नस्ती तपासल्या असता असे निदर्शनास आले आहे की लाभार्थ्या चे जातीचे दाखले न बघताचा त्यांना लाभ दिलेल्या आहे. तसेच काही लाभार्थ्यांनी मुलाचा, मुलीचा किंवा पत्नीचा दाखला जोडला आहे. परंतु प्रत्यक्षात लाभार्थ्यांनी स्वतःचा जातीचा दाखला जोडलेला

नाही. उदा.श्रीमती ताईबाई प्रल्हाद राजगुरु यांनी सर्व आवश्यक कागदपत्रे पतीच्या नावाची आहेत. श्री.पितांबर शिंदे यांनी मुलीचा जातीचा दाखला जोडला आहे. श्रीमती मंजुळा तुकाराम गायकवाड यांनी मुलाचे जात प्रमाणपत्र जोडलेले आहे. असे असतानाही त्यांना लाभ मंजुर करण्यात आलेले आहेत.सबब शा.नि. 9 मार्च 2010 मुद्दा क्र.4 (ब) (3) मधील तरतुदीचे पालन होत नाही.

7) शा.नि.15 नोव्हेंहबर 2008 मुद्दा क्र.5(अ) नुसार रमाई आवास योजनेअंतर्गत लाभ मंजुर करतेवेळी त्यांनी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम व इंदिरा आवास योजनेचा लाभ घेतलेला नाही तेच लाभार्थी या योजनेसाठी पात्र आहेत अशी तरतुद केलेली आहे. तपासणी दरम्यान या दोन योजनांच्या् लाभार्थ्यांची यादी उपलब्ध न केल्याने रमाई घरकुल योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी अन्य योजनेचा लाभ घेतला अगर कसे याची खात्री करता आलेली नाही.

8) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुनिवपु) अधिनियम 1971 नुसार महानगरपालिका क्षेत्रात पक्के घराचे बांधकाम करण्या्साठी बांधकाम परवाना घेणे बंधनकारक आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या 6690 उदिष्ट्यापैकी मंजुरी दिलेल्या 710 घरकुलांपैकी 523 घरकुले मार्च 2015 पर्यंत पुर्ण झालेली तसेच 175 घरकुलांचे काम चालु होते. यापैकी महापालिकेने एकाही घरकुलांना बांधकाम परवानगी देवून नियमित करुन घेतलेले नाहीत.

9) शासन निर्णय क्र.9 मार्च 2010 मुद्दा क्र 23(ब) नुसार, घर पुर्ण झाल्यांनंतर प्रवेश व्दाराजवळ सामाजिक न्याय विभागांच्या अर्थ सहाय्यातून घर बांधण्यात आले आहे असा नामफलक लावण्यात यावा असे स्पष्ट निर्देश असतानाही काही लाभार्थ्यांच्या नस्तीमध्ये कोनशिला न लावता बसवलेले फोटो जोडलेले असतानाही अंतिम (अनुदान) हप्ता मंजुर केलेले आहे. उदा.1) श्रावण शि.वाघे. 2) बनसोडे कुसुम धर्मा 3) निर्मला व मुथाल 4) सुमन रणदिवे. 5) शिवाजी शिंदे 6) नितीन गायकवाड 7) अंकुश बनसोडे 8) योशिमा वाघमारे 9) जनाबाई तुपसुंदर या लाभार्थ्यांच्या नस्ती मध्ये कोनशिला न लावता बसवलेले फोटो जोडलेले आहेत.

10) शासन निर्णय 9 मार्च 2010 मुद्दा क्र.23 (क) घर पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांच्या कुटुंबासोबत घराचा फोटो घेण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत. परंतु लेखापरीक्षणा दरम्यान काही निवडक लाभार्थ्यांच्या नस्तीची तपासणी केली असता.उदा. 1) श्री.रामदास शिंदे 2) अंकुश बनसोडे 3) योगिना वाघमारे 4) जनाबाई तुपसुंदर या लाभार्थ्यांचे नस्तीमध्ये घर पुर्ण झाल्याबाबतचे फोटो जोडलेले नसतानाही अंतिम (अनुदान) हप्ता मंजुर केलेले आहे.

11) शा.नि.9 मार्च 2010 (सामाजिक न्या्य व विशेष सहाय्य विभाग) मुद्दा क्र (4) (ब) (1) नुसार जागा लाभार्थ्यांच्या नावे असणे बंधनकारक आहे व त्याचा पुरावा म्हणून 7/12 चा उतारा,मालमत्ताल नोंदप्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परंतु लाभार्थ्यांनी जागेचा उतारा किंवा मालमत्ता नोंदप्रमाणपत्रा शिवाय काही घरकुलाना मंजुरी दिलेली आहे. सबब शासन निर्णयातील तरतुदींचे पालन झालेले नाही. उर्वरीत लाभार्थ्यांच्या बाबतीत फोटो, कोनशिला व जातीचे दाखला व जागेच्या पुराव्याबाबतची खातरजमा करुन लेखापरीक्षणास अनुपालन सादर करावे.

DATVRKM8002 (Ref No : 16, Hmm No : 29)

## *26 डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत सफाई कर्मचा-यांचे निवासस्थान बांधणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 14**

*लेखा शीर्ष : डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 30527431.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 30527431.00/-

***मा.आयुक्त यांचे दि.31/12/2012 च्या बैठकी मध्ये पर्यायी निवासस्थात टी.पी.2, फा.प्लॉ.नं.80, मड्डी वस्ती या ठिकाणी बांधण्या बाबत निर्णय दिला असतानाही पूर्वीच्या उत्तर सदर बझार या ठिकाणच्या अनुषंगाने तयार केलेले पूर्वगनणपत्रक र.रु.1,87,08,500/- याप्रमाणेच 9/02/2013 जाहिर प्रसिध्दीकरण करण्यात आले. मनपाच्या सर्वसाधारण सभेने मान्यता न दिल्याने माननीय आयुक्त यांची दि.20/06/2013 रोजी मानीव मान्यता घेऊन संबंधित विभागाने निविदा प्रक्रिया राबविलेली आहे. पर्यायी निवासस्थान टी.पी.2, फा.प्लॉ.नं.80, मड्डी वस्ती च्या अनुषंगाने सुधारित पुर्वगणनपत्रक तयार करुन त्यप्रमाणे निविदा प्रक्रिया राबविलेली नाही. पर्यायी जागेसाठी विभागाने पूर्वगणनपत्रक तसेच इतर कुठलीही तांत्रिक मान्यता न घेता वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. मोफत निवासस्थाने बांधण्याची जागा बदलाबाबत शासनाची मान्यता घेण्यांत आलेली नाही. संबंधित कामाच्या बाबतीत थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट केल्याबाबतचे प्रमाणपत्र, करारनामा,बारचार्ट, मासिक प्रगती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेले नाही. कामाची निविदा 39 टक्के जादा दराची मंजूर करण्यात आली आहे हे नियमबाह्य आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजने अंतर्गत सफाई कर्मचा-यांचे निवासस्थान बांधणे.** |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | हल-को इन्फ्रा प्रा.लि. मुंबई |
| स्थापत्य समिती | क्र. 14, दिनांक 14/09/2012 |

| | |
|---|---|
| स्थायी समिती मंजुरी | ठराव क्रमांक 151, दिनांक 30/07/2013 |
| प्रशासकीय मंजुरी | मा.आयुक्त यांचे दिनांक 26/07/2012 चे मान्यता |
| मा.मनपा सर्वसाधारण सभेची मान्यंता | मान्यता नाही, मा.आयुक्त यांचे 20/06/2013 रोजी मानीव मान्यता. |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2011-12 |
| पूर्वगणन पत्रक क्रमांक व वर्ष | 2012-13 |
| पूर्वगणन पत्रक रक्कम | र.रु.1,87,08,500/- |
| इसारा रक्कम | र.रु.1,70,500/- |
| निविदा रक्क्म | र.रु.1,70,07,625/- |
| सुरक्षा अनामत | र.रु.3,45,000/- |
| कामाचा कालावधी | 9 महिने |
| कार्यारंभ आदेश | नअ/गवसु-748, दिनांक 15/10/2013 |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | अपूर्ण |

शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.सकानि 2007/प्र.क्र.176/2007/नवि-6,मंत्रालय, मुंबई 32, दि.22/10/2008 अन्वये सोलापूर महानगरपालिकेतील 71 सफाई कामगाराकरीता 269 चौ.फुटाचे मोफत निवाससथान बांधणे कामी सन 2011-12 चे डी.एस.आर. दरानुसार सविस्तर सुधारित अंदाजपत्रक र.रु.1,87,08,500/- इतक्या रक्कमेचे तयार करुन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविले असता ते मंजूर होऊन शासनाकडून दि.31/03/2013 ने र.रु.1,68,37,500/- इतके अनुदान प्राप्त झाले आहे. सुधारित अंदाजपत्रकात सन 2012-13 र.रु.1,87,08,500/- यास मा.स्थापत्य, समिती ठ.क्र.47 दि.14/09/2012 ने मान्यता मिळाली. परंतु मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिली नसल्याने माननीय आयुक्त यांच्या दिनांक 20/06/2013 च्या आदेशान्वये मानीव मान्यता दिली आहे.

सदरचे निवासस्थान हे उत्तर सदर बझार येथे बांधणेचे प्रस्तावित होते. परंतु त्या ठिकाणी मनपाचे इतर सफाई कर्मचारी अतिक्रमण करुन राहत असल्याने सदरचे निवासस्थान पर्यायी जागा टी.पी.2, फा.प्लॉस.नं.80, मड्डी वस्ती या ठिकाणी जागेत बांधणेबाबत मा.आयुक्त यांच्या दि.31/12/2012 रोजीच्या बैठकीमध्ये निर्णय झाला. या पर्यायी जागेला मा.सर्वसाधारण सभेने मान्येता दिली नसल्याने माननीय आयुक्त यांनी दिनांक 20/06/2013 च्या आदेशान्वये मान्यता दिली आहे. याबाबतच्या नस्तीचे, मोजमाप नोंदवहीची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.30

दि.22/06/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यववहार फक्त् शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे.विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे प. क्र.प्रविनी-2300/सहविमा/जिप-2 दि.07 जानेवारी 2004 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% विमा कामासाठी व कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा निधीत भरणे आवश्यक आहे. सदर कामाचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. परंतु धावत्या बिलातून 1% विमा रक्कम वसूल केलेली नाही. सदर विमा रक्कम रु.2,36,405/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.

2) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावली नुसार तांत्रिक अधिका-याने पर्यायी जागा टी.पी.2, फा.प्लॉ्.नं.80, मड्डी वस्ती या ठिकाणाचे स्थ्ळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याआधारे कामाच्या् बाबींच्या अंदाजपत्रकात समावेश करणे अपेक्षित आहे. परंतु सदर अहवालाची प्रत निविदा नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

3) मा.आयुक्त यांचे दि.31/12/2012 च्या बैठकीमध्ये पर्यायी निवासस्थान टी.पी.2, फा.प्लॉ.नं.80, मड्डी वस्ती या ठिकाणी बांधण्याबाबत निर्णय दिला असतानाही पूर्वीच्या उत्तर सदर बझार या ठिकाणच्या अनुषंगाने तयार केलेले पूर्वगनणपत्रक र.रु.1,87,08,500/- याप्रमाणेच 9/02/2013 जाहिर प्रसिध्दीकरण करण्यारत आले. मनपाच्या सर्वसाधारण सभेने मान्याता न दिल्याने माननीय आयुक्त यांची दि.20/06/2013 रोजी मानीव मान्यता घेऊन संबंधित विभागाने निविदा प्रक्रिया राबविलेली आहे. पर्यायी निवासस्थान टी.पी.2, फा.प्लॉ.नं.80, मड्डी वस्ती च्या अनुषंगाने सुधारित पुर्वगणनपत्रक तयार करुन त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया राबविलेली नाही.

4) सदनिकाचे नवीन जागेत काम करताना पर्यायी जागेवरील परिस्थितीनुसार मंजूर पूर्वगणनपत्रकातील (उत्तर सदर बझार) काही आयटमच्यां क्वॉटिटीमधील वाढीमुळे व नवीन आयटममुळे मंजूर पूर्वगनणपत्रक(उत्तर सदर बझार) र.रु.1,87,08,500/- व सुधारित पूर्वगणनपत्रक (टी.पी.2, फा.प्लॉ.नं.80, मड्डी वस्ती) र.रु.3,40,95,178/- या दोन्ही मध्ये. र.रु.1,53,86,678/- इतक्या रकमेची वाढ होत आहे. हा खर्च महापालिका कसा भागविणार याबाबत कुठलेही नियोजन केलेले दिसत नाही. त्यामुळे काम पूर्णत्वास विलंब होत आहे. याबाबत खुलासा करावा.

5) पर्यायी निवासस्थान टी.पी.2, फा.प्लॉ.नं.80, मड्डी वस्ती बझार या जागेच्या अनुषंगाने सुधारित पूर्वगणनपत्रक र.रु.3,40,95,178/- यास मा.स्थापत्य समिती ठराव क्रमांक 7, दि.14/05/2015 व मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 87, दि.08/06/2015 अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. याच जागेवरील कामासाठी नअ/गवसु-748, दि.15/10/2013 अन्वये वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे. म्हणजेच पर्यायी जागेसाठी विभागाने पूर्वगणनपत्रक तसेच इतर कुठलीही तांत्रिक मान्यता न घेता वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. याबाबत खुलासा करावा.

6) मा.आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांचे पत्र कमांक नअ/झोवसु/1131, दि.28/03/2012 अन्व ये सोलापूर महानगरपालिका अंतर्गत 71 सफाई कामगारांसाठी अनुज्ञेय प्रत्येकी 269 चौ.फुटाची सदनिका उत्तर सदर बझार, सात रस्ता या जागेचा एकूण र.रु.1,87,08,500/- अंदाजपत्रकीय प्रस्ताव शासनास सादर केला होता. व त्या अनुषंगाने शासनाने उत्तर सदर बझार सातरस्ता जागेत बांधकाम करणेसाठी

शासन निर्णय संकीर्ण-2012 प्रक्र-31/नवि06 नगर विकास विभाग दिनांक 31 मार्च 2012 अन्वयये मान्यता देऊन र.रु. 1,68,37,650/- अनुदान उपलब्ध करुन दिले. यातील मुद्दा क्रमांक 6 नुसार नगर अभियंता सोलापूर महानगरपालिका यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यता नुसार सदनिका बांधकाम करणे बंधनकारक राहील असे नमुद केलेले आहे. परंतु मोफत निवासस्थाने बांधण्याची जागा बदलाबाबत शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही.

7) महानगरपालिकेने टी.पी.2, फा.प्लॉम.नं.80, मड्डी वस्ती, या जागेनुसार पूर्वगनणपत्रक तयार केलेले नसल्यामुळे व त्याचप्रमाणे शासनाची मान्यता घेतली नसल्यामुळे क्वॉन्टीटीत होणा-या वाढीमुळे र.रु.49,50,756/- व इतर नवीन आयटम र.रु.1,04,58,662/- हा स्वनिधीतून करावा लागणार आहे. त्यामुळे महापालिकेचे दायित्व वाढणार आहे.

8) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 180 प्रमाणे बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईच्या् कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्य्क आहे. तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्या रोख प्रमाणकाचा क्र. दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे.

9) या कामासाठी वापरण्यांत आलेले स्वा्क्षरी नकाशे, एल सेक्शन अंदाजपत्रक संचिकेत आढळून आलेले नाहीत.

10) संबंधित कामाच्या बाबतीत थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट केल्याबाबतचे प्रमाणपत्र, करारनामा,बारचार्ट, मासिक प्रगती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेले नाही.

11) मुंबई प्रांतिक महानरपालिका अधिनियम-1949 कलम (10) (दोन) (च) नुसार महानगरपालिकेच्या कोणत्याही संविदेमध्ये पदाधिका-याचा (नगरसेवकांचा) प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असल्यास असा पदाधिकारी अपात्र ठरतो. त्यामुळे महानरपालिकेच्या कोणत्याही संविदेत पदाधिका-यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही. यासाठी निविदाधारकांडून निविदा संदर्भात पदाधिका-यांशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्यानचे प्रतिज्ञापत्र घेणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही.

12) मक्तेदार हल-को इन्फ्रा प्रा.लि. मुंबई यांचे दर 39% इतक्या जादा दराने स्वीकृत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.सीएसटी-1087/सीआर-196/बी-2 दि.4.5.1988 नुसार अंदाजपत्रकापेक्षा 5 टक्के जादा निविदा मंजूर करण्यात येवू नये अशी तरतूद आहे. तथापि सदर कामाची निविदा 39 टक्के जादा दराची मंजूर करण्यात आली आहे हे नियमबाहय आहे.

13) बार चार्टनुसार कामाची प्रगती झाली नसल्याने काम संथगतीने केले आहे. तसेच मासिक प्रगती अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

14) लेखापरिक्षण काळात पर्यायी जागेवर कोणतेही पूर्व अंदाजाचा /पूर्वगणकपत्राचा आधार न घेता रक्कम रु.3,05,27,431/- चे काम केले असून ते लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही, त्यामुळे सदरची रक्कम रु.3,05,27,431/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे

DATVRKM8002 (Ref No : 17, Hmm No : 30)

## *27 मोदी स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : सुवर्ण जयंती नागरोथ् शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 72261.00/-

***कामासा वापरणेत आलेल्या साहित्याची गौण खनिजाची रक्कम कमी वसुल केली असल्याने रक्कम रु. 22,557/- वसूल करून शासनास जमा करावी. स्लॅबचे गीलावासाठी प्रदान केलेली रक्कम रु.49,704/- वासुलात आणावी. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी केली नाही.***

मोदी स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.1,01,35,700/-

2. प्रशासकीय मान्यता - मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे आदेश दि.17/06/2012.

3. निविदा रक्कम रु.90,49,778/-

4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.17 दि.12/05/2014.

5. लेखाशिर्ष - सुवर्ण जयंती नागरोथ्यान योजना.

6. निधी - शासन 50% व मनपा 50%

7. ठेकेदाराचे नाव - मे.वैष्णवी कन्स्ट्रक्शन, तुळजापूर .

8. कार्यारंभ आदेश क्र. नअ/9 दि.02/06/2014 (7.89 % कमी दराने)

9. कामाचा कालावधी - 11 महिने.

10. एकूण खर्च रु.49,74,539/-

11. मोजमाप पुस्तक क्र.270 पान क्र.163.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.16 दि.29/05/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सदर कामासाठी वापरणेत आलेल्या साहित्याची गैण खनिजाची रक्कम खाली नमूद केलेनुसार कमी वसूल केली असल्याने ती सबंधीताकडून रु.22,557/- वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

| अ. क्र. | धावते देयक | एकूण वापरणेत आलेले साहित्य घ.मी. | दर रु. (प्रति घ.मी.) | वसूल करावयाची रक्कम रु. | वसूल केलेली रक्कम रु. | फरक रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 1 ले | 1937.77 | 70.67 | 1,36,942/- | 1,30,730/- | 6,212/- |
| 2. | 2 रे | 292.89 | 70.67 | 20,699/- | 13,600/- | 7,099/- |
| 3. | 3 रे | 314.79 | 70.67 | 22,246/- | 13,000/- | 9,246/- |
| | एकूण | 2,545.45 | | 1,79,887/- | 1,57,330/- | 22,557/- |

2) स्टॉंर्डड स्पेशिफिकेशन क्र.Bdf 4.3.5. नुसार आर.सी.सी.चे स्लॅबचे काम केल्यानंतर ठेकेदाराने किमान जाडीचे गिलाव करून फिनिश करणेचे आहे. त्यासाठी ठेकेदारास गिलावासाठी वेगळा दर देण्याची आवश्यकता नाही असे असताना सदर कामाचे 171.47 चौ.मी. स्लॅबला गिलाव केल्याचे दर रु.314.70 प्रति चौ.मी. प्रमाणे रक्कम रु.53,961.60 चे निविदा दर 7.89% कमी दरानुसार रु.49,704/- चे जादा रक्कम प्रदान केले आहे. तरी स्लॅबचे गिलावासाठी जादा प्रदान केलेली रक्कम वसूल करण्यात यावी.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 25, Hmm No : 16)

## *28 जन्नतुल फिरदोस मुस्लीम कब्रस्थान येथे विविध सुधारणा करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : भांडवली कामे स्मशानभ शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 126225.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 86186.00/-

***मूळ अंदाजपत्रकतील बाबीव्यतिरिक्त जादा बाबीचे प्रदान हे निविदा दरानुसार प्रदान केल्याने ठेकेदारास रक्कम रु.58,935/- चे जादा प्रदान झाल्याने ती वसूलात आणावी. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.27,251/-***

***संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. सदरचे काम मनपा निधीमधून मंजूर केले असताना शासन निधीमधून खर्च करणेत आली आहे. पाणी उपसणेचा दर रक्कम रु.450/- बाबीसाठी देणेत आलेल्या दरास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात आली नाही. मोजमाप पुस्तकामध्ये केलेल्या कामानुसार रोजचेरोज नोंदी करण्यात आलेल्या नाहीत.***

जन्नतुल फिरदोस मुस्लीम कब्रस्थान येथे विविध सुधारणा करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.30,03,934/-

2. प्रशासकीय मान्यता - भांडवली कामे.

3. निविदा रक्कम रु.27,15,808/-

4. ठेकेदाराने सादर केलेल्या निविदेनुसार कामाची किंमत रु.31,11,735/-

5. मनपाने निविदा मंजुरीचेवेळी काढलेली कामाची किंमत रु.30,16,208/-

6. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.265 दि.09/09/2014.

7. लेखाशिर्ष - भांडवली कामे स्मशानभूमी व दफनभूमी सुधारणा करणे.

8. निधी - शासन.

9. ठेकेदाराचे नाव - श्री सुनिल वसंतराव घाटगे.

10. कार्यारंभ आदेश क्र. नअ/67 दि.12/09/2014 (10% कमी दराने)

11. कामाचा कालावधी - 4 महिने.(12/09/2014 to 11/01/2015)

12. एकूण खर्च रु.29,81,239/-

13. मोजमाप पुस्तक क्र.601 पान क्र.20.

सदर कामाची नस्तीची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.17 दि.29/05/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सदरचे काम करताना Dewatering, M-15 Concreting, Footing, External Plaster इ. बाबी जादा कराव्या लागल्या. जादा बाबीची रक्कम ही चालू दरसूचीनुसार म्हणजे 2014-15 चे दरसूचीनुसार प्रदान करण्यात आले आहे. निविदा शर्त क्र.14 नुसार जादा बाबीची रक्कम ही चालू दरसूचीनुसार केल्यास त्यास पुन्हा निविदा दरानुसार रक्कम प्रदान करणेत येऊ नये असे असताना मनपाने जादा बाबीचे रकमेवर निविदा दर 10% टक्के जादा दरानुसार रक्कम प्रदान केली आहे. त्यामुळे ठेकेदारास जादा बाबीची रक्कम रु.5,89,351/- चे 10% टक्के रक्कम रु.58,935/- चे जादा प्रदान झाल्याने ती संबंधिताकडून वसूल करण्यात यावी.

2) कामाची निविदा मंजूर करताना दराचे पृथ:करणामध्ये उपकराची 1% रक्कम समाविष्ट करून कामाची किंमत काढणेत आली आहे. ठेकेदाराने सादर केलेली निविदा 10% जादा दरानुसार येणारी कामाची किंमत ही चालू दरसुचीनुसार येणाऱ्या कामाच्या किंमतीशी तुलना केली असता निविदा ही

कमी दराची येत असल्याने निविदा मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे ठेकेदाराची निविदा ही जादा दरामध्ये उपकराची रक्कम समाविष्ट असताना पुन्हा कामाचे देयकाचे रकमेमध्ये 1% उपकराची रक्कम समाविष्ट करून ती वजा करण्यात आली आहे. म्हणजे ठेकेदाराकडून उपकराची रक्कम वसूल केली नसल्याने देयकाचे रकमेच्या 1% उपकराची रक्कम रु.27,251/- संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

3) सदरचे काम मनपा निधीमधून मंजूर केले असताना शासन निधीमधून खर्च करणेत आली आहे. तरी याबाबत समर्थन करावे.

4) पाणी उपसणेचा दर रक्कम रु.450/- प्रति हॉर्स पॉवर प्रति तास प्रमाणे 255 तासासाठी रु.1,14,750/- चे निविदा दर 10% जादा दरानुसार रु.1,26,225/- इतके प्रदान करण्यात आले आहे. सदर बाबीसाठी देणेत आलेल्या दरास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात आली नाही. त्यामुळे सदर बाबीवर खर्च करण्यात आलेली रक्कम रु.1,26,225/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. तसेच त्याचे लॉगशीट देयकासोबत जोडण्यात आलेले नाही.

5) मोजमाप पुस्तकामध्ये केलेल्या कामानुसार रोजचेरोज नोंदी करण्यात आलेल्या नाहीत. कामाची मोजमापे अंदाजपत्रकानुसार नोंदविण्यात येऊन त्या बाबीचा कालावधी नमूद करण्यात आलेला आहे हे नियमबाह्य आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 26, Hmm No : 17)

## *29 रुपाभवानी उद्यान येथे विविध सुधारणा करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : सुवर्ण जयंती नागरोथ् शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 50712.00/-

| |
|---|
| ***कामाचे खोदाईपोटी जादा प्रदान केलेली रक्कम रु. 17,097/- संबंधीताकडून वसूल करण्यात यावे. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.33,615/- संबधीकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करण्यात आली नाही.*** |

रुपाभवानी उद्यान येथे विविध सुधारणा करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.48,55,820/-

2. प्रशासकीय मान्यता - मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे आदेश दि.02/03/2014.

3. निविदा रक्कम रु.38,25,898/-

4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.262 दि.09/09/2014.

5. लेखाशिर्ष - सुवर्ण जयंती नागरोथ्यान योजना.

6. निधी - शासन 50% व मनपा 50%

7. ठेकेदाराचे नाव - श्री सुनिल सुरेश बेत.

8. कार्यारंभ आदेश क्र. नअ/58 दि.11/09/2014 (3.00 % कमी दराने)

9. कामाचा कालावधी - 12 महिने.

10. एकूण खर्च रु.34,80,625/-

11. मोजमाप पुस्तक क्र.567.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.18 दि.29/05/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर कामातील रस्त्याची खोदाई 519.93.00 घ.मी. करण्यात आली आहे. 2013-14 मंजूर दरसुचीतील सर्वसाधारण नोट क्र. 0.28 नुसार 100 घ.मी. पेक्षा जास्त खोदाई करावयाची असल्यास मशीनने खोदाई करण्यात यावा व त्यास मशीनचा दर देण्यात यावा अशी तरतूद आहे. मनपाने खोदाई ही 100 घ.मी.पेक्षा जास्त केले असता त्यास मशीनचा दर देणे आवश्यक असताना त्यास मॅन्युअल दर दिला आहे. दरसूचीनुसार मशीनचा दर रक्कम रु.96+4.80+0.96= 101.80 प्रति घ.मी. इतका येत आहे. मनपाने खोदाई साठी रु.135.70 प्रति घ.मी.प्रमाणे ठेकेदारास मॅन्युअल दरानुसार देयक प्रदान केले आहे. त्यामुळे सदर कामापोटी रु.33.90 प्रति घ.मी. प्रमाणे रु.17,626/- चे निविदा दर 3% कमी दरानुसार रु.17,097/- ने जादा प्रदान केल्याने त्याची संबंधीताकडून वसूल करण्यात यावे.

2) कामाचे अंदाजपत्रक दराचे दर पृथ:करण करून तयार करून कामाची किंमत काढण्यात आली आहे. दर पृथ:करणाचे दरामध्ये 1 % कामगार कल्याण उपकराची रक्कम समाविष्ट करण्यात आली असून त्याप्रमाणे कामाचे देयक त्या दरानुसार तयार करण्यात आले आहे. ठेकेदारास पहिले व दुसरे धावते देयक प्रदान करतेवेळी मोजमाप पुस्तकात केलेल्या कामाचे किंमतीमध्ये पुन्हा 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.33,615/- जमा करून कपात केल्याचे दर्शविण्यात आली आहे. प्रत्यक्षात 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात आली नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.33,615/- संबधीकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

## *30 मजरेवाडी स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : जिल्हा वार्षिक योजना शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 76075.00/-

***कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.27,048/- संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. कामास वापरणेत आलेल्या साहित्याची गौण खनिजाची रक्कम रु. 14,856/- वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. खोदाईपोटी जादा प्रदान केलेली रक्कम रु.34,171/- संबंधीताकडून वसूल करण्यत यावी. उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी केली नाही.***

मजरेवाडी स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.85,07,257/-

2. प्रशासकीय मान्यता - मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे आदेश दि.02/03/2014.

3. निविदा रक्कम रु.75,95,764/-

4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.316 दि.11/09/2014.

5. लेखाशिर्ष - जिल्हा वार्षिक योजना

6. निधी - शासन 50% व मनपा 50%

7. ठेकेदाराचे नाव - मे. अनिल पाटील.

8. कार्यारंभ आदेश क्र. नअ/71 दि.31/10/2014 (4.30 % कमी दराने)

9. कामाचा कालावधी - 12 महिने.

10. एकूण खर्च रु.56,42,984/-

11. मोजमाप पुस्तक क्र.567 पान क्र. 75.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.19 दि.29/05/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) कामाचे अंदाजपत्रक दराचे दर पृथ:करण करून तयार करून कामाची किंमत काढण्यात आली आहे.

दर पृथ:करणाचे दरामध्ये 1 % कामगार कल्याण उपकराची रक्कम समाविष्ट करण्यात आली असून त्याप्रमाणे कामाचे देयक त्या दरानुसार तयार करण्यात आले आहे. ठेकेदारास धावते देयक प्रदान करतेवेळी मोजमाप पुस्तकात केलेल्या कामाचे किंमतीमध्ये पुन्हा 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.27,048/- अधिक करून वसुल केल्याचे दर्शविण्यात आली आहे. प्रत्यक्षात 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात आली नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.27,048/- संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

2) शासन निर्णयानुसार ठेकेदाराने कामास वापरणेत आलेल्या गौण खनिजाची रक्कम शासनास जमा केलेचे चलन सादर केले नसल्याने त्यांचेकडून खाली नमूद केलेल्या साहित्याची गौण खनिजाची रक्कम रु. 14,856/- वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील | परिमाण | वाळु | खडी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | पी. सी. सी. | 9.45 घ.मी. | 4.44 घ.मी. | 8.41 घ.मी. | 12.85 |
| 2. | वीट बांधकाम | 5.46 घ.मी. | 1.31 | -- | 1.31 |
| 3. | आर.सी.सी. | 5.55 | 2.33 | 4.72 | 7.05 |
| 4. | 40 व 60 mm खडी | 189 | -- | 189.00 | 189.00 |
| | एकूण | | | | 210.21 घ.मी. |
| | दर रु.70.67 प्रति घ.मी. प्रमाणे रक्कम | | | | 14,856/- |

3) सदर कामातील रस्त्याची खोदाई 747.00 घ.मी. करण्यात आली आहे. 2013-14 मंजूर दरसुचीतील सर्वसाधारण नोट क्र. 0.28 नुसार 100 घ.मी. पेक्षा जास्त खोदाई करावयाची असल्यास मशीनने खोदाई करण्यात यावी व त्यास मशीनचा दर देण्यात यावा अशी तरतूद आहे. मनपाने खोदाईसाठी मशीनचा दर देणे आवश्यक असताना मॅन्युअल दर दिला आहे. दरसूचीनुसार मशीनचा दर रक्कम रु.60+3+0.60= 63.60 प्रति घ.मी. इतका येत आहे. मनपाने खोदाईसाठी मॅन्युअल दर रु.111.40 प्रति घ.मी.प्रमाणे ठेकेदारास देयक प्रदान केले आहे. त्यामुळे सदर कामापोटी रु.47.80 प्रति घ.मी. प्रमाणे रु.35,706.60 चे निविदा दर 4.30 % कमी दरानुसार रु.34,171/- ने जादा प्रदान केले आहे. जादा प्रदानाची रक्कम संबंधीताकडून वसूल करण्यत यावी.

4) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 28, Hmm No : 19)

## *31 नेताजी सुभाषचंद्र उद्यान येधे सुधारणा करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष : सुवर्ण जयंती नागरोत् शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 18124.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 22877.00/-

***सेन्ट्रल ट्रॅकची खोदाई केली नसताना डबर सोलींग केली आहे. जॉगींग ट्रॅकची खोदाई 35 मी. लांबी खोदाई केली असता त्यामध्ये 71 मी. लांबीची पी.सी.सी. केल्याचे नमूद करण्यात आले आहे. रिटेनिंग वॉलची खोदाई 66.60 मी. लांब व 0.60 मी. रुंदीची खोदाई केली असता त्यामध्ये 0.75 मी. रुंदीची पी.सी.सी. केल्याचे नमूद करणेत आले आहे. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.13,415/- वसूल केली नसल्याने संबंधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. कामास वापरणेत आलेले गौण खनिजाची रक्कम रु. 9,462/- बधीकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. मोजमाप पुस्तकामध्ये प्रत्यक्ष केलेल्या कामाचे तारखेनुसार नोंदी करणेत आले नाहीत. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी केली नाही.***

नेताजी सुभाषचंद्र उद्यान येधे सुधारणा करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.31,38,860/-

2. प्रशासकीय मान्यता - मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे आदेश दि.02/03/2014.

3. निविदा रक्कम रु.27,47,359/-

4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.639 दि.04/02/2015

5. लेखाशिर्ष - सुवर्ण जयंती नागरोत्थान (जिल्हास्तर)

6. निधी - शासन.

7. ठेकेदाराचे नाव - श्री डी. एस. टाकळीकर.

8. कार्यारंभ आदेश क्र. नअ/123 दि.03/03/2015 (3.6% कमी दराने)

9. कामाचा कालावधी - 8 महिने.

10. एकूण खर्च रु.14,80,265/-

11. मोजमाप पुस्तक क्र.443 पान क्र. 62.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 20 दि.29/05/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सदर कामाचे सेन्ट्रल ट्रॅकची खोदाई 35x2.60x0.23 = 20.93 घ.मी. केली असता त्यामध्ये डबर सोलींग 35x3.00x0.23 = 24.15 घ.मी. केली आहे. 35x0.40x0.23 = 3.22 घ.मी.ची खोदाई केली नसताना डबर सोलींग केल्याचे मोजमाप पुस्तकात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे डबर सोलींगपोटी 3.22 घ.मी.ची रक्कम रु.1405.10 प्रति घ.मी. प्रमाणे रु.4,524.42 चे निविदा दर 3.60% कमी दरानुसार रु.4,362/- चे प्रदान करण्यात आल्याने ती आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) जॉगींग ट्रॅकची खोदाई 35 मी. लांबी खोदाई केली असता त्यामध्ये 71 मी. लांबीची पी.सी.सी. केल्याचे मोजमाप पुस्तकात नमूद करण्यात आले आहे. म्हणजे 36 मी. खोदाई न करता पी.सी.सी. करण्यात आले आहे. त्यामुळे 36x0.60x0.10= 2.16 घ.मी. पी.सी.सी.पोटी रक्कम रु.3,902.60 प्रति घ.मी. प्रमाणे रु.8,429.61 चे निविदा दर 3.60% कमी दरानुसार रु.8,126/- चे प्रदान करण्यात आल्याने ती रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) रिटेनिंग वॉलची खोदाई 66.60 मी. लांब व 0.60 मी. रुंदीची खोदाई केली असता त्यामध्ये 0.75 मी. रुंदीची पी.सी.सी. केल्याचे मोजमाप पुस्तकात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे 66.60x0.15x0.15 = 1.498 घ.मी. खोदाई न करता पी.सी.सी. करण्यात आले आहे. त्यामुळे पी.सी.सी.पोटी रक्कम रु.3,902.60 प्रति घ.मी. प्रमाणे रु.5,846.10 चे निविदा दर 3.60% कमी दरानुसार रु.5,636/- चे प्रदान करण्यात आल्याने ती आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी दरसुचीतील दराचे दर पृथ:करण करून विविध बाबींच्या (Items) ची किंमत काढण्यात आली आहे. दर पृथ:करणाचे दरामध्ये 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम समाविष्ट करण्यात आली असून त्याप्रमाणे कामाचे त्या दरानुसार तयार करण्यात आले आहे. ठेकेदारास 1st धावते देयक प्रदान करतेवेळी मोजमाप पुस्तकात केलेल्या कामाचे किंमतीमध्ये पुन्हा 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.13,415/- अधिक करून वसुल केल्याचे दर्शविण्यात आली आहे. दोनदा उपकराची रक्कम विचारात घेऊन एकदाच कपात केल्याने प्रत्यक्षात 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात आली नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.13,415/- संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

5) सदर कामास वापरणेत आलेले खाली नमूद केलेले गौण खनिजाची रक्कम शासनास जमा केलेचे चलन नस्तीमध्ये आढळत नसल्याने सदराची रक्कम संबधीकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील | परिमाण | वाळु | डबर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | डबर सोलींग | 40.47 | -- | 40.47 | 40.47 |
| 2. | डबर बांधकाम | 51.94 | 17.14 | 60.25 | 77.39 |
| 3. | प्लास्टर | 517.10 | 16.03 | -- | 16.03 |
| | एकूण | | | | 133.89 घ.मी. |
| | दर रु.70.67 प्रति घ.मी. प्रमाणे रक्कम | | | | 9,462/- |

6) मोजमाप पुस्तकामध्ये प्रत्यक्ष केलेल्या कामाचे तारखेनुसार नोंदी करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता अंदाजपत्रकातील बाबीनुसार सलग नोंदी करून त्या बाबीसमोर काम केल्याचा कालावधी नमूद करण्यात आला आहे. हे नियमबाह्य आहे.

7) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 29, Hmm No : 20)

## *32 लालबहादूर शास्त्री प्रशाला ते संत तुकाराम चौक पर्यंतचा रस्ता करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष : रस्ते अनुदान. शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 106229.00/-

***खोदाईसाठी जादा दर दिल्याने रक्कम रु.36,481/- ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावे. कामाच्या मूळ किंमतीत 10% पेक्षा जास्त वाढ झाल्याने सुधारित अंदाजपत्रक तयार करून त्यास मान्यता घेण्यात आली नाही. कामाचा पूर्णत्वाचा दाखला नस्तीमध्ये समाविष्ट करण्यत आला नाही. कामाचा विमा उतरविलेचे कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून येत नसल्याने कामाचे किंमत रु.69,74,837/- चे 1% दराने रक्कम रु.69,748/- संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. कामाचे ठेकेदार कामाचे कालावधीत मयत झाले असताना त्यांचे पत्नीस कायदेशीर करारनामा न करता काम सोपविण्यात आले आहे. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणेत आले नाही.***

लालबहादूर शास्त्री प्रशाला ते संत तुकाराम चौक पर्यंतचा रस्ता करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.76,74,837/-

2. प्रशासकीय मान्यता - सर्व साधारण सभा ठराव क्र.56 दि. 21/05/2013.

3. निविदा रक्कम रु.69,77,125/-
4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.263 दि.16/11/2013
5. लेखाशिर्ष - रस्ते अनुदान.
6. निधी - शासन.
7. ठेकेदाराचे नाव - श्री एस. एन. क्षत्रिय.
8. कार्यारंभ आदेश क्र. नअ/206 दि.06/01/2014 (7.86% कमी दराने)
9. कामाचा कालावधी - 90 दिवस.
10. मुदतवाढ - 31/12/2014 अखेर विनादंडने.
11. एकूण खर्च रु.71,00,124/-
12. मोजमाप पुस्तक क्र.163.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 48 दि.04/08/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) 2012-13 मंजूर दरसुचीतील सर्वसाधारण नोट क्र.0.28 नुसार 100 घ.मी. पेक्षा जास्त खोदाई करावयाची असल्यास मशीनने खोदाई करण्यात यावी व त्यानुसार दर देणेत यावा अशी तरतूद आहे. मनपाने खोदाईसाठी मशीनचा दर देणे आवश्यक असताना मॅन्युअल दर देण्यात आला आहे. दरसूचीनुसार मशीनचा दर रक्कम रु.57.75 प्रति घ.मी. इतका येत आहे. मनपाने खोदाई साठी मॅन्युअल दर रु.100.80 प्रति घ.मी.प्रमाणे ठेकेदारास देयक प्रदान केले आहे. सदर कामाचे 919.71 घ.मी. इतकी खोदाई करण्यात आली असून त्याची रक्कम रु.43.05 प्रति घ.मी. प्रमाणे रु.39,593.51 वर निविदा दर 7.86% कमी दरानुसार रु.36,481/- ने ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

2) काम करीत असताना कामामध्ये वाढ झाल्याने कामाची किंमत रु. 9,04,355/- इतकी वाढ झाली आहे. कामाची अंदाजपत्रकिय रक्कम रु.76,74,837/- इतकी असून त्याचे किंमतीपेक्षा 10% पेक्षा जादा वाढ झाल्याने सुधारित अंदाजपत्रक तयार करून त्यास मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून मान्यता घेण्यात यावी.

3) काम पूर्ण झाले असताना कामाचा पूर्णत्वाचा दाखला नस्तीमध्ये समाविष्ट करण्यत आला नाही.

4) सदर कामाचा विमा उतरविलेचे कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून येत नाहीत. तरी कामाचे किंमत रु.69,74,837/- चे 1% दराने रक्कम रु.69,748/- संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

5) सदर कामाचे ठेकेदार कामाचे कालावधीत मयत झाले असताना त्यांचे पत्नीस कायदेशीर करारनामा न करता काम सोपविण्यात आले आहे. तसेच त्यांचे शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव लेखा परीक्षणात आढळून आला नाही.

6) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 30, Hmm No : 48)

## *33 प्र.क्र. 32 श्री साईबाबा देवी मंदिरासमोर मनपाचे जागेत सभामंडप बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : खासदार निधी. शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 12785.00/-

***कामाचे जागेच्या मालकीचे कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून येत नाही. कामास वापरणेत आलेल्या साहित्याची गौण खनिजाची रक्कम रु.1,515/- इतकी कमी वसूल केल्याने ती संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. कामाचे डिझाईनची व टेस्टिंगची रक्कम रु.11,270/- ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे ती वसूल करण्यात यावी.***

प्र.क्र. 32 श्री साईबाबा देवी मंदिरासमोर मनपाचे जागेत सभामंडप बांधणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.7,00,000/-

2. प्रशासकीय मान्यता - मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचे आदेश दि.17/01/2014.

3. निविदा रक्कम रु.6,93,028/-

4. निविदा मान्यता - मा.आयुक्त, सोलापूर यांचे दि.03/03/2014 ची मान्य टिपणी.

5. लेखाशिर्ष - खासदार निधी.

6. निधी - शासन.

7. ठेकेदाराचे नाव - श्री.विनायक क. इंगळजी.

8. कार्यारंभ आदेश क्र. नअ/259 दि.04/03/2014 (2.00% कमी दराने)

9. कामाचा कालावधी - 4 महिने.

10. एकूण खर्च रु.5,48,613/-

12. मोजमाप पुस्तक क्र.75.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 49 दि.04/08/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.
1)सदरचे काम हे मनपाच्या मालकीचे जागेत करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. परंतु जागेच्या मालकीचे कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून येत नाही.
2) दुसरे धावते देयकापर्यंत प्रदान केलेल्या रकमेतून गौण खनिजाची रक्कम रु.3,284/- इतकी वसूल करण्यात आली आहे. सदर देयकापर्यंत कामास वापरणेत आलेल्या वाळु, खडी व मेटल इ. साहित्याची परिगणना केली असता ती 67.91 घ.मी. साहित्य वापरलेचे दिसून येते. वापरणेत आलेल्या साहित्याच्या स्वमित्वाधनाची रक्कम रु.70.67 प्रति घ.मी. प्रमाणे रु.4,799/- इतकी रक्कम कामाचे देयकातून वसूल करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रक्कम रु.1,515/- इतकी कमी वसूल केल्याने ती संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.
3) कामाचे दुसरे धावते देयकाची तपासणी केली असताना डिझाईन करणे हे खात्याचे काम असताना स्टील डिझाईनपोटी ठेकेदारास रक्कम रु.4,000/- इतकी रक्कम प्रदान केली आहे. तसेच आर.सी.सी.ची चाचणी ठेकेदाराने स्वखर्चाने करावयाची असताना टेस्टिंग चार्जेस म्हणून रु.7,500/- ठेकेदारास प्रदान केले आहेत. तरी डिझाईनची रक्कम रु.4,000/- व टेस्टिंगची रक्कम रु.7,500/- अशी एकूण रक्कम रु.11,500/- ची निविदा दर 2% कमी दरानुसार रक्कम रु.11,270/- ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे ती वसूल करण्यात यावी.

DGPKVSM6101 (Ref No : 31, Hmm No : 49)

## *34 महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे वेटर्नरी हॉस्पिटल, पोष्ट मर्टम रूम, बर्निंग शेड, कंपाउंड वॉल बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष : केंद्रीय चिडिया घर प शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4690953.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 60893.00/-

***खोदाईसाठी जादा दर दिल्याने रक्कम रु.12,571/- चे जादा प्रदान झाल्याने ठेकेदाराकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. कामाचा करारनामा कमी रकमेच्यामुद्रांकावर केल्याने रक्कम रु.2,300/- मुद्रांक शुल्क***

***वसूल करून शासनास जमा करण्यात यावे. ठेकेदाराने केलेल्या कामाचे किमंतीच्या 1% उपकराची रक्कम रु.45,992/- वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.मोजमाप पुस्तकामध्ये काम केलेनुसार मापे नमूद केली जात नाहीत. कामाची जागा मनपाचे मालकीची असलेबाबत खात्री न करताच काम सुरु करणेबाबत ठेकेदारास आदेश देण्यात आले आहेत. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करण्यात आले नाही. कामाचे प्रशासकीय आदेश व तांत्रिक मान्यतेचे आदेश नस्तीमध्ये आढळली नाहीत.***

महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे वेटर्नरी हॉस्पिटल, पोष्ट मर्टम रूम, बर्निंग शेड, कंपाउंड वॉल बांधणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.99,25,637/-

2. प्रशासकीय मान्यता - मा.सर्व साधारण सभा ठराव क्र. 227 दि.25/02/2009.

3. निविदा रक्कम रु.99,25,940/-

4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.483 दि.12/02/2013

5. लेखाशिर्ष - केंद्रीय चिडिया घर प्राधिकरण.

6. निधी - शासन.

7. ठेकेदाराचे नाव - श्री अतुल चंद्रकांत गायकवाड.

8. कार्यारंभ आदेश क्र. नअ/1985 दि.22/02/2013 (22.04% जादा दराने)

9. कामाचा कालावधी - 9 महिने.

10. एकूण खर्च रु.46,90,953/-

11. मोजमाप पुस्तक क्र.29.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 51 दि.04/08/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करताना खोदाई 908.70 घ.मी. इतकी गृहीत धरण्यात आली होती. 2011-12 मंजूर दरसुचीतील सर्वसाधारण नोट क्र.0.28 नुसार 100 घ.मी. पेक्षा जास्त खोदाई करावयाची असल्यास मशीनने खोदाई करण्यात यावी व त्यानुसार दर देणेत यावा अशी तरतूद आहे. मनपाने खोदाईसाठी मशीनचा दर देण्यात आलेला नाही. दरसूचीनुसार मशीनचा दर रक्कम रु.94.50 प्रति घ.मी. इतका येत आहे. मनपाने खोदाई साठी रु.124.95/- प्रति घ.मी.प्रमाणे ठेकेदारास देयक प्रदान केले आहे. सदर कामाचे तिसरे धावते देयकापर्यंत 338.28 घ.मी. इतकी खोदाई करण्यात आली असून त्याची रक्कम रु.30.45 प्रति घ.मी. प्रमाणे रु.10,300.62 चे निविदा दर 22.04% जादा दरानुसार रु.12,571/- ने जादा प्रदान झाले आहे. तरी जादा प्रदानाची रक्कम संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

2) कामाचा मक्ता हा रक्कम रु.1,21,13,617/- इतक्या रकमेचा निश्चित करण्यात आला आहे. मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार पहिले रु.10 लाखास रु.100/- व त्यापुढील प्रत्येक 1 लाखास रु 100/- प्रमाणे रु.11,300/- चे मुद्रांक शुल्क पेपरवर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रु.9000/- चे मुद्रांक शुल्क पेपरवर कामाचा करारनामा केला आहे. त्यामुळे संबधीताकडून रु.2,300/- मुद्रांक शुल्क वसूल करून शासनास जमा करण्यात यावे.

3) सदर कामाचे अंदाजपत्रक हे 2011-12 चे दरसुचीतील दरानुसार तयार करण्यात आले असून त्याची किंमत रु.99,25,637/- इतकी आहे. त्यानुसार कामाची मक्ता निश्चित करणेसाठी जाहीर निवीद मागविणेत आली होती. निविदाधारकाने सादर केलेल्या निविदापैकी श्री गायकवाड यांची सर्वात कमी दराची म्हणजे 34% जादा दराची सादर केली आहे. श्री गायकवाड यांचेशी दराबाबत वाटाघाटी केलेनंतर 22.04% जादा दराने करण्याचे मान्य केल्याने त्यांची निविदा मंजूर करण्यात आली. निविदा मंजूर करतेवेळी कामाची किंमत ही चालू दरसूची 2012-13 मधील दराचे दरपृथ:करण करून दर निश्चित करणेत आले होते. दरपृथ:करणामध्ये 1% उपकर, अंतराची आकारणी (lead charges) समाविष्ट करून दर काढणेत आले आहेत. दरपृथ:करणानुसार कामाची किंमत रु.1,22,12,063/- इतकी काढून कामाचे किंमतीशी तुलना केली असता ती 23.04% जादा आली. त्यामुळे मनपाने श्री गायकवाड यांनी मान्य केलेल्या 22.04% जादा दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. मनपाने जादा दराने मंजूर केलेल्या दरामध्ये 1% उपकर रक्कम समाविष्ट आहे. ठेकेदाराने केलेल्या कामाचे देयक तयार करताना कामाचे किंमतीमध्ये निविदा मंजूर केलेनुसार 22.04% जादा रक्कम अधिक करून येणाऱ्या किंमतीमध्ये पुन्हा 1% उपकरची रक्कम अधिक करून ती वजा करण्यात आली आहे. म्हणजेच ठेकेदाराकडून 1% उपकराची रक्कम वसूल न करता रक्कम प्रदान करण्यात आली आहे. तरी 1% उपकराची रक्कम रु.45,992/- संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

4) मोजमाप पुस्तकामध्ये काम केलेनुसार मापे नमूद केली जात नाहीत. त्यामुळे मोजमाप पुस्तकातील तारखा ह्या पुढील तारखेनंतर मागील तारीख नमूद केली जाते. मोजमाप पुस्तकामध्ये तारखेबाबत सलगपणा दिसून येत नाही हे नियमबाह्य आहे.

उदा. (1) पान क्र. 4,5,6 वर दि. 25/03/2014 तारखेनंतर दि. 27/02/2014 तारखेस मोजमापे घेतल्याचे नमूद केले आहे. (2) पान क्र. 9,10 वर दि.23/03/2014 तारखेनंतर दि.21/03/2014 तारखेस मापे घेतल्याचे नमूद करण्यात आली आहेत.

5) सार्वजानिक बांधकाम नियमावलीमधील नियम क्र. 252 नुसार कामाची निविदा निश्चित करणेपूर्वी जागा मनपाचे मालकीची असल्याबाबत खात्री केल्याशिवाय काम चालू करू नये अशी तरतूद आहे. कामाची जागा मनपाचे मालकीची असलेबाबत खात्री न करताच काम सुरु करणेबाबत ठेकेदारास आदेश देण्यात आले आहेत. काम अपूर्ण असताना कामाचे जागेबाबत वाद निर्माण झाल्याने हायकोर्टातून कामास स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे सदर कामासाठी करण्यात आलेला खर्च रक्कम रु.46,90,953/- इतकी गुंतून पडली आहे.

6) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.
7) कामाचे प्रशासकीय आदेश व तांत्रिक मान्यतेचे आदेश नस्तीमध्ये आढळली नाहीत.

DGPKVSM6101 (Ref No : 38, Hmm No : 51)

## *35 रस्ते व बांधकामाचे कामासाठी लागणारे साहित्यासाठी देण्यात आलेली लीड चार्जेस आकारणीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : इमारती व विकास कामे मनपा/शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 142578.00/-

***मनपाचे इमारत बांधकाम व त्याअनुषंगिक विभागाने त्यांचेकडील कामासाठी खडी व मुरूमाकरीता 17 कि.मी. चा लीड मंजूर नसताना दर देण्यात आला आहे. त्यामुळे त्या विभागाकडे असणारे सर्व कामाचे खडी व मुरूम असणारे बाबीसाठी 7 कि.मी. लीड चार्जेसचे रक्कम जादा प्रदान झाली आहे.***

सोलापूर मनपाचे नगर अभियंता यांचे नियंत्रणाखाली रस्ते आणि इमारत व त्याअनुषांगिक कामे करणे असे दोन विभाग करण्यात आले आहेत. सोलापूर महानगरपालिकेने महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधमक विभागाने जाहीर केलेला जिल्हा दरसूचीतील दरामध्ये डांबर, खडी, वाळु, डबर, मुरूम इ. साहित्य उपलब्धतेबाबत लीड व लिफ्टचा समाविष्ट करून दराचे पृथ:करण करून दर निश्चित करणेत आले आहेत. सन 2012-13, 2013-14, 2014-15 चे जिल्हा दरसूचीतील दराचे दर पृथ:करण करून नगर अभियंता, यांचेकडील परिपत्रक अनुक्रमे दि.15/01/2013, 21/09/2013, 20/11/2014 अन्वये मान्यता देण्यात आली आहे. कामास लागणारी खडी व मुरूम हे मनपा हद्दीपासून 10 कि.मी. अंतरावर उपलब्ध होत असल्याने त्याप्रमाणे त्याअनुषंगिक बाबीसाठी 10 कि.मी.चा लीड आणि लिफ्टचा दर समाविष्ट करण्यात आला आहे. त्यानुसार रस्ते विभागाकडील कामासाठी खडी व मुरूम बाबीसाठी 10 कि.मी. चा अंतराचा दर दिला आहे. परंतु इमारत आणि त्याअनुषंगिक कामे करणेचे विभागाने खडी, व मुरूम बाबीसाठी 17 कि.मी. अंतराचा लीड व लिफ्टचा दर समाविष्ट करून दर निश्चित करून त्याप्रमाणे देयके प्रदान करण्यात आली आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 52 दि.04/08/2017 अन्वये खात्यास विचारणा केली असता खात्याने अनुपालन सादर केले

नसल्याने खालीलप्रमाणे लेखा परीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

नगर अभियंता यांचेकडील परिपत्रकानुसार सदर बाबीसाठी 10 कि.मी. चा लीड मंजूर केला असता इमारत बांधकाम व त्याअनुषंगिक विभागाने त्यांचेकडील कामासाठी 17 कि.मी. चा लीड मंजूर नसताना दर देण्यात आला आहे. त्यामुळे त्या विभागाकडे असणारे सर्व कामाचे खडी व मुरूम असणारे बाबीसाठी 7 कि.मी. लीड चार्जेसचे रक्कम जादा प्रदान झाली आहे.

उदा. टाकळी मंगळ कार्यालय उजव्या बाजूने राठोड घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रक हे सन 2012-13 चे दरसूचीनुसार केले असून खाली नमूद केलेल्या बाबीसाठी जादा अंतराचे लीड चार्जेस दिल्याने संबधीत ठेकेदाराकडून वसुली करण्यात यावी.

| अ.क्र. | बाब | परिमाण घ.मी. | 17कि.मी. नुसार दिलेला दर रु. | 10 कि.मी. नुसार द्यावयाचा दर रु. | जादा दिलेला दर रु. | जादा प्रदानाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| .1 | कठीण मुरूम पुरवठा करणे | 384.00 | 503.40 | 404.00 | 99.40 | 38170/- |
| 2. | mm40खडी पुरवणे व पसरविणे | 558.00 | 799.60 | 664.00 | 135.60 | 75665/- |
| 3. | मउ मुरूम पुरवठा करणे | 150.00 | 503.40 | 399.00 | 104.40 | 15660/- |
| 4. | कठीण मुरूम पुरवठा करणे | 66.00 | 503.40 | 404.00 | 99.40 | 6560/- |
| 5. | 6 mm0खडी पुरवणे व पसरविणे | 48.00 | 788.90 | 653.00 | 135.90 | 6523/- |
| | एकूण | | | | | 142578/- |

सदराची रक्कम रु.1,42,578/- वसूल करण्यात यावी. तसेच उर्वरित कामातील सदरची अतिप्रदान रक्कम परिगणना करून वसूल करण्यात यावी.

DGPKVSM6101 (Ref No : 39, Hmm No : 52)

## *36 टाकळी मंगल कार्यालय उजव्या बाजूने राठोड घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

सोलापूर महानगरपालिका

*लेखा शीर्ष : सुवर्ण जयंती नागरोत् शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 694571.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 14417.00/-

***खोदाईसाठी जादा दर दिल्याने रक्कम रु.14,417/- चे जादा प्रदान झाल्याने ठेकेदाराकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. खोदाईची सविस्तर मापे मोजमाप पुस्तकामध्ये नमूद करण्यात आली नाहीत. काम पूर्ण केल्याचा दाखला नस्तीमध्ये आढळून येत नाही. कामाचे बाबनिहाय कमी जास्त खर्चाच्या तक्तावर नगरअभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात आली नाही. कामाची मोजमापे मोजमाप पुस्तकामध्ये प्रत्यक्ष काम केलेनुसार नमुद करण्यात आली नाहीत. रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी ठेकेदाराने आणलेले B.M. व B.C. चे पावत्या नस्तीमध्ये आढळून येत नाही.***

टाकळी मंगल कार्यालय उजव्या बाजूने राठोड घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु. 17,06,876/-

2. प्रशासकीय मान्यता - मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे आदेश दि.17/06/2012.

3. निविदा रक्कम रु.15,51,705/-/-

4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.118 दि.12/11/2014.

5. लेखाशिर्ष - म.सुवर्ण जयंती नागरोत्थान महा अभियान (जिल्हास्तर)

6. निधी - शासन.

7. ठेकेदाराचे नाव - श्री डी. एस. टाकळीकर

8. कार्यारंभ आदेश क्र. नअ/236 दि14/02/2014 (6.90% कमी दराने)

9. कामाचा कालावधी - 4 महिने.

10. एकूण खर्च रु.14,09,767/- (दुसरे व अंतिम)

11. मोजमाप पुस्तक क्र.270

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 53 दि.04/08/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर कामातील रस्त्याची खोदाई 359.70 घ.मी. करण्यात आली आहे. 2012-13 मंजूर दरसुचीतील सर्वसाधारण नोट क्र. 0.28 नुसार 100 घ.मी. पेक्षा जास्त खोदाई करावयाची असल्यास मशीनने खोदाई करण्यात यावी व त्यानुसार दर देणेत यावा अशी तरतूद आहे. मनपाने खोदाईसाठी मशीनचा दर देण्यात आलेला नाही. दरसूचीनुसार मशीनचा दर रक्कम रु.55+2.75=57.75 प्रति घ.मी. इतका येत आहे. मनपाने खोदाई साठी रु.100.80 प्रति घ.मी.प्रमाणे ठेकेदारास देयक प्रदान केले आहे.

त्यामुळे सदर कामापोटी रु.43.05 प्रति घ.मी. प्रमाणे रु.15,485.09/- चे निविदा दर 6.90% कमी दरानुसार रु.14,417/- ने जादा खर्च करावा लागला. तरी जादा खर्चाची रक्कम वसुल करण्यात यावे.
2) सदर कामासाठी 359.70 घ. मी.ची खोदाई केली असल्याचे मोजमाप पुस्तकामध्ये नमूद करण्यात आली आहेत. परंतु त्याची सविस्तर मापे नमूद करण्यात आली नाहीत. खोदाई केलेबाबत खर्च करण्यात आलेली रक्कम रु.100.80 प्रति घ.मी. प्रमाणे रु.36,257.76 व खोदाईमधील साहित्य वाहतूक केलेबाबत रु.147.99 प्रति घ.मी.प्रमाणे रु.53,232.00 असे एकूण रु.89,489.76 चे निविदा दर 6.90% कमी दरानुसार रु.83,315/- रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
3) मोजमाप पुस्तक क्र.270 मध्ये सदरचे काम ठेकेदाराने पूर्ण केल्याने दुसरे व अंतिम मोजमापे नमूद करण्यात आली आहेत. परंतु काम पूर्ण केल्याचा दाखला नस्तीमध्ये आढळून येत नाही.
4) काम पूर्ण केल्याने पुर्वगनक पत्रकानुसार असणारे काम व प्रत्यक्ष केलेले काम याबाबत बाबनिहाय कमी जास्त खर्चाचा तक्ता तयार करून त्यास नगरअभियंता यांची स्वाक्षरी घेण्यात आली नाही.
5) मोजमाप पुस्तकामध्ये पान क्र.13 वर ब्युटीमनस मॉकेडमचे काम दि.12/04/2014 ते 15/04/2014 व सेमी ब्युटीमनस काँक्रेटचे काम दि.21/04/2014 ते 23/04/2014 या कालावधीत केले असल्याचे नमूद करण्यात आले आहे. स्पेशीफिकेशननुसार रस्त्यावर टॅक कोट करून लगेच ब्युटीमनस मॉकेडम व सेमी ब्युटीमनस काँक्रेटचे काम करणे आवश्यक आहे. परंतु टॅक कोटचे काम दि.03/04/2014 ते 06/04/2014 या कालावधीत दोनवेळा केलेचे नमूद करण्यात आले आहे. यावरून प्रत्यक्ष केलेल्या तारखेनुसार कामाची मोजमापे मोजमाप पुस्तकामध्ये नमुद केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे 1200 चौ.मी. रस्त्यावर टॅक कोट केल्यापोटी खर्च करण्यात आलेली रक्कम रु.30/- प्रति चौ.मी. प्रमाणे रु.36,000/- चे निविदा दर 6.90% कमी दरानुसार रु.33,516/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
6) रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी ठेकेदाराने आणलेले B.M. व B.C. चे पावत्या नस्तीमध्ये आढळून येत नाही. त्यामुळे रस्त्यावर B.M. व B.C. चा किती जाडीचा थर देण्यात आला आहे याची खात्री करता येत नाही. त्यामुळे सदर बाबीवर खर्च करणेत आलेली रक्कम रु.6,20,558.58 चे निविदा दर 6.90% कमी दरानुसार रु.5,77,740/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
वसुलपात्र रक्कम रु.14,417/-
आक्षेपाधिन रक्कम रु.6,94,571/-

DGPKVSM6101 (Ref No : 51, Hmm No : 53)

## *37 मनपाचे अग्निशामक कर्मचाऱ्यांसाठी रविवार पेठ व होटगी येथे निवासस्थान बांधणे कामातील अनियमिततेबाबत.*

सोलापूर महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष : अग्निशामक सेवा व आणी शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 153091.00/-

***कामाची जागा मनपाचे मालकीचे असलेबाबत कागदपत्रे सादर केली नाहीत. वीट बांधकामास जादा दर दिल्याने जादा प्रदानाची रक्कम रु.2,085/- संबधीताकडून वसूल करण्यात यावी. स्लॅबचे गिलावासाठी जादा प्रदान केलेली रक्कम रु.49,829/- वसूल करण्यात यावी. कामास वापरणेत आलेल्या साहित्याची गौण खनिजाची रक्कम रु.19,656/- इतकी कमी वसूल केल्याने ती संबंधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. कामाचे देयकाच्या 1% कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.72,060/- संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी. इमारत नोंदवही ठेवलेली नाही. आर्किटेक श्री किर्तने यांच्या बिलातून आयकर कमी कपात केलेली रक्कम रु.9.461/- संबधीताकडून वसूल करण्यात येऊन आयकर विभागाकडे जमा करणेत यावे.***

मनपाचे अग्निशामक कर्मचाऱ्यांसाठी रविवार पेठ व होटगी येथे निवासस्थान बांधणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.3,79,92,000/-

2. पूर्व गणकपत्रक मान्यता - मा.स्थापत्य समिती ठराव क्र.32 दि.17/08/2013.

3. प्रशासकीय मान्यता - मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे आदेश दि.10/12/2013.

4. निविदा रक्कम रु.3,36,32,865/-

5. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.182 दि.28/08/2014.

6. लेखाशिर्ष - अग्निशामक सेवा व आणीबाणीच्या सेवाची बळकटीकरण करणे.

7. निधी - शासन.

8. ठेकेदाराचे नाव - श्री धनराज सुधाकर हरकुडे, लातूर.

9. कार्यारंभ आदेश क्र. नअ/39 दि.02/09/2014 (9% जादा दराने)

10. कामाचा कालावधी - 12 महिने.

11. एकूण खर्च रु.70,44,127/-

12. मोजमाप पुस्तक क्र.597 व 47.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.55 दि.14/08/2017 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.नअ/नागरीकामे/1021 दि.25/09/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत

आहेत.

1)मालमत्ता पत्रक पाहता रविवार पेठ येथील प्लॅट क्र. 9591/1 मध्ये मनपाच्या मालकीची जागा 434.84 चौ.मी. इतकी आहे. त्याठिकाणी मनपाने 800 चौ.मी. जागेमध्ये कर्मचाऱ्यासाठी निवासस्थान बांधण्याचे प्रस्तावित करणेत आले आहे. उर्वरित जागा 365.16 चौ.मी. ही मनपाच्या मालकीची असल्याचे कागदपत्रे नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.

जागा मनपाचे मालकीचे असलेबाबत कागदपत्रे सादर केली नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) जिल्हा दरसूची 2012-13 नुसार कामाचे अंदाजपत्रक बाब क्र.15 वीट बांधकाम 1:6 मध्ये करणेचे बाबीसाठी दर रु.4,551.75 प्रति घ.मी. इतका आहे. परंतु मनपाने सदर बाबीसाठी रु.4,614.75 प्रति घ.मी. इतका दर देऊन ठेकेदारास देयक प्रदान केले आहे. त्यामुळे ठेकेदारास रु.63/- प्रति घ.मी. प्रमाणे 30.36 घ.मी.ची रक्कम रु.1912.68 चे निविदा दर 9% जादा दरानुसार रु.2085/- जादा प्रदान झाले आहेत. तरी ती रक्कम संबधीताकडून वसूल करण्यात यावी.

वसुलीची कार्यवाही करणेत येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) स्टॉर्डड स्पेशिफिकेशन क्र.Bdf 4.3.5. नुसार आर.सी.सी.चे स्लॅबचे काम केल्यानंतर ठेकेदाराने किमान जाडीचे गिलाव करून फिनिश करणेचे आहे. त्यासाठी ठेकेदारास गीलावासाठी वेगळा दर देण्याची आवश्यकता नाही असे असताना सदर कामाचे 192.54 चौ.मी. स्लॅबला गिलाव केल्याचे दर रु.237.43 प्रति चौ.मी. प्रमाणे रक्कम रु.45,714.77 चे निविदा दर 9% जादा दरानुसार रु.49,829/- चे जादा रक्कम प्रदान केले आहे. तरी स्लॅबचे गिलावासाठी जादा प्रदान केलेली रक्कम वसूल करण्यात यावी.

पुर्वगनकपत्रकामध्ये आयटम नं. Bd-L4चा समावेश करणेत आलेला आहे व त्याप्रमाणे काम पूर्ण करणेत आले आहे. त्यामुळे झालेला खर्च वसूल करणे योग्य होणार नाही असे खात्याने कळविले आहे.

इमारतीचे स्लॅबला जादा जाडीचे गिलाव का करावे लागले याबाबत सविस्तर स्पष्टीकरण केले नसल्याने खात्याने केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) तिसरे धावते देयकापर्यंत प्रदान केलेल्या रकमेतून गौण खनिजाची रक्कम रु.37,835/- इतकी वसूल करण्यात आली आहे. सदर देयकापर्यंत कामास वापरणेत आलेल्या वाळु, खडी व मेटल इ. साहित्याची परिगणना केली असता ती 813.51 घ.मी. साहित्य वापरलेचे दिसून येते. वापरणेत आलेल्या साहित्याची गौण खनिजाची रक्कम रु.70.67 प्रति घ.मी. प्रमाणे रु.57,491/- इतकी रक्कम कामाचे देयकातून वसूल करणे आवश्यक होते. परंतु मनपाने रक्कम रु.19,656/- इतकी कमी वसूल केल्याने ती संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

वसुलीची कार्यवाही करणेत येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5) सदर कामाचे अंदाजपत्रक हे 2012-13 चे दरसुचीतील दरानुसार तयार करण्यात आले असून त्याची किंमत रु.3,36,32,866/- इतकी आहे. त्यानुसार कामाची मक्ता निश्चित करणेसाठी जाहीर निवीद

मागविणेत आली होती. निविदाधारकाने सादर केलेल्या निविदापैकी श्री हरगुडे यांची सर्वात कमी दराची म्हणजे 22% जादा दराची सादर केली आहे. श्री हरगुडे यांचेशी दराबाबत वाटाघाटी केलेनंतर 9% जादा दराने करण्याचे मान्य केल्याने त्यांची निविदा मंजूर करण्यात आली. निविदा मंजूर करतेवेळी कामाची किंमत ही चालू दरसूची 2013-14 मधील दराचे दरपृथःकरण करून दर निश्चित करणेत आले होते. दरपृथःकरणामध्ये 1% उपकर, 1% विमा व अंतराची आकारणी (lead charges) समाविष्ट करून दर काढणेत आले आहेत. दरपृथःकरणानुसार कामाची किंमत रु.3,54,49,040/- इतकी काढून कामाचे किंमतीशी तुलना केली असता ती 5.40% जादा आली. त्यामुळे मनपाने श्री हरगुडे यांनी मान्य केलेल्या 9% जादा दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. मनपाने जादा दराने मंजूर केलेल्या दरामध्ये 1% उपकर रक्कम समाविष्ट आहे. ठेकेदाराने केलेल्या कामाचे देयक तयार करताना कामाचे किंमतीमध्ये निविदा मंजूर केलेनुसार 9% जादा रक्कम अधिक करून येणाऱ्या किंमतीमध्ये पुन्हा 1% उपकरची रक्कम अधिक करून ती वजा करण्यात आली आहे. म्हणजेच ठेकेदाराकडून 1% उपकराची रक्कम वसूल न करता रक्कम प्रदान करण्यात आली आहे. तरी 1% उपकराची रक्कम रु.72,060/- संबधीताकडून वसूल करून शासनास जमा करण्यात यावी.

वसुलीची कार्यवाही करणेत येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

6) विभागाने इमारत नोंदवही ठेवलेली नाही.

इमारत नोंदवही ठेवण्यात येत असल्याचे खात्याने कळविले आहे. अनुपालन केले नसल्यचे आक्षेप कायम करणेत येत आहे.

7) आर्किटेक श्री किर्तने यांच्या बिलातून रु.9,460/- इतका आयकर वसूल केला आहे. तथापि रक्कम रु.1,89,185/- वर 10% दराने रक्कम रु.18,919/- इतका आयकर कपात करणे आवश्यक होते. त्यामुळे रक्कम रु.9.461/- संबधीताकडून वसूल करण्यात येऊन आयकर विभागाकडे जमा करणेत यावे.

वसुलीची कार्यवाही करणेत येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.1,53,091/-

DGPKVSM6101 (Ref No : 52, Hmm No : 55)

## *38 विभागीय कार्यालय क्र. 5 मधील केबलसाठी खोदलेली चर दुरुस्त करणे या कामातील अनियमिततेबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2193870.00/-

| |
|---|
| ***विभागीय कार्यालय क्र. 5 मधील केबलसाठी खोदलेली चर दुरुस्त करणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामाची मुदत 90 दिवस असताना मार्च 2015 पर्यंत पहिले धावते देयकाव्दारे सदर कामावर रक्कम रु.21,93,870/- खर्च झाला आहे. यावरुन सदरचे काम मार्च 2015 पर्यंत पुर्ण झाले याची खात्री करता आली नाही, काम पुर्णत्वा चा दाखला नस्तीस आढळुन आला नाही, करारनामा अट क्रमांक 6 नुसार मुदतीनंतर कामाच्यात 10% रक्केम नुकसान भरपाई म्हणून वसुल करणे आवश्यवक असताना अशी कार्यवाही झाली नाही, करारनामा अट क्र.4 नुसार सदरचे काम मक्ते दाराने स्पेशिकेशन प्रमाणे टेंडर नमुद तपशिलाप्रमाणे पुर्ण करणेचे आहे. सदरचे काम मुदतीत पुर्ण झाले नसल्याचे दिसुन येते.*** |

विभागीय कार्यालय क्र. 5 मधील केबलसाठी खोदलेली चर दुरुस्त करणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामात अनियमितता आढळून आल्याने याबाबत अर्धसमास क्र.41 दि.25/07/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

कामाचा तपशिल

1)पुर्वगणन पत्रक :- र. निधी

2)निविदा :- र.95,71,833/-

3)मुदत :- 90 दिवस

4)करारनामा दिनांक :- 10/07/2014

5)निविदा मंजूर :-- एस.डी.कलमुली (-) 9.55%

6)सर्वसाधारण सभा ठराव क्र.203, दिनांक 02/01/2014

सदर कामावर 2014-15 या आर्थिक स्थितीत खालील प्रमाणे खर्च झाले आहे.

| अ.क्र | धावते देयक | दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1. | 1 | 13/03/2015 | 21,93,870 |

1) सदर कामाची मुदत 90 दिवस असताना म्हणजे असताना मुदतीत काम पूर्ण झाले नाही. मार्च 2015 पर्यंत पहिले धावते देयकाव्दारे सदर कामावर रक्कम रु.21,93,870/- खर्च झाला आहे. यावरुन सदरचे काम मार्च 2015 पर्यंत पुर्ण झाले याची खात्री करता आली नाही.

2) कामाची मुदत 09/01/2015 पर्यंत असताना काम मुदतीत पुर्ण झाल्याचा काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीस आढळुन आला नाही. सदर कामास मा.आयुक्त यांची दंडनिय/विनादंड मुदतवाढ मिळाल्याचे नस्तीस आढळुन आले नाही. निविदा अटी व शर्ती प्रमाणे कामास विलंब झाल्यास ज्या कारणामुळे विलंब झाला ते नमुद करुन

मुदत संपण्यापुर्वी 15 दिवसाचे आत मक्तेदाराने अर्ज सादर करुन मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु असा अर्ज नस्ती आढळुन आला नाही. मक्तेदाराने मुदतीत काम पुर्ण न केल्यास व मुदतीत काम पुर्ण न होऊ शकल्यास पटण्याणजोगी कारणे न दिल्यास दंडात्मक कार्यवाही मा. आयुक्त यांचे मान्यतेने कारणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही.

3) करारनामा अट क्रमांक 6 नुसार मुदतीनंतर कामाच्या 10% रक्केम नुकसान भरपाई म्हणून वसुल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही.

4) करारनामा अट क्र.4 नुसार सदरचे काम मक्तेदाराने स्पेशिफीकेशन प्रमाणे टेंडर नमुद तपशिलाप्रमाणे पुर्ण करणेचे आहे. सदरचे काम मुदतीत पुर्ण झाले नसल्याचे दिसुन येते.

DATRNDM7201 (Ref No : 154, Hmm No : 41)

## *39 जिल्हा वार्षिक योजना सन 2012-13 अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थाहन यांच्या (जिल्हास्तर) भाग 4 मधील 8 रस्ते करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 13086165.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13086165.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 918462.00/-

***जिल्हा वार्षिक योजना सन 2012-13 अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थाहन यांच्या (जिलस्तर) भाग 4 मधील 8 रस्ते करणे या कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता विहित मुदतीत काम पूर्ण न झाल्याने निविदा अटी व शर्ती मधील अटक्र. 3 नुसार मा. आयुक्त यांचे मान्यातेने दंडात्माक कार्यवाही करणे आवश्यका असताना अशी कार्यवाही झाली नाही, निविदा अटी व शर्ती मधील अट क्र. 3 नुसार दरमहा निविदा रक्कमेच्या 0.5% प्रमाणे म्हणजे रक्कम रु.13086165/- च्या 0.5% प्रमाणे माहे एप्रिल 2015 ते काम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरिता दंडाची आकारणी करणे आवश्यक आहे. तसेच मुदतबाहय कालावधीच्या कामाच्या रक्कमेच्या 10% रक्कम नुकसान भरपाई म्हणून वसूल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नसल्याचे आढळून आले. सदर कामाच्या मोजमाप नोंदवहया लेखापरीक्षणास सादर केल्या नाहीत. सदर कामाची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे तपासणी अहवाल लेखापरीक्षणास नस्तीत आढळुन आला नाही***

मधील 8 रस्ते करणे या कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामात अनियमितता आढळून आल्याने याबाबत अर्धसमास क्र.42 दि.25/07/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने, सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे

कामाचा तपशिल

1) टेंडर :- 1,52,34,185/-
2) मुदत :-- 90 दिवस
3) निधी :-- शासन -50% मनपा - 50% (रस्ते)
4) निविदा प्राप्तल :-- 5
5) निविदा मंजूर :-- वर्षा कंन्ट्रक्शन (-) 14.10%
6) प्रशासकीय मंजूरी :- जिल्हांधिकारी कार्या. आरआ/3735/12, दिनांक 02/11/2012
7) निविदा मंजूरी :- स्थाजयी समिती ठराव क्र.558, दिनांक 28/02/2013
8) कामाचे आदेश :-- नअ/68, दिनांक 30/04/2013
9) कामाची मुदत :-- वर्क ऑर्डर पासुन 90 दिवस
10) करारपत्र :- दिनांक 26/04/2013

सदर कामाची निविदा नस्ती, प्रमाणके, मोजमाप नोंदवही यांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणिवा आढळुन आल्याः.

1) कामाची मुदत दिनांक 08/11/2013 पर्यंत असताना काम मुदतीत पूर्ण झाल्याचा काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीत आढळुन आला नाही. यावरुन सदरचे काम मुदतीत पुर्ण झाले नसल्याचे आढळुन आले. सदर कामास मा.आयुक्त यांची दंडनिय/विनादंड मुदतवाढ मिळाल्याचे नस्तीस आढळुन आले नाही.

2) निविदा अटी व शर्ती प्रमाणे कामास विलंब झाल्यास ज्या कारणामुळे विलंब झाला ते नमुद करुन मुदत संपण्यापुर्वी 15 दिवसाचे आत मक्तेदाराने अर्ज सादर करुन मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु असा अर्ज मक्तेदाराने दिनांक 22/11/2013 रोजी केला म्हणजे मुदत संपल्यावर केला असल्याचे आढळुन आले. मक्तेदाराने मुदतीत काम पुर्ण न केल्यास व मुदतीत काम पुर्ण न होऊ शकल्यास पटण्याजोगी कारणे न दिल्यास निविदा अटी व शर्ती मधील अट क्र. 3 नुसार मा.आयुक्त यांचे मान्यातेने दंडात्माक कार्यवाही करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही. मा.आयुक्त यांनी दि.07/12/2013 रोजी 1 महिना मुदतवाढ प्रस्तावास मान्यता दिली.

3) सदर 8 कामापेक्षा 6 कामे मुदतवाढ कालावधी पुर्ण 4 चालु व 3 कामे अदयाप सुरु नसल्याचे नगर अभियंताकडील पत्रक क्र.नअ/एमओ/3063,दि.24/01/2014 नुसार प्रथम मुदतवाढ दि.29/12/2013 रोजी संपले असलेने मार्च 14 अखेर मक्तेदारास मुदतवाढ मिळणेस विनंती केली. पुन्हा पत्र क्र.3669 दि.15/03/2014 अन्वये एप्रिल 2014 अखेर मुदतवाढ मिळणेस विनंती केले. त्या नुसार मा.आयुक्त यांनी 0.5% दंड आकारुन काम पुर्ण करणेस लावण्यास मान्य केले. त्यानुसार निविदा रक्कमेच्या 0.5% म्हणजे रक्कम रु.13086165/- च्या 0.5% प्रमाणे माहे जानेवारी 2014 ते मार्च 2015 या कालावधी करिता रु.918462/-एवढी रक्कम मक्तेदाराक्डून वसूल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नसल्याचे आढळुन आले. तसेच सदरची कामे केंव्हा पूर्ण झाली याची नोंद नस्तीत नाही अथवा पूर्णत्वाचा दाखला नस्तीत आढळुन आला नाही. त्यामुळे वरील प्रमाणे अटी व शर्ती मधील अट क्र. 3 नुसार दरमहा निविदा रक्कमेच्या 0.5% प्रमाणे म्हणजे रक्कम रु.13086165/- च्या च्या 0.5% प्रमाणे माहे एप्रिल 2015 ते काम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरिता दंडाची आकारणी करणे आवश्यक आहे. तसेच मुदतबाह्य कालावधीच्या

कामाच्या रक्कमेच्या 10% रक्कम नुकसान भरपाई म्हणून वसूल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नसल्याचे आढळून आले.

4) करारनामा नस्तीत आढळुन आला नाही.

5) सदर कामाच्या मोजमाप नोंदवह्या लेखापरीक्षणास सादर केल्या नाहीत.

6) सदर कामाची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे तपासणी अहवाल लेखापरीक्षणास नस्तीत आढळुन आले नाही.

DATRNDM7201 (Ref No : 155, Hmm No : 42)

## *40 UIDSSMT योजनेअंतर्गत देगाव येथे 1.0 द.ल.लि. क्षमतेची उंचावर टाकी बांधणे व पाईप लाईन टाकणे...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :UIDSSMT शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 8453495.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 69745.00/-

***महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. सा.बा.वि.क्र.CST/1087/CR-196/बी-2 दि.04.05.1988 नुसार कोणत्याही कामाची निविदा मंजूर करताना 5% किंवा यापेक्षा जास्त दराची निविदा मंजूर करू नये अशी तरतूद असताना 48% जादा दराची निविदा स्वीकारली आहे. सदरच्या कामासाठी वापरण्यात आलेल्या पाईपचा HYDRAULIC टेस्टिंग अहवाल नस्तीत आढळून आला नाही. मोजमाप पुस्तकातील मोजमापे कर्णरेषेने खोडली नसून गोषवारा तयार केलेला नाही. टाकीसाठी प्रस्तावित जागा ही शालेय संस्थेस देण्यात आल्याने जागेत बदल झाल्याने नवीन जागेचे स्थळ निरीक्षण करुन अंदाजपत्रक बनवणे आवश्यक होते. पाईपच्या अबकारी करावर महापालिकेस मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून सवलत प्राप्त असताना ठेकेदारास अबकारी करासह पाईपच्या खरेदीची रक्कम अदा केली असल्याने लेखापरीक्षण कालावधीतील खरेदीची रक्कम रु.3,83,766/- वर 16.48% दराने रक्कम रु.63,245/- मक्तेदाराकडून वसुलपात्र आहेत.***

सोलापूर महानगरपालिका

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नाव | असोसिएट इंजीनिअर, 48% जादाने निविदा मंजूर. |
| तांत्रिक मंजुरी | सोलापूर मनपा ठराव क्र.10, दिनांक18/05/2011 |
| स्थायी समिती मंजुरी | स्थायी समिती मंजुरी ठराव क्र.27, दि.07/08/2007. |
| प्रशासकीय मंजुरी | 1)मनपा ठराव क्रमांक 164, दिनांक.12/10/2006<br>2)मनपा ठराव क्रमांक 254, दिनांक.01/12/2007 |
| जिल्हा दरसुची वर्ष | 2006-07 MJP DSR |
| पूर्वगणन पत्रक | र.रु. 58,78,000/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 12/04/2008 TO 07/05/2008, दै.लोकमत. |
| कामाचा कालावधी | 18 महिने |
| करारनामा दि. व मुद्रांक शुल्क | दि.03.12.2008, रु.100/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष. |
| कार्यारंभ आदेश | जा.क्र./साआअ/810, दिनांक 04/12/2008 |
| लेखापरीक्षण कालावधीपर्यंत खर्च | 84,53,495/- |

उपरोक्त कामाची निविदा नस्ती, मोजमाप पुस्तिका व इतर अभिलेखांचे लेखापरीक्षण केले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक 24 दि. 20/06/2017 अन्वये खुलासा मागविला असून विभागाचे पत्र जावक क्र.188 दिनांक 10/07/2017 अन्वये सादर केलेला खुलासा/ अनुपालन विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1.कामाची निविदा प्राकलन दराच्या 48.00% जास्त दराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. सा.बा.वि.क्र.CST/1087/CR-196/बी-2 दि.04.05.1988 नुसार कोणत्याही कामाची निविदा मंजूर करताना 5% किंवा यापेक्षा जास्त दराची निविदा मंजूर करू नये अशी तरतूद असताना 5% पेक्षा जादा दराची निविदा स्वीकारली आहे. विभागाने अनुपालानामध्ये निविदा दर हे 2006-2007 मधील असून त्यांचा चालू बाजारभावाप्रमाणे तुलना केली असता 47.97% जादा दर येणे अपेक्षित असल्याने 48%जादा दराची निविदा मान्य केलेचे नमूद असून निविदा दर हे चालू बाजारभावाशी तुलना करून निश्चित करणे आवश्यक होते. त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही.

2.करारनामा हा रु.6600/- च्या मुद्रांक पेपरवर करणे आवश्यक असताना रु.100/- च्या मुद्रांक पेपरवर केला आहे, त्यामुळे रक्कम रु.6500/- मक्तेदाराकडून वसुलपात्र आहेत. विभागाने अनुपालानामध्ये 6 व्या रनिंग बिलातून शुल्क कपात केलेबाबत बिलाच्या पृष्ठाची छायांकित प्रत जोडली आहे, परंतु ते शासनास जमा केल्याचे चलन सादर केले नाही.

3. सदरच्या कामासाठी वापरण्यात आलेल्या पाईपचा HYDRAULIC टेस्टिंग अहवाल नस्तीत आढळून आला नाही.

4.मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम-1949 कलम (10) (दोन) (च) नुसार महानगरपालिकेच्या कोणत्याही संविदेमध्ये पदाधिका-याचा (नगरसेवकांचा) प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असल्यास असा पदाधिकारी अपात्र ठरतो. त्यामुळे महानरगपालिकेच्या कोणत्याही संविदेत पदाधिका-यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही. यासाठी निविदाधारकांडून निविदा संदर्भात पदाधिका-यांशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रतिज्ञापत्र घेणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही. विभागाने अनुपालानामध्ये असे प्रतिज्ञा पत्र घेण्यासंबंधी कार्यवाही ठेवण्यात येत असल्याचे नमूद केले आहे.

5.महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 180 प्रमाणे बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईच्या कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्यक आहे. तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्या रोख प्रमाणकाचा क्र.दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम परिशिष्ट-24 मधील अ.क्र.12,13 व 15 अन्वये मोजमाप पुस्तकात मापे उतरल्यानंतर शेवटी गोषवारा तयार करणे अनिवार्य असून त्यामध्ये केलेल्या कामाच्या मोजमापाच्या प्रत्येक बाबींची संख्या, दर, युनिट व रक्कम दर्शविणे आवश्यक आहे. तथापि मोजमाप पुस्तकातील मोजमापे कर्णरेषेने खोडली नसून गोषवारा तयार केलेला नाही. तसेच गोषवा-याखाली काम पूर्णत्वाचा दिनांक नमुद केलेला नाही. विभागाने अनुपालानामध्ये संबंधित आक्षेप लेख विभागाशी संबंधित असल्याचे नमूद केले आहे.
6.महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता नियम-165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याआधारे कामाच्या बाबींच्या अंदाजपत्रकात समावेश करणे अपेक्षित आहे. परंतु सदर अहवालाची प्रत नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही. तसेच WIT सांगली या संस्थेनुसार सदरच्या जागेवर RAFT FAUNDATION करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदरच्या बाबीवर रु.25,10,092/- इतका ज्यादा खर्च करावा लागला. यावरून तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर केला नसल्याचे दिसून येत असून चुकीचे पुर्वगणकपत्रक तयार केले आहे. विभागाने अनुपालानामध्ये टाकीसाठी प्रस्तावित जागा ही शालेय संस्थेस देण्यात आल्याने जागेत बदल केल्याचे नमूद केले आहे. नवीन जागेचे स्थळ निरीक्षण करुन अंदाजपत्रक बनवणे आवश्यक होते.
7.सदरच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या पाईपच्या अबकारी करावर महापालिकेस मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून सवलत प्राप्त असताना ठेकेदारास अबकारी करासह पाईपच्या खरेदीची रक्कम अदा केली असल्याने लेखापरीक्षण कालावधीतील खरेदीची रक्कम रु.3,83,766/- वर 16.48% दराने रक्कम रु.63,245/- मक्तेदाराकडून वसुलपात्र आहेत. विभागाचे अनुपालन संयुक्तिक नाही.
एकूण वसूलपात्र रक्कम=63,245/-

DGPAGPM8503 (Ref No : 9, Hmm No : 24)

## *41 निवडणूक विभागामधील अंदाजपत्रक नियत्रंण नोदवहीनुसार वित्तीय वर्ष 2013-14 मधील अभिलेख व 2014-15 मधील देयके उपलब्ध न झाल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1045228.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1045228.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणूक विभागामधील अंदाजपत्रक नियत्रंण नोदवहीनुसार वित्तीय वर्ष 2013-14 मधील अभिलेख व 2014-15 मधील देयके व अनुषंगीक नस्ती उपलब्ध करुन देण्याबाबत लेखापरीक्षण पथकाकडून मागणी करण्यात आलेली असता त्या संबधी दस्ताऐवज उपलब्ध झालेले नाही.***

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अधिनियम 2011 मधील कलम 6 नुसार सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणूक विभागामधील बजेट नियत्रंण नोदवहीनुसार वित्तीय वर्ष 2013-14 मधील अभिलेख व 2014-15 मधील खालील देयके व अनु षंगीक अभिलेख्याची लेखापरीक्षणसाठी अर्धसमास पत्र क्र 109 दि. 03.01.2018 व अर्धसमास पत्र क्र.145 दि.28/03/2018 नुसार मागणी करण्यात येवूनही अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अनु . क्र | वित्तीय वर्ष | देयकाचा तपशील | चेक क्र.व दिनांक | देयकाची रक्कम( खर्च) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2014 -15 | आर. के. एजन्सी कडून मतदान केंद्र दुरूस्तीसाठीचा खर्च | 1321 दि. 0.06.2014 | 194828/- |
| 2 | 2014 -15 | आरोग्य निरीक्षक यांना मानधन | 1328 दि. 8.06.2014 | 109204/- |
| 3 | 2014 -15 | (आरोग्य निरीक्षक यांना मानधन)अग्रीम समायोजन | ाज्ञापत्र ५.6/3337 दि. 5.02.2012 | 425200/- |
| 4 | 2014 -15 | पोलीस कर्मचारी भत्ता | | 315996/- |

आक्षेपाधीन एकूण रक्कम रु. 1045228/-

DATMDSM7101 (Ref No : 10, Hmm No : 145)

## *42 पाणी पुरवठा व मलनित्सारण विभागांतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत केलेल्या विविध कामामधून कामगार विमा व कामगार कल्याण उपकर वसूल न केल्याबाबत व इतर अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्ण ज शासन/मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 88076.00/-

***विमा रक्काम रु.64488/- व कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 23588/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यरक आहे. थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट केल्याबाबतचा अहवाल नस्तीमध्ये अढळत नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बाधकाम नियमावलीतील परिशिष्ट क्र.24 नुसार कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमाप पुस्तकातील मोजमापाची तपासणी केली नाही.***

1) कामाचे नाव : अलकुंटे चौक ते भोजप्पा टेकडी पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे.
सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव : कल्याणी कंन्ट्रक्शन, सोलापूर
तांत्रिक मंजुरी : क्र. 133, दिनांक 22/08/2013
स्थायी समिती मंजुरी : ठराव क्रमांक 484, दिनांक 28/02/2014
अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष : DSR 2011-12
पूर्वगणन पत्रक रक्कम : र. रु. 15,68,650/-
इसारा रक्कम : र. रु. 14505/-
निविदा रक्क्म : र. रु. 14,50,438/-
देयक मूल्यक : र. रु. 762516/-
करारनामा मुद्रांक शुल्क : र.रु.600/-
कार्यारंभ आदेश : जा.क्र./साआअ/जलवित/17, दिनांक 09/12/2013
एम बी नंबर/पृष्ठ क्रमांक : एम बी नंबर 794 व पृष्ठ क्रमांक 55 ते 63
काम पूर्ण झाल्याचा दिनांक : अपूर्ण
पहिल्या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | पाणी किंमत | विमा | ईटीपी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15250 | 15250 | 15250 | --- | | 200 | -- | --- | **47856** |

वसुल पात्र रक्कम 1) विमा र.रु.14504/-
2) उपकर र.रु.7625/-

2)कामाचे नाव : जमखंडी पुल ते रत्नमारुती चौकापर्यंत ड्रेनेज लाईन घालणे.
सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव: शिवशंभु कंन्ट्रक्शन सोलापूर
स्थायी समिती मंजुरी : ठराव क्रमांक 365,दिनांक 27/12/2013
अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष : MJP DSR 2012-13
पूर्वगणन पत्रक रक्कम : र.रु. 46,58,852 /-
निविदा रक्क्म : र. रु. 42,80,030/-

सोलापूर महानगरपालिका

देयक मूल्य : र. रु. 1264180 +101134 = 136514

करारनामा मुद्रांक शुल्क : र.रु.3400

कार्यारंभ आदेश : जा.क्र./साआअ/जलवित/1445, दिनांक 04/03/2014

एम बी नंबर/ पृष्ठ क्रमांक : एम बी नंबर 24 व पृष्ठ क्रमांक 23 ते 28

काम पूर्ण झाल्याचा दिनांक : अपूर्ण

पहिल्या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | एलबीटी | पाणी किंमत | विमा | ईटीपी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 25284 | 25284 | 25284 | 3160 | 200 | --- | 101134 | **180346** |

वसुल पात्र रक्कम 1) विमा र.रु.42800/-

2) उपकर र.रु.12642/-

3) कामाचे नाव : राजु नगर ते किसान नगर करीता पानगल घर ते महादेव मंदीर कोपरा घरापर्यंत पिण्याचे पाईप लाईन घालणे.

सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव : अमरनाथ बि बसंती

स्थायी समिती मंजुरी : ठराव क्रमांक 602, दिनांक 23/01/2015

अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष : MJP 2012-13

पूर्वगणन पत्रक रक्कम : र .रु. 19,89,140/-

निविदा रक्क्म : र.रु. 7,18,437/-

देयक मूल्य : र.रु. 332107 + 26558 = 334749

करारनामा मुद्रांक शुल्क : र. रु. 100

कार्यारंभ आदेश : जा.क्र./साआअ/जल/5076, दिनांक 29/12/2014

काम पूर्ण झाल्याचा दिनांक : 10/04/2015

पहिल्या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | पाणी किंमत | विमा | ईटीपी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6642 | 6642 | 6642 | 1796 | 3321 | -- | --- | 26558 | **51611** |

वसुल पात्र रक्कम 1) विमा र.रु. 7184/-

2) उपकर र.रु. 3321/-

महापालिकेच्या पाणीपुरवठा व मलनित्सारण विभागाने जिल्हा वार्षिक योजना सन 2012-13

मध्ये समाविष्ठि असलेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत ड्रेनेज लाईन घालणे व पाण्याची लाईन घालणे या कामांच्या निविदा नस्ती, देयक व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 12 दि. 28/05/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवशययक आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24, 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 3 नुसार काही विशिष्ट परीस्थितीत कंत्राट दाराला कंत्राटी कामाची देय रक्कम प्रदान करण्याची तातडीची आवश्यकता भासल्यास कंत्राटी कामाच्या मूल्याच्या सरासरी अंदाजे रु. 1/- (प्रतिशेकडा ) या दराने रक्कम वळती करून उर्वरित रक्कम प्रदान करण्यात यावी व नंतर शासकीय विमा निधीकडे ही रक्कम धनादेश वा धनाकर्षाद्वारे विमा उतरविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात यावी.

वरील कामासाठी मक्तेदाराने कामाचा तसेच कामावरील कामगारांचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. विमा रक्कंम रु.64488/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 1 नुसार प्रत्येक प्रकारच्या कंत्राटी कामाचे स्वीकार पत्र व कार्यादेश कंत्राट दाराला निर्गमित करताना त्याची एक प्रत शासकीय विमा निधी या कार्यालयास अग्रेषित करावी.या प्रकारे तरतूद असतानाही कुठल्याही कंत्राटी कामाचे स्वीकार पत्र व कार्यादेश प्रत शासकीय विमा निधी या कार्यालयास अग्रेषित केलेली नाही. सबब शासन निर्णयातील तरतुदीचे पालन झालेले नाही.

3)महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 2 नुसार प्रत्येक महापालिकेने कंत्राटी कामापोटी कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा योग्य प्रकारे शासकीय विमानिधीकडे उतरवून या संबधिचा पुरावा सादर केलेला आहे याची खात्री करावी तद्नंतरच कंत्राटी कामापोटी देय रक्कम प्रदान करावी .

परंतु वरील प्रमाणे महापालिकेने कंत्राटी कामापोटी कंत्राटदारास रक्कम प्रदान करण्यापूर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा योग्य प्रकारे शासकीय विमानिधीकडे उतरवून या संबधिचा पुरावा सादर केलेला आहे याची खात्री न करता देयाकांचे प्रदान केलेले आहे. सबब शासन निर्णयातील तरतुदीचे पालन झालेले नाही.

4) महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र.108 कामगार-7, दिनांक 17/06/2010 अन्वये उपकराची 1 टक्का रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. परंतु उपकराची रक्कम रु.23588/- वसूल केलेली नाही. त्यामुळे कामगार कल्याण उपकराची रक्कुम रु.23588/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्य क आहे.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बाधकाम नियमावली नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तिर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याआधारे कामाच्या बाबींच्या अंदाजपत्रकात समावेश करणे अपेक्षित आहे. परंतु सदर अहवालाची प्रत निविदा नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

6) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली प्रमाणे बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तमकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईच्या कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्यक आहे. तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्या रोख प्रमाणकाचा क्र. दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे.

7) कामासाठी वापरण्यात आलेले स्वाक्षरी नकाशे, एल सेक्शन अंदाजपत्रक संचिकेत आढळून आलेले नाहीत.

8) संबंधित कामाच्या बाबतीत थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट केलेले नाही.

9) मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम-1949 कलम (10) (दोन)(च) नुसार महानगरपालिकेच्या कोणत्याही संविदेमध्ये पदाधिका-याचा (नगरसेवकांचा) प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असल्यास असा पदाधिकारी अपात्र ठरतो. त्यामुळे महानरगपालिकेच्या कोणत्याही संविदेत पदाधिका-यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही. यासाठी निविदाधारकांडून निविदा संदर्भात पदाधिका-यांशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रतिज्ञापत्र घेणे आवश्याक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही.

10)महाराष्ट्र सार्वजनिक बाधकाम नियमावलीतील परिशिष्ट क्र.24 नुसार कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमाप पुस्तकातील मोजमापाची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु कार्यकारी अभियंता यांनी व उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तकातील मोजमापाची तपासणी केली नाही.

DATVRKM8002 (Ref No : 12, Hmm No : 12)

## *43 संत तुकाराम चौक ते पाथरुट चौक ते पोटफाडी चौकापर्यंत ड्रेनेज लाईनघालणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्ण ज शासन/मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 88074.00/-

***ड्रेनेज लाईन घालणे कामासाठी वापरण्यात आलेले स्वाक्षरी नकाशे, एल सेक्शन अंदाजपत्रक संचिकेत आढळून आलेले नाहीत. थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट केलेले नाही. मक्तेदाराने कामाचा तसेच कामावरील कामगारांचा***

***विमा उतरविलेला नाही. त्यामुळे कामगार विमा रक्कम रु.44,037/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे. कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 44,037/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | संत तुकाराम चौक ते पाथरुट चौक ते पोटफाडी चौकापर्यंत ड्रेनेज लाईन घालणेबाबत. |
| ठेकेदाराचे नाव | लक्ष्मी कंन्ट्रनक्शन, सोलापूर |
| तांत्रिक मंजुरी | क्र.399, दिनांक 25/02/2014 |
| स्थायी समिती मंजुरी | मानीव मान्यता, दिनांक 08/02/2014 |
| प्रशासकीय मंजुरी | मा. आयुक्त यांचे दिनांक 08/02/2014 चे मान्यता |
| मा. सर्वसाधारण सभा | ठराव क्रमांक 188 दिनांक 02/01/2014 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2012-13 MJP DSR |
| पूर्वगणन पत्रक क्रमांक व वर्ष | 31/2013-14 |
| पूर्वगणन पत्रक रक्कम | र. रु. 52,95,137/- |
| इसारा रक्कम | र.रु.49,000/- |
| निविदा रक्कम | र.रु.48,96,104/- |
| सुरक्षा अनामत | र.रु.98,000/- |
| कामाचा कालावधी | 3 महिने |
| करारनामा मुद्रांक शुल्क | 4 हजार |
| कार्यारंभ आदेश | जा.क्र./साआअ/जलवित/177, दिनांक 25/02/2014 |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | 22/05/2014 |

प्रदान

| तपशील | रक्कम रु | मोजमाप पुस्तक क्र. | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| पहिले धावते देयक | 1332370/- | 2 | |
| दुसरे धावते देयक | 1297541/- | 2 | |
| तिसरे धावते देयक | 2157863/- | 2 | 20 ते 29 |
| एकूण | | 4787774/- | |

पहिल्या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत एकूण | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | | पाणी किंमत | | विमा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 24676 | 24676 | 24676 | 3084 | --- | 200 | --- | 98694 | 176000 |

दुसऱ्या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत एकूण | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | पाणी किंमत | | विमा | ईटीपी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 23808 | 23808 | 23808 | 2976 | 11904 | 200 | --- | 95232 | 181736 |

तिसऱ्या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत एकूण | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | | पाणी किंमत | विमा | ईटीपी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 39594 | 39594 | 39594 | 158375 | 197997 | 200 | --- | 4949 | 302103 |

महापालिकेच्या पाणीपुरवठा व मलनित्सारण विभागाने जिल्हा वार्षिक योजना सन 2012-13 मध्ये समाविष्ठ असलेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत संत तुकाराम चौक ते पाथरुट चौक ते पोटफाडी चौकापर्यंत ड्रेनेज लाईन घालणे या कामाची निविदा नस्ती, देयक व मोजमाप पुस्तिकेची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 13 दि.29/05/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास 1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 3 नुसार काही विशिष्ट परीस्थितीत कंत्राट दाराला कंत्राटी कामाची देय रक्कम प्रदान करण्याची तातडीची आवश्यकता भासल्यास कंत्राटी कामाच्या मूल्याच्या सरासरी अंदाजे रु.1/- (प्रतिशेकडा) या दराने रक्कम वळती करून उर्वरित रक्कम प्रदान करण्यात यावी व नंतर शासकीय विमा निधीकडे ही रक्कम धनादेश वा धनाकर्षाद्वारे विमा उतरविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात यावी.

वरील कामासाठी मक्तेदाराने कामाचा तसेच कामावरील कामगारांचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. विमा रक्कम रु. 44,037/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.

2) महाराष्ट्रय शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.बीसीए-2009/प्र.क्र.108 कामगार-7, दिनांक 17/06/2010 अन्वये उपकराची 1 रक्कम टक्का वसूल करणे आवश्यक आहे. परंतु बिलातून रक्कम रु.44,037/- वसूल केलेली नाही. त्याकमुळे कामगार कल्याण उपकराची रक्कम रु. 44,037/- वसुलपात्र असून ती शासनखाती भरणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावली नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याआधारे कामाच्या बाबींच्या अंदाजपत्रकात समावेश करणे अपेक्षित आहे. परंतु सदर अहवालाची प्रत निविदा नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

4) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावली परिशिष्ट -24 मधील अ.क्र.12,13 व 15 अन्व्ये बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईच्या कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्यक आहे. तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्या रोख प्रमाणकाचा क्र.दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्यक आहे. तथापि मोजमाप पुस्तकातील मोजमापे कर्णरेषेने खोडली नसून गोषवारा तयार केलेली नाही. तसेच गोषवा-याखाली काम पूर्णत्वाचा दिनांक नमुद केलेला नाही.

5) कामासाठी वापरण्यात आलेले स्वाक्षरी नकाशे, एल सेक्शन अंदाजपत्रक संचिकेत आढळून आलेले नाहीत.

6) संबंधित कामाच्या बाबतीत थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट केलेल्या अहवालाची प्रत नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

7) मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम-1949 कलम (10) (दोन) (च) नुसार महानगरपालिकेच्या कोणत्याही संविदेमध्ये पदाधिका-याचा (नगरसेवकांचा) प्रत्यक्ष/अप्रक्ष सहभाग असल्यास असा पदाधिकारी अपात्र ठरतो. त्यामुळे महानरगपालिकेच्या कोणत्याही संविदेत पदाधिका-यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही. यासाठी निविदाधारकांडून निविदा संदर्भात पदाधिका-यांशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्यानचे

प्रतिज्ञापत्र घेणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही.

8) महाराष्ट्र सार्जनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार कामाच्या किंमतीचे कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमापे तपासणी करून मोजमाप पुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेले मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करणेत आली नाही.

DATVRKM8002 (Ref No : 13, Hmm No : 13)

## *44 प्र.क्र.36 स्लॉटर हाऊस ते लुशा प्रिंटर्स ते महात्मा फुले ड्रेनेज लाईन घालणे याकामात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्ण जय शासन/मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 146419.00/-

***अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% प्रमाणे र. रु.65251/- वसूल करून शासन खाती भरण्यात यावी. तांत्रिक अधिकाऱ्याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवालाची प्रत निविदा नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही. कामाच्या किंमतीचे कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमापे तपासणी करून मोजमाप पुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेले नाहीत. निविदे सोबतच्या कागदपत्रात विक्री कर नोंदणी दाखला उपलब्ध झाला नाही. नोंदणी प्रमाणाआधारे खात्री पटविलेली नसल्याने रक्कम रु. 81168/- मक्तेदाराकडून वसुलपात्र असून सदर रक्कम शासनखाती भरणा करणे आवश्ययक आहे.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | प्र क्र 36 स्लॉटर हाऊस ते लुशा प्रिंटर्स ते महात्मा फुले ड्रेनेज लाईन घालणे. |
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | कल्याणी कंन्ट्रक्शन |
| तांत्रिक मंजुरी | अनुक्रमांक 144, दिनांक 22/08/2013 |
| प्रशासकीय मंजुरी | म.न.पा. ठराव क्रमांक 201, दिनांक 31/03/2013 |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | MJPDSR 2012-13 |

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकाची रक्कम | 65,25,195/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | दैनिक तरुण भारत |
| इसारा रक्कम | 60,335/- |
| निविदा रक्कम | 60,33,465/- (प्राप्त दर 4% कमी दराने) |
| सुरक्षा अनामत | 120670/- |
| कामाचा कालावधी | 270 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | 6000/- |
| कार्यारंभ आदेश | जा.क्र/साआअ/जनि/95,दिनांक 12/05/2014 |

प्रदान

| तपशील | रक्कम रु | मोजमाप पुस्तक क्र.. | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| पहिले धावते देयक | 1265766 | 794 | 19 ते 30 |
| दुसरे धावते देयक | 1671638 | 794 | 42 ते 54 |
| एकूण | 16739904 | | |

पहिल्या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | पाणी किंमत | ईटीपी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 23440 | 23440 | 23440 | 2930 | 11720 | 200 | 93760 | 178930 |

दुस-या देयकातील कपाती

| सुरक्षा अनामत | विक्रीकर | आयकर | एलबीटी | उपकर | पाणी किंमत | ईटीपी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 30672 | 30672 | 30672 | 12155 | 15336 | 500 | 122689 | 242696 |

महापालिकेच्या पाणीपुरवठा व मलनित्सारण विभागाने जिल्हा वार्षिक योजना सन 2012-13 मध्ये समाविष्ठ असलेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत प्र.क्र. 36 स्लॉटर हाऊस ते लुशा प्रिंटर्स ते महात्मा फुले ड्रेनेज लाईन घालणे या कामाची निविदा नस्ती, देयक व मोजमाप पुस्तिकाची तपासणी केली

असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.14 दि. 28/05/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे. महाराष्ट शासन, नगर विकास विभाग, क्रमांक जीईएन1098/1357/प्र.क्र.166/98/नवी-24 3 नोव्हेंबर 2003, मुद्दा क्र. 3 नुसार काही विशिष्ट परीस्थितीत कंत्राट दाराला कंत्राटी कामाची देय रक्कम प्रदान करण्याची तातडीची आवश्यकता भासल्यास कंत्राटी कामाच्या मूल्याच्या सरासरी अंदाजे रु. 1/-(प्रतिशेकडा) या दराने रक्कम वळती करून उर्वरित रक्कम प्रदान करण्यात यावी व नंतर शासकीय विमा निधीकडे ही रक्कम धनादेश वा धनाकर्षाद्वारे विमा उतरविण्यासाठी हस्तांतरीत करण्यात यावी.

वरील कामासाठी मक्तेदाराने कामाचा तसेच कामावरील कामगारांचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. विमा रक्क म रु.65251/- वसुल करुन शासकीय विमा निधीकडे भरणा करावी.

2) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली परिशिष्टि -24 मधील अ.क्र.12,13 व 15 अन्वये बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठ लाल शाईच्या कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्यक आहे.तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्या रोख प्रमाणकाचा क्र.दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्याक आहे. तथापि मोजमाप पुस्त्कातील मोजमापे कर्णरेषेने खोडली नसून गोषवारा तयार केलेली नाही. तसेच गोषवा-याखाली काम पूर्णत्वाचा दिनांक नमुद केलेला नाही.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याआधारे कामाच्या बाबींच्या अंदाजपत्रकात समावेश करणे अपेक्षित आहे.परंतु सदर अहवालाची प्रत निविदा नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र.विकअ/1998/प्र.क्र.43/कराधान-1 दि.5 मे 1999, कार्यकंत्राट कायदयाचे कलम 16 तसेच मुल्यवर्धित कर कायदा 2002 प्रमाणे कार्यकंत्राटदाराने विक्री कर खात्याकडुन नोंदणी दाखला घेणे बंधनकारक असून निविदेसोबतच्या सहपत्रात दाखला (नमुना 102 नियम) सादर केला पाहिजे. दाखला सादर करणा-या कंत्राटदाराकडून 2 टक्के व सादर न करणा-या कंत्राटदाराकडुन 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे.

आलेले

निविदे सोबतच्या कागदपत्रात विक्री कर नोंदणी दाखला उपलब्ध झाला नाही. मात्र विक्रीवर 2 टक्के कपात केला आहे. नोंदणी प्रमाणाआधारे खात्री पटविलेली नसल्याने रक्कम रु. 81168/- मक्तेदाराकडून वसुलपात्र

असून सदर रक्कम शासनाखाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र. 24 नुसार कामाच्या किंमतीचे कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के व उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमापे तपासणी करून मोजमाप पुस्तकामध्ये नोंदविण्यात मोजमापेसमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.परंतु अशी कार्यवाही करणेत आली नाही.

DATVRKM8002 (Ref No : 14, Hmm No : 14)

## *45 महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मलनिःसारण व्यवस्था सुधारणे भाग -1 प्रकल्पात झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 20**

*लेखा शीर्ष : महाराष्ट्र सुवर्ण जय शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 54062124.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 72157730.00/-

***निविदा अटी शर्तीनुसार व करारनामा अट क्र.34 नुसार 2% मोबीलायजेशन अॅडव्हांन्स देणेची अट असताना मक्तेरदारास मागणीनुसार 10% अॅडव्हांन्स देणेत आलेला आहे. रक्कम रु. 6,37,56075/- ची बँक गॅरंटी 100/- स्टँम्प पेपरवर घेतली आहे. भारतीय मुद्रांक शुल्क अधिनियम अनुच्छेद 154(2) व 40 (b)नुसार तिच्या विधीग्राहयतेसाठी रु.1000 स 5 रु. प्रमाणे रक्कम रु. 318780/- च्या स्टँप वर बँक गॅरंटी घेणे आवश्यक होते. त्यामुळे सदरची बँक गॅरंटी विधी ग्राहय ठरत नाही. कामगार कल्याण निधी शासनाकडे वेळोवेळी भरणा केलेली चलने व कामाचा तसेच कामावरील कामगारांचा विमा उतरविलेल्या संदर्भातील लेखे उपलब्ध झाले नाहीत. बार चार्ट नुसार कामाची प्रगती ठेकेदाराकडून झाली नसल्याने काम संथ गतीने केले आहे. दंडाची थकबाकी र.रु.5,82,45,207/- मक्तेदाराकडे प्रलंबित असून ती अद्याप वसूल करण्यात आलेली नाही. सदरची दंडाची र.रु.5,82,45,207/-वसूल करण्यात यावी.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर नित्सारण व्यवस्था सुधारणे भाग -1 प्रकल्पाबाबत. |

| | |
|---|---|
| सु.बे/म.का.स.सं./ठेकेदाराचे नाव | एस.एम.सी.जी.ई.सी.पी.एल. (जे.व्ही.ठाणे) |
| तांत्रिक मंजुरी | सोलापूर मनपा ठराव क्र.10, दिनांक 18/05/2011 |
| स्थायी समिती मंजुरी | 1) जा.क्र. 1023, दिनांक 28/12/2011<br>2) Common Set of Deviation स्थायी समिती मंजुरी ठराव क्र.875, दि.19/11/2011 |
| प्रशासकीय मंजुरी | 1) मनपा ठराव क्रमांक 390, दिनांक 23/03/2012<br>2) महाराष्ट्र शासन नगरविकास निर्णय शा.नि.क्र.नगरो-2010/प्र.क्र.242/नवि-33, दिनांक 23/02/2011 नुसार (रक्कम रु.160 कोटीचे प्रकल्प) |
| अंदाजपत्रकातील जिल्हा दरसुची वर्ष | 2011-12 MJP DSR |
| पूर्वगणन पत्रक | र.रु.160,43,65,400/- |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | 08/09/2011 ते 23/09/2011, दै.लोकमत, दै.सकाळ आणि टाईम्स ऑफ इंडिया |
| निविदा रक्कम | र.रु.139,12,52,332/- |
| सुरक्षा अनामत | र.रु.63756075/- |
| कामाचा कालावधी | 24 महिने |
| करारनामा मुद्रांक शुल्क | 5 लाख |
| कार्यारंभ आदेश | जा.क्र./साआअ/जनि/1261, दिनांक 27/02/2012 |

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मलनिःसारण व्यवस्था सुधारणा प्रकल्पाजतील कामांचा मक्ता मक्तेदार एस.एम.सी.जी.ई.सी.पी.एल. (जे.व्ही.ठाणे) यांचे नावे मंजुर असुन उपरोक्त संदर्भान्वये मंजुर मक्तेतदारास कामाचे कार्यादेश जा.क्र./साआअ/जनि/1261, दिनांक 27/02/2012 देण्याकत आले आहेत. उपरोक्त विषयाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 32 दि.29/06/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) लेखापरीक्षणासाठी नस्तीची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. तथापि मुळ निविदा नस्तील उपलब्धन करुन देण्यात आली नाही.

2) नस्तीमध्ये मक्तेदार एस.एम.सी.जी.ई.सी.पी.एल. (जे.व्हीक.ठाणे) व महानगरपालिका यांच्यांमध्ये झालेला करारनाम्याची छायांकित प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध केलेली आहे. तथापि मूळ करारनामा उपलब्ध केला नाही.

3) मोजमाप पुस्तिकेमध्ये ब-याच ठिकाणी खाडाखोड करून नोदी घेण्यात आलेल्या आहेत. परंतु त्या नोंदी सक्षम अधिकाऱ्याने साक्षाकिंत केलेल्या नाहीत.
4) निविदा अटी शर्तीनुसार व करारनामा अट क्र.34 नुसार 2% मोबीलायजेशन ॲडव्हांन्सक देणेची अट असताना मक्तेदारास मागणीनुसार 10% ॲडव्हांन्स देणेत आलेले आहे.त्यामुळे निविदा अटी व शर्तीचा भंग करून करारनामा केलेला आहे. याबाबतचे मंजुरीचे आदेश लेखापरीक्षणास आढळून आलेले नाही. मोबीलायजेशन ॲडव्हांन्स वसुली प्रलंबित आहे.
5) मक्तेदारास अदा केलेल्या मोबीलायजेशन ॲडव्हांन्सच्या सुरक्षाकरिता तेवढ्याच रकमेची बँक गॅरंटी आयुक्त सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांना सादर केली आहे. सदरहु बँक गॅरेंटीपैकी खालील नमुद बँक गॅरंटीची मुदत संपूष्टात आली असल्याने त्यापुढील कालावधीसाठी बँक गॅरेटीचे नुतनीकरण करण्यात आले नसल्याचे दिसून आले.

| Sr.No. | Name of Bank | BG No. | Amount in Rs. | Date of Validity |
|---|---|---|---|---|
| 1 | Bank Of Baroada | 0723IGPER012612 | 5000000 | 20/09/2013 |
| 2 | Bank Of Baroada | 0723IGPER043612 | 5000000 | 20/09/2013 |
| 3 | Orintal Bank of Comerce | 01380002312 | 5000000 | 20/09/2013 |
| 4 | Orintal Bank of Comerce | 01380002412 | 5000000 | 20/09/2013 |
| 5 | Orintal Bank of Comerce | 01380002512 | 5000000 | 20/09/2013 |
| 6 | Orintal Bank of Comerce | 01380002612 | 5000000 | 20/09/2013 |
| 7 | Orintal Bank of Comerce | 01380002712 | 5000000 | 20/09/2013 |
| 8 | Orintal Bank of Comerce | 01380002812 | 5000000 | 20/09/2013 |
| 9 | Orintal Bank of Comerce | 01380002912 | 5000000 | 20/09/2013 |
| 10 | Orintal Bank of Comerce | 01380003012 | 5000000 | 20/09/2013 |

6) रक्कम रु. 6,37,56075/- ची बँक ग्यारंटी 100/- स्टँम्प पेपरवर घेतली आहे.भारतीय मुद्रांक शुल्क अधिनियम अनुच्छेद 154 (2 )व 40 (b)नुसार तिच्या विधीग्रहयतेसाठी रु.1000 स 5 रु. प्रमाणे रक्कम रु. 318780/- च्या स्टँप वर बँक ग्यारंटी घेणे आवश्यक होते. त्यामुळे सदरची बँक ग्यारंटी विधी ग्राहय ठरत नाही..
7) कामगार कायदा 1970 व नियम 1971 च्याय तरतुदी अन्वये संबंधित ठेकेदार कामगार

आयुक्तांकडील लायसन्सनधारक असल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तसेच कामगारांची जी.आय.एस.,जी .पी.एफ व कामगार कल्याण निधी शासनाकडे वेळोवेळी भरणा केलेली चलने उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे सदरच्या रक्कमेच्या भरणाबाबत खात्री होत नाही.

8) मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम-1949 कलम (10) (दोन) (च) नुसार महानगरपालिकेच्याई कोणत्याही संविदेमध्ये पदाधिका-याचा (नगरसेवकांचा) प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असल्यास असा पदाधिकारी अपात्र ठरतो. त्यामुळे महानरगपालिकेच्या कोणत्याही संविदेत पदाधिका-यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही. यासाठी निविदाधारकांडून निविदा संदर्भात पदाधिका-यांशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे प्रतिज्ञापत्र घेणे आवश्याक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र घेतलेले नाही.

9) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्यक आहे.

विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्रविनी-2300/ सहविमा/जिप-2 दि.07 जानेवारी 2004 नुसार मंजूर निविदा रकमेच्या 1% विमा कामासाठी व कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा निधीत भरणे आवश्यक आहे. वरील कामासाठी मक्ते दाराने कामाचा तसेच कामावरील कामगारांचा विमा उतरविलेल्या संदर्भातील लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. कामाचा तसेच कामावरील कामगारांचा विमा र.रु. 13912523/- वसूल करून शासन खाती भरावी.

10) बांधकाम नियम पुस्तिका प्रमाणे बांधकामाच्या प्रमाणकाचे प्रदान करताना मोजमाप पुस्तभकातील तपशीलवार मापे नोंदविलेले प्रत्येक पृष्ठा लाल शाईच्या कर्ण रेषेने खोडून टाकणे आवश्यक आहे. तसेच ज्यानुसार बिल संमत करण्यात आले आहे. त्या रोख प्रमाणकाचा क्र.दिनांक तसेच धनादेशाचा तपशील गोषवा-याखाली लाल शाईने नमूद करणे आवश्य्क आहे.

11) मक्तेदाराच्या दिनांक 05/10/2012 रोजी खर्ची पडलेल्या प्रमाणकामधून कपात केलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या रक्कमा अंतिम प्रदानासोबतच शासन खाती जमा केल्याबाबत शहानिशा करण्यायसाठी संबंधिताची पोच/चलनाच्या प्रती असा अभिलेख मागविला होता परंतु तो सादर केलेला नाही. भारतीय मुद्रांक अधिनियम 1899 कलम 30 तसेच महाराष्ट्रं नगरपालिका लेखासंहिता नियम 19 नुसार रक्कमाच्या पोच तसेच मक्तेदाराची प्राप्त विषयक मुद्रांकित पोच मागणी करुनही सादर केलेली नाही. त्यामुळे कपातीच्या रक्कमा संबंधित शासन प्राधिकारास व मक्तेदारास प्रदानाची रक्कम प्राप्त झाल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

12) महाराष्ट्रा नगरपालिका लेखासंहिता नियम-165 नुसार तांत्रिक अधिका-याने जागेचे स्थळ निरीक्षण करुन प्रस्तावित कामाबाबत सविस्तर अहवाल सादर करणे आवश्यक असून त्याआधारे कामाच्या बाबींच्या अंदाजपत्रकात समावेश करणे अपेक्षित आहे. परंतु सदर अहवालाची प्रत नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

13) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सन 2011-12 ची दरसुची उपलब्ध न झाल्याने प्रस्तावांतर्गत वापरलेले दर योग्य असल्याची खात्री पटत नाही.

14) कामाचे प्राकलन सादर केले नसल्याने मोजमाप पुस्तीकाची तपासणी बाबनीहाय करता आली नाही.त्यामुळे सदरचा खर्च र.रु. 53743344/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

15) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र.विकअ/1998/प्र.क्र.43/कराधान-1 दि.5 मे 1999, कार्यकंत्राट कायद्याचे कलम 16 तसेच मुल्य7वर्धित कर कायदा 2002 प्रमाणे कार्यकंत्राटदाराने विक्री कर खात्याकडुन नोंदणी दाखला घेणे बंधनकारक असून निविदेसोबतच्याय सहपत्रात दाखला (नमुना 102 नियम 9) सादर केला पाहिजे. दाखला सादर करणा-या कंत्राटदाराकडून 2 टक्केत व सादर न करणा-या कंत्राटदाराकडुन 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे. निविदे सोबतच्या कागदपत्रात विक्री कर नोंदणी दाखला उपलब्ध झालेला नाही.

16)बार चार्ट नुसार कामाची प्रगती ठेकेदाराकडून झाली नसल्याने काम संथ गतीने केले आहे.मासिक प्रगती अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेले नाहीत.

17)कामासाठी वापरण्यात आलेले स्वाक्षरी नकाशे, एल सेक्शन अंदाजपत्रक संचिकेत आढळून आलेले नाहीत.

18) प्री.बीड.मिटिंग मध्ये सिवेज डिस्पोजल या कामाचे ठिकाण व सिवेज प्लँट यांची लांबी ठेकेदारांनी विचारली असता ती साईट कंडीशन प्रमाणे ठरेल असे पालिकेचे म्हणणे आहे त्यामुळे प्राकलानामध्ये या बाबींचा विचार केलेला दिसत नाही.

19) लेखापरिक्षणा दरम्यान माती परीक्षण अहवाल (geo-technica linvestigation report) उपलब्ध झाले नाहीत.

20) मु.ले.प.च्या टिपणी क्र.मु.ले.प/अभि/2376 नुसार सदर मक्तेदारास र.रु.15,80,71,500/-दंड लावण्यात आलेला आहे.यापैकी 36,07,500/-इतका दंड वसूल केलेला असून र.रु.9,62,18,793/- मक्तेदारास प्रलंबित असलेल्या देयकातून सामायोजीत केल्याचे दिसत आहे.परंतु र.रु.5,82,45,207/-दंडाची थकबाकी मक्तेदाराकडे प्रलंबित असून ती अद्याप वसूल करण्यात आलेली नाही. सदरची दंडाची र.रु.5,82,45,207/-वसूल करण्यात यावी.

DATVRKM8002 (Ref No : 19, Hmm No : 32)

## *46 सोलापूर शहर भागात पिण्याचे पाण्याचे पाईप वितरण व्यवस्था करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष :UIDSSMT शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 23136606.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 63756.00/-

***सदर कामापोटी पूर्वीचे ठेकेदाराने कोणत्या ठिकाणी किती काम केले आहे व नवीन ठेकेदाराने उर्वरित काम कोणत्या ठिकाणी किती काम करावयाचे आहे याचा स्पष्ट अहवाल सादर केला नाही. काम लेखापरीक्षणाचे***

***तारखेपर्यंत पूर्ण केले नाही. कामास वापरणेत आलेले स्पेशलपोटी जादा प्रदानाची रक्कम रु.12,006/- वसुल करणेत आले नाही. ठेकेदाराने दिलेली बँक गॅरंटीचे नूतनीकरण करण्यात आले नाही. कामास मुदतवाढ मंजूर न करता कामाचे देयके प्रदान करणेत आली आहेत. मे.परफेक्ट असोसिएट इंजि. यांची बयाणा रक्कम, सुरक्षा रक्कम व बँक गॅरंटी जप्त करून मनपा निधीमध्ये जमा केल्याची कागदपत्रे सादर केली नाहीत. सदरचे काम मूळ ठेकेदाराकडून निविदेमधील कोणत्या अटीनुसार काम काढून घेतले आहे याचा उल्लेख करण्यात आला नाही. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणेत आली नाहीत.***

सोलापूर शहर भागात पिण्याचे पाण्याचे पाईप वितरण व्यवस्था करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

UIDSSMT योजने अंतर्गत सदरचे काम 129 कि.मी. पाईप वितरण करणेचे काम करावयाचे होते. त्याचे मूळ अंदाजपत्रक रक्कम रु.772.105 लक्ष इतके तयार करण्यात आले होते. कामाची जाहीर निविदा मागावून प्राप्त झालेले निविदापैकी लघुत्तम निविदाधारक मे.परफेक्ट असोसिएट इंजि. यांची 12.40% कमी दराची निविदा मंजूर करून कार्यादेश क्र.114 दि.23/11/2009 अन्वये 20 महिन्यात काम पूर्ण करणेचे आदेश देणेत आले होते. ठेकेदाराने मूळ मुदतीत काम पूर्ण केले नसल्याने त्यास दि.31/03/2012 पर्यंत वाढीव विनादंडाने मुदतवाढ मंजूर करण्यत आले होते. परंतु ठेकेदाराने वाढीव मुदतीत 38 कि.मी.चे काम करून उर्वरित काम केले नसल्याने ते काम त्याचेकडून काढून घेणेत येवून त्यांचेविरुद्ध दंडनीय कार्यवाही करण्यात आली आहे.

कामाची निविदा किंमत रु.676.364 लक्ष इतकी असून त्यापैकी ठेकेदाराने केलेल्या कामावर रु.164.87 लक्ष खर्च केला आहे. उर्वरित काम 91 कि.मी.चे असुन त्याची निविदा किंमत रु.511.494 इतकी आहे. उर्वरित काम करणेसाठी नवीन ठेकेदार मे.असोसिएट इंजि. यांना स्थायी समिती ठराव क्र.457 दि.07/02/2013 अन्वये मंजूर करून देणेत आले आहे. नवीन ठेकेदार मे.असोसिएट इंजि. यांना कार्यारंभ आदेश क्र. 65 दि.04/05/2013 अन्वये मूळच्या दराने म्हणजे 12.40% कमी दराने उर्वरित काम 16 महिन्याचे मुदतीत करण्यास आदेश देणेत आले आहे.नवीन ठेकेदाराने दिलेले मुदतीत काम केले नसल्याने त्यास दि.31/03/2014 अखेर विनादंडाने मुदतवाढ मंजूर करण्यत आले आहे.

सदर कामाचे देयकाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 5 दि.08/05/2017 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.84 दि.18/05/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेले अनुपालन समर्पक नसल्याने खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)शहर विभागात पिण्याचे पाण्याचे पाईप वितरण व्यवस्था 16 ठिकाणी करणेचे असून त्याचे 16 अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत. कार्यालयीन टिपणी दि.18/09/2012 नमूद केलेनुसार पूर्वीचे ठेकेदाराने 38 कि.मी.चे काम केले असून उर्वरित 91 कि.मी.चे काम करणेचे आहे असे मोघम स्वरुपात उल्लेख करण्यात आला आहे. वास्तविक पाहता पूर्वीचे ठेकेदाराने कोणत्या ठिकाणी किती काम केले आहे व नवीन ठेकेदाराने उर्वरित

काम कोणत्या ठिकाणी किती काम करावयाचे आहे याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. खात्याने याबाबत सविस्तर अहवाल देणेत आला नसल्याने नवीन ठेकेदाराने अंदाजपत्रकानुसार उर्वरित काम केले असल्याची खात्री करता येत नाही.

ठेकेदाराने केलेल्या कामाची मोजमापे मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केली आहेत असे खात्याने कळविले आहे. खात्याचा खुलासा समर्पक नसल्याने व आक्षेपानुसार अहवाल सादर केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) सदरचे काम लेखापरीक्षणाचे तारखेपर्यंत म्हणजे माहे मे 2017 पर्यंत पूर्ण केले नसल्याने त्याचा लाभ लाभार्थ्यास मिळालेले नाही. त्यामुळे सदर कामावर करण्यात आलेला खर्च रु.2,31,36,606/- गुंतून पडलेला आहे.

सदरचे काम हे फेज 1 व फेज 2 अश्या दोन प्रकारे करण्यात आले आहे. फेज 2 मधील टाकण्यात आलेल्या पाईपलाईन बहुतांशी पुरेश्या दाबाने पुरेश्या वेळ पाणीपुरवठा चालु आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

काम पुर्ण केले नसल्याने व टाकण्यात आलेल्या पाईपलाईनव्दारे पाणीपुरवठा चालु असलेबाबतचा अहवाल सादर केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) मित्रगोत्री पाण्याची टाकीचे कामामध्ये स्पेशलमधील 700x700x100 साईज टीचा दर 2007-08 चे दरानुसार रु.38,786/- इतका असताना रु.44,934/- चा दर देणेत आला आहे. त्यामुळे ठेकेदारास 2 नगापोटी रु.12,296/- चे निविदा दर 12.40% कमी दरानुसार रु.10,771/- इतके जादा प्रदान झाले आहे. ती संबधीकडून वसुल करण्यात यावी.

वसुलीची कार्यवाही करणेत येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) 1013 पाण्याची टाकीचे कामामध्ये स्पेशलमधील 200x150 साईज रीडूसचा दर 2007-08 चे दरानुसार रु.3,846/- इतका असताना रु.5,256/- चा दर देणेत आला आहे. त्यामुळे ठेकेदारास 1 नगापोटी रु.1,410/- चे निविदा दर 12.40% कमी दरानुसार रु.1,235/- इतके जादा प्रदान झाले आहे. ती संबधीकडून वसुल करण्यात यावी.

वसुलीची कार्यवाही करणेत येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5) ठेकेदाराने दिलेली बँक गॅरंटीची मुदत दि.01/05/2014 रोजी संपुष्टात आली असून तिचे नूतनीकरण करण्यात आले नाही.

बँक गॅरंटीची मुदत अंतीम बीलापुर्वी वाढवुन घेण्याची कर्यवाही करणेची दक्षता घेत आहोत असे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

6) खाली नमूद केलेल्या कामाची मुदत दि.31/03/2014 रोजी संपली असता मुदतीनंतर काम केलेची देयके प्रदान करण्यात आली आहेत. कामास मुदतवाढ मंजूर न करता कामाचे देयके प्रदान करणे नियमबाह्य आहे.
उदा. अ) मित्रगोत्री येथील वितरण व्ययस्था मोजमाप पुस्तक क्र.430 मध्ये दि.03/05/2014 रोजी मोजमापे नमूद करण्यात आली आहेत.

ब) टाकी क्र.2005 चे कामाचे मोजमापे दि.10/05/2014 नमूद करण्यात आले आहे.

क) भद्रावती येथील कामाचे मोजमापे दि.22/05/2014 नमूद करण्यात आले आहे.

सध्यास्थितीत पाईप्स अभावी अपुर्ण असुन शहरात उदभवलेल्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी काही पाईप्स इतर विभागाकडे वापरण्यात आले आहेत. ते पाईप्स परत मिळाल्यानंतर मुदतवाढ देउनच काम पुर्ण करून घेणार आहोत असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने सादर केलेले अनुपालन संयुक्तिक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

7) मे.परफेक्ट असोसिएट इंजि. यांची बयाणा रक्कम, सुरक्षा रक्कम व बँक गँरंटी जप्त करून मनपा निधीमध्ये जमा केल्याची कागदपत्रे सादर केली नाहीत.

सदरबाबत मुख्यलेखापाल यांचेकडे पत्र दिल्याबाबत खात्याने कळविले असल्याचे अनुपालन सादर केले आहे. आक्षेपानुसार कार्यवाही केल्याचा अहवाल सादर केला नसल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

8) सदरचे काम मूळ ठेकेदाराकडून काढून घेणेत आले आहे. परंतु निविदेमधील कोणत्या अटीनुसार काम काढून घेतले आहे याचा उल्लेख करण्यात आला नाही. वास्तविक पाहता निविदामधील अट क्र.3(सी) नुसार काम काढून घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु खात्याने तशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

आक्षेपानुसार खुलासा सादर केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

9) सदर कामाचा करार दि.04/05/2013 रोजी केला असल्याने शासन निर्णयानुसार 2014-15 अखेर कस्तुरबा,दयानंद, मजरेवाडी, भद्रावती, कार्निकानगर येथील कामाची प्रदान केलेली रक्कम रु.51,75,103/- कामाचे देयकातून कामगार कल्याण उपकर देयकाचे 1 टक्का रक्कम रु.51,750/- वसूल करणे आवश्यक होती. परंतु खात्याने ठेकेदाराचे देयकातून 1 टक्का उपकराची रक्कम वसूल केली नाही.

कामगार कल्याण उपकराची रक्कम वसुल करुन देयके अदा केली जातात असे खात्याने कळविले आहे. परंतु आक्षेपात नमुद केलेली रक्कम वसुल केलेबाबत कामाचे देयकाच्या प्रती सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

10) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

कामाचे अडचणीमुळे चेकिंग करता आले नाही उपअभियंता यांची 20% व कार्यकारी अभियंता यांची 10% चेकींग असते असे खात्याने कळविले आहे. आक्षेपानुसार कार्यवाही केली नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

गुंतलेली रक्कम रु. 2,31,36,606/-

वसुलपात्र रक्कम रु.63,756/-

## *47 UIDSSMT योजने अंतर्गत पिण्याचे पाण्याचे पाईप वितरण व्यवस्था करणेसाठी निरनिराळ्या व्यासाची स्लूस व्हॉल्व पुरवठा करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 09**

*लेखा शीर्ष :UIDSSMT शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
आक्षेपाधीन रक्कम रु. 5500541.00/-

***कामास तांत्रिक मान्यता घेण्यात आली नाही. व्हॉल्व पुरवठा केलेचे डिलिव्हरी चलने सादर केली नाहीत. 2008-09 दरसुची सादर करणेत आली नाही. कामास मुदतवाढ मंजूर नसताना कामाची देयके प्रदान करण्यात आली आहेत. कामाचा विमा उतरविल्याची कागदपत्रे सादर केली नाहीत. ठेकेदाराने पुरवठा केलेले स्लूस व्हॉल्व कोठे बसविण्यात आले आहेत याचा अहवाल सादर केला नाही. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणेत आली नाहीत.***

UIDSSMT योजने अंतर्गत पिण्याचे पाण्याचे पाईप वितरण व्यवस्था करणेसाठी निरनिराळ्या व्यासाची स्लूस व्हॉल्व पुरवठा करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.73,54,488 /-
2. निविदा रक्कम रु.1,10,31,732 /-
3. अंदाजपत्रक मान्यता - सर्व साधारण सभा ठराव क्र. 2 दि.20/05/2009
4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र. 2445 दि.11/02/2010
5. लेखाशिर्ष - UIDSSMT.
6. निधी - शासन.
7. ठेकेदाराचे नाव - मे. एम. एस.मुधोळकर, सोलापूर.
8. कार्यारंभ आदेश क्र.331 दि.20/03/2010 (50% जादा दराने)
9. कामाचा कालावधी - 6 महिने.
10. मुदतवाढ - 75 दिवस दि.03/12/2010 पर्यंत.
11. काम पूर्ण/अपूर्ण - अपूर्ण.
12. एकूण खर्च रु.90,75,709/- (7th आर.ए. बिल रु.2,38,416/-).
13. मोजमाप पुस्तक क्र.143, 225

सदर कामाचे देयकाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळुन

आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 4 दि.08/05/2017 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.86 दि.18/05/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेले अनुपालन समर्पक नसल्याने खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सदर कामास तांत्रिक मान्यता दिल्याचे कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. तांत्रिक मन्यता न देता निविदेची कार्यवाही करणेत आली आहे हे नियमबाह्य आहे.

सार्वजनिक आरोग्य अभियंता हे शासनकडील अधिकारी असल्याने तांत्रिक मान्यता घेण्यात आली नाही असे खात्याने कळविले आहे. अनुपालन संयुक्तिक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) ठेकेदाराने 300mm ते 700mm साईजचे व्हॉल्व पुरवठा केलेचे डिलिव्हरी चलने नस्तीमध्ये आढळून येत नाहीत. त्यामुळे सदर बाबीवर खर्च करणेत आलेली रक्कम रु.53,54,622/- अक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

चलनाचे प्रती सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) कामाचे अंदाजपत्रक हे 2007-08 चे दरसूचीनुसार करण्यत आले आहे. निविदा माहे सप्टेंबर 2009 मध्ये केली असल्याने निविदाधारकाने सादर केलेले दर हे 2008-09 चे मंजूर दरसुचीमधील दराशी तुलना करण्यात आली असता ती कमी दराची आल्याने निविदा मंजूर करण्यत आली आहे. 2008-09 ची दरसूचीची मागणी केली असता लेखापरीक्षणास सादर केली नसल्याने 2008-09 चे दराची तपासणी करता आली नाही.

2008-09 दरसुची सादर करणेत येत आहे असे खात्याने कळविले आहे. तथापि दरसुची सादर केली नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) कामाची मुदत दि.03/12/2010 रोजी संपुष्टात आली असताना 7 वे रनिंग बिलाची नोंद मोजमाप पुस्तकामध्ये दि.23/05/2014 रोजी करण्यात येऊन ठेकेदारास देयक प्रदान करण्यत आले आहे. कामास मुदतवाढ मंजूर नसताना कामाचे देयक प्रदान करणे नियमबाह्य आहे.

कामाचे मुदतवाढीबाबत खात्याने खुलासा केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5) सदरचे काम लेखापरीक्षणाचे कालावधी पर्यंत अपूर्ण आहे. तसेच काम पूर्ण करणेसाठी कामास मुदतवाढही देणेत आली नाही.

कामाचे मुदतवाढीबाबत खात्याने खुलासा केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

6) कामाचा विमा उतरविल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाहीत.

7) ठेकेदाराने पुरवठा केलेले स्लूस व्हॉल्व कोठे बसविण्यात आले आहेत याचा नस्तीमध्ये अहवाल नाही किंवा मोजमाप पुस्तकामाध्ये कोठे व्हॉल्व बसविणेत आले आहेत ते नमूद करण्यत आले नाही.

स्लूस व्हॉल्व कोठे बसविण्यात आले आहेत याबाबत स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यात आल्याचे खात्याने कळविले आहे. परंतु रजिस्टर सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

8) 7वे रनिंग देयकाची तपासणी केली असता खाली नमूद केलेले व्हॉल्व बसविले नाहीत म्हणून

ठेकेदाराचे देयकामधून रक्कम रु.1,45,919/- वजा करण्यत आले आहे. तरी सदरचे व्हाल्व खात्याकडे ठेकेदारा ने जमा केल्याचे नोंद अढळ होत नाहीत. त्यामुळे सदराची रक्कम अक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

| Sr.No. | Size | Nos. | Rate Rs. | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | 100mm | 10 | 799/- | 87,890/- |
| 2. | 150mm | 3 | 1246/- | 3,738/- |
| 3. | 200mm | 5 | 1331/- | 6,655/- |
| 4. | 300mm | 5 | 2275/- | 11,375/- |
| 5. | 500mm | 3 | 3654/- | 10,962/- |
| 6. | 600mm | 3 | 4029/- | 12,087/- |
| 7. | 700mm | 3 | 4404/- | 13,212/- |
| | Total | 32 | | 1,45,919/- |

आक्षेपानुसार खात्याने खुलासा केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

9) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

कामाचे अडचणीमुळे चेकिंग करता आले नाही उपअभियंता यांची 20% व कार्यकारी अभियंता यांची 10% चेकींग असते असे खात्याने कळविले आहे. आक्षेपानुसार कार्यवाही केली नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.55,00,541/-

DGPKVSM6101 (Ref No : 35, Hmm No : 04)

## *48 सोलापूर हद्दवाढ भागात पिण्याचे पाण्याचे पाईप वितरण व्यवस्था करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :UIDSSMT शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 18421928.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4616.00/-

***सदर कामापोटी पूर्वीचे ठेकेदाराने कोणत्या ठिकाणी किती काम केले आहे व नवीन ठेकेदाराने उर्वरित काम कोणत्या ठिकाणी किती काम करावयाचे आहे याचा स्पष्ट अहवाल सादर केला नाही. काम लेखापरीक्षणाचे तारखेपर्यंत पूर्ण केले नाही. कामास वापरणेत आलेले स्पेशलपोटी जादा प्रदानाची रक्कम रु. 4,616/- वसुल करणेत आले नाही. ठेकेदाराने दिलेली बँक गॅरंटीचे नूतनीकरण करण्यात आले नाही. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणेत आली नाहीत.***

सोलापूर हद्दवाढ भागात पिण्याचे पाण्याचे पाईप वितरण व्यवस्था करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

UIDSSMT योजने अंतर्गत सदरचे काम 42 कि.मी. पाईप वितरण करणेचे काम करावयाचे होते. त्याचे मूळ अंदाजपत्रक रक्कम रु.411.94 लक्ष इतके तयार करण्यात आले होते. कामाची जाहीर निविदा मागावून प्राप्त झालेले निविदापैकी लघुत्तम निविदाधारक मे.परफेक्ट असोसिएट इंजि. यांची 14% जादा दराची निविदा मंजूर करून कार्यादेश क्र.07 दि.06/04/2010 अन्वये काम पूर्ण करणेचे आदेश देणेत आले होते. ठेकेदाराने 11.50 कि.मी. पाईपचे काम केले आहे. त्यांनी पाईप पुरवठा केलेपैकी 1.50 कि.मी. चे पाईप शिल्लक होते.तदनंतर त्यांनी काम बंद केले आहे. उर्वरित काम केले नसल्याने ते काम त्याचेकडून काढून घेणेत येवून त्यांचेविरुद्ध दंडनीय कार्यवाही करण्यात आली आहे.

कामाची निविदा स्वीकृतीची किंमत रु.503.81 लक्ष इतकी असून त्यापैकी ठेकेदाराने केलेल्या कामावर रु.69.96 लक्ष खर्च केला आहे. उर्वरित काम 30.50 कि.मी.चे असुन त्याची निविदा किंमत रु.433.85 इतकी आहे. उर्वरित काम करणेसाठी नवीन ठेकेदार मे.असोसिएट इंजि. यांना स्थायी समिती ठराव क्र.293 दि.12/11/2012 अन्वये मंजूर करून देणेत आले आहे. नवीन ठेकेदार मे.असोसिएट इंजि. यांना कार्यारंभ आदेश क्र.570 दि.02/03/2013 अन्वये मूळच्या दराने म्हणजे 14% जादा दराने उर्वरित कामाची किंमत रु.371.98 लक्षचे काम 6 महिन्याचे मुदतीत करण्यास आदेश देणेत आले आहे.

सदर कामाचे देयकाची नस्ती व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 9 दि.17/05/2017 अन्वये विचारणा केली असता खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.101 दि.25/05/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेले अनुपालन समर्पक नसल्याने खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.
1)हद्दवाढ विभागात पिण्याचे पाण्याचे पाईप वितरण व्यवस्था 7 ठिकाणी करणेचे असून त्याचे 7 अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत. कार्यालयीन टिपणी दि.18/09/2012 नमूद केलेनुसार पूर्वीचे ठेकेदाराने 11.50 कि.मी.चे काम केले असून उर्वरित 30.50 कि.मी.चे काम करणेचे आहे असे मोघम स्वरुपात उल्लेख करण्यात आला आहे. वास्तविक पाहता पूर्वीचे ठेकेदाराने कोणत्या ठिकाणी किती काम केले आहे व नवीन ठेकेदाराने उर्वरित काम कोणत्या ठिकाणी किती काम करावयाचे आहे याचा

स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. खात्याने याबाबत सविस्तर अहवाल देणेत नसल्याने नवीन ठेकेदाराने अंदाजपत्रकानुसार उर्वरित काम केले असल्याची खात्री करता येत नाही.

ठेकेदाराने केलेल्या कामाची मोजमापे मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केली आहेत असे खात्याने अनुपालन सादर केले आहे. खात्याचा खुलासा समर्पक नसल्याने व आक्षेपानुसार अहवाल सादर केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) सदरचे काम लेखापरीक्षणाचे तारखेपर्यंत म्हणजे माहे मे 2017 पर्यंत पूर्ण केले नसल्याने त्याचा लाभ लाभार्थ्यास मिळालेले नाही. त्यामुळे सदर कामावर करण्यात आलेला खर्च रु.1,84,21,928/- गुंतून पडलेला आहे.

आजला बहुतांशी ठिकाणी पाणीपुरवठा चलु होवुन तेथील नागरीकांच्या प्रेशरच्या तक्रारी कमी झाले आहेत असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

सदरचे काम पुर्ण केले नसल्याने खात्याने सादर केलेले अनुपालन संयुक्तिक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) मजरेवाडी पाण्याची वितरण व्यवस्था मोजमाप पुस्तक क्र.431 पान क्र.8 वर नमूद केलेले स्पेशलमधील 400x400x200 साईज टीचा दर 2007-08 चे दरानुसार रु.18,374/- इतका असताना रु.22,423/- चा दर देणेत आला आहे. त्यामुळे ठेकेदारास 1 नगापोटी रु.4,049/- चे निविदा दर 14% जादा दरानुसार रु.4,616/- इतके जादा प्रदान झाले आहे. ती संबधीकडून वसुल करण्यात यावी.

वसुलीची कार्यवाही करणेत येत असल्याचे खात्याने अनुपालन सादर केले असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) ठेकेदाराने दिलेली बँक गॅरंटीची मुदत दि.06/02/2014 रोजी संपुष्टात आली असून तिचे नूतनीकरण करण्यात आले नाही.

बँक गॅरंटीची मुदत वाढवून घेउनच पुढील कार्यवाही ठेवण्याची दक्षता घेत आहोत असे खात्याने अनुपालन सादर केले असल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

कामाचे अडचणीमुळे चेकिंग करता आले नाही उपअभियंता यांची 20% व कार्यकारी अभियंता यांची 10% चेकींग असते असे खात्याने कळविले आहे. आक्षेपानुसार कार्यवाही केली नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

गुंतुन पडलेली रक्कम रु.1,84,21,928/-

वसुलपात्र रक्कम रु.4,616/-

DGPKVSM6101 (Ref No : 36, Hmm No : 09)

## *49 ट्रान्समिशन पाईप लाईन घालणे मजुरी मक्ता स्पेश्ल्स व व्हाल्वसह काम करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष :UIDSSMT शासन/ मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 533980.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 700603.00/-

***कामाचा विमा उतरविले नसल्याने कामाची किंमत रु.6,90,60,374/- चे 1 टक्का रक्कम रु.6,90,603/- संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे. मनापास स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही. काम पूर्ण करणेस ठेकेदारास रु.10,000/- एक रकमी दंड करून दि.30/06/2012 पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आल्याने दंडाची वसुली केली नाही. ठेकेदाराने दिलेली बँक गँरंटीची मुदत दि.31/01/2015 रोजी संपलेली असल्याने त्याची मुदतवाढ घेणेत आली नाही. कामामध्ये वापरणेत आलेले स्पेशल वापरलेबाबत सविस्तर अहवाल नसल्याने त्यावर खर्च करण्यात आलेली रक्कम रु.5,33,980/- अक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. कामास मुदतवाढ मंजूर न करता देयके प्रदान करण्यात आली आहेत. काम अपूर्ण असल्याने लाभार्थ्यास त्याचा लाभ मिळत नाही व शासनाचा निधी गुंतून पडलेला आहे. अंदाजपत्रकात नमूद केलेली बसवेश्वरनगर, ESR 2009, 1019 येथील कामास सुरुवात केलेचे दिसून येत नाही. कोंडी ते कस्तुरबा व जुळे सोलापूर ते मित्रगोत्री या कामाचे अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेले अनुक्रमे 600mm व 350mm साईजचे पाईप बसविणेत आलेले नाहीत. मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपाभियांता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी केली नाही.***

ट्रान्समिशन पाईप लाईन घालणे मजुरी मक्ता स्पेशल्स व व्हाल्वसह काम करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.6,11,42,429/-

2. निविदा रक्कम रु.6,90,60,374/-

3. अंदाजपत्रक मान्यता - सर्व साधारण सभा ठराव क्र. 2 दि.20/05/2009

4. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र. 1271 दि. 11/11/2009

5. लेखाशिर्ष - UIDSSMT.

6. निधी - शासन.

7. ठेकेदाराचे नाव - मे. असोसिएटेड इंजिनिअर्स, सोलापूर.

8. कार्यारंभ आदेश क्र. 161 दि.15/12/2009 (12.95% जादा दराने)

9. कामाचा कालावधी - 20 महिने. (15/12/2009 ते 14/08/2011)
10. मुदतवाढ - दि.30/06/2012 पर्यंत दंडाने
11. काम पूर्ण/अपूर्ण - अपूर्ण.
12. एकूण खर्च रु.4,30,91,684/- (2013-14 व 2014-15 मध्ये खर्च रु.55,66,481/-).
13. मोजमाप पुस्तक क्र.32,115,2563,108,40,385.

सदर कामाची 5 अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.06 दि.08/05/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.UIDSSMT/85 दि.18/05/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)महाराष्ट्र शासन विमा संचालनालय यांचेकडील पत्र क्र. प्रविनी 2305/सहिका/साबांवि/फ-2 दि.12/09/2005 नुसार कामाचा विमा शासनाकडे उतरविला नसल्याचे कामाचे किंमतचे 1 टक्का रक्कम शासनाकडे जमा करणेत यावी अशी तरतूद आहे. सदर कामाचा विमा उतरविले असलेबाबत कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाही. तरी कामाची किंमत रु.6,90,60,374/- चे 1 टक्का रक्कम रु.6,90,603/- संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करुन शासनाकडे जमा करण्यात यावे.

अंतीम बीलापुर्वी वसुल करण्याची दक्षता घेत आहोत असे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम कराणेत येत आहे.

2) सदर कामासाठी तीन निविदा प्राप्त झाले असताना एक निविदा उशिरा प्राप्त झाली म्हणून ती उघडणेत आली नाही. निविदा निश्चित करणेसाठी किमान तीन निविदा प्राप्त होणे आवश्यक होते. तीन निविदा प्राप्त झाले नसल्यास निविदेस मुदतवाढ देणे आवश्यक होते. परंतु खात्याने तशी कार्यवाही न करता एक निविदा उशिरा प्राप्त झाल्याने ती रद्द करून उर्वरित दोन निविदा उघडून त्यांचे दराची तुलना करून निविदा निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे मनापास स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

टेंडर पावीत्र जपण्यात आलेले आहे व तात्कालीन आयुक्त यांच्या आदेशानुसार सदरचे काम मुदतीत पुर्ण करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही ठेवण्यात आलेले आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे. अनुपालन संयुक्तीक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) काम पूर्ण करणेस ठेकेदारास रु.10,000/- एक रकमी दंड करून दि.30/06/2012 पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. सदर दंडाची वसुली केली नसल्याचे दिसून आल्याने ती संबधीकडून वसूल करण्यत यावी.

वसुली केलीबाबत खुलासा केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) कामचे काम अद्याप अपूर्ण असल्याने ठेकेदाराने दिलेली बँक गँरटीची मुदत दि.31/01/2015 रोजी संपलेली असल्याने त्याची मुदतवाढ घेणेत आली नाही.

बँक गॅरंटी वाढवुन घेउनच पुढील कार्यवहीची दक्षता घेत आहोत असे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5) खाली नमूद केलेले कामामध्ये वापरणेत आलेले स्पेशल हे त्या साईजचे पाईप टाकलेले नसताना स्पेशलवर खर्च करण्यात आलेले आहे. सदरचे स्पेशल वापरलेबाबत सविस्तर अहवाल नसल्याने त्यावर खर्च करण्यात आलेली रक्कम रु.5,33,980/- अक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | पाण्याचे टाकीचे नाव | वापराणेत आलेले स्पेशल | संख्या | दर रु. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | केगाव | 250 x 200 mm Reduce | 1 | 5128/- | 5128/- |
| 2. | बाळे | 150 x 100 Reduce | 1 | 3056/- | 3056/- |
| | | 150 Coller | 4 | 1458/- | 5832/- |
| | | 100x100x100 Tee | 3 | 3007/- | 9021/- |
| | | 100mm Pipe | 5.50 | 677/- | 3723/- |
| 3. | देगाव | 400x350 mm Reduce | 1 | 12534/- | 12534/- |
| | | 350x350x250mm Tee | 1 | 13398/- | 13398/- |
| | | 250mm Coller | 3 | 2668/- | 8004/- |
| | | 100mm Coller | 5 | 812/- | 4060/- |
| 4. | कोंडी ते कस्तुरबा | 800x800x200mm Tee | 2 | 46261/- | 92522/- |
| | | 800x600mm Reduce | 2 | 55303/- | 110606/- |
| | | 500x500x150mm Tee | 2 | 20478/- | 40956/- |
| | | 150mm Coller | 5 | 1458/- | 7290/- |
| | | 200mm Coller | 2 | 1664/- | 3328/- |
| | | 300x300x100mm Tee | 3 | 8509/- | 25527/- |
| | | 400x400x100mm Tee | 3 | 16176/- | 48528/- |
| | | 600mm Coller | 2 | 12538/- | 25076/- |
| 5. | जुळेसोलापूर ते मित्रगोत्री | 500x500x Tee | 1 | 38006/- | 38006/- |
| | | 500x450mm Reduce | 1 | 16164/- | 16164/- |
| | | | | | |
| | | निविदा दर 12.95% जादा दर | | | |
| | एकूण | | | | 5,33,980/- |

ट्रांसमिशन लाईनचे असल्याने टाक्या भरताना तांत्रीक दृष्ट्या विचार करता पाईपलाईनमध्ये निर्माण होणारी हवा बाहेर काढणेसाठी एअरव्हॉल्व असेम्ब्ली यंत्रणा उभी करावी लागते. अन्यथा

पाईपवर प्रेशर येऊन पाईप फुटण्याची शक्यता असते असे खात्याने कळविले आहे.

खात्याने आक्षेपात नमुद केलेनुसार खुलासा केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

6) कामची मुदत दि.30/06/2012 अखेर देणेत आली होती. कामाचे मोजमाप पुस्तकातील नोंदी पाहता दि.20/11/2014 पर्यंत नमूद करून ठेकेदारास देयके प्रदान करण्यात आली आहेत. कामास मुदतवाढ मंजूर न करता देयके प्रदान करण्यात आली आहेत हे नियमबाह्य आहे.

कामास मुदतवाढ दिल्याबाबत सविस्तर खुलासा केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

7) कामाची बी1 निविदा मंजूर करून ठेकेदारास दि.15/12/2009 रोजी काम पूर्ण करणेस 20 महिन्याची मुदत देणेत आली आहे. सदरचे काम ठेकेदाराने लेखापरीक्षणाचे कालावधीपर्यंत म्हणजे माहे एप्रिल 2017 पर्यंत पूर्ण करण्यात आले नाही व कामास मुदतवाढही मंजूर करण्यात आली नाही. त्यामुळे काम अपूर्ण असल्याने लाभार्थ्यास त्याचा लाभ मिळत नाही व शासनाचा निधी गुंतून पडलेला आहे.

शासनाकडून जसे जसे निधी उपलब्ध झाले तस तसे काम करण्यात दक्षता घेतलेली आहे. शासनाकडून शेवटचा डीएसआर मधील फरकाची रक्कम 9.54 कोटी हि एप्रिल 2015 रोजी उपलब्ध झालेली आहे.तदनंतर मनपा हीस्सा रक्कम तरतूद करून जागेवर सदर मुदतीच्या आत काम पुर्ण केलेले आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने अनुपालन काम कधी पुर्ण केले व कामास मुदतवाढ मंजूर केलेबाबत स्पष्ट उल्लेख केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

8) अंदाजपत्रकात नमूद केलेली बसवेश्वरनगर, ESR 2009, 1019 येथील कामास सुरुवात केलेचे दिसून येत नाही.

इएसआर 2009 ही अमृत योजने अंतर्गत करावयाचे आहे व इएसआर 1019 ही यापुर्वीच सेटलमेंट येथे बांधण्यात आली असून त्यावरून पाणीपुरवठा चालू आहे असे खात्याने कळविले आहे.

खात्याचे अनुपालन संयुक्तीक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

9) कोंडी ते कस्तुरबा व जुळे सोलापूर ते मित्रगोत्री या कामाचे अंदाजपत्रकामध्ये नमूद केलेनुसार ज्या साईजचे पाईप बसविणेचे होते त्या साईजचे पाईप न बसवता वेगळ्या साईजचे पाईप बसविणेत आले आहेत. त्या बदलास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आली नाही.

कोंडी ते कस्तुरबा पैकी ए2 ट्रान्समिशन लाईन असुन 800 व 600 मि.मि. व्यासाचीच आहे. त्याप्रमाणे जागेवर काम पुर्ण झालेले आहे असे खात्याने कळविले आहे.

कोंडी ते कस्तुरबा या कामाचे अंदाजपत्रकामध्ये 600 एमएम चे पाईप 1405 मी लांबीचे बसविण्याचे गृहीत धरले होते ते न बसवता 300 एमएम चे पाईप धरलेले नसताना 1179 मी. पाईप बसवणेत आलेले आहेत. जुळे सोलापूर ते मित्रगोत्री या कामाचे अंदाजपत्रकामध्ये 350 एमएम चे पाईप 259 मी लांबीचे बसविण्याचे गृहीत धरले होते ते न बसवता 600 एमएम चे व 200 एमएम चे पाईप धरलेले नसताना अनुक्रमे 145 मी. व 1484 मी. लांबीचे पाईप बसवणेत आलेले आहेत. त्यामुळे

खात्याने सादर केलेले अनुपालन संयुक्तीक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

10) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपाभियांता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

सार्वजनिक बांधकाम नियमावली प्रमाणे महानगरपालिकाची कार्य प्रणाली वेगळी आहे. म्हणजेच येथील तांत्रीक सेवकाना मेंटेनंसची कामे एक्झीक्युशनची कामे तांत्रीक तपासणी इ. स्वरुपाची कामे करावी लागतात. तसेच उप अभियंता व सार्वजनिक आरोग्य अभियंता हे वेळोवेळी शासनाच्या मिटींगसाठी हजर राहावे लागते. सदर अडचणीमुळे उपा अभियंता 20% चेकिंग असते व 10% कार्यकारी अभियंता म्हणजे सा.आ.अ. यांची असते असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने सादर केलेले अनुपालन संयुक्तीक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 60, Hmm No : 06)

## *50 सोलापूर शहर व हद्दवाढ भागात पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन करणेसाठी DI K-7 ग्रेडचे पाईप पुरवठा करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :UIDSSMT मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1807262.00/-

***कामाचा विमा उतरविला असल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाहीत व पाईपचा defect कालावधीकरिता विमा उतरविल्याची कागदपत्रे सादर केली नाहीत. खरेदी करण्यत आलेले सर्व पाईपची नोंद Dead Stock नोंदवहीमध्ये नोंदी घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणेत आलेले नाहीत. पुरवठादाराशी केलेल्या करारामध्ये भाववाढीनुसार खरेदी करणेबाबतचे निविदा पूर्व बैठकीचे इतिवृत्तानुसार व निविदा मंजूर स्थायी समितीचे ठरावात नमूद केलेनुसार न करता बदल करून करार करणेत आला आहे. करारपत्रामधील खाडाखोडीबाबत कारणे दिलेली नाहीत व ठिकाणी संबंधीच्या स्वाक्षरी घेणेत आलेले नाहीत. शासनाने भाववाढी संदर्भात Material Component बाबतची परिगणना कशी करणेत याबाबतचे सूत्रानुसार केले नसल्याने मक्तेदारास रक्कम रु.18,07,262/- चे जादा प्रदान झाले आहे.***

सोलापूर शहर व हद्दवाढ भागात पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन पुराविणे कामाची किंमत रक्कम रु.11.24 कोटी इतकी असून त्याची निविदा निश्चित करणेकामी मनपाने दै. संचार दि.16/052010 चे वृत्तपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार तीन निविदाधाराकांने निविदा सादर केली आहे. निविदा सादर करणेच कालावधी दि.17/05/2010 ते 08/06/2010 इतका आहे.

निविदा सादर करणेपुर्वी निविदाधारकांची निविदापूर्व बैठक दि.04/06/2010 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत तीन निविदाधारक उपस्थित होते. बैठकीमध्ये अनेक मुद्द्यावर चर्चा होवून निविदेचे अटी व शर्ती बाबत निर्णय घेणेत आले. त्यापैकी अ.क्र.1 नुसार कामास भाववाढ देतेवेळी केंद्र शासनाकडून प्रसिध्द होणाऱ्या माहे मार्च 2010 चे WPI इंडेक्सनुसारच सुचविलेल्या सूत्रानुसार प्रत्येक पुरवठ्याच्यावेळी मागील दोन महिन्यापुर्वीचे इंडेक्स धरूनच पाईपचे प्रति रनिंग मीटर दर काढणेत येईल असा निर्णय घेणेत आला आहे. सदर बैठकीतील निर्णय हा निविदेच्या अटी व शर्तीचा एक भाग म्हणून गृहीत धरण्यात येईल, हे मक्तेदारास मान्य राहील असे बैठीकीच्या इतिवृत्तात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र.838 दि.12/10/2010 अन्वये पाईप पुरवठा पूर्वीच्या 2 महिन्यातील उपलब्ध शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द होणाऱ्या WPI नुसार दराने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वेगवेगळ्या साईजचे पाईप पुरवठाकमी प्राप्त झालेल्या निविदा दराची तुलना करून ज्याचे दर कमी आहेत, त्यांना खालीलप्रमाणे पुरवठादारास आदेश देण्यात आले आहेत. सदर आदेशामध्ये कामाचा कालावधी 12 महिन्याचा नमूद करण्यात आला आहे.

1) मे. जिंदाल सॉ लि. यांना आदेश क्र.559 दि.30/11/2010 अन्वये खालील साईजचे पाईप पुरवठा करणेस आदेश देणेत आले.

| अ.क्र. | पाईपची साईज | दर रु. | पुरवठा करावयाचे पाईपची लांबी मी. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | 100 mm | 816/- | 40345 | 3,29,21,520/- |
| 2. | 400 mm | 3,820/- | 4303 | 1,64,37,460/- |
| | एकूण | | | 4,93,58,980/- |

2) मे. लॅन्को इंडस्ट्रीज. यांना आदेश क्र.542 दि.23/11/2010 अन्वये खालील साईजचे पाईप पुरवठा करणेस आदेश देणेत आले.

| अ.क्र. | पाईपची साईज | दर रु. | पुरवठा करावयाचे पाईपची लांबी मी. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | 150 mm | 1,200/- | 22743 | 2,72,91,600/- |
| 2. | 200 mm | 1,520/- | 5676 | 86,27,520/- |
| 3. | 250 mm | 2,015/- | 3257 | 65,62,855/- |
| 4. | 300 mm | 2,550/- | 2625 | 66,93,750/- |
| 5. | 500 mm | 5,300/- | 3111 | 1,64,88,300/- |
| | एकूण | | | 6,56,64,025/- |

3) मे. इलेक्ट्रिकोथर्म लि. यांना आदेश क्र.545 दि.23/11/2010 अन्वये खालील साईजचे पाईप पुरवठा करणेस आदेश देणेत आले.

| अ.क्र. | पाईपची साईज | दर रु. | पुरवठा करावयाचे पाईपची लांबी मी. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | 450 mm | 4,530/- | 1609 | 72,88,770/- |
| 2. | 600 mm | 6,960/- | 4213 | 2,93,22,480/- |
| | एकूण | | | 3,66,11,250/- |

सदर नस्तीची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.10 दि.17/05/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.UIDSSMT/112 दि.30/05/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पुरवठादाराने पाईप पुरवठा कामाचा विमा उतरविला असल्याची कागदपत्रे नस्तीमध्ये अढळ होत नाहीत. तरी पाईपचा defect कालावधीकरिता विमा उतरविल्याची कागदपत्रे लेखा परीक्षणास सादर करावीत.

सदर निविदा ही पाईप उत्पादित कंपनी कडूनच पुरवठा करणेची असलेने या कामी विमा उतरविणे बाबत निविदेमध्ये अट नमूद नाही. तथापि पाईपचा defect कालावधीकरिताचा पाईप उत्पादित कंपनीचा Gaurentee certificate हे उत्पादित कंपनीने दिलेले असून ते नस्तीमध्ये समाविष्ट आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने अनुपालनासोबत कागदपत्रे सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) खरेदी करण्यत आलेले सर्व पाईपची नोंद Dead Stock नोंदवहीमध्ये नोंदी घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. तसेच पाईपची उपयोगीत्मक नोंद (Usage Entry) घेणेत आले असल्यास त्याचे अभिलेखे लेखा परीक्षणास मागणी करूनही सादर केली नाहीत.

खरेदी करण्यात आलेले सर्व पाईप ठेवणेकरिता मनपाकडे पुरश्या प्रमाणात जागा उपलब्ध नसल्याने पाईप्सचा पुरवठा हा प्रत्यक्ष कामाचे जागेवर उतरविणेत आलेले आहे. त्याप्रमाणे या कार्यालयाकडील रजिस्टरमध्ये नोंद घेणेत आलेली आहे.

खात्याने साधे नोंदवही ठेवण्यात आलेले आहे. त्यामध्ये ते पाईप कोठे उतरविले आहेत किती वापरले व किती शिल्लक आहेत ते नमूद केले नाही. जंगम मालमत्ता नोंदवहीमध्ये नोंदी केलेल्या नाहीत. खात्याने सादर केलेले अनुपालन संयुक्तीक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार मोजमाप पुस्तकामध्ये तपासल्याचे नमूद करून तारखेसह स्वाक्षरी घेणेची दक्षता घेणेत येत आहे असे खात्याने अनुपालन सादर केल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) पुरवठादाराशी केलेल्या करारामध्ये भाववाढीनुसार खरेदी करणेबाबतचे निविदा पूर्व बैठकीचे इतिवृत्तानुसार व निविदा मंजूर स्थायी समितीचे ठरावात नमूद केलेनुसार न करता बदल करून करार करणेत आला आहे. करारामधील विसंगतीबाबत खुलासा करावा.
अ) मे.जिंदाल सॉ लि. यांचे करारनाम्यामध्ये पान क्र.29 वर P1 पाईप पुरवठा केलेले महिन्याच्या अगोदरच्या दोन महिने पूर्वीचा इंडेक्स हा मजकूर खोडून लगतच्या महिनाचा इंडेक्स दर नमूद केला आहे. खाडाखोडीचे ठिकाणी कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी नाही.
ब) मे.लॅन्को इंडस्ट्रीज लि. यांचे करारामध्ये पान क्र.9 वर P1 पाईप पुरवठा केल्याचे मागील दोन महिन्याचा इंडेक्स दर असे नमूद केले आहे.
क) मे. इलेक्ट्रिकोथर्म लि. यांचे करारामध्ये पान क्र. 55 वर P1 पाईप पुरवठ्याचे लगतचे महिन्याचा इंडेक्स दर नमूद करण्यात आला आहे.

करारपत्र करून देणारे निविदा धारकाने खाडाखोड केली असल्यास त्यावर निविदा धारकाने स्वाक्षरी करणे अपेक्षित आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने सादर केलेले अनुपालन संयुक्तीक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5) शासनाने भाववाढी संदर्भात Material Component बाबतची परिगणना कशी करणेत याबाबत खालीलप्रमाणे सूत्र देण्यात आले आहे.

P2 = 0.85 x P x [ R/100 ( P1 - Po )/Po ]

परंतु मनपाने तसे न करता P2 = P x [ R/100 (P1 - Po)/Po ] असे सूत्र मांडून भाववाढीची परिगणना केली आहे. तसेच P1 ची किंमत स्थायी समितीच्या ठरावात नमूद केलेनुसार पुरवठा

केल्याच्या महिन्याच्या अगोदरच्या दोन महिन्याचा इंडेक्स दर विचारात न घेता पुरवठा केल्याच्या लगतपुर्वीचा इंडेक्स दर विचारात घेऊन परिगणना करण्यात आली आहे.

भाववाढीची रक्कम शासनाने दिलेल्या सूत्रानुसार परिगणना करून रक्कम प्रदान करणे आवश्यक होती. परंतु मनपाने सूत्रात बदल केल्याने व इंडेक्स दर पाईप पुरवठा केल्याचे लगतच्या महिन्याचा दर घेतल्याने ठेकेदारास अतिप्रदान झाले आहे. तसेच मे. जिंदाल सॉ लि. यांनी पाईप वेळेत पुरवठा केला नसल्याने त्यांना माहे. ऑक्टोबर 2013 पासून दंड आकारणेत आला आहे. पुरवठादारास ज्या महिन्यापासून दंड आकारणी केली आहे, त्या महिन्याचा इंडेक्स दर हा कायम करून(त्या महिन्यात इंडेक्स दर गोठवून) त्यापुढील कामास कायम केलेल्या इंडेक्स दराप्रमाणे भाववाढ देणे आवश्यक होते. परंतु मनपाने तसे न करता त्यापुढील वाढीव इंडेक्स दराने भाववाढ प्रदान केली आहे. त्यामुळे पुरवठादारास खालील विवरणपत्रानुसार जादा रक्कम प्रदान झाली आहे.

| | M/S. Electrotharm (I) Ltd. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Pipe size | Month of Supply | Index Rate 2 month before | Actual Paid per meter | Payable Rate | Difference | Qty. Supply | Recoverable Amount |
| 600mm | Apr-11 | 133.1 | 7535.98 | 7238.88 | 297.10 | 882 | 2,62,042/- |
| 450mm | Apr-11 | 133.1 | 4904.88 | 4711.51 | 193.37 | 550 | 1,06,354/- |
| 450mm | Sep-12 | 156.9 | 5277.39 | 5191.50 | 85.89 | 527.5 | 45,307/- |
| 600mm | Oct-12 | 156.7 | 8115.6 | 7970.15 | 145.45 | 1490 | 2,16,721/- |
| 450mm | Oct-12 | 156.7 | 5282.14 | 5187.47 | 94.67 | 531.5 | 50,317/- |
| 600mm | Oct-13 | 156.7 | 7576.08 | 7970.15 | (-)394.07 | 336 | (-)1,32,408/- |
| 600mm | Dec-13 | 142.2 | 7627.11 | 7520.85 | 106.26 | 1502 | 1,59,603/- |
| | एकूण | | | | | | 7,07,936/- |

| | M/S. Jindal saw Ltd. | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

| Pipe size | Month of Supply | Index Rate 2 month before | Actual Paid per meter | Payable Rate | Difference | Qty. Supply | Recoverable Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 100mm | Apr-11 | 137.5 | 871.99 | 864.68 | 7.31 | 7327.5 | 53,564/- |
| 400mm | Jan-13 | 155 | 4390.23 | 4345.51 | 44.72 | 2343 | 1,04,779/- |
| 100mm | Apr-13 | 137.5 | 897.63 | 864.68 | 32.95 | 3389 | 1,11,667/- |
| 100mm | Aug-13 | 143.8 | 888.65 | 887.57 | 1.08 | 2184 | 2,359/- |
| 400mm | Oct-13 | 142.8 | 4158.13 | 4138.03 | 20.01 | 330 | 6,633/- |
| 100mm | Oct-13 | 142.8 | 888.23 | 883.93 | 4.30 | 6000 | 25,800/- |
| 100mm | Dec-13 | 142.8 | 894.21 | 883.93 | 10.28 | 9982 | 1,02.615/- |
| 400mm | Dec-13 | 142.8 | 4186.14 | 4138.03 | 48.11 | 1100 | 52,921/- |
| 400mm | Jan-14 | 142.8 | 4200.15 | 4138.03 | 62.12 | 137.5 | 8,542/- |
| 100mm | Jan-14 | 142.8 | 897.2 | 883.93 | 13.27 | 4282 | 56,822/- |
| 400mm | Feb-14 | 142.8 | 4244.17 | 4138.03 | 106.14 | 390.5 | 41,448/- |
| 100mm | Feb-14 | 142.8 | 906.6 | 883.93 | 22.67 | 1773.5 | 40,205/- |
| | एकूण | | | | | | 6,07,355/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | M/S. Lanco Industries Ltd. | | | | | |

| Pipe size | Month of Supply | Index Rate 2 month before | Actual Paid per meter | Payable Rate | Difference | Qty. Supply | Recoverable Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 150mm | Apr-11 | 137.5 | 1299.3 | 1271.59 | 27.71 | 2802.5 | 77,657/- |
| 200mm | Apr-11 | 137.5 | 1645.78 | 1610.68 | 35.10 | 2852 | 1,00,105/- |
| 250mm | Apr-11 | 137.5 | 2181.75 | 2135.21 | 46.54 | 1650 | 76,791/- |
| 500mm | Apr-11 | 137.5 | 5738.6 | 5616.18 | 122.42 | 564 | 69,045/- |
| 150mm | May-11 | 137.2 | 1269.76 | 1269.99 | (-)0.23 | 197.5 | (-)45/0 |
| 200mm | May-11 | 137.2 | 1608.37 | 1608.65 | (-)0.28 | 78 | (-)22/- |
| 300mm | Apr-11 | 137.5 | 2698.25 | 2702.13 | (-)3.88 | 1000 | (-)3,880/- |
| 500mm | Jan-13 | 155 | 6091.15 | 6029.11 | 62.04 | 1000 | 62,040/- |
| 150mm | Jan-13 | 155 | 1379.13 | 1365.08 | 14.05 | 300 | 4,215/- |
| 300mm | Feb-13 | 154.3 | 2906.61 | 2892.85 | 13.76 | 600 | 8,256/- |
| 250mm | Feb-13 | 154.3 | 2296.79 | 2285.92 | 10.87 | 484 | 5,261/- |
| 200mm | Feb-13 | 154.3 | 1732.56 | 1724.37 | 8.19 | 800 | 6,552/- |
| 500mm | Mar-13 | 150.8 | 5938.47 | 5930.01 | 8.46 | 1547 | 13,088/- |
| 250mm | Mar-13 | 150.8 | 2257.74 | 2254.52 | 3.22 | 1123 | 3,616/- |
| 200mm | Mar-13 | 150.8 | 1703.11 | 1700.68 | 2.43 | 850 | 2,066/- |
| 150mm | Apr-13 | 146.7 | 1320.04 | 1320.74 | (-)0.70 | 2364 | (-)1,655/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 200mm | Apr-13 | 146.7 | 1672.06 | 1672.94 | (-)0.88 | 100 | (-)88/- |
| 300mm | Apr-13 | 146.7 | 2805.1 | 2806.57 | (-)1.47 | 297 | (-)437/- |
| 200mm | Aug-13 | 143.8 | 1655.34 | 1653.31 | 2.03 | 996 | 2,022/- |
| 300mm | Aug-13 | 143.8 | 2777.05 | 2773.65 | 3.40 | 728 | 2,475/- |
| 150mm | Aug-13 | 143.8 | 1306.84 | 1305.25 | 1.59 | 1474 | 2,344/- |
| 150mm | Sep-13 | 143.4 | 1309.36 | 1303.11 | 6.25 | 6100 | 38,125/- |
| 150mm | Oct-13 | 142.8 | 1306.22 | 1299.90 | 6.32 | 2426 | 15,332/- |
| 150mm | Dec-13 | 142.4 | 1315.02 | 1297.77 | 17.25 | 528 | 9,108/- |
| | एकूण | | | | | | 4,91,971/- |

करारपत्रामध्ये नमूद केलेल्या सुत्राप्रमाणेच मनपाने बिले दिलेली असल्याने आपण दर्शविलेप्रमाणे सुत्रानुसार भाववाढ दिल्यास करारपत्रातील शर्ती व अटीचा भंग होणे अपेक्षित आहे. तसेच निविदेमध्ये अथवा करारपत्रामध्ये मुदतवाढ देतेवेळी ज्या महिन्यापासून दंड आकारणी केली आहे त्या महिन्याचा इंडेक्स दर हा कायम करून (त्या महिन्यात इंडेक्स गोठवून) त्यापुढील कामास कायम केलेल्या इंडेक्स दराप्रमाणे भाववाढ देणे आवश्यक होते अशा प्रकारचे कुठलीही अट नमूद नाही व मुदतवाढही तत्कालीन आयुक्त यांचे मान्यतेनेच माहे ऑक्टोंबर नंतरच्या कालावधीकरिता दंड आकारणी करून मंजूर करणेत आलेले आहे. त्याप्रमाणे दंडाची रक्कमही मनपाने ठेकेदाराचे बिलामधून वसुल करून मनपाचे हित पाहिलेले आहे. त्यामध्ये फक्त जिंदाल सॉ लि. यांनीच फक्त त्याना दिलेल्या मुदतीत पाईपचा पुरवठा केलेला नसून फक्त त्यानाच दंड आकारणी केलेली असून उर्वरीत दोन मक्तेदार हे त्याना LOC मध्ये दिलेल्या मुदतीतच पाईप्सच पुरवठा केलेला असलेने त्यांचे बिलामध्ये दंडाची आकारणी करणेत आलेली नाही.

मनपाने दिलेला खुलासा नियमधिन व संयुक्तीक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे. भाववाढीपोटी खालीलप्रमाणे वसूलपात्र रक्कम

1) मे. इलेक्ट्रिकोथर्म लि. रु. 7,07,936/-

2) मे.जिंदाल सॉ लि. रु. 6,07,355/-

3) मे.लंन्को इंडस्ट्रीज लि. रु. 4,91,971/-

एकूण रु.18,07,262/-

DGPKVSM6101 (Ref No : 71, Hmm No : 10)

## ***51 प्रभाग क्र. 1 ते 8 व कार्यालयाकरीता पाईप खरेदी करणे या कामातील अनियमितते बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : मनपा मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्र. 1 ते 8 व पाणीपुरवठा कार्यालयाकडील विविध पाणीपुरवठा कामासाठी लागणारे विविध आकाराचे 60786 र.मी. चे पाईप खरेदीसाठी 2013-14, 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये मनपा लेखा विभागाने पाणी पुरवठा विभागास बँक LOC साठी दिलेल्या रु.6,12,81,344/- रक्कमेचे समायोजन झाले नसल्याचे आढळुन आले. साठा नोंदवहीमध्ये पुरवठा झालेल्या सर्व प्रकारच्या पाईपची जमा/वाटप नोंद आहे. परंतु शिल्लक पाईपची सविस्तर नोंद नसल्याने शिल्लक पाईप्स बाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. पाईपस् कोणत्या कामावर वापरले याची सविस्तर नोंद साठा नोंवहीत नाही, साठा नोंदवहीस शिल्ल्क काढली नाही व सक्षम अधिका-यांच्या स्वांक्ष-या नाहीत. नोंदवही अपुर्ण असल्याचे आढळुन आले, गोषवारा काढला नाही. सा.आ.अ. यांनी दिनांक 2014/15 व 19/06/2014 रोजी प्रसिद्वी केले नुसार स्थायी समितीने ठराव क्र 106, दि.11/07/2014 अन्ववये जाहीर प्रसिध्दी करणारी अट शिथील करुन WPI तपासणे पुर्वी मंजूर केलेले मक्तेदार लॅन्को इंडस्ट्रीज यांचे कडुन 100 ते 400 एमएम व्यासाचे 60,786/- र.मी. पाईप्स प्रचलित WPI च्यास 2% सूट या दराने खरेदी करणे कामी मान्यता देवून निविदा प्रक्रिया राबविली असताना ती रद्द करुन स्थायी समिती ठरावाचे आधारे पुर्वीच्या मक्तेदाराकडुन पाईप खरेदीस मान्यता देणे व त्याचेकडून खरेदी कशाचे आधारे केली याचा समर्पक खुलासा करणे आवश्यक आहे. तो खुलासा केला नाही.***

सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्र.1 ते 8 व पाणीपुरवठा कार्यालयाकडील विविध पाणीपुरवठा कामासाठी लागणारे विविध आकाराचे 60786 र.मी. चे पाईप खरेदीसाठी 2013-14, 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये खालीलप्रमाणे पाणीपुरवठा विभागास अग्रिम देण्यात आले.

| अ.क्र | दिनांक | अग्रिम रक्कम |
|---|---|---|
| 1 | निरंक | 23373870/- |
| 2 | निरंक | 6630128/- |

| | | |
|---|---|---|
| 3 | निरंक | 9986430/- |
| 4 | निरंक | 21290916/ |
| एकूण | | 61281344/- |

सदर पाईप खरेदी नस्ती, मोजमाप नोंदवही व साठा नोंदवही ची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणिवा आढळून आल्या.

1) सदर पाईप खरेदीसाठी मनपा लेखा विभागाने पाणी पुरवठा विभागास बँक LOC साठी दिलेल्या रु.61281344/- रकमेचे समायोजन झाले नसल्याचे आढळुन आले.

2) साठा नोंदवहीमध्ये पुरवठा झालेल्या 3 सर्व प्रकारच्या पाईपची जमा नोंद घेण्यात आली आहे. त्यातुन वाटप केलेल्या 4 पाईपची नोंद आहे. परंतु शिल्लक पाईपची सविस्तर नोंद नसल्याने शिल्लक पाईप्स बाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. पाईप कोणत्या कामावर वापरले याची सविस्तर नोंद साठा नोंदवहीत नाहीत.

3) साठा नोंदवहीस शिल्लक काढली नाही व सक्षम अधिका-यांच्या स्वाक्ष-या नाहीत. नोंदवही अपुर्ण असल्याचे आढळुन आले, गोषवारा काढला नाही.

4) मक्त्याची रक्कम 8.59 कोटी होती निविदा प्रक्रिया राबवुन दि.17/06/2014 रोजी निविदा उघडल्या त्यांनंतर निविदेतील दर WIP च्या दरापेक्षा जास्त असलेने रु.38,72,411.69 चे नुकसान होणार असल्यांचे नमुद करुन सा.आ.अ. यांनी दिनांक 2014/15 व 19/06/2014 रोजी प्रसिध्द केले नुसार स्थायी समितीने ठराव क्र 106, दि.11/07/2014 अन्वये जाहीर प्रसिध्दी करणारी अट शिथील करुन WPI तपासणे पुर्वी मंजूर केलेले मक्तेदार लॅन्को इंडस्ट्रीज यांचे कडुन 100 ते 400 एमएम व्यासाचे 60,786/- र.मी. पाईप्स प्रचलित WIP च्या व 2% सूट या दराने खरेदी करणे कामी मान्यता देण्यात आली.

वरील प्रमाणे निविदा प्रक्रिया राबविली असता ती रद्द करुन स्थायी समिती ठरावाचे आधारे पुर्वीच्या मक्तेदाराकडुन पाईप खरेदीस मान्यता देणे व त्याचेकडून खरेदी कशाचे आधारे केली याचा समर्पक खुलासा करणे आवश्यक आहे. सदर बाबत अर्धसमास पत्र क्र.22 दि.20/06/2017 अन्वये विचारणा करण्यात आली होती परंतु विभागाने खुलासा लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

DATRNDM7201 (Ref No : 141, Hmm No : 22)

## *52 मौजे कुमठे येथील गट क्र.206/1 मधील जागा मलनित्सारण केंद्रासाठी खरेदी करणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3600000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3600000.00/-

***दिलीप बाबु भोपळे यांचे मालकीची मौजे कुमठे येथील गट क्र.206/1 मधील 3 एकर (1.20 हेक्टदर) जागा महानगरपालिकेने मलनिःसारण केंद्रासाठी (सिव्हेल प्लॅट) साठी खरेदी केली, वाटाघाटीमध्ये मलनित्सारण केंद्रातील प्रक्रियेनंतरचे पाणी विनामुल्य श्री.भोपळे यांना देणेबाबत मान्यता नसताना श्री.भोपळे यांचे अर्जानुसार STP केंद्रातील प्रक्रिया केलेले पाणी विनामूल्य देणेस मान्यता दिल्याचे प्राधिकार/सक्षम मान्यता लेखा परीक्षणास आढळुन आली नाही, जागा खरेदी केल्यानंतर मनपाच्या नावे जागा हस्तांतरीत झाल्याबद्दल महानगरपालिकेच्या नावे असलेला स्वतंत्र 7/12 उतारा व फेरफार दाखला लेखापरीक्षणास आढळुन आला नाही, जागा खरेदी करताना शासनाच्या भूमी अभिलेख विभागाकडून सदर जागा मोजणी केल्याबद्दलचा मोजणी दाखला नस्तीत आढळून आला नाही, तसेच शिग्रसिध्द गणकापेक्षा जादा दराने जागा खरेदी करण्याची कारणे व सक्षम मंजूरी नस्तीत आढळून आली नाही.***

दिलीप बाबु भोपळे यांचे मालकीची मौजे कुमठे येथील गट क्र.206/1 मधील 3 एकर ( 1.20 हेक्टर) जागा महानगरपालिकेने मलनित्सारण केंद्रासाठी ( सिव्हेल प्लॅट) साठी खरेदी केली आहे. पाणी पुरवठा व मलनित्सारण विभागाकडील सदर नस्तीची तपासणी केली असता, खालील प्रमाणे उणिवा आढळून आल्या.

1) श्री.दिलीप बाबु भोपळे यांचे दि.25/02/2013 चे पत्रानुसार त्यांचे मालकीचे मौजे कुमठे येथील गट नं 206 (1) मधील 3 एकर (1.20 हेक्टर) जागा मलनित्सारण केंद्रासाठी देण्याचे सहमती दिली .

2) वाटाघाटीमध्ये मलनित्सारण केंद्रातील प्रक्रियेनंतरचे पाणी विनामुल्य श्री.भोपळे यांना देणेबाबत मान्यता नसताना श्री.भोपळे यांचे अर्जानुसार STP केंद्रातील प्रक्रिया केलेले पाणी विनामुल्य देणेस मान्यता दिली आहे. तरी सदरचे पाणी विनामुल्य देण्यास असलेला प्राधिकार/सक्षम मान्यता
लेखापरीक्षणास आढळुन आली नाही.

3) सदर जागा खरेदी केल्यानंतर मनपाच्या नावे जागा हस्तांतरीत झाल्याबद्दल महानगरपालिकेच्या
नावे असलेला स्वतंत्र 7/12 उतारा व फेरफार दाखला लेखापरीक्षणास आढळुन आला नाही.

4) सदर जागा खरेदी करताना शासनाच्या भूमी अभिलेख विभागाकडून सदर जागा मोजणी केल्याबद्दलचा मोजणी दाखला नस्तीस आढळून आला नाही.

5) महाराष्ट्र मनपा अधिनियम 1949 अन्वये आयुक्त व पक्षकार यांचे मध्ये जागेच्या
मोबदल्याबाबत चर्चा झाली व त्यामध्ये 2014-2015 चे शिग्रसिध्द गणकाचे दरापेक्षा जादा दराने
म्हणजे रु.12.00 लाख प्रति एकर प्रमाणे रु.36.00 लाख मान्य झाले. शिग्रसिध्दगणाका पेक्षा जादा दराने जागा खरेदी करण्याची कारणे व सक्षम मंजूरी नस्तीत आढळून आली नाही. सरकारी किंमत काय
होती हे नस्तीत आढळून आले नाही.

सदर बाबत अर्धसमास पत्र क्र.23 दि.20/06/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता, विविभागाकडून याबाबत खुलासा लेखापरीक्षणास सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATRNDM7201 (Ref No : 142, Hmm No : 23)

## *53 भारती विदयापीठ ते कंबर तलाव पर्यंत 450 एमएम आरसीसी ड्रेनेज लाईन टाकणे या कामातील अनियमितता.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 मनापा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1451240.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 21273.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 14935.00/-

***भारती विदयापीठ ते कंबर तलाव पर्यंत 450 एमएम आरसीसी ड्रेनेज लाईन टाकणे या कामाची मोजमाप नोंदवही क्र.79 मधील पृष्ठ क्र.12 ते 18 वर धावते देयक रु.14,51,240/- च्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. त्यानुसार मंजूर खालील बाबीमध्ये मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जादा काम करावे लागल्याने मक्तेदारास जादा रक्कम प्रदान केल्याचे आढळुन आले. सार्वजनिक बांधकाम विभाग कडील नियम 267 (1) नुसार अंदाजपत्रापेक्षा जादा काम करावे लागल्यास पुर्व मंजूरी घेणे आवश्यक असताना तशी पुर्व मंजूरी घेतली नसल्याने जादा खर्चाची रक्कम रु.21,273/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. कामाचा विमा व कामगारांचा विम्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास नस्तीत आढळून आली नाहीत. त्यामुळे निविदा रक्कमेच्या 1 % रक्कम रु.14,935/- इतकी रक्कम वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.***

भारती विदयापीठ ते कंबर तलाव पर्यंत लाईन ड्रेनेज आरसीसी एमएम 450 टाकणे या कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामात अनियमितता आढळून आल्याने याबाबत अर्धसमास क्र.34 दि.30/06/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

**कामाचा तपशिल**

**1) पुर्वगणकपत्रक (अंदाजपत्रक) - रु.14,93,587/-**

**2) निविदा रक्कम रु.14,93,587/-**

**3) मंजूर निविदा - 3% कमी**

**4) मक्तेदार - कल्याणी कंन्ट्र क्शन**

**5) करारपत्र - दि.26/02/2014**

**6) कामाची मुदत - 90 दिवस**

**7) कार्यादेश - 189, दि.26/02/2014**

**8) दरसुची - MJP - 20/02/2013**

**9)मोजमाप नोदवही व्हावचर क्रमांक - 799**

**1) मोजमाप नोंदवही क्र.79 मधील पृष्ठ क्र.12 ते 18 वर धावते देयक रु.14,51,240/- च्या नोंदी घेण्यात आल्या आहेत. त्यानुसार मंजूर खालील बाबीमध्ये मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जादा काम करावे**

**लागल्याने मक्तेदारास जादा रक्कम प्रदान केल्याचे आढळुन आले.**

| अ. क्र | बाब | अंदाजपत्रका नुसार | मोजमाप नोंदवहीनुसार | फरक | दर |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कठीण खडकातील खोदाई | 434.40 m3 | 516.95 | 82.55 | 736.05 |
| 2. | मॅनहोल चेंबर बांधणे | 12 नग | 17 नग | 5 नग | 20537.05 |
| | | | | | 21273 |

2) सार्वजनिक बांधकाम विभाग कडील नियम 267 (1) नुसार अंदाजपत्रापेक्षा जादा काम करावे लागल्यास पुर्व मंजूरी घेणे आवश्यलक आहे. परंतु सदर कामात अशी पुर्व मंजूरी घेतली नसल्याचे आढळुन आले. त्यामुळे जादा खर्चाची रक्कम रु.21,273/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3) कामाचा विमा व कामगारांचा विम्याचची कागदपत्रे लेखा परीक्षणास नस्तीत आढळून आली नाहीत. त्यामुळे निविदा रक्कमेच्या 1 % रक्कम रु.14,935/- इतकी रक्कम वसूल करून शासनाच्या विमा संचालनालयाकडे भरावी.

DATRNDM7201 (Ref No : 144, Hmm No : 34)

## *54 मील पेठ नाला येथे 600 एम. एम.व्यासाचे ड्रेनेज लाईन टाकणे या कामातील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3143475.00 /-

***मील पेठ नाला येथे 600 एम. एम.व्यासाचे ड्रेनेज लाईन टाकणे य कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामाचा व कामगारांचा विमा उतरविल्याबाबतची कागदपत्रे नस्तीस आढळुन आली नाहीत, मोजमाप नोंदवहीस मोजमापे घेतल्याची दिनांक नमुद नाही, सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियम 267 नुसार एखादे कामात अंदापत्रकापेक्षा जादा काम करावे लागल्यास त्यास पुर्व मंजूरी असणे आवश्यक आहे तथापि सदर प्रकरणी मात्र जादा काम करुन घेतल्यानंतर जादा परिमाणास मंजूरी मिळणेबाबत विनंती केली आहे. कामाचा मंजूर नकाशा नस्तीस आढळुन आलेला नाही, करारनामा अटी व शर्ती क्र.9 प्रमाणे विहित मुदतीत काम पूर्ण न झाल्याने मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार प्रतिदिन दंडाची आकारणी करणे आवशयाक होते. परंतु दंडाची आकारणी न करता दुसरे धावते देयक आदा झाल्याचे आढळुन आले.***

मील पेठ नाला येथे 600 एम. एम.व्यासाचे ड्रेनेज लाईन टाकणे या कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामात अनियमितता आढळून आल्याने याबाबत अर्धसमास क्र.35 दि.30/06/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

कामाचा तपशिल

1) पूर्व गणक पत्रक (अंदाजपत्रक ) रु.39,98,670/-

2) निविदा रक्कम रु.36,97,335/-

3) मंजूर निविदा :-14.98 % कमी

4) मक्तेदार :- यश कन्स्ट्रक्शन

5) करारपत्र :- दि.16/08/2014

6) कामाची मुदत :-120 दिवस

7) कार्यादेश :- 617 दि.05/09/2014

8) दरसूची :- MJP-2012-2013

सदर कामांची नस्ती मोजमाप नोंदवही यांची तपासणी केली असता खालील प्रमाणे उणीवा आढळून आल्या.

1) कामाचा व कामगारांचा विमा उतरविल्याबाबतची कागदपत्रे नस्तीत आढळुन आली नाहीत.

2) मोजमाप नोंदवहीस मोजमापे घेतल्याची नोंदविल्याचा दिनांक नमुद नाही.

3) दुसरे धावते देयकाअखेर खालील बाबीमध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा काम करावे लागल्याने मान्यतेसाठी दि.06/01/2015 चे पत्रामध्ये विभागाने मा.आयुक्त1यांना विनंती केली, त्याप्रमाणे मा. आयुक्तम्यांनी मान्यता दिली परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियम 267 नुसार एखादे कामात अंदापत्रकापेक्षा जादा काम करावे लागल्यास त्यास पुर्व मंजूरी असणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी मात्र जादा काम करून घेतल्यानंतर जादा परिमाणास मंजूरी मिळणेबाबत विनंती केली आहे.

| अ.क्र. | | I R.A. bill | A up to II RA | Exaction Quarter | Rate | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Execution in HR | 122.75 m3 | 1587.18 m3 | 365.63m3 | 736.05 | 268954.75 |
| 2 | Reffiling Trences | 1006.44m3 | 2590.07m3 | 1583.63 m3 | 60.90 | 96443.01 |
| 3 | Transto Surplus Mat. | 251.61 m3 | 314.50 | 62.91 | 207.15 | 13031.50 |
| | | | | | | 378429.26 |

4) सदर कामाचा मंजूर नकाशा नस्तीत आढळुन आले नाही.

5) सदर कामाच्या पुर्णत्वाचा दाखला नस्तीत नाही. त्यामुळे सदर कामाची मुदत वर्क ऑर्डर (कामाचे आदेश) दि.05/09/2014 पासुन 120 दिवस म्हणजे दि.05/01/2015 पर्यंत असताना, सदरचे काम विहीत कालावधीत पुर्ण झाले किंवा नाही याची खात्री करता आली नाही. मुदतवाढीस मान्यता नस्तीत

आढळुन आली नाही. तरी करारनामा अटी व शर्ती क्र.9 प्रमाणे मा. आयुक्त यांचे मान्यतेनुसार प्रतिदिन दंडाची आकारणी करणे आवश्यक होते. परंतु दंडाची आकारणी न करता दुसरे धावते देयक आदा झाल्याचे आढळुन आले.

DATRNDM7201 (Ref No : 145, Hmm No : 35)

## *55 पाणी पुरवठा केद्रांकडील वीज बिल देयकास इलेक्ट्रीसीटी डयुटी देय नसताना अदा केल्याने जादा रक्केम प्रदान झालेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1187951.00/-

***महाराष्ट्र इलेक्ट्रिक डयुटी अन्वये 1958 चे नियम 3(2)(a) नुसार पाणी पुरवठा केंद्राकडील विद्युत बिलातून वीज आकार शुल्क (इलेक्ट्री सीटी डयुटी) देय नसताना महानगरपालिकेकडील उजनी, पाकणी, भवानी पेठ, टाकळी, सोरेगाव व जुळे सोलापूर अशी 6 पाणी पुरवठा केंद्राकडील वीज बिल देयकांची तपासणी केली असता वीज बिल देयकात वीज आकार शुल्क रक्कम रु.11,87,951/- विद्युत महामंडळास जादा अदाकरण्यात आले.***

पाणी पुरवठा केद्रांकडील वीज बिल लेखापरीक्षण केले असता सदर कामात अनियमितता आढळून आल्याने याबाबत अर्धसमास क्र.36 दि.12/07/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेकडील उजनी, पाकणी, भवानी पेठ, टाकळी, सोरेगाव व जुळे सोलापूर अशी 6 पाणी पुरवठा केंद्राकडील वीज बिल देयकांची तपासणी केली असता वीज बिल देयकात इलेक्ट्रीसीटी डयुटी देय नसताना अदा केल्याचे आढळुन आले.

महाराष्ट्र इले. डयुटी अन्वये 1958 चे क्लॉज 3(2)(a) नुसार पाणी पुरवठा केंद्राकडील विद्युत बिलातून वीज आकार शुल्क (इलेक्ट्रीसीटी डयुटी) देय नाही. तरीही मनपा कडील वरी पाणीपुरवठा केद्राकडील विद्युत बीलात वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये खालील प्रमाणे वीज आकार शुल्क (इलेक्ट्रीसीटी डयुटी) ची रक्कम रु.11,87,951/- विद्युत महामंडळास जादा आदा झाल्याचे आढळुन आले.

| अ.क्र. | पाणीपुरवठा केद्राचे नाव | कालावधी | वीज आकार शुल्क रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | पाकणी वॉटर वर्क्स | फेब्रुवारी 2015 | 104111 |
| | | एकूण (अ) | **104111** |
| 2 | टाकळी हेड वर्क्स | एप्रिल 14 | 58.93 |
| | | मे 14 | 550.2 |
| | | जून14 | 530.67 |
| | | जुलै 14 | 2183.13 |
| | | आक्टोबर 14 | 458.01 |
| | | डिसेंबर 14 | 234454.18 |
| | | जानेवारी 15 | 747.69 |
| | | फेब्रुवारी 15 | 136677 |
| | | एकूण (ब) | **398186.61** |
| 3 | जुळे सोलापूर | एप्रिल 14 | 25777.16 |
| | | मे 14 | 36990.22 |
| | | जून14 | 38195.69 |
| | | जुलै 14 | 6645.06 |
| | | आगस्त 14 | 9324.16 |
| | | सप्टेंबर 14 | 11250.81 |
| | | आक्टोबर 14 | 6533.8 |
| | | नोव्हेंबर 14 | 46639.74 |
| | | डिसेंबर 14 | 51642.06 |
| | | फेब्रुवारी 15 | 9125.33 |
| | | मार्च 15 | 49844.08 |
| | | एकूण (क) | 708179.93 |
| | | **एकूण (अ) (ब) (क)** | **1187950.74** |

DATRNDM7201 (Ref No : 146, Hmm No : 36)

***56 पॉवर फॅक्टसर कमी आल्या ने महावितरण कंपनीकडुन इन्सेुटिव्ह न मिळाल्याषने मनपाचे झालेले नुकसान बाबत.***

सोलापूर महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 105287.00/-

***वित्तीय वर्ष 2014-15 च्या उजनी, पाकणी व भवानी पेठ पाणी पुरवठा केंद्राकडील वीज देयकाची तपासणी केली असताना 2014-15 मधील वीज बिलात पॉवर फॅक्टर 1.00 पेक्षा कमी आल्याने 7% इनसेटिव्ह मिळाला नाही. त्यामुळे मनपाचे रु.49,27,474/- चे नुकसान झाले आहे.***

सोलापूर महागनरपालिकेच्या उजनी, भवानी पेठ, एम बी आर जुळे सोलापूर व पाकणी येथील पाणी पुरवठा केद्रांचे वीज बिल दरमहा रु.1 कोटी महावितरण कंपनीस आदा केले जाते. सदरच्या वीज वापरात पॉवर फॅक्टर 1.00 असल्यास महावितरण कंपनीकडुन वीज बिलात 7% इनसेटिव्ह दिला जातो. त्यामुळे सदर ठिकाणी पॉवर फॅक्टर 1.00 येण्यासाठी मनपाने संकल्प इले, सांगली यांचेकडुन A.P.F.C पॅनल बोर्ड व कॅपॅसिटरचे काम 2012-13 मध्ये केले होते सदर कामाच्या अटी शर्ती मधील अट क्रमांक 16 प्रमाणे काम पूर्ण झाल्यानंतर 3 वर्ष मेटेन्सचे काम मक्तेदाराचे असुन पॉवर फॅक्टर 1.00 पेक्षा कमी आल्यास व त्यामुळे महावितरण कंपनीकडुन मनपास वीज बिलात इनसेटिव्ह न मिळाल्यास त्याची मक्तेदार संकल्प इले. यांचेकडून वसूल करणेत येईल असे असताना वित्तीय वर्ष 2014-15 च्या उजनी, पाकणी व भवानी पेठ पाणी पुरवठा केंद्राकडील वीज देयकाची तपासणी केली असता 2014-15 मधील वीज बिलात पॉवर फॅक्टर 1.00 पेक्षा कमी आल्याने 7 % इंनसेटिव्ह मिळाला नाही. त्यामुळे मनपाचे रु.49,27,474/- चे नुकसान झाले आहे. एमबीआर जुळे सोलापूर कडील वीज बिले लेखापरीक्षणास तपासणीस मिळाली नसल्याने सदर बिलामधील पॉवर फॅक्टरबाबतची तपासणी करता आली नाही. सदर बाबत अर्धसमास पत्र क्र.07 दि.15/05/2017 अन्वये विचारणा करण्यात आली होती. परंतु विभागाने खुलासा लेखापरीक्षणास सादर केलेला नाही

| अ.क्र. | पाणी पुरवठा केंद्राचे नाव | महिना | वीज बिल रक्कम | प्राप्त पॉवर फॅक्टर | मिळालेली इनसेटिव्ह रक्कम | 7% प्रमाणे मिळावयास आवश्यक इनसेटिव्ह रक्कम | फरक रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | पाकणी | एप्रिल-14 | 2039170 | 0.98 | 68956 | 142742 | 73786 |
| | | मे-14 | 2085220 | 0.98 | 65163 | 145965 | 80802 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जून-14 | 1934090 | 0.99 | 102877 | 135386 | 32509 |
| | | ऑगस्ट-14 | 2338000 | 0.98 | 73062 | 163660 | 90598 |
| | | सप्टेबर-14 | 2483910 | 0.97 | 51214 | 173874 | 122660 |
| | | ऑक्टोबर-14 | 2469920 | 0.95 | 0 | 172894 | 172894 |
| | | नोव्हेंबर-14 | 2389020 | 0.96 | 49258 | 167231 | 117973 |
| | | डिसेंबर-14 | 2527230 | 0.97 | 134426 | 176906 | 42480 |
| | | जानेवारी-15 | 2598040 | 0.95 | 0 | 181863 | 181863 |
| | | एकूण | | | | | **915565** |
| 2 | उजनी | एप्रिल-14 | 6030310 | 0.98 | 202848 | 422122 | 219274 |
| | | मे-14 | 5949810 | 0.99 | 316479 | 416486 | 100008 |
| | | जून-14 | 6577690 | 0.99 | 349877 | 460438 | 110561 |
| | | जुलै-14 | 6474190 | 0.99 | 344372 | 453193 | 108821 |
| | | ऑगस्ट-14 | 6675990 | 0.98 | 208624 | 467319 | 258695 |
| | | सप्टेबर-14 | 7840540 | 0.96 | 80005 | 548838 | 468833 |
| | | ऑक्टोबर-14 | 8047480 | 0.96 | 82117 | 563324 | 481207 |
| | | नोव्हेंबर-14 | 7789090 | 0.96 | 79480 | 545236 | 465756 |
| | | डिसेंबर-14 | 8357340 | 0.96 | 85279 | 585014 | 499735 |
| | | जानेवारी15 | 8044190 | 0.96 | 82083 | 563093 | 481010 |
| | | फेब्रुवारी-15 | 6540720 | 0.96 | 66742 | 457850 | 391108 |
| | | मार्च-15 | 7139280 | 0.96 | 72849 | 499750 | 426901 |
| | | एकूण | | | | | **4011909** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एकूण (पाकणी व उजनी) | **4927474** |

वसुलपात्र रक्कम – रु.49,27,474/-

DATRNDM7201 (Ref No : 147, Hmm No : 07)

## *57 DCPS ची वर्गणी रक्कम कमी कपात केलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : म.न.पा. म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***मनपाच्या पाणी पुरवठा व मल निस्सारण विभागाकडील वर्ग 4 च्या कर्मचा- यांची सेवापुस्तके व फेब्रुवारी 2015 चे वेतन देयक यांची पडताळणी केली असता ज्या कर्मचा- यांना DCPS(अंशदायी निवृत्ती वेतन योजना) लागू आहे त्यांचे वेतनातुन DCPS वर्गणीची रक्काम कमी वसुल केल्याचे आढळुन आले.***

मनपाच्या पाणी पुरवठा व मलनित्सारण विभागाकडील वर्ग 4 च्या कर्मचा-यांची सेवापुस्त्के व फेब्रुवारी 2015 चे वेतन देयक यांची पडताळणी केली असता ज्या् कर्मचा-यांना DCPS (अंशदायी निवृत्ती4 वेतन योजना) लागू आहे त्यांचे वेतनातुन DCPS वर्गणीची रक्काम कमी वसुल केल्याचे आढळुन आले.

1 नोव्हेंबर 2005 नंतर सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या् कर्मचा-यांसाठी शासनाने DCPS (अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू केली असुन त्यातनुसार कर्मचा-यांचे वेतन (वेतन+ग्रेड वेतन) व महागाई भत्ता यांचे 10% रक्कयम कर्मचारी हिस्सा (employee's contribution) म्हणुन कर्मचा-याचे वेतनातुन कपात करणे आवश्यक आहे. या सोबतच्या यादीतील कर्मचा-यांची माहे फेब्रुवारी 2015 चे वेतन देयकामध्ये कपात करण्यात आलेल्या DCPS वर्गणीची रक्कम 10% पेक्षा कमीने कपात करण्यात आली असल्याचे आढळुन आले. तसेच मनपा हिस्शाचे (Municipal Contribution) 10% रक्कम DCPS खात्या मध्ये जमा केले नसल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | नाव | पदनाम | वेतन | ग्रेड पे | म.भत्ताक | एकूण | DCPS 10% रक्कम | DCPS 10% वसुल | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मन्सुर शेख | मजुर/चावीवाला | 5580 | 1300 | 6530 | 13416 | 1342 | 1300 | 42 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | इब्राहिम शेख | मजुर/चावीवाला | 5580 | 1300 | 6530 | 13416 | 1342 | 1300 | 42 |
| 3 | गोविंद सुर्यवंशी | मजुर/चावीवाला | 5580 | 1300 | 6530 | 13416 | 1342 | 1300 | 42 |
| 4 | संभाजी बनसोडे | मजुर | 5380 | 1300 | 6346 | 13026 | 1303 | 1270 | 33 |

वरील उदाहरणे नमुना दाखल देणेत आले असून अशा प्रकारच्या उदाहरणांचा शोध घेऊन योग्ये ती DCPS वर्गणी रक्कम वसूल करण्याची दक्षता घेणे आवश्यक आहे. सदर बाबत अर्धसमास पत्र क्र.08दि.15/05/2017 अन्वये विचारणा करण्यात आली होती. परंतु विभागाने खुलासा लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

DATRNDM7201 (Ref No : 148, Hmm No : 08)

## *58 टेंभुर्णी ते उजनी पंप पर्यंत 33 kv एक्सप्रेस फीडर वीज पुरवठा घेणे या कामातील अनियमिततेबाबत..........*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 13595715.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13595715.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 670000.00/-

***टेंभुर्णी ते उजनी पंप पर्यंत 33 kv एक्सप्रेस फीडर वीज पुरवठा घेणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता निविदा अटी व शर्ती व करारनामा अटी व शर्ती सदर कामाची मुदत कार्यादेश पासुन 4 महिने असताना ती 4 महिने वाढविण्यात आली तसेच मुदतवाढीचा मक्तेदाराचा अर्ज लेखापरीक्षणास नस्तीत आढळुन आला नाही, पुरवठा करावयाचा MSEDCL यांचे मान्यतेने व मानांकनाप्रमाणे असल्याबाबतची कागदपत्रे लेखा परीक्षणास आढळुन आले नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.सीएसटी-1087/सीआर-196/बी-2 दि.04.05.1988 नुसार अंदाजपत्रकापेक्षा 5% पेक्षा जदा दराने निविदा मंजूर करण्यात येऊ नये अशी तरतूद असताना कामाची निविदा 12% पेक्षा दाराची निविदा मंजूर करण्यात आली आहे.***

***करारनामा अट क्र.5 नुसार मार्च15 पर्यंत काम अपुर्ण असल्यानेदि.03/02/2015 नंतरच्या67 लाख रकमेच्या 10% प्रमाणे वसुल केले नाही. तसेच करारनामा अट क्र.4 प्रमाणे मा. आयुक्त यांचे मान्यतेने दंडाची आकारणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही.***

टेंभुर्णी ते उजनी पंप पर्यंत 33 kv एक्सप्रेस फीडर वीज पुरवठा घेणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामात अनियमितता आडळून आल्याने याबाबत अर्धसमास क्र.37 दि.12/07/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

कामाचा तपशिल

1) निविदा रक्कम :- 97,25,881/-

2) निविदा मंजूर :- 12% जादा

3) मक्तेदार :- यशकिरण इंजिनियर्स

4) कार्यादेश :- साआअ/उजनी-147, दिनांक 03/07/2014.

5) लेखाशीर्ष :- 13 वा वित्त-आयोग

6) कामाची मुदत :- 4 महिने (कार्यादेशपासुन 4 महिने)

7) करारनामा :- दि.03/07/2014.

सदर कामावर खालीलप्रमाणे खर्च झाला आहे.

| अ.क्र | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | 51 | 2014/09/28 | 4027551/- |
| 2 | 85 | 2015/01/13 | 1269360/- |
| 3 | 86 | 2015/01/13 | 1625304/- |
| 4 | 93 | 22/02/2015 | 4433310/- |
| 5 | 111 | 31/03/2015 | 1415940/- |
| 6 | 112 | 31/03/2015 | 824252/- |
| **एकूण** | | | **1,35,95,715/-** |

सदर कामाची नस्ती, मोजमाप नोंदवही यांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्यात.

1) निविदा अटी व शर्ती व करारनामा अटी व शर्ती सदर कामाची मुदत कार्यादेश पासुन 4 महिने म्हणजे दिनांक 03/07/2014 पासुन 03/11/2014 पर्यंत असताना तसेच जावक क्र.साआअ/उजनी-278 नुसार 90 दिवस मुदतवाढ म्हणजे दिनांक 03/11/2014 पासुन दि. 03/02/2015 पर्यंत मुदतवाढ देवुन ही सदरचे काम मार्च 2015 पर्यंत अपुर्ण असल्याचे आढळुन आले, मुदतवाढीचा मक्तेदाराचा अर्ज लेखापरीक्षणास नस्तीत आढळुन आला नाही.

2) करारनामा अट क्र.14 अ नुसार पुरवठा करावयाचा माल MSEDCL च्या गुणवत्ते प्रमाणे पुरवठा केलेला साहित्याची तपासणी केल्याचा तपासणी अहवाल तसेच तो MSEDCL गुणवत्ते प्रमाणे असल्याबाबतची कागदपत्रे लेखा परीक्षणास आढळुन आले नाही.

3) करारनामा अट क्र. 15 प्रमाणे मक्त्याचे काम समाधानकारक असल्याचे प्रमाणपत्र मक्तेदार यांनी MSEDCL कडुन प्राप्त करुन घेवुन सादर करण्याचे आहे. परंतु अशी प्रामणपत्रे लेखापरीक्षणास आढळुन आली नाहीत.
4) करारनामा अट क्र.15 ब नुसार सदर कामाचा माल MSEDCL यांचे मान्यतेने व मानांकनाप्रमाणे घेणेचा आहे. परंतु असा माल घेतल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास नस्तीस आढळुन आली नाहीत.
5) सदर कामाची निविदा 12% जादा प्रमाणे स्विकारण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.सीएसटी-1087/सीआर -196/बी-2 दि.04.05.1988 नुसार अंदाजपत्रकापेक्षा 5% पेक्षा जादा दराने निविदा मंजूर करण्यात येऊ नये. अशी तरतूद आहे. तथापि सदर कामाची निविदा 12% पेक्षा दाराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. हे नियमबाह्य आहे.
6) करारनामा अट क्र.5 नुसार मुदवाढी नंतरच्या् कामाच्या 10% रक्कम नुकसान भरपाई म्हणून वसुल करणेत येईल असे नमुद आहे. मार्च 15 पर्यंत काम अपुर्ण असल्याने दि.03/02/2015 नंतरच्या 67.00 लाख रकमेच्या 10% प्रमाणे रक्कम रु. 6,70,000/- वसुल केलेली नाही.
7) सदरचे काम मुदतवाढीनंतरही अपुर्ण असल्याचे आढळुन आले. त्यामुळे करारनामा अट क्र.4 प्रमाणे मा. आयुक्त यांचे मान्यतेने दंडाची आकारणी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नसल्यायचे आढळुन आले.
अक्षेपाधीन रक्कम रु.13595715/-
वसुलपात्र रक्कम रु.670000/-

DATRNDM7201 (Ref No : 149, Hmm No : 37)

## *59 केंगनाळकर शाळा ते ताई चौक पर्यंत पाईप लाईन टाकणे या कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1421213.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1421213.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3415.00/-

***केंगनाळकर शाळा ते ताई चौक पर्यंत पाईप लाईन टाकणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता करारनामा अटी शर्ती मधील अट क्र.1 नुसार सदर कामाची मुदत कार्यादेश दि.01/02/2014 पासुन 2 महिने म्हणजे दि.01/04/2014 पर्यंत असताना सदरचे काम मार्च 15 पर्यंत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नस्तीत आढळुन आले नाही. काम मुदतीत पूर्ण न झाल्याबाबत निविदा अट क्र.7 प्रमाणे सुरक्षित रक्कम व बयाणा रक्कम जमा***

***करणे. अट क्र.25 प्रमाणे कामास विलंब झाल्यामुळे व करारनामा क्र.6 प्रमाणे दंडाची आकारणी करणे या प्रमाणे कार्यवाही केली नसल्याचे, तसेच निविदा प्रक्रियेस तिस-या मुदवाढीचे वेळेस पुर्वीचे निविदा अटी व शर्ती मधील अट क्र.23 व 24 फेर निविदामध्ये नसल्याचे आढळुन आले. करारनामा अट क्र.22 नुसार पहिले व दुसरे धावते देयकामध्ये मटेरियल पुरवठयाची रक्कम 20% रक्कम पैकी 10% रक्कम पाईप लाईनचे काम पुर्ण झालेनंतरच प्रदान करणे ऐवजी पुर्ण आदा केल्याचे आढळुन आले.***

कैंगनाळकर शाळा ते ताई चौक पर्यंत पाईप लाईन टाकणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामात अनियमितता आडळून आल्याने याबाबत अर्धसमास क्र.21 दि.20/06/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे

1) अंदाजपत्रकीय रक्काम :- 1929924/-

2) मंजूर निविदा रक्काम :- 3% कमी

3) मंजूर निविदा क्र. :- स्थायी समिती ठराव क्र.6, दिनांक 18/02/2014

4) लेखाशिर्ष :- भांडवली कामे (सन 2013/14)

5) निधी :- मनपा

6) मक्तेदाराचे नाव :- श्रीकांत रमेश सोनी

7) कार्यादेश क्रमांक :- साआअ/जल-2545, दिनांक 01/02/2014

8) कामाची मुदत :- 2 महिने

9) खर्च :- पहिले देयक सन 2014-15 मधील खर्च र.रु.858227/- दि.09/06/2014 आणि दुसरे देयक र.रु.5,63,003/-

सदर कामाची तपासणी केली असता खालील प्रमाणे उणिवा आढळून आल्या.

1) करारनामा अटी शर्ती मधील अट क्र.1 नुसार सदर कामाची मुदत कार्यादेश दि.01/02/2014 पासुन 2 महिने म्हणजे दि.01/04/2014 पर्यंत असताना सदरचे काम मार्च 15 पर्यंत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नस्तीत आढळुन आले नाही. काम मुदतीत पूर्ण न झाल्याबाबत निविदा अट क्र.7 प्रमाणे सुरक्षित रक्कम व बयाणा रक्कम जमा करणे अट क्र.25 प्रमाणे कामास विलंब झाल्यामुळे व करारनामा क्र.6 दंडाची आकारणी करणे या प्रमाणे कार्यवाही केली नसल्याचे आढळून आले.

2) सदर निविदा प्रक्रियेस तिस-या मुदवाढीचे वेळेस पुर्वीचे निविदा अटी व शर्ती मधील अट क्र.23 व 24 फेर निविदा मध्ये नसल्याचे आढळुन आले.

3) करारनामा अट क्र.22 नुसार मटेरियल पुरवठा झाल्यानंतर 80% रक्कम अदा करण्यात येईल व 20% रक्कमे पैकी 10% रक्कम पाईप लाईनचे काम पुर्ण झालेनंतरच उर्वरीत 10% रक्कम हायड्रॉलीक टेस्टींग नंतर अदा करणेत येईल असे असताना, पहिले व दुसरे धावते देयकामध्ये मटेरियल पुरवठयाची रक्कम पुर्ण अदा केल्यायचे आढळुन आले. 20% रक्कम रोखून ठेवणे आवश्यक होते सदरचे 20% रक्कम ठेकेदारास अवाजवी लाभ देण्यात आला आहे.

4) करारनामा क्र.8 प्रमाणे स्लुस व्हॉल्व पाईप स्पेकशल्स  मटेरियलची तपासणी थर्ड पार्टी कडून करुन घेण्यात येईल असे असताना फक्त पाईप ची टेस्टींग SGS मा.संस्थेयकडून दि.17/04/2014

रोजी केल्याचे प्रमाणपत्र नस्तीत आढळुन आले. स्लुस व्हॉल्व, पाईप स्पेशल, ई. साहित्याची तपासणी प्रमाणपत्र नस्तीत आढळुन आले नाहीत.

5) स्लुस व्हॉल्व पुरविणे यासाठी खालील प्रमाणे जादा आदा रक्कम आदा केल्याचे आढळुन आले.

| स्लूस व्हॉल्व प्रकार | देय दर | आदा दर | जादा आदा | नग | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 150mm | 10217 | 10727.85 | 510.85 | 5 | 2554.25 |
| 200mm | 19333 | 20299.65 | 966.65 | 1 | 966.65 |
| | | | **एकूण** | | 3520.90 X 3/100 = 3415/- |

तरी सदरची जादा आदा रक्कम 3520.90 वजा 3% = 3415/- वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

वसूलपात्र रक्कम रु.- 3415/-

DATRNDM7201 (Ref No : 150, Hmm No : 21)

## *60 भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्र येथे 125 एच.पी. पंपीग मशिनरी बदलणे व ए.सी.बी. आणि वि.सी.बी. बसविणे व इतर कामे करणे व 6 महिने टेस्ट ट्रायल देणे या कामातील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 9925155.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9925155.00/-

***भवानी पेठ जलशुध्दी करण केंद्र येथे 125 एच.पी. पंपीग मशिनरी बदलणे व ए.सी.बी. आणि वि.सी.बी. बसविणे व इतर कामे करणे व 6 महिने टेस्ट ट्रायल देणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.सीएसटी-1087/सीआर-196/बी-2 दि.4.5.1988 नुसार अंदाजपत्रकापेक्षा 5 टक्के पेक्षा जादा दराने निविदा मंजूर करण्यात येवू नये, अशी तरतूद आहे. तथापि सदर कामाची निविदा 26% टक्के जादा दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे. प्रस्तावामध्ये 240 एच.पी. पंपाचा उल्लेख असताना स्थायी समिती ठरावा मध्ये 125 एच.पी. पंपाचा उल्लेख आहे. सदर कामासाठीचे पुर्वगणन पत्रक, निविदा स्थायी समिती ठराव, कार्यादेश व करारनामा यामध्ये सदर कामासाठी 125 एच.पी. चे चार पंप बसविणे असा उल्लेख असताना प्रस्ताव, मोजमाप नोंदवही व देयकामध्ये 240 एच.पी. पंपाचा उल्लेख आहे. स्थायी समिती ठराव व कार्यादेश, करारनामा, मोजमापे नोंदवही, व देयके यानुसार तसेच पंपाचे***

***अश्वशक्तीमधील विसंगतीमुळे लेखापरीक्षणास कामाच्या योग्यतेची खात्री करता आली नाही. कामाचे ड्रॉईंग अॅप्रुव्हल केले याची कागदपत्रे लेखापरीक्षणास नस्तीत आढळुन आली नाहीत. निविदा अटी व शर्ती व करारनामा अटी व शर्ती मधील अट क्र.1 नुसार महानगरपालिकेचे पत्र मिळाल्यापासुन 6 महिन्याचे आत मंजूर दराने करुन देणे असे असताना, सदरचे काम मार्च 2015 पर्यंत अपुर्ण असल्याचे आढळुन आले. करारनामा अट क्र. 14 प्रमाणे काम मुदतीने पुर्ण न केल्यास मुदतबाहय कालावधीसाठी प्रतिदिन 2670/- प्रमाणे दंडाची आकारणी करण्यात आलेली नाही. मनपाने ड्रॉईंग अॅप्रुव्हल नंतर मक्तेदारास काम सुरु करणेबाबत केंव्हा पत्र दिले याची माहिती लेखापरीक्षणास आढळून आली नाही. करारनामा अट क्र.5 नुसार मुदतीनंतरचे कामाचे 10% रक्कम बिलातुन वगळण्यात आले नाही, अट क्र.8 नुसार थर्ड पार्टी इन्पेक्शन कागदपत्रे लेखापरीक्षणास नस्तीत आढळुन आली नाहीत.***

भवानी पेठ जलशुध्दी करण केंद्र येथे 125 HP पंपीग मशिनरी बदलणे व ACB & VCB बसविणे व इतर कामे करणे व 6 महिने टेस्ट ट्रायल देणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता सदर कामात अनियमितता आढळून आल्याने याबाबत अर्धसमास क्र.38 दि.17/07/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नसल्याने सदर आक्षेप कायम करण्यात येत आहे.

कामाचा तपशिल

1) पुर्वगणनण पत्रक रक्कम :- 13326371/-

2) निविदा रक्कम :- 12691792/-

3) निविदा मंजूर :- 25% जादा (15864727/-)

4) मक्तेदार :- मे.अलाईड इलेट्रीक्ल्स पूणे

5) स्थयी समिती :- ठराव क्रमांक 230, दिनांक 25/11/2013.

सदर कामावर 2013/14 व 2014/15 या आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे 5 धावते देयकाव्दारे मक्तेदारास रक्कम रु. 99,25,155/- आदा करण्यात आले.

| अ.क्र. | धावते देयक क्र | रक्कम रु. |
|---|---|---|
| 1. | 1 | 825426/- |
| 2. | 2 | 4895593/- |
| 3. | 3 | 1282293/- |
| 4. | 4 | 1993586/- |
| 5. | 5 | 928257/- |
| | एकूण | 9925155/- |

सदर कामाची नस्ती मोजमाप नोंदवही यांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या

1) सदर कामासाठी 4 वेळा निविदाचे फेरप्रसिध्दीकरण झाल्यानंतर एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी दराची ( L1) निविदा मे.अलाईड इलेट्रीक्ल्स पूणे यांची 26% जास्तीची होती. निविदाधारकाशी वाटाघाटी केल्यानंतर 25% जास्त ने काम करण्यास तयार असल्याचे मक्तेदाराने मान्य केले. परंतु महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.सीएसटी-1087/सीआर-

196/बी-2 दि.4.5.1988 नुसार अंदाजपत्रकापेक्षा 5 टक्के पेक्षा जादा दराने निविदा मंजूर करण्यात येवू नये, अशी तरतूद आहे. तथापि सदर कामाची निविदा 26% टक्के जादा दराची निविदा मंजूर करण्यात आली आहे, हे नियमबाह्य आहे. .

2) पुर्वगणन पत्रक, निविदेमध्ये 125 एचपी चे 4 पंप बसविणेचा उल्लेख होता तर प्रस्तावामध्ये 250 एचपी पंपाचा उल्लेख आहे, तर दरपृथ्थकरण मध्ये 240 एचपी पंपाचा उल्लेख आहे. या विसंगती बाबत खात्याने मक्तेदार 240 एचपी ज्योती मेक चे पंप 125 एचपी पंपाचे 25% जास्त दराने काम करणेस तयार असल्याचे कळविले त्यानुसार प्रस्ताव मा. आयुक्त यांच्या मान्यतेने स्थायी समितीस सादर करण्यात आला व स्थायी समितीने ठराव क्र.230 दि.05/10/2013 अन्वये 125 एचपी पंप बसविणे. ACB/VLB बसविणे व लागणारे साहित्य खरेदी करणे व 6 महिने ट्रायल देणे हे काम निविदा रक्कमेच्या 25% जादा दराने करुन घेण्यास मान्यता दिली. प्रस्तावामध्ये 240 एच.पी.पंपाचा उल्लेख असताना स्थायी समिती ठराव मध्ये 125 एच.पी. पंपाचा उल्लेख आहे. सदर कामासाठीचे पुर्वगणन पत्रक, निविदा स्थायी समिती ठराव, कार्यादेश व करारनामा यामध्ये सदर कामासाठी 125 एच.पी. चे चार पंप बसविणे असा उल्लेख असताना प्रस्ताव व मोजमापे नोंदवही, व देयकामध्ये 240 एच.पी. पंपाचा उल्लेख आहे. जा.क्र.साआअ/ भवानी/ES/400, दिनांक 25/11/2013 नुसार सदर कामाचे कार्यादेश (वर्कऑर्डर) देण्यात आले परंतु कार्यादेशामध्ये 125 HP पंपीग मशिनरी बदलणे, ACB/VLB इतर साहित्यासह कामे करणे 12 महिने टेस्ट ट्रायल देणे असा उल्लेख आहे. सदर कामाचा करारनामा दि.25/11/2013 रोजी करण्यात आला. सदर करारनाम्यामध्ये कामाचा उल्लेख मध्ये 125 एच.पी. पंपीग मशिनरी बदलणे असे असल्याचे आढळुन आले. पुरवणी करारनामा दि.04/01/2016 रोजी करण्यात आला. तरी वरील प्रमाणे प्रस्ताव, स्थायी समिती ठराव व कार्यादेश, करारनामा,मोजमापे नोंदवही, व देयके यानुसार तसेच पंपाचे अश्वशक्ती मधील विसंगतीमुळे लेखापरीक्षणास कामाच्या योग्यतेची खात्री करता आली नाही.

3) कामाची मुदत ड्रॉईंग ॲप्रुव्हल नंतर 6 महिने असा होता परंतु कामाचे ड्रॉईंग ॲप्रुव्हल केले याची कागदपत्रे लेखापरीक्षणास नस्तीत आढळुन आली नाहीत. करारनामा अटी शर्ती मधील अट क्र.9 नुसार सदर कामाचे ड्रॉईंग तपासुन व ॲप्रुव्हल एम.एस.ई.बी कडुन करुन घेण्याचे काम मक्तेदाराचे होते. परंतु अशी कार्यवाही कधी पूर्ण झाली याची कागदपत्रे लेखा परीक्षणास आढळून आली नाहीत.

4) सदर कामाची मोजमापे मोजमाप नोंदवही क्रमांक 1 व 2 मध्ये नोंदवली आहेत सदरच्या मोजमापानुसारमापे आयटम चे दराचे परसेंट नुसार देण्यात आली आहेत. साहित्याचे पुरवठा झाल्यावर दराचे 60% तर उर्वरीत 40% पैकी 20% रक्कम साहित्याचे उभारणी झाल्यावर व उर्वरीत 20% रक्कम साहित्याचे कामाचे बाबीचे संच चालु झाल्यावर याप्रमाणे देण्यात आली. सदरचे रक्कम वितरणाचे प्रमाण कशाचे आधारे ठरविण्यात आले हे लेखापरीक्षणास प्रधिकारासह सादर करण्यात आला नाही.

5) निविदा अटी व शर्ती व करारनामा अटी व शर्ती मधील अट क्र.1 नुसार महानगरपालिकेचे पत्र मिळाल्यापासुन 6 महिन्याचे आत मंजूर दराने करुन देणे असे असताना सदरचे काम मार्च 2015 पर्यंत अपुर्ण असल्याचे आढळुन आले. मनपाने ड्रॉईंग ॲप्रुव्हल नंतर मक्तेदारास काम सुरु करणेबाबत केंव्हा पत्र दिले याची माहिती लेखा परीक्षणास आढळून आली नाही. सदरचे काम मुदतीत पुर्ण झाली नाहीत. करारनामा अट क्र.4 नुसार मुदतवाढीचा अर्ज मुदतसंपण्यापूर्वी दोन महिने अगोदर मक्तेदाराने विलंबाच्या कारणासह सादर करणे आवश्यक होते. परंतु असा मक्तेदाराचा अर्ज लेखापरीक्षणास नस्तीत आढळून आला नाही. अर्जातील कारणे योग्य असल्यास मुदतवाढ देणेचा अधिकार मा. आयुक्त यांना आहे. परंतु अशी मुदतवाढ मिळाल्याचे लेखा परीक्षणास नस्तीत आढळुन आली नाही.

6) करारनामा अट क्र.5 नुसार मुदतीनंतरचे कामाचे 10% रक्कम बिलातुन वगळण्याचे अधिकार मनपास होता परंतु अशी कार्यवाही झाली नसल्याचे आढळुन आले.
7) करारनामा अट क्र.8 नुसार थर्ड पार्टी इन्स्पेक्शन एस.जी.एस. कंपनीकडुन करुन घेणे आवश्यक असताना त्याबाबतचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन (त्रयस्त संस्था तपासणी) अहवाल लेखा परीक्षणास नस्तीत आढळुन आले नाहीत.
8) करारनामा अट क्र.10 नुसार काम पुर्ण झाल्यानंतर 12 महिने ट्रायल रन देणे व 36 महिने साहित्य (पार्ट) सप्लाय मेंटेनन्स मक्तेदाराने करणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झाल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करुन खात्री पटविणे आवश्यक आहे.
9) करारनामा अट क्र.12 प्रमाणे 12 महिने ट्रायल रन कालावधीत मक्तेदाराने एक इलेक्ट्रीक इंजिनियर सतत उपस्थित ठेवणे आवश्यक होते. अशी कार्यवाही झाल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करुन खात्री पटविणे आवश्यक आहे.
10) करारनामा अट क्र. 14 प्रमाणे काम मुदतीने पुर्ण न केल्यास मुदतबाहय कालावधीसाठी प्रतिदिन 2670/- प्रमाणे दंडाची आकारणी करण्यात येईल असे नमुद होते. सदरचे काम मुदतीत पुर्ण न झाल्याने विनादंड मुदतवाढ कालावधी सोडून मुदतबाहय कालावधीसाठी मा. आयुक्त यांच्या मान्यतेने दंडाची आकारणी करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही झाली नसल्याचे आढळुन आले.
11) सदर कामास मक्तेदाराने 125 एच.पी.पंपाचे ऐवजी 240 एच.पी.चे ज्योती मेकचे पंप त्याच किंमतीत देण्याचे मान्य केल्याने मनपाने मक्तेदाराकडुन 240 एच.पी.ज्योती पंप बसवुन घेतले, परंतु सदर भवानी पेठ पाणी पुरवठा केंद्रावर पुर्वीचे 125 एच.पी. पंपाची मशिनरी होती व पुर्वगणन पत्रक व निविदेनुसार 125 एच.पी.पंप बदलणे हे काम असताना 240 एच.पी.बसविणेचे काम केल्याने मनपास मोटार, व्हाल्व, जॉइन्टस, व इलेक्ट्रीक साहित्य यावर जादा खर्च करावा लागला किंवा कसे तसेच केवळ मक्तेदार 125 एच.पी. पंपाचे किंमतीत 240 एच.पी. चे पंप देणार म्हणुन ते घेतल्याने मनपास काय फायदा झाला याची खात्री लेखा परीक्षणास करता आली नाही
12) सदरचे काम तांत्रिक स्वरुपाचे असल्याने सदर कामाची तांत्रिक तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. तरी तपासणी करुन घेऊन अहवाल लेखापरीक्षणास सादर करुन खात्री पटविणे आवश्यक आहे.

DATRNDM7201 (Ref No : 152, Hmm No : 38)

## *61 बांधकाम परवानगी मंजूर करतांना जमीन विकास शुल्काची रक्कम कमी वसूल केल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : बांधकाम परवाना*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 14793.00/-

***बांधकाम परवाना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता काही केलेल्या प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करतांना जमीन विकास शुल्काची रक्कम रु.14793/- इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे. नियोजन व नगररचना( सुधारणा) अधिनियम 2010 ची अधिसूचना दि:27/12/2010 व नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई अधिसूचना क्र.टीपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि:01/03/2011 नूसार वसूल पात्र रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासन खाती जमा करावी.***

नियोजन व नगररचना(सुधारणा) अधिनियम 2010 ची अधिसूचना दि.27/12/2010 व नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई अधिसूचना क्र.टीपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि.01/03/2011 नूसार इमारत बांधकाम विकास कर रहिवास क्षेत्राकरीता शिघ्रगणक पत्रकामधील जमीन मुल्याच्या 0.5 टक्के आकारणेबाबत शासन आदेश आहेत.

बांधकाम परवाना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.44 दि. 04/08/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत. बांधकाम परवानगी मंजूर करतांना जमीन विकास शुल्काची रक्कम रु.14793/- इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर वसूल पात्र रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासन खाती जमा करावी.

| अ क्र | नाव | परवाना क्रमांक/ दिनांक | जमिन क्षेत्राफळ (.मी.चौ) | बांधकाम क्षेत्रफळ | शिघ्रगणक पत्रक दर | आकारलेली रक्कम (रुपये) | वसुलपात्र रक्कम (रुपये) | तफावत रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जवानसिंग बलवंतसिंग राठोड व इतर | 1075/ 16/3/2015 | 93 | 93 | 13540 | 2046 | 6296 | 4250 |
| 2 | स्वामीनाम शिवलिंगप्पा कोडाले | 1071/ 13/3/2015 | 93 | 92 | 13540 | 2046 | 6296 | 4250 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | सौ अनुराधा सतिश म्हेत्रे | 1065 12/3/2015 | 98 | 97 | 5450 | 2156 | 2671 | 515 |
| 4 | शिवानंद संगप्पा टाकळी | 1073/ 6/3/2015 | 119.31 | 119 | 5450 | 2640 | 3251 | 611 |
| 5 | मालकप्पा शिवलिंगप्पा कोंडले | 1050/ 9/3/2015 | 93 | 92 | 13540 | 2046 | 6296 | 4250 |
| 6 | शिवाजी कदम | 1042/ 5/3/2015 | 107 | 84 | 5450 | 2354 | 2916 | 562 |
| 7 | पोपट सोनकांबळे | 1018/ 2/3/2015 | 67.73 | 66.17 | 5450 | 1491 | 1846 | 355 |
| एकूण 14793/- | | | | | | | | |

तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे. अशा प्रकारे सदरील आर्थिक वर्षात जमीन विकास शुल्काची रक्कम वसूल न करता बांधकाम परवानगी मंजूर केली आहेत काय,याची खात्री करून महानगरपालिका मुख्यलेखपरिक्षकाच्या मान्यतेने अनियमितता दूर करावी.

DATVRKM8002 (Ref No : 21, Hmm No : 44)

## *62 बांधकाम परवानगी मंजूर करतांना इमारत बांधकाम विकास शुल्काची रक्कम कमी वसूल केल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : बांधकाम परवाना*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 51600.00/-

***बांधकाम परवाना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता काही प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करतांना इमारत बांधकाम विकास शुल्काची रक्कम रु.51600/- इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे. नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम 2010 ची अधिसूचना दि:27/12/2010 व नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई अधिसूचना क्र.टीपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि:01/03/2011 नूसार वसूल पात्र रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासन खाती जमा करावी.***

नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम 2010 ची अधिसूचना दि.27/12/2010 व नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई अधिसूचना क्र.टीपीएस-1810/85/प्र.क्र.2118/10/नवि-13 दि.01/03/2011 नूसार इमारत बांधकाम विकास कर रहिवास क्षेत्राकरीता शिघ्रगणक पत्रकामधील जमीन मुल्याच्या दोन टक्के व वाणिज्य वापरासाठी चार टक्के आकारणेबाबत शासन आदेश आहेत.

बांधकाम परवाना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासणी असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 45 दि.04/08/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

काही निवडक प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करतांना इमारत बांधकाम विकास शुल्काची रक्कम रु.51600/- इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे. वसूल पात्र रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासन खाती जमा करावी.

| अ.क्र. | मालकाचे नाव | बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक | बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) | नगरविकास विभाग अधिसुचनेनुसार शुल्क | आकारणे आवश्यक एकूण रक्कम (रुपये) | आकारलेली रक्कम (रुपये) | कमी आकारलेली वसुलपात्र रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 5 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | देवेंद्र आर . गंभिरे | /1063 12.03.2015 | 51 | 2960 | 3019 | 2244 | 775 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | श्रीमती नागुबाई मधुकर देवकर | 1056/11.03.2015 | 102.58 | 5200 | 10668 | 4514 | 6154 |
| 3 | सौ अनुराधा. म्हेत्रे.स | 1065/12.03/2015 | 97 | 4268 | 10573 | 5450 | 6305 |
| 4 | समीर अहमद मोहम्मद अली शेख | 1087/20.03.2015 | 108.26 | 5450 | 8720 | 3520 | 5200 |
| 5 | जवानसिंग बलवंतसिंग राठोड व इतर | 1075/10/03/2015. | 93 | 13540 | 25184 | 4092 | 21092 |
| 6 | प्रभु खंडू मिसाळ व इतर | 1080/18/03/2015. | 80 | 8780 | 10536 | 2640 | 7896 |
| 7 | श्री उबंराव. अप्पाराव वाघमोडे | 1061/12/03/2015 | 75.15 | 4980 | 7485 | 3307 | 4178 |
| एकूण र.रु.51600/- | | | | | | | |

तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे. अशा प्रकारे सदरील आर्थिक वर्षात जमीन विकास शुल्काची रक्कम वसूल न करता बांधकाम परवानगी मंजूर केली आहेत काय,याची खात्री करून महानगरपालिका मुख्यलेखपरिक्षकाच्या मान्यतेने अनियमितता दूर करावी.

DATVRKM8002 (Ref No : 22, Hmm No : 45)

## ***63 इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कराची कमी रक्कम वसूल केलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : बांधकाम परवाना*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 59459.00/-

***बांधकाम परवाना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता काही प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करतांना स्थानिक संस्था कराची एकूण रक्कम रु.59459/- विकासकांकडून कमी जमा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. स्थासंक-8209/प्र.क्र.65/09/नवि-34 दि.06/08/2012 अन्वये स्थानिक संस्था कराची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.***

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. स्थासंक-8209/प्र.क्र.65/09/नवि-34 दि.06/08/2012 अन्वये स्थानिक संस्था कराची रक्कम खालीलप्रमाणे आकारणी करून वसूल करणे आवश्यक आहे.
चौथ्या मजल्यापर्यंत रु.100/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र
पाचवा मजला ते सातव्या मजल्यापर्यंत रु.150/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र
सात मजल्यावरील बांधकामास रु.150/- x एकूण बांधकामाचे क्षेत्र

बांधकाम परवाना विभागामधील काही निवडक प्रकरणे तपासणी असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 46 दि.04/08/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत. निवडक प्रकरणे तपासणी असता स्थानिक संस्था कराची एकूण रक्कम रु.59459/- विकासकांकडून कमी जमा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. वसूल पात्र रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासन खाती जमा करावी.

**<u>इमारत बांधकाम स्थानिक संस्था कराच्या वसुलीचे विवरणपत्रक</u>**

| **अ.क्र.** | नाव | परवाना क्रमांक | दिनांक | जमिन क्षेत्राफळ (चौ.मी) | बांधकाम क्षेत्रफळ (चौ.मी.) | वसूल रक्कम (रुपये) | वसुलपात्र रक्कम (रुपये) | तफावत रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शंकर भाऊराव जाधव | 1084 | 20-03-15 | 0 | 28.58 | 0 | 2858 | 2858 |
| 2 | पुष्पा गोपाळ कान्हा | 1077 | 17-03-2015 | 0 | 106 | 0 | 10600 | 10600 |
| 3 | स्वामीनाम शिवलिंगप्पा कोडाले | 1071 | 13-03-2015 | 93 | 92 | 0 | 9200 | 9200 |
| 4 | विश्वनाथ विरपाक्षप्पा लोणी | 1093 | 24-03-2015 | 0 | 44.22 | 0 | 4422 | 4422 |
| 5 | गजानान मोहनसा पवार व इतर | 1107 | 22-03-2015 | 100 | 92 | 0 | 9200 | 9200 |
| 6 | कल्पना जाधव | 1086 | 20-03-2015 | 0 | 26.27 | 0 | 2627 | 2627 |
| 7 | चंद्रकांत व्यंकट बिराजदार | 1079 | 18-03-2015 | 0 | 37.84 | 0 | 3784 | 3784 |
| 8 | विदयाधर विनायक माने | 1076 | 10-03-2015 | 112 | 110 | 0 | 11000 | 11000 |
| 9 | महादेवी बा . लोधर | 1036 | 04-03-2015 | 0 | 57.68 | 0 | 5768 | 5768 |
| **एकूण 59459/-** | | | | | | | | |

तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे. अशा प्रकारे सदरील आर्थिक वर्षात स्थानिक संस्था कराची रक्कम  वसूल न करता बांधकाम परवानगी मंजूर केली आहेत काय,याची खात्री करून महानगरपालिका मुख्यलेखपरिक्षकाच्या मान्यतेने अनियमितता दूर करावी.

DATVRKM8002 (Ref No : 23, Hmm No : 46)

## *64 बांधकाम परवानगी मंजूर करतांना कामगार कल्याण उपकर रक्कम कमी वसूल केल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : बांधकाम परवाना मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 117579.00/-

***उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दि. 17/06/2010 नुसार बांधकामाचे मुल्यावर 1 टक्का उपकर वसुल करावयाचा आहे. परंतु सोलापूर मनपाने बांधकाम वापर परवानाधारकाकडून बांधकामाच्या मुल्याच्या 1 टक्का उपकर वसुल केलेला नाही. काही निवडक प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करतांना कामगार कल्याण उपकर रक्कम रु. 117579/- इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे. वसूल पात्र रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासन खाती जमा करावी.***

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ दि. 17/06/2010 नुसार बांधकामाचे मुल्यावर 1 टक्का उपकर वसुल करावयाचा आहे. परंतु सोलापूर मनपाने बांधकाम वापर परवानाधारकाकडून बांधकामाच्या मुल्याच्या 1 टक्का उपकर वसुल केलेला नाही. बांधकाम परवाना विभागातील मंजूर बांधकाम परवानगीचे निवडक प्रकरणे तपासली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.47 दि. 04/08/2017 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत. काही निवडक प्रकरणांत बांधकाम परवानगी मंजूर करतांना कामगार कल्याण उपकर रक्कम रु. 117579/- इतकी कमी वसूल केली असल्याचे निदर्शनास आले आहे. वसूल पात्र रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासन खाती जमा करावी.

उपकर निर्धारणाच्या आदेशानुसार उपकराची रक्कम न भरल्यास असे मालक उपकराच्या रक्कमेवर प्रतिमहा किंवा ज्या तारखेपासून उपकर भरण्यास पात्र आहेत अशा तारखेपासून 2 टक्के व्याजाची रक्कम वसुल करुन शासनास जमा करण्यात यावी. तसेच याप्रमाणे इतर प्रकरणांतदेखील अनियमितता झाली असल्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | नाव | परवाना क्रमांक | दिनांक | जमिन क्षेत्राफळ (.मी.चौ) | बांधकाम क्षेत्रफळ (.मी.चौ) | आकारलेली रक्कम (रुपये) | वसुलपात्र रक्कम (रुपये) | तफावत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | समीर अहमद मोहम्मद अली शेख | 1087 | 20-03-015 | 0 | 80 | 8800 | 17600 | 8800 |
| 2 | कविता नंदकुमार धुमाळ चेअरमन राज्य सारथी गृह संस्था मर्या. | 1057 | 11-03-015 | 115 | 102.65 | 5124 | 10248 | 5124 |
| 3 | विश्वनाथ विरपाक्षप्पा लोणी | 1093 | 24-03-015 | 0 | 44.22 | 5195 | 9728 | 4533 |
| 4 | पांडुरंग धोडोसा हबिब | 1095 | 24-03-015 | 88 | 87 | 9570 | 19140 | 9570 |
| 5 | दिपक सर्वगोड | 1094 | 24-03-015 | 55.75 | 49.53 | 5448 | 10896 | 5448 |
| 6 | सुनील वीरप्पा होण्पारखे | 1068 | 23-03-015 | 181.44 | 88 | 0 | 19360 | 19360 |
| 7 | विनायक रामचंद्र | 1055 | 11-03-015 | 0 | 29 | 3190 | 6380 | 3190 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पतंगे | | | | | | | |
| 8 | कृष्णाहरी लबोडा. | 1041 | 05-03-015 | 69.3 | 49.89 | | 10976 | 10976 |
| 9 | शिवाजी कदम | 1042 | 05-03-015 | 107 | 84 | 9240 | 18480 | 9240 |
| 10 | सुर्यकांत लवंगे | 1091 | 23-03-015 | 0 | 74.17 | 8159 | 16317 | 8158 |
| 11 | मारुती हजारे | 1002 | 02-03-015 | 216 | 189 | 20790 | 41580 | 20790 |
| 12 | पुरूषोत्तम देशपांडे | 1123 | 27-03-015 | 0 | 63 | 6930 | 13860 | 6930 |
| 13 | मनेमाय यादेय्या | 1120 | 26-03-015 | 0 | 49.82 | 5500 | 10960 | 5460 |
| एकूण 117579/- | | | | | | | | |

अशा प्रकारे सदरील आर्थिक वर्षात कामगार कल्याण उपकर रक्कम व व्याज वसूल न करता बांधकाम परवानगी मंजूर केली आहेत काय,याची खात्री करून महानगरपालिका मुख्य लेखपरिक्षकाच्या मान्यतेने अनियमितता दूर करावी.

DATVRKM8002 (Ref No : 24, Hmm No : 47)

## *65 सोलापूर महानगरपालिकेच्या 2014-15 या आर्थिक वर्षाच्या विना परवाना इमारतींच्या कर निर्धारण प्रकरणांना मालमत्ता कराच्या शास्तीची आकारणी न केलेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 66742.00/-

***सोलापूर मनपा हद्दीतील कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता विना परवाना बांधकाम इमारतींना कराची आकारणी करताना कराच्या रक्कमेवर शास्तीची आकारणी करणे आवश्यक असताना आकारणीच्या वेळी करयोग्य मूल्यामध्ये (ARV) पुन्हा करयोग्य मूल्याइतकी रक्कम समाविष्ट करून येणाऱ्या ARV रक्कमेवर कराची रक्कम आकारणी केली. त्यामुळे कराच्या रक्कमेवर शास्तीची आकारणी केलीच गेली नाही. त्यामुळे निवडक प्रकरणातील मार्च 2017 अखेर वसूलपात्र रक्कम रु.66,742/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. त्याप्रमाणेच इतर प्रकरणांची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षक विभागाकडून कमी आकारणी केलेल्या प्रकरणांची वसुली करून सदरची अनियमितता दूर करावी. तसेच सफाईपट्टी, शिक्षण कर, रोजगार हमी कर, व इतर कराची फरकाच्या रक्कमेची परिगणना करून रक्कम वसूल करावी.***

सोलापूर महानगरपालिकेकडील कर संकलन विभागाच्या वित्तीय वर्ष 2014-15 या आर्थिक वर्षातील कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता काही अनियमितता आढळुन आल्या. सदरच्या आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास क्रमांक 86 दि.23/11/2017 व सुधारित अर्धसमास क्रमांक 115 दि.20/01/2018 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणतेही अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267 अ नुसार जी बांधकामे अवैध आहेत, अशा बांधकामांना मालमत्ता कर व कराच्या दुप्पट इतकी शास्ती अशी आकारणी करण्यात यावी अशी तरतूद आहे. शास्तीची रक्कम हि मिळकतदाराकडून देय असलेल्या मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारित करण्यात येवून ती गोळा करण्यात यावी. अशी अवैध बांधकामे हि ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत तोपर्यंत शास्तीच्या रक्कमेसह कराची रक्कम वसूल करण्यात यावी अशी तरतूद आहे. त्यानुसार सोलापूर मनपा हदीत्तील कर निर्धारण प्रकरणांची तपासणी केली असता विना परवाना बांधकाम इमारतींना कराची आकारणी करताना कराच्या रक्कमेवर शास्तीची आकारणी करणे आवश्यक असताना आकारणीच्या वेळी करयोग्य मूल्यामध्ये (ARV) पुन्हा करयोग्य मूल्याइतकी रक्कम समाविष्ट करून येणाऱ्या ARV रक्कमेवर कराची रक्कम आकारणी केली. त्यामुळे कारच्या रक्कमेवर शास्तीची आकारणी केलीच गेली नाही. कराची आकारणी हि ज्या तारखेपासून लागू करण्यात आली आहे त्या तारखेपासून ती अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत तोपर्यंत शास्तीच्या रकमेची परिगणना करून कराची वसुली करण्यात यावी. खाली नमूद उदाहरणादाखल प्रकरणांमध्ये विना परवाना बांधकाम इमारतींना कराची शास्ती आकारणी केली नसल्याने ती आकारून संबंधित मिळकतदाकडून वसुल करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणेच इतर प्रकरणांची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षक विभागाकडून कमी आकारणी केलेल्या प्रकरणांची वसुली करून सदरची अनियमितता दूर करावी.

| अ.क्र. | मिळकतदाराचे नाव | कर आकारणी केल्याचा दिनांक | शास्तीसह विना परवाना बांधकामास वार्षिक कर आकारावयाची रक्कम रु. | शास्तीसह वार्षिक कर आकारणी केलेली रक्कम रु. | वार्षिक वसूलपात्र फरक रक्कम रु. | एकूण वसूलपात्र रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | मुसा राहिमानसाब सय्यद. द.हु.नंबर- 202. दि.13/03/15. | 2014/04/01 | 19320 | 6440 | 12880 | 38640 |
| 2. | व्यंकटेश सुर्यनारायण विडप. द.हु.नंबर-203. दि.13/03/15. | 2010/04/01 | 5406 | 1802 | 3604 | 25228 |
| 3. | लक्शीमन यादगिरी यनगदुल द.हु.नंबर-205. दि.13/03/15. | 2015/04/01 | 2256 | 752 | 1504 | 3008 |

मार्च 2017 अखेर एकूण वसूलपात्र रक्कम रु.66,742/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. तसेच सफाईपट्टी, शिक्षण कर, रोजगार हमी कर, व इतर कराची फरकाच्या रक्कमेची परिगणना करून रक्कम वसूल करावी.

DGPAGPM8503 (Ref No : 42, Hmm No : 115)

## *66 मोबाईल टॉवर वरील थकीत कराबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 15786432.00/-

***सोलापूर महानगरपालिकेतील कर संकलन विभागाच्या लेखापरीक्षणामध्ये विभागाने सादर केलेल्या मोबाईल टॉवरच्या थकबाकी दर्शविणाऱ्या विवरणपत्रावरुन असे निदर्शनास आले की, महापालिकाहद्दीत असलेल्या खालील वेगवेगळया 11 मोबाईल कंपन्यांच्या टॉवर मालकांकडे मार्च 2015 अखेर रकक्म रु.1,33,78,332/- एवढी रकक्म थकीत आहे. थकीत असलेली रक्कम व्याजासह वसूल होणे आवश्यक आहे.सदरची मागणी,***

***वसूली, थकबाकीची नोंदवही राष्ट्रीय लेखा संहितेतील नियम 9.13 नुसार विहीत नमुन्यात (FORM GEN 20) ठेवली नाही. मोबाईल टॉवर थकबाकी रक्कम रु.1,33,78,332/- वर 9 महीन्यासाठी 18% प्रमाणे रक्कम रु.24,08,100/- शास्ती वसूल करणे आवश्यक असताना शास्ती वसूल केलेली नाही. रक्कम कोणत्या तारखेला प्राप्त झाली (रोख/ चेकने) यांची नोंद रजिस्टरमध्ये घेण्यात आलेली नाही. रजिस्टर मध्ये सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या नाही.***

सोलापूर महानगरपालिकेतील कर संकलन विभागाच्या लेखापरीक्षणामध्ये विभागाने सादर केलेल्या मोबाईल टॉवरच्या थकबाकी दर्शविणाऱ्या विवरणपत्रावरुन असे निदर्शनास आले की, महापालिका हद्दीत असलेल्या खालील वेगवेगळया 11 मोबाईल कंपन्यांच्या टॉवर मालकांकडे मार्च 2015 अखेर रक्कम रु.1,33,78,332/- रककम थकीत आहे. थकीत असलेली रक्कम व्याजासह वसूल होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | टॉवर संख्या | मोबाईल कंपनीचे नांव | मागील थकबाकी बाकी रु. | चालू मागणी 2013-14 | एकूण रु. | 2013-14 मधील वसूली | एकूण थकबाकी रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 22 | भारत संचार निगम | 3263612 | 695972 | 3959584 | 0 | 3959584 |
| 2. | 19 | रिलायन्स टॉवर | 646291 | 1447428 | 2093719 | 2093719 | 0 |
| 3. | 22 | भारती एअरटेल | 499415 | 1023566 | 1522981 | 1105193 | 417788 |
| 4. | 10 | इंडस टॉवर | 784445 | 806741 | 1591186 | 1274041 | 317145 |
| 5. | 4 | वोडाफोन | 4080 | 296953 | 301033 | 164009 | 137024 |
| 6 | 10 | हचसन एस. आर. | 884078 | 658622 | 1542700 | 1542700 | 0 |
| 7. | 4 | टाटा टेली सर्विसेस | 185610 | 177300 | 362910 | 0 | 362910 |
| 8. | 1 | क्विपो टॉवर | 352263 | 51452 | 51452 | 0 | 403715 |
| 9. | 22 | टी. टी.इन्प्फो सव्हीसेस | 0 | 1707894 | 1707894 | 0 | 1707894 |
| 10 | 14 | 21St.सेंच्युरीइन्फा.टेली. | 0 | 1188016 | 1188016 | 0 | 1188016 |
| 11 | 1 | हयोम नेटवर्क | 0 | 63218 | 63218 | 0 | 63218 |
| 12 | 8 | जी.टी. एल.इन्फ्रा. | 3510470 | 840024 | 4350494 | 0 | 4350494 |
| 13 | 3 | इंडीया टेलीकॉम इन्फ्रा. | 3070 | 194773 | 197843 | 197843 | 0 |
| 14 | 4 | एस्सार टेलीकॉम इन्फ्रा. | 0 | 288200 | 288200 | 288200 | 0 |
| 15. | 1 | ATC टेलीकॉम | 223220 | 167644 | 390864 | 390864 | 0 |
| 16. | 4 | टॉवर व्हिजन इंडीया | 454573 | 225818 | 680391 | 680390 | 0 |
| 17 | 1 | ऐअरसेल | 470544 | 0 | 0 | 0 | 470544 |
| | | एकूण बेरीज | | | | | **13378332** |

1. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये क्विपो टॉवर, 266 बेगम पेठ मिळकत क्र.220733 श्री.महम्मद आदम खैरदी यांचेकडे वित्तीय वर्ष 2013-14 ची रक्कम रु.352263/- थकीत असतांना त्यांची वसूली न करता टॉवर बंद असल्याची नोंद दाखवीलेली आहे. याबाबत स्पष्टीकरण सादर केलेले नाही.
2. इंडीया टेलीकॉम इन्फ्रा. यांचेकडे सन 2013-14 मध्ये थकीत रक्कम निरंक दाखविलेली आहे. परंतु वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये मागील बाकी रक्कम रु.3070/- दाखविलेली आहे. सदरच्या विसंगतीबाबत स्पस्टीकारण सादर केलेले नाही.
3. मिळकत क्र.192531 गुलमोहर अपार्टमेंट येथील ऐअरसेल च्या मोबाईल टॉवरची वित्तीय वर्ष 2013-14 मधील थकबाकी रक्कम रु.470544/- असताना वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये थकबाकीची रक्कम रजिस्टरमध्ये दाखवण्यात आलेली नाही.
4. वोडाफोन टॉवर मधील मिळकत क्र.168812 गंगाबाई यलप्पा कदर येथील वोडाफोन टॉवरची सन 2013-14 मधील थकबाकी रक्कम रु.2484/- एवढी दाखविलेली आहे. परंतु वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये मागील थकबाकी दाखविलेली नाही.
5. सदरची मागणी, वसूली थकबाकीची नोंदवही राष्ट्रीय लेखा संहितेतील नियम 9.13 नुसार विहीत नमुन्यात (FORM GEN-20) ठेवली नाही.
6. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची ड प्रकरण 8 कराधान नियम 41(2) नुसार बिल सादर केल्यानंतर बिलात विनिर्दिष्ट केलेल्यादिनांकास देय रक्कम न भरल्यास 2009 च्या सुधारणा अधिनियमामधील पोट कलम 1 अन्वये प्रति महिन्यासाठी कराच्या 2 टक्के इतकी रककम शास्ती म्हणून वसूल करणे आवश्यक आहे. त्याअन्वये मोबाईल टॉवर थकबाकी रक्कम रु.1,33,78,332/- वर 9 महीन्यासाठी 18% प्रमाणे रक्कम रु.24,08,100/- शास्ती वसूल करणे आवश्यक असताना ती करण्यात आलेली नाही.
7. रक्कम वसूल करण्यात आलेल्या रक्कमेबाबतची नोंद नोंदवहीत घेण्यात आली आहे. परंतु रक्कम कोणत्या तारखेला प्राप्त झाली (रोख/चेकने) यांची नोंद रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली नाही.
8. रक्कम वसूल झाल्यानंतर थकबाकी किती आहे यांची नोंद रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली नाही.
9. वित्तीय वर्ष 2013-14 या वर्षात थकबाकी रककम रु.1,07,40,202/- असतांना वित्तीय वर्ष 2014-15 या वर्षात मागील वर्षाची थकबाकी रु.1,04,56,380/- एवढी दाखविलेली आहे. त्यामूळे रु.2,83,822/- एवढी रक्कम कमी दिसत असून सदरच्या रक्कमेच्या तफावतीबाबत स्पष्टीकरण सदर केलेले नाही.
10. रजिस्टरमध्ये सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या नाहीत.
11. रजिस्टर मधील माहीती अपूरी असल्याचे लेखापरिक्षणास दिसून आले.

एकत्रित रक्कम रु.1,57,86,432- संबधिताकडून वसूल करण्यात यावी.

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 78 दिनांक 10/11/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

वसूलपात्र रक्कम- 1. थकबाकी रु.1,33,78,332/-
2. व्याजाची रक्कम रु.24,08,100/-

## *67 करमणूक कराची रक्कम वेळीच वसूल केली नसल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***सोलापूर महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाकडून करमणूक कराची वसुली केली जाते. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये सोलापूर शहरातील सिनेमागृहाकडून करमणूक कराची वसुल केलेली रक्कम रु.1,77,120/- असल्याचे पावती पुस्तक, चलने यांच्यावरुन आढळून आली. करमणूक कराची मागणी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. मागणी नोंदवही ठेवली नसल्याने सिनेमागृह, नाट्यगृह, व्हिडीओ सेंटर इ. करमणूक कर देय असणा-या करदात्याकडे किती रक्कम थकीत आहे? यांची माहीती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाही. सोलापूर महानगरपालिका हद्दीत एकूण किती सिनेमागृहे आहेत? यांची यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाकडून करमणूक कराची वसुली केली जाते. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये सोलापूर शहरातील सिनेमागृहाकडून करमणूक कराची वसुल केलेली रक्कम रु.1,77,120/- असल्याचे पावती पुस्तके, चलने यावरुन आढळून आली. करमणूक कराची मागणी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

1)वित्तीय वर्ष 2014-15 करीता अशी मागणी नोंदवही ठेवली नसल्याचे आढळून आले. त्यामुळे कोणत्या सिनेमागृह, नाट्यगृह, व्हिडीओ सेंटर इ. करमणूक कर देय असणा-या करदात्याकडे किती रक्कम थकीत आहे यांची माहीती उपलब्ध नसल्याने लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली पावती पुस्तके व चलने यांच्या आधारे 2014-15 या वित्तीय वर्षात खालील सिनेमागृह यांचेकडून करमणूक कराची रक्कम थकीत असल्याचे निर्दशनास आलेले आहे.

| अ.क्र. | सिनेमा गृहाचे नांव | कालावधी |
|---|---|---|
| 1 | शालीमार चित्र मंदीर | फेब्रुवारी 2012 पासून |
| 2 | प्रभात चित्र मंदीर | डिसे.2014 पासून |
| 3. | भगवाण | नोव्हे.2013 पासून |

2) वसूल केलेल्या कराची तपासणी केली असता फक्त सिनेमागृहाकडील करमणूक कराची वसुली केली जात असल्याचे आढळून आले, तर नाट्यगृह, व्हिडीओ सेंटर, सर्कस इ. कडून करमणूक कर वसूल

केला जात नसल्याचे आढळून आले. तसेच सिनेमागृहाकडून वसुल करण्यात आलेला करमणूक कर हा वेळीच वसूल न करता खालीलप्रमाणे खूप उशिराने वसूल केला आहे.

| अ.क्र. | सिनेमा गृहाचे नांव | कालावधी | वसूल करण्यात आलेली रक्कम | वसूलीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | आशा | 1.12.2013 ते फेब्रु.2014 | 2340 | 29.3.2014 |
| 2 | आशा | मार्च 2014 तें जून 2014 | 2720 | 7.7.2014 |
| 3 | आशा | जुलै 2014 ते नोव्हे.2014 | 3180 | 4.12.2014 |
| 4 | आशा | डिसे.2014 ते फेब्रु.2015 | 3820 | 22.3.2014 |
| 5 | प्रभात चित्र मंदीर | 1.2.2014 ते 28.2.2014 | 1640 | 20.4.2014 |
| 6 | कल्पना | 1.5.2010 ते 31.12.2014 | 24400 | 14.7.2014 |
| 7 | लक्ष्मी नारायण स्क्रीन-1 | 1.9.2014 ते 28.2.2015 | 12100 | 17.3.2015 |
| 8 | लक्ष्मी नारायण स्क्रीन-2 | 1.9.2014 ते 28.2.2015 | 17080 | 17.3.2015 |

3) सोलापूर महानगरपालिका हद्दीत एकूण किती सिनेमागृहे आहेत ? यांची यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

4) करमणूक कराची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 77 दिनांक 10/11/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

FDSDKPM7201 (Ref No : 50, Hmm No : 77)

## *68 मोठ्या निवासी कराच्या वसुलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : कर संकलन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 2340295.00/-

***मोठ्या निवासी इमारत नोंदवहीमध्ये नोंदविलेली 261 प्रकारणांची लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर केली नाहीत. मनपा वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रक्कम रु.52,036/- वसुल केलेल्या रकमा शासनास लेखापरिक्षण कालावधी माहे. नोव्हेंबर 2017 अखेर जमा केलेले नाहीत. मोठ्या निवासी इमारत नोंदवहीतील नोंदीवरुन 2014-15 या अर्थिक वर्षाअखेरीस रक्कम रु.23,40,295/- इतकी थकीत असुन ती वसुल करण्यात आलेली नाही. मोठ्या निवासी कराची वसुल करण्यात आलेल्या रकमा ह्या आयसीआयसीआय बँक खात्यातील दि.31/03/2015 अखेरची रक्कम रु.6,41,088/- इतकी शासनास जमा न करता शिल्लक ठेवण्यात आल्या आहेत.***

मनपाचे कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मोठ्या निवासी कराच्या नोंदवहीमधील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.81 दि.18/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतीवरील कर अधिनियम, 1979 मधील नियम 3 नुसार मनपा क्षेत्रात असणारे 150 चौ.मी. निवासी इमारतीचे करयोग्य मुल्याच्या 10 टक्के रक्कम दरानुसार कराची आकारणी करण्यात यावी अशी तरतूद आहे. त्यानुसार सोलापूर मनपा क्षेत्रात 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये मोठ्या निवासी इमारत नोंदवहीची तपासणी केली असता त्यामध्ये 261 प्रकारणांची नोंद करण्यात आलेची आढळुन आली आहेत. सदर प्रकरणांची तपासणीसाठी मागणी केली असता लेखा परिक्षणास सादर केली नाहीत. त्यामुळे नोंदवहीमध्ये नमूद केलेली मोठ्या निवासी कराची रक्कम बरोबर असल्याची खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमरतीवरील कर अधिनियम, 1979 मधील नियम 14(1) नुसार वसुल केलेल्या कराच्या रकमा ह्या वसुल केल्याच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या कालावधीत राज्य शासनास जमा करणे आवश्यक आहे. सोलापूर मनपा वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रक्कम रु.52,036/- वसुल केलेल्या रकमा शासनास लेखापरिक्षण कालावधी माहे. नोव्हेंबर 2017 अखेर जमा केलेले नाहीत.

3) मोठ्या निवासी इमारत नोंदवहीतील नोंदीवरुन 2014-15 या अर्थिक वर्षाअखेरीस रक्कम रु.23,40,295/- इतकी थकीत असुन ती वसुल करण्यात आलेली नाही.

4) वसुल करण्यात आलेल्या रकमा ह्या आयसीआयसीआय बँक खात्यात जमा केल्या आहेत. सदर खात्यामध्ये दि.31/03/2015 अखेर रक्कम रु.6,41,088/- इतकी शिल्लक आहेत. सदरच्या रकमा ह्या महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमरतीवरील कर अधिनियम, 1979 मधील नियम 14 नुसार शासनास जमा करुन त्याबाबतचे महीतीचे विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत शासनास सादर करणे आवश्यक आहे. सदरच्या रक्कमा ह्या शासनास जमा न करता बँके खात्यामध्ये जमा करुन ठेवण्यात आल्या आहेत. याबाबत मनपाने कोणतीच कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही हे

नियमबाह्य आहे. तरी प्रलंबित मोठ्या निवासी कराची रक्कम शासनास विवरणपत्रांसह त्वरित अदा करणे आवश्यक आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 59, Hmm No : 81)

## *69 वित्तीय वर्ष 2014-15मधील पाणीपट्टी थकबाकी बाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***आर्थिक वर्ष 2014-15 या कालावधीमध्ये पाणीपट्टीची थकबाकी रक्कमेमध्ये वाढ झाल्याचे आढळून आले. वर्ष 2013-14 अखेर थकबाकी रक्कम रु.493890794/- एवढी होती, ती 2014-15 अखेर रक्कम रु.553675023/- झाल्याने थकबाकीमध्ये रक्कम रु.59784229/- एवढी वाढ झाली आहे. पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी, अधिकारी यांचे वेतन व भत्त्यावर, लाईट बील, मेटेंनन्स, पाणीपुरवठा योजना, कर्जे त्यांचे व्याज, परतावा यावर वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये किती खर्च करण्यात आलेला आहे, याबाबतची माहिती विभागाने सादर केलेली नाही. पाणीपट्टीचे वित्तीय वर्ष 2014-15 चे एकूण उद्दिष्ट किती होते, त्यापैकी प्रत्यक्षात किती रक्कम वसूल करण्यात आलेली आहे व किती रक्कम थकीत या बाबतची माहिती विभागाकडून सादर केलेली नाही. मीटर विभागाचे वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये पाणीपट्टी चे एकूण उद्दिष्ट रक्कम रु.126408304/- एवढे असताना रक्कम रु.93689754 /- एवढीच वसुली झाली असून रक्कम रु.32718559/- थकबाकी असल्याचे दिसून येत आहे. मीटर विभागाकडून एकूण वसुली उद्दिष्टाच्या 76% पेक्षा कमी असल्याचे दिसून आलेले आहे. पाणी पुरवठा विभागाचे पाणी लेखापरीक्षण (वॉटर ऑडीट) करण्यात आले होते किंवा कसे? याबाबतची माहिती विभागाकडून सादर करण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकचे शहर व हद्दवाढ भागामधील पाणीपट्टी मागणी, वसुली व थकबाकी यांचा आढावा घेतला असता काहि अनियमितता आढळुन आल्या असल्याने या संदर्भात अर्ध समास पत्र क्र. 95 दि.12/12/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता त्याचे अनुपालन विभागाने सादर केले नाही. त्यामुळे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) आर्थिक वर्ष 2014-15 या कालावधीमध्ये पाणीपट्टीची थकबाकी रक्कमेमध्ये खालीलप्रमाणे वाढ झाल्याचे आढळून आले. वर्ष 2013-14 अखेर थकबाकी रु.493890794/- एवढी होती, ती 2014-15 अखेर रु.553675023/- झाल्याने थकबाकीमध्ये रक्कम रु.59784229/- एवढी वाढ झाली आहे.

2) पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी, अधिकारी यांचे वेतन व भत्त्यावर, लाईट बील, मेटेंनन्स, पाणीपुरवठा योजना,कर्जे त्यांचे व्याज, परतावा यावर सन 2014-15 मध्ये किती खर्च करण्यात आलेला आहे या बाबतची माहिती सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने याबाबतची माहिती सादर केलेली नाही.

3) शहर व हद्दवाढ विभागाचे पाणीपट्टी चे वित्तीय वर्ष 2014-15 चे एकूण उद्दिष्ट किती होते, त्यापैकी प्रत्यक्षात किती रक्कम वसूल करण्यात आलेली आहे व किती रक्कम थकीत आहे. या बाबतची माहिती सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने याबाबतची माहिती सादर केलेली नाही.

4) आकारणी करसंकलन कार्यालय मीटर विभागाकडून प्राप्त माहिती नुसार वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये मीटर विभागाचे पाणीपट्टी चे एकूण उद्दिष्ट रक्कम रु.126408304/- एवढे असताना रक्कम रु.93689754/- एवढीच वसुली झाली असून रक्कम रु.32718559/- थकबाकी असल्याचे दिसून येत आहे. मीटर विभाकडून एकूण वसुली उद्दिष्टाच्या 76%पेक्षा कमी वसुली असल्याचे दिसून आलेले आहे.

5) शहर व हद्दवाढ विभागातील 1 इंच पेक्षा जास्त नळ आकाराच्या बाबतीतील वित्तीय वर्ष 2014-15 यावर्षामध्ये पाणपट्टी मागणी किती होती? त्यापैकी वसुली किती झाली? व मार्च 2015अखेर थकबाकी किती आहे. तसेच सदर 1 इंचापेक्षा जादा आकारमान मीटर संख्या,वापर प्रकार,बंद मीटर चालु मीटर संख्या इ. माहिती सादर करण्यात आलेली नाही.

6) मुख्यलेखापाल कार्यालयाकडे प्रत्येक विभागाचे खर्चाचे व जमेची हिशोब असल्याने वित्तीय वर्ष 2014-15 या वित्तीय वर्षात पाणी पुरवठा विभागाचा प्रत्यक्ष खर्च व प्रत्यक्ष जमा किती याबाबची माहिती मुख्यलेखापाल कार्यालयाकडून सादर करण्यात आलेली नाही.

7) पाणी पुरवठा विभागाचे वित्तीय वर्ष 2014-15 या वित्तीय वर्षाचे पाणी लेखापरीक्षण (वॉटर ऑडीट) करण्यात आले होते किंवा कसे ? याची याबाबतची माहिती सादर करण्यात आलेली नाही.

FDSDKPM7201 (Ref No : 63, Hmm No : 95)

## *70 अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर मधील गाळा क्र.8 मधील अनियमित्ताबाबत.... .*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| ***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79(क) अन्वये आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल अशी तरतुद असताना व सदरचे*** |

***अधिकार महासभेस असल्याने स्थायी समितीच्या मान्यतेने नियमबाह्यपणे अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर मधील गाळा क्र.8 जागा भाड्याने देण्यात आलेली आहे. प्रशासनाने गाळा ताब्यात घेऊन पुन्हा लिलाव पद्धतीने देणे आवश्यक असताना श्री.नितीन रा. गायकवाड यांनी श्री भालचंद्र अर्जुनदास अहुजा यांना हस्तांतरित केला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) नुसार जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्याने देता येईल, अन्यथा हस्तांतरित करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद असताना त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. श्री भालचंद्र अर्जुनदास अहुजा यांनी ताब्यात घेतलेल्या गाळाबाबत राहिलेल्या मुदतीकरिता करारपत्र लिहून घेतलेले नाही. तसेच दि.26/07/2007 पासूनचा गाळेभाडे करारपत्र करण्यात आलेला नाही. वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये आरंभीची शिल्लक रु.72689/- एवढी होती त्यावर 15 % प्रमाणे रु.10903/- अशी एकूण र.83592/- वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये आरंभीची शिल्लक दाखविणे आवश्यक होते व चालू मागणी रु.35544/- असे एकूण रक्कम रु.119136/- वसूल करणे आवश्यक असताना त्यापैकी वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये रक्कम रु.70000/- एवढी रक्कम वसूल केल्यामुळे रक्कम रु.49136/- वसूल करणे बाकी असल्याने त्यावर 15 % व्याज रु.7370/- व 2014-15 ची चालू मागणी रु.35544/- असे एकूण रक्कम रु 92050/- वसूल करणे आवश्यक असताना त्यापैकी वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रक्कम रु.120000/- एवढी रक्कम वसूल केल्यामुळे रक्कम रु.27950/- जादा वसूल केलेली असून वित्तीय वर्ष 2014-15 च्या मागणी रजिस्टर मध्ये रु.46223/- एवढी रक्कम बाकी असल्याचे दाखविण्यात आलेले आहे.***

सोलापूर महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर मधील असलेल्या गाळा क्र.8 व 27 हि दोन गाळे स्थायी समिती दि.06/06/1997 विषय क्र.271 ठराव क्र.271 अन्वये मागासवर्गीयसाठी राखीव ठेवण्यास मान्यता दिलेली असल्याने श्री. नितीन रा. गायकवाड यांना 217.00 चौ.फु. असलेला गाळा क्र.8 दि.26/08/1997 ते दि.25/07/2007 ह्या 9 वर्ष 11 महिने कालावधी करिता भाडे पट्टाकरारावर देण्यात आला. याबाबतच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता त्यात काही त्रृटी आढळून आल्या असल्याने याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 131 दिनांक 16/03/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

1. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79(क) अन्वये आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल अशी तरतुद असताना व सदरचे अधिकार महासभेस असताना स्थायी समितीच्या मान्यतेने नियमबाह्यपणे सदरची जागा भाड्याने देण्यात आलेली आहे.
2. सदर गाळा श्री भालचंद्र अर्जुनदास अहुजा यांना हस्तांतरित करण्याबाबत श्री. नितीन रा. गायकवाड यांनी अर्ज केल्यप्रमाणे स्थायी समिती दि.26/8/2005 विषय क्र.592 ठराव क्र.592 अन्वये राहिलेल्या दि.25/7/2007 पयंत श्री भालचंद्र अर्जुनदास अहुजा यांना हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. प्रशासनाने गाळा ताब्यात घेऊन पुन्हा लिलाव पद्धतीने देणे आवश्यक असताना श्री. नितीन रा. गायकवाड यांनी श्री

भालचंद्र अर्जुनदास अहुजा यांना हस्तांतरित केला आहे. अशा परस्पर केलेल्या हस्तांतरास स्थायी समितीची नियमबाह्य रित्या मान्यता घेतल्याने महानगरपालिका ची ऑक्युपंशी प्राईस मुळे येणा-या जादा रकमेची तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) नुसार जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्याने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतरित करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतुद असताना त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

3. श्री भालचंद्र अर्जुनदास अहुजा यांनी ताब्यात घेतलेल्या गाळाबाबत राहिलेल्या मुदतीकरिता करारपत्र लिहून घेतलेले नाही. तसेच दि.26/07/2007 पासूनचा गाळेभाडे करारपत्र करण्यात आलेला नाही. हे नियमबाह्य आहे.

4. गाळाभाड्याने देताना त्यांचेकडून करारपत्र करून घेण्यात आलेले असून, त्यातील अट क्र.4 प्रमाणे गाळे धारकांनी दरमहा 10 तारखेपर्यंत भाडे भरणे आवश्यक आहे व अट क्र.5 अन्वये सदर गाळ्याचे भाडे मुदतीत न भरल्यास भाड्याची रक्कम भरे पर्यंत द.स.द.शे. 15 टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम आकारणेत येईल अशी अट असल्याने त्याप्रमाणे वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये आरंभीची शिल्लक रु.72689/- एवढी होती, त्यावर 15 % प्रमाणे रु.10903/- अशी एकूण र.83592/- वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये आरंभीची शिल्लक दाखविणे आवश्यक होते व चालू मागणी रु.35544/- असे एकूण रक्कम रु.119136/- वसूल करणे आवश्यक असताना त्यापैकी वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये रक्कम रु.70000/- एवढी रक्कम वसूल केल्यामुळे रक्कम रु.49136/- वसूल करणे बाकी असल्याने त्यावर 15 % व्याज रु.7370/- आकारून 2014-15 ची चालू मागणी रु.35544/- असे एकूण रक्कम रु 92050/- वसूल करणे आवश्यक असताना त्यापैकी वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये रक्कम रु.120000/- एवढी रक्कम वसूल केल्यामुळे रक्कम रु.27950/- आगाऊ भरणा वसूल केलेली असून, वित्तीय वर्ष 2014-15 च्या मागणी रजिस्टर मध्ये रु.46223/- एवढी रक्कम आगाऊ भरणा असल्याचे दाखविण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात रक्कम रु.27,950/- आगाऊ भरणा दाखवने आवश्यक होते.

FDSDKPM7201 (Ref No : 79, Hmm No : 131)

## *71 महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर (रोजगार हमी कर) शासनाकडे विलंबाने जमा केल्याबाबत.......*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 86943879.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 6208975.00/-

***सोलापूर महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती करची रक्कम***

***रुपये 3720012/- एवढी रक्कम शासनाकडे जमा करण्याचे प्रलंबित असल्याचे आढळून येते. नौकर शाश्वती कराची शहर विभागाकडून जमा केलेली जुलै 2014 ते नोव्हेंबर 2014 या कालावधीची रक्कम रुपये 25,39,759/- जमा झालेली असून 2% रिबेट रु. 50,795/- वजा जाता रु. 24,88,963 शासनाकडे जमा होणे आवश्यक असतांना सदरची रक्कम शासनाकडे जमा झालेली आढळून येत नाही. महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर (रोजगार हमी कर) अधिनियम 1962, महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग परिपत्रक क्र- ईडीसी-1097/प्र.क्र.205/ल-5, मंत्रालय, मुंबई दि.03 एप्रिल 1998 नुसार जमीन व इमारती यावरील कराच्या रक्कमा ज्या आठवडयात वसूल केल्या जातात अशा रक्कमा शासकिय कोषागारात पुढील आठवडा संपण्याच्या आत भरणा करावयाचा आहे. जी नगरपालिका शासकिय कोषागारापासून आठ कि. मी. पेक्षा जास्त अंतरावर असेल अशा नगरपालिकेने वसूल केलेल्या रक्कमा नगरपालिकेचे बँक खात्यात भरून पुढील महिन्याच्या 07 तारखेच्या आत शासकिय कोषागारात भरणा करणे आवश्यक असताना विलंबाने शासनाकडे भरणा करण्यात आलेला आहे.***

सोलापूर महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये शहर विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षणकर रु.5,03,28,644/- व नौकर शाश्वती कर रू. 36,61,714/- वसुल केला आहे. व हद्दवाढ विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षणकर रु.3,00,73,729/- व नौकर शाश्वती कर रु.28,79,792/ वसुल केला आहे. परंतु त्याचा भरणा शासन तिजोरीत खालील प्रमाणे विलंबाने केला असल्याचे आढळून आले त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-94 दि.06/12/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून अनुपालन प्राप्त न झाल्याने खालील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहेत.

महानगरपालिकेने वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये शहर विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षणकर रु.5,03,28,644/- व नौकर शाश्वती कर रू. 36,61,714/- वसुल केला आहे. व हद्दवाढ विभागातील मालमत्ता करदात्याकडून महाराष्ट्र शिक्षण कर रु.3,00,73,729/- व नौकर शाश्वती कर रु.28,79,792/ वसुल केला आहे. परंतु त्याचा भरणा शासन तिजोरीत खालील प्रमाणे विलंबाने केला असल्याचे आढळून आले

(अ ) महाराष्ट्र शिक्षण कर - वित्तीय वर्ष-2014-15

| अ.क्र. | विभाग | कालावधी | वसूल रक्कम | रिबेट | 2 टक्के रिबेट वजा जाता शासनास जमा केलेली रक्कम | शासनास रक्कम जमा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शहर विभाग | एप्रिल-14 ते जून-14 | 15971368 | 399428 | 15651940 | 04/12/2014 |
| 2 | शहर विभाग | जुलै-14 (पैकी) | 8897972 | 000 | 5000000 | 08/12/2015 |
| 3 | शहर विभाग | जुलै-14 ते | 12518943 | 350379 | 12168564 | 16/01/2015 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नोव्हेम्बर-14 | | | | |
| 4 | शहर विभाग | डिसेंम्बर-14 ते जानेवारी-15 | 5339139 | 106791 | 5232748 | 11/02/2015 |
| 5 | शहर विभाग | फेब्रुवारी-15 | 1938040 | 38761 | 1899279 | 03/03/2015 |
| 6 | शहर विभाग | मार्च-15 | 2924094 | 58482 | 2865612 | 27/03/2015 |
| 7 | शहर विभाग | मार्च-15 | 2739088 | 54782 | 2684306 | 29/04/2015 |
| | एकूण बेरीज (1) | | 50328644 | 1008623 | 45502449 | |
| 8 | हददवाढ विभाग | एप्रिल-14 ते जुलै-14 | 14257315 | 285147 | 13972168 | 04/12/2014 |
| 9 | हददवाढ विभाग | ऑगस्ट-14 ते ऑक्टोंबर-14 | 5332115 | 106643 | 5225472 | 08/12/2014 |
| 10 | हददवाढ विभाग | नोव्हेंबर-14 | 1324891 | 26498 | 1298393 | 16/01/2015 |
| 11 | हददवाढ विभाग | डिसेंम्बर-14 ते जानेवारी-15 | 3526916 | 70538 | 3456378 | 11/02/2015 |
| 12 | हददवाढ विभाग | फेब्रुवारी-15 | 1981162 | 39623 | 1941539 | 03/03/2015 |
| 13 | हददवाढ विभाग | मार्च-15 | 1565760 | 31315 | 1534445 | 27/03/2015 |
| 14 | हददवाढ विभाग | मार्च-15 | 2085570 | 41711 | 2043859 | 08/05/2015 |
| | एकूण बेरीज (2) | | 30073729 | 601475 | 29472254 | |
| | एकूणबेरीज (1+2) | | 80402373 | 1610098 | 74974703 | |

(ब ) रोजगार हमी कर वित्तीय वर्ष-2014-15

| अ.क्र. | विभाग | कालावधी | वसूल रक्कम | रिबेट | 2टक्के रिबेट वजा जाता शासनास जमा केलेली रक्कम | शासनास रक्कम जमा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शहर विभाग | एप्रिल-14 ते जून-14 | 1939672 | 38794 | 1900378 | 04/12/2014 |
| | शहर विभाग | डिसेम्बर-14 ते जानेवारी-15 | 672955 | 13459 | 659496 | 11/02/2015 |
| | शहर विभाग | फेब्रुवारी-15 | 280824 | 5616 | 275208 | 03/03/2015 |
| | शहर विभाग | मार्च-15 | 407286 | 8142 | 399144 | 27/03/2015 |
| | शहर विभाग | मार्च-15 | 360977 | 7220 | 353757 | 29/04/2015 |
| | एकूण बेरीज | | 3661714 | 73231 | 3587983 | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (1) | | | | | |
| 2 | हददवाढ विभाग | एप्रिल 14 ते जुलै 14 | 1521879 | 30438 | 149441 | 4/12/2014 |
| 3 | हददवाढ विभाग | ऑगस्ट 14 ते आक्टोंबर 14 | 571142 | 11423 | 559719 | 8/12/2014 |
| 4 | हददवाढ विभाग | नोहेंबर 14 | 30871 | 617 | 30254 | 16/1/2015 |
| 5 | हददवाढ विभाग | डिसेंबर 14 ते जाने. 15 | 196719 | 3934 | 192777 | 11/2/2015 |
| | हददवाढ विभाग | फेब्रुवारी 15 | 119371 | 2387 | 116984 | 3/3/2015 |
| | हददवाढ विभाग | मार्च 15 | 39785 | 796 | 38989 | 27/3/2015 |
| | हददवाढ विभाग | मार्च 15 | 400025 | 8001 | 392024 | 8/5/2015 |
| | एकूण बेरीज(2) | | 2879792 | 57596 | 2822188 | |
| | एकूण बेरीज (1+2) | | 6541506 | 130827 | 6410171 | |

1.महाराष्ट्र शिक्षण कर व नौकर शाश्वती कर (रोजगार हमी कर) अधिनियम 1962, महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग परिपत्रक क्र- ईडीसी-1097/प्रक्र205/ल-5,मंत्रालय,मुंबई दि.03 एप्रिल 1998 नुसार जमीन व इमारती यावरील कराच्या रक्कमा ज्या आठवडयात वसूल केल्या जातात अशा रक्कमा शासकिय कोषागार पुढील आठवडा संपण्याच्या आत भरणा करावयाचा आहे. जी नगरपालिका शासकिय कोषागारापासून आठ कि. मी. पेक्षा जास्त अंतरावर असेल अशा नगरपालिकेने वसूल केलेल्या रक्कमा नगरपालिकेचे बँक खात्यात भरून पुढील महिन्याच्या 07 तारखेच्या आत शासकिय कोषागारात भरणा करणे आवश्यक असताना विलंबाने शासनाकडे भरणा करण्यात आलेला आहे.

2.शहर विभागाकडून शिक्षण कराची माहे जुलै-14 मध्ये रक्कम रु. 88,97,972/- जमा झालेली असतांना रिबेट वजा जाता रक्कम रुपये 87,20,012/-एवढी रक्कम शासनाकडे जमा होणे आवश्यक असतांना दि.08/12/2015 रोजी रक्कम रुपये 50,00,000/- जमा करण्यात आलेले आहे. त्यामुळे रक्कम रु. 3720012/- एवढी रक्कम शासनाकडे जमा करण्याचे प्रलंबित असल्याचे आढळून येते. सदरची रक्कम शासनाकडे तत्काळ जमा करावी.

3.नौकर शाश्वती कराची शहर विभागाकडून जमा केलेली माहे जुलै 2014 ते नोव्हेंबर 2014 या कालावधीची रक्कम रुपये 25,39,759/- जमा झालेली असून 2% रिबेट रु-50,795/- वजा जाता रु.24,88,963 शासनाकडे जमा होणे आवश्यक असतांना सदरची रक्कम शासनाकडे जमा झालेली आढळून येत नाही. सदरची रक्कम शासनाकडे तत्काळ जमा करावी.

एकून वसूलपात्र रक्कम रु.6208975/-

DATYMKM6601 (Ref No : 87, Hmm No : 94)

## *72 सोलापूर महानगरपालिकेच्या 2014-2015 आर्थिक वर्षाच्या विनापरवाना बांधकामाकरिता इमारतीच्या करनिर्धारण प्रकरणावर मालमत्ता शास्तीची कमी दराने आकारणी केल्याबाबत.......*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 161027.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 161027.00/-

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267(अ) नुसार जी बांधकामे अवैध आहेत. अशा बांधकामाना मालमत्ता व कराच्या दुप्पट शास्ती अशी कर आकारणी करण्यात यावी अशी तरतूद आहे. शास्तीची रक्कम मिळकतदाराकडून देय असलेल्या मालमत्ता कराची रक्क्म असल्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्धारीत करण्यात येवून ती वसूल करण्यात यावी. अशी अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यत अवैध आहेत तोपर्यत शास्तीच्या रक्कमेसह कराची रक्कम रु.1,61,027/- वसूल करण्यात यावी.***

सोलापूर महानगरपालिकेमध्ये वित्तीय वर्ष 2014-2015 ची मिळकतदाराकडून देय असलेल्या मालमत्ता कराच्या प्रकरणाची तपासणी केली असता, त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-105 दि. 29/12/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून याबाबत लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267(अ) नुसार जी बांधकामे अवैध आहेत अशा बांधकामाना मालमत्ता व कराच्या दुप्पट शास्ती अशी कर आकारणी करण्यात यावी अशी तरतूद आहे. शास्तीची रक्कम मिळकतदाराकडून देय असलेल्या मालमत्ता कराची रक्क्म असल्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतुदी अन्वये निर्धारीत करण्यात येवून ती वसूल करण्यात यावी. अशी अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यत अवैध आहेत तोपर्यत शास्तीच्या रक्कमेसह कराची रक्कम वसूल करण्यात यावी अशी तरतूद आहे. त्यानुसार सोलापूर मनपा कर निर्धारण प्रकरणाची तपासणी केली असता विना परवाना बांधकाम इमारतींना कराची आकारणी करताना कराच्या रक्कमेवर शास्तीची आकारणी करणे आवश्यक असताना आकारणीच्या वेळी करयोग्य मुल्याच्या रक्कमेवर (ARV) पुन्हा कर योग्य मुल्याइतकी (ARV) रक्कम समाविष्ट करुन येणाऱ्या रक्कमेवर मंजुर दराने कर आकारला

आहे. त्यामुळे प्रत्यक्षात शास्तीची आकारणी केली गेली नाही. कराची आकारणी ही ज्या तारखेपासून लागू करण्यात आली आहे. त्या तारखेपासून ती अवैध बांधकामे ही ज्या कालावधीपर्यंत अवैध आहेत, तोपर्यंत शास्तीच्या रक्कमेची परिगणना करून कराची वसुली करण्यात यावी. खाली नमुद उदाहरणादाखल प्रकरणामध्ये विना परवाना बांधकाम इमारतीना कराची शास्ती आकारणी केली नसल्याने ती आकारून संबंधित मिळकतराकडून रक्कम रु.1,61,027/- वसुल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणेच इतर प्रकरणाची तपासणी करून मुख्य लेखापरीक्षक विभागाकडून कमी आकारणी केलेल्या प्रकरणाची वसुली करून सदरची अनियमिता दूर करावी

| अ.क्र | मिळकत धारकाचे नाव | कर आकारणी सुरु केल्याचा दिनांक | विना परवाना बाधकामास वार्षिक कर आकारावयाची रक्कम रु | वार्षिक कर आकारणी केलेली रक्कम रु | वार्षिक वसुली व फरकाची रक्कम रु व (शास्तीची वसुलपात्र रक्कम) | एकुण वसुल पात्र रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री गोविद यशवंत अडसुळे नेहरू नगर-२ विभाग-२४ द हु न ९३ दि.१०/११/२०१४ पेठ लक्ष्मी | दि. 15/05/2014 | 17432 | 5811 | 11621 | 46484/- |
| 2. | श्री सतिश भिवा घाडगे आवासे वस्ती विभाग-२४ द हु न १०४ दि.२२/१२/२०१४ लक्ष्मी पेठ | दि.22/01/2013 | 1946 | 1351 | 595 | 2975/- |
| 3. | श्री संजय गणपत होमकर घोगडेवाडी विभाग क्र-५ द हु न 271 दि.२६/०२/२०१५ भवानी पेठ | दि.21/05/2014 | 3123 | 1405 | 1718 | 6872/- |
| 4. | श्री संजय महादेवसा बिद्री द हु न २७७ दि/१७/०३/२०१५ भवानी पेठ | दि.21/05/2014 | 2271 | 1853 | 347 | 1388/- |
| 5. | श्री राजेंद्र बसंतराव आगरकर द हु न ६६ दि/०५/१२/२०१४ बुधवार पेठ | दि.01/10/2013 | 1165 | 720 | 445 | 1780/- |
| 6. | श्री राजकुमार विष्णु लवटे जानकर नगर द हु न ९१ दि.३०/१०/२०१४ लक्ष्मी पेठ | दि.03/02/2014 | 25131 | 8377 | 16754 | 67016/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 7. | श्रीमती शकीला जाहीर पटेल मजरेवाडी नगर भिमाशंकर पेठ क्र-६४ | दि.15/01/2013 | 2562 | 854 | 1708 | 8540/- |
| 8. | श्री शरीफ अहमदसाव मनियार मजरेवाडी विजय नगर | दि.15/01/2011 | 5565 | 1855 | 3710 | 25972/- |
| | एकूण | | 59195 | 22226 | 36898 | 161027/- |

वित्तीय वर्षं 2017-2018 पर्यत एकूण शास्तीची वसुलपात्र रक्कम रु.1,61,027/- संबधीत मिळकतदाराकडून वसुल करण्यात यावी. यासारखी इतर प्रकरणाची मा.मुख्य लेखापरीक्षक विभागामार्फत तपासणी करून सदरच्या रक्कमा वसूल करण्यात याव्या.

DATYMKM6601 (Ref No : 128, Hmm No : 105)

## *73 आयकराच्या रक्कमा विलंबाने भरणा केल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 112644.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 112644.00/-

***आयकर अधिनियम 1961 कलम (A) (1) 201 नूसार वसूल केलेली रक्कम पुढील महीन्याच्या 7 तारखेपर्यंत आयकर विभागाकडे जमा करणे आवश्यक आहे. 2014-2015 या आर्थिक वर्षात संबधितांकडून वसूल करण्यात आलेल्या आयकराच्या रक्कमा आयकर विभागाकडे विलंबाने जमा करण्यात आल्याचे निर्दशनास आलेले आहे. विलंबाने भरणा केलेल्या रक्कमेवर प्रतिमहा दिड टक्के दराप्रमाणे दंडाची तरतुद असल्याने दिड टक्के प्रमाणे रक्कम रु.1,12,644/- दंडाची रक्कम वसूल करुन आयकर विभागाकडे भरणे आवश्यक आहे.***

आयकर अधिनियम 1961 कलम (A) (1) 201 नूसार वसूल केलेली रक्कम पुढील महिन्याच्या 7 तारखेपर्यंत आयकर विभागाकडे जमा करणे आवश्यक आहे. **2014-15** या आर्थिक वर्षात संबधितांकडून वसूल करण्यात आलेल्या आयकराच्या रक्कमा आयकर विभागाकडे विलंबाने जमा करण्यात आल्याचे निर्दशनास आलेले आहे. विलंबाने भरणा केलेल्या रक्कमेवर प्रतिमहा दिड

टक्के दराप्रमाणेदंडाची तरतुद आहे. आयकर भरणा करण्यास झालेला विलंब व आकारण्यात येणाऱ्या दंडाची रक्कमे बाबतचे विवरणपत्र पुढील प्रमाणे आहे.

| आयकर वसूलीचा महीना | वसूल आयकराची रक्कम | आयकर भरणा केल्याचा दिनांक | विलंब कालावधीचे दिवस | दंडाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| एप्रिल 2014 | 1078716 | 15.5.2014 | 8 | 4315 |
| ऑक्टोबर 2014 | 21354 | 2.12.2014 | 25 | 267 |
| नोव्हे.2014 | 73300 | 5.1.2014 | 27 | 990 |
| जाने.2015 | 3411066 | 20.2.2015 | 13 | 22172 |
| फेब्रुवारी 2015 | 4961069 | 17.3.2015 | 10 | 24805 |
| मार्च 2015 | 1320218 | 5.5.2015 | 27 | 17823 |
| मार्च 2015 | 148535 | 12.8.2015 | 127 | 9432 |
| मार्च 2015 | 134678 | 15.9.2015 | 128 | 8619 |
| मार्च 2015 | 41256 | 19.10.2015 | 195 | 4022 |
| मार्च 2015 | 312924 | 18.6.2015 | 72 | 11265 |
| मार्च 2015 | 40450 | 12.8.2015 | 127 | 2569 |
| मार्च 2015 | 69178 | 8.10.2015 | 184 | 6364 |
| | एकूण | | | **112644** |

वरील प्रमाणे विलंबाने भरणा केलेल्या आयकर रक्कमेवर दंडाची रक्कम वसूल करुन आयकर विभागाकडे भरणा करण्याबाबत अर्धसमास क्र.61 दिनांक 27/09/2017 अन्वये विचारणा करण्यात आली असता विभागाने दि.17/11/2017 च्या पत्रान्वये खुलासा सादर केलेला आहे. सदरचा खुलासा संयुक्तीक नसल्याने रक्कम रु.1,12,644/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 46, Hmm No : 61)

## *74 कामगार कल्याण उपकराची वसूल न करण्यात आलेली रक्कम शासनाकडे जमा करण्यात येण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 202169.00 /-

सोलापूर महानगरपालिका

वसूलपात्र रक्कम रु. 202169.00/-

***इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम 1996 व त्या अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम 1996 नुसार बांधकाम मूल्यावर 1% उपकर वसूल करण्याबाबत तरतूद आहे. उपकर उशिरा भरल्यास कलम 8 नुसार कोणताही मालक विहित केलेल्या वेळेत उपकर निर्धारणाच्या आदेशानुसार उपकराची रक्कम न भरल्यास उपकराच्या रक्कमेवर प्रतीमहा किंवा ज्या तारखेपासून उपकर भरण्यास पात्र आहेत, त्या तारखेपासून 2% व्याज भरण्यास पात्र राहीलअशी तरतूद आहे. वित्तीय वर्ष 2014-15 या वर्षामध्ये कामगार कल्याण उपकाराची रक्कम विलंबाने शासनास जमा केलेली असल्याने 2% प्रमाणे रक्कम रु.2,02,169/- एवढी व्याजाची रक्कम शासन जमा करणे आवश्यक असल्यने सदरची रक्कम वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.***

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग , महाराष्ट्र शासन , यांचे कडील शासन निर्णय क्रमांक बिसीए 2009/प्र.क्र.108/कामगार, 7-अ दिनांक 17 जून 2010 नुसार इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती ) अधिनियम 1996 व त्या अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम 1996 नुसार बांधकाम मूल्यावर 1% उपकर वसूल करण्याबाबत तरतूद आहे. उपकर उशिरा भरल्यास कलम 8 नुसार कोणताही मालक विहित केलेल्या वेळेत उपकर निर्धारणाच्या आदेशानुसार उपकराची रक्कम न भरल्यास उपकराच्या रक्कमेवर प्रतिमहा किंवा ज्या तारखेपासून उपकर भरण्यास पात्र आहेत , त्या तारखेपासून 2% व्याज भरण्यास पात्र राहीलअशी तरतूद आहे.

2014-15 या आर्थिक वर्षात उपकराची रक्कम शासनास विलंबने भरण्यात आल्याचे खालील विवरण पत्रावरुन दिसून येत असून झालेल्या विलंब दिवसाकरीता 2 टक्के प्रमाणे व्याज शासन जमा करणे आवश्यक आहे. परंतु माहे एप्रिल 2014 पासून वसूल करुन जमा करण्यात आलेल्या रक्कमाची चलने / प्रमाणके संबधित विभागाकडून प्राप्त झालेली नाही. त्यामूळे चलनाद्वारे प्रत्यक्ष शासनाकडे उपकराचा भरणा केव्हा केला यांची खात्री होत नाही. नोंदबुकची तपासणी केली असता खालील प्रमाणे उपकराचा भरण करण्यास विलंब झालेला आहे.

| उपकर वसूलीचा महिना | उपकराची रक्कम | उपकर भरणा दिनांक | विलंबकालावधीचे दिवस | व्याजाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| मे -2014 | 75217 | 22.8.2014 | 54 | 2708 |
| ऑक्टो.2014 | 3471731 | 3.12.14 | 34 | 78693 |
| नोव्हे.2014 | 1658804 | 6.2.2014 | 37 | 40917 |
| जाने.2015 | 3235216 | 23.3.2015 | 23 | 49607 |
| फेबुवारी 2015 | 2019019 | 20.4.2015 | 20 | 26920 |
| फेबुवारी 2015 | 20395 | 10.7./2015 | 101 | 1373 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मार्च -2015 | 28985 | 10.7.2015 | 101 | 1952 |
| | एकूण | | | **202169** |

सन 2014-15 या आर्थिकवर्षामध्ये कामगार कल्याण उपकाराची रक्कम विलंबाने शासनास जमा केलेली असल्याने 2% दराने व्याज रक्कम रु.2,02,169/- एवढी व्याजाची रक्कम शासन जमा करण्याबाबत अर्धसमास क्र. 63 दिनांक 27/09/2017 अन्वये विचारणा करण्यात आलेली असता विभागाने दि.17/11/2017 पत्रान्वये खुलासा सादर केलेला असून विभागाने सादर केलेला खुलासा संयुक्तीक नसल्याने व्याजाची रक्कम शासनास जमा आवश्यक असल्यने रक्कम रु. 2,02,169/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.2,02,169/-

FDSDKPM7201 (Ref No : 47, Hmm No : 63)

## *75 गौण खनिजावरील स्वामित्वधनाची वसूल करण्यात आलेली रक्कम विहीत कालावधीत शासन जमा न करणे तसेच रोखीने प्राप्त होणारी रक्कम शासनास जमा न करण्यात आल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : गौण खनिज शासन निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***महानगरपालिकेतील विविध कामावर वापर करण्यात आलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची वसूली संबधित ठेकेदाराच्या देयकातून कपात करण्यात येते. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये गौण खनिज स्वामित्वधन या शिर्षाखाली वसूल केलेली रक्कम देना बॅकेच्या खाते क्र.04141003490 धनादेशाव्दारे जमा करण्यात आलेली आहे. सादर करण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये केवळ शासनाकडे एकत्रित जमा करण्यात आलेल्या रक्कमेबाबतची नोंद नोंदवहीत घेण्यात आलेली आहे. परंतु जमा करण्यात आलेल्या रक्कमांची देयकनिहाय स्वतंत्र कपातीच्या नोंदी नोंदवही मध्ये ठेवण्यात आली नाही. गौणखनिजापोटी प्राप्त होणारी रक्कम शासनास प्रतिमहा जमा करणे आवश्यक असताना तसे केले नसल्यामूळे शासनाकडे विलंबाने रक्कम जमा केलेली आहे.***

महानगरपालिकेतील विविध कामावर वापर करण्यात आलेल्या गौण खनिजाच्या

स्वामित्वधनाची वसूली संबधीत ठेकेदाराच्या देयकातून कपात करण्यात येते. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये गौण खनिज स्वामीत्वधन याशीर्षाखाली वसूल करण्यात आलेल्या रक्कमांबाबतची नोंदवही तसेच गौण खनिजाच्या स्वामीत्वधनाची रक्कम देना बॅकेच्या खाते क्र.04141003490 दि.1.4.2014 ते मार्च 2015 पर्यंतचे विवरणपत्र तपासले असता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

1. सदर नोंदवहीची तपासणी केली असता असे आढळून आले की, मक्तेदारास प्रदान करण्यात आलेल्या देयकामधून गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची रक्कम कमी करुन देना बॅकेच्या खाते क्र.04141003490 मध्ये धनादेशाव्दारे जमा करण्यात येते त्या जमा करण्यात आलेल्या रक्कमांची देयकनिहाय स्वतंत्र कपातीच्या नोंदी नोंदवहीमध्ये ठेवण्यात आलेली नाही. सादर करण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये केवळ शासनाकडे एकत्रित जमा करण्यात आलेल्या रक्कमेबाबतची नोंद नोंदवहीत घेण्यात आलेली आहे.

2. सदर नोंदवही मध्ये दि.3.1.2012 ते दि.31.10.2014 या कालावधीतील एकूण रु.3,11,03,862/- ऐवढी रक्कम दि.28.11.2014 रोजी शासनास प्रदान करण्यात आल्याचें दिसून येत असून, देना बॅकेच्या खाते क्र.04141003490 चे विवरणपत्रात धनादेश क्र.355441 दि.2.12.2014 रोजी वटलेला असल्याचे दिसून येते. तसेच दि.1.11.2014 ते दि.28.2.2015 या कालावधीतील रक्कम रु.55,84,602/- चा धनादेश क्र.355442 दि.9.2.2015 रोजी शासनास प्रदान केले असल्याचे दिसून येत असून देना बॅकेच्या खाते क्र.04141003490 च्या विवरणपत्रात धनादेश क्र.355442 दि.24.3.2015 रोजी सदर धनादेश वटलेला असल्याचे दिसून येते.

3. गौण खनिजापोटी मक्तेदारांच्या देयकातून वजावट करण्यात आलेल्या रक्कमेची देयकनिहाय नोंदवही सादर करण्यात आलेली नसल्याने प्रत्यक्षात गौण खनिजापोटी किती रक्कमेची कपात करण्यात आलेली आहे हे दिसून येत नसल्याने महिनानिहाय व देयकनिहाय किती कपात करण्यात आलेली आहे. या बाबतीत रक्कम शासनाकडे भरणा केल्याची खात्री लेखापरीक्षणास झाली नाही. गौणखनिजापोटी प्राप्त होणारी रक्कम शासनास प्रतिमहा जमा करणे आवश्यक असताना तसे केले नसल्यामूळे शासनाकडे विलंबाने रक्कम जमा केलेली आहे.

4. नोंदवही मध्ये दि.1.11.2014 ते दि.28.2.2015 या कालावधीत कपातीची रक्कम रु.55,84,602/- धनादेश क्र.355442 दि.9.2.2015 अन्वये शासनास प्रदान केले असल्याचे दाखविले आहे. मक्तेदाराकडून वसूल करण्यात आलेल्या गौण खनिजापोटी वसूल करण्यात आलेल्या रक्कमांची नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्यामूळे प्रत्यक्षात दि. 1.11.2014 ते दि. 28.2.2015 या कालावधीत किती रक्कम जमा करण्यात आलेली आहे यांची तपासणी करता आली नाही. शासनाकडे जमा केलेल्या रक्कमांची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामूळे सदरची रक्कम शासनास प्रत्यक्षात प्राप्त झाल्याची याची खात्री होत नाही.

5. रोख शाखेतील रोखपालाकडे दैनंदीन प्राप्त जमा करण्यात आलेल्या रक्कमेच्या नोंदवहीची तपासणी केली असता माहे मार्च-2015 मध्ये खालील रककमा देना बॅकेच्या खाते क्र.04141003490 मध्ये जमा झालेल्या नसल्याचे दिसून आलेले आहे.

| अ.क्र. | मक्तेदाराचे नांव | रक्कम जमा केल्याची तारीख | धनादेशाव्दारे जमा केलेली रक्कम | रोख रक्कम |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. एन.एम. मंढाळकर | दि.3.3.2015 | 43969 | --- |
| 2 | गायत्री कंन्ट्रक्शन | दि.3.3.2015 | --- | 60 |
| 3 | विशाल धोत्रे | दि.3.3.2015 | --- | 20 |
| 4 | सूनिल वेग | दि.13.3.2015 | 37393 | --- |
| 5 | मुधोळकर | दि.13.3.2015 | 15051 | --- |
| 6 | बी.पी.मेगेरी | दि.18.3.2015 | ---- | 360 |
| 7 | वैष्णवी कंन्ट्रक्शन | दि.24.3.2015 | 33646 | --- |
| 8 | सूनिल घाटगे | दि.24.3.2015 | 118471 | --- |
| 9 | सिध्दतेज कंन्ट्रक्शन | दि.27.3.2015 | ---- | 410 |
| 10 | ए.एस.पाटील | दि.33.3.2015 | 21189 | --- |
| 11 | एस. डी. कलगुट्टी | दि.31.3.2015 | 19835 | --- |
| 12 | बि. ए. बागवान | दि.31.3.2015 | 1100 | --- |
| 13 | युनारी कंन्ट्रक्शन | दि.31.3.2015 | 1000 | --- |
| 14 | मारुजी पवार | दि.31.3.2015 | 650 | --- |
| 15 | तिरुपती कंन्ट्रक्शन | दि.31.3.2015 | 67604 | --- |

त्यानुसार गौण खनिजापोटी रोखीने प्राप्त झालेली रक्कम शासनास जमा करण्यात आलेली दि.1.4.2014 ते दि.31.3.2015 या कालावधीत गौण खनिजापोटी रोखीने किती रक्कम प्राप्त झालेली आहे व ती रककम शासनास जमा करण्यात आलेली आहे काय ? किंवा कोणत्या बॅक खात्यात जमा करण्यात आली, याची माहीती सादर करण्यात आलेली नाही.

उपरोक्त मुद्द्या संदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 69 दिनांक 12/10/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने याबाबतची माहिती सादर केलेली नाही.

FDSDKPM7201 (Ref No : 48, Hmm No : 69)

## *76 परिभाषित अशंदान निवृतीवेतन योजनेच्या अमंलबजावणीमधील उणिवाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : परिभाषित अशंदान निवृ मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***अशंदायी निवृतीवेतन योजना लागू झालेपासून बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडणेत आलेले नाही. 41 कर्मचा-यांचे वित्तलब्धीच्या 10% रक्कम वसुल न करता अंदाजे रक्कम वसुल केली जाते. तसेच त्यांच्या वेतनातून वसुल केलेल्या रकमे इतके मनपा हिस्सा त्यांचे खात्यात जमा करण्यात आली नाही. सन 2014-15 या अर्थिक***

***वर्षामध्ये वसुल केलेल्या रकमा ह्या 6 ते 17 महिने उशिरा वर्ग केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कर्मचा-याना देण्यात आलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले जाते याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. अशंदायी निवृतीवेतन योजनेत असणा-या कर्मचा-यांच्यासाठी अशंदायी निवृतीवेतन योजनाचा वेगळा क्रमांक देणे आवश्यक असताना त्याना सर्वसाधारण भ.नि.नि. वर्गणीदाराप्रमाणे त्यापुढील क्रमांक देण्यात आलेला आहे.***

अशंदायी निवृतीवेतन योजनाचे अभिलेखेचे तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.72 दि.02/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मुले6/लेखा परिक्षण/72/2017 दि.26/12/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)अशंदायी निवृतीवेतन योजनेचे बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडणेत आलेले नाही. सदरच्या रकमा ह्या सर्वसाधारण भ.नि.नि.च्या खात्यामध्ये जमा केल्या जातात. त्यामुळे सदर योजनेमध्ये किती शिल्लक आहे याची खात्री करता येत नाही. अशंदायी निवृतीवेतन योजनेचे स्वतंत्र खाते ठेवणे आवश्यक आहे.

सदर योजनेचे महाराष्ट्र बँकेत दि.18/12/2015 रोजी स्वतंत्र खाते उघडणेत आले असून त्यामध्ये आज अखेर रक्कम रु.21600000/- इतकी मुदत ठेवी मध्ये रक्कम ठेवण्यात आलेली आहे असे खात्याने कळविले आहे.

सदर योजना कर्मचा-याना लागू केलेपासून आज अखेर किती रक्कम जमा करणे आवश्यक होती व किती जमा केली आहे याबाबत उल्लेख केला नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) खात्याने सादर केलेल्या महीतीनुसार सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये सदर योजनेमध्ये असणारे कर्मचा-यांचे वेतनातून एकूण वित्तलब्धीच्या 10% रक्कम वसुल करुन तेवढीच रक्कमे एवढा मनपा हिस्सा यांची एकूण रक्कम त्यांचे खात्यात जमा करणे आवश्यक आहे. परंतु 41 कर्मचा-यांचे वित्तलब्धीच्या 10% रक्कम वसुल न करता अंदाजे रक्कम वसुल केली जाते. तसेच त्यांच्या वेतनातून वसुल केलेल्या रकमे इतके मनपा हिस्सा त्यांचे खात्यात जमा करण्यात आली नाही. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करुन लेखापरीक्षणास अहवाल सादर करावा.

आक्षेपात नमूद केलेनुसार 41 कर्मचा-यांचे वेतनातून कमी कपात केलेली रक्कम माहे सप्टेंबर 2017 पासून वसुल करण्यात येत आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

41 कर्मचा-यांचे किती रक्कम वसुल करणे आवश्यक होते व ती किती हप्त्यात वसुल करणेत येत आहे. तसेच त्या रकमे इतकी मनपा हिस्सा जमा केला जातो किंवा कसे याबाबत स्पष्टीकरण सादर केलेले नसल्याने आक्षेप कायम कराणेत येत आहे.

3) कर्मचा-यांच्या वेतनातून वसुल केलेल्या रकमा ह्या वेतन प्रदान केलेनंतर त्वरीत अशंदायी पेंशन योजना खात्याकडे रक्कम वर्ग केली जात नाही. सन 2014-15 या अर्थिक वर्षामध्ये वसुल केलेल्या रकमा ह्या 6 ते 17 महिने उशिरा वर्ग केल्याचे दिसून येत आहे. वसुल केलेल्या अशंदायी पेंशन

योजनाचे रकमेवर कर्मच-याना व्याज द्यावे लागत असल्याने सदराच्या रकमा ह्या त्वरीत वर्ग करुन त्या वेळीच गुंतवणुक करणे आवश्यक आहे. मनपाने वेतनातुन वसुल केलेल्या रकमा ह्या संबंधीत कर्मचा-याचे खात्यात व्याजासहीत जमा केल्याचे नोंदी केल्या आहेत. वसुल केलेल्या रकमा वेळीच गुंतवणुक केले असते तर त्यावर मिळणारे व्याजाची रकमेतून कर्मचा-याना व्याज देणे सुकर झाले असते. परंतु मनपाने सदरच्या रकमा वेळीच गुंतवणुक केली नसल्याने त्यावरील व्याजाची रक्कम मनपास मिळलेले नाही. त्यामुळे व्याजाच्या रकमेचा भार मनपा निधीवर पडत आहे. तरी कर्मचा-याना देय असलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले जाते याचे स्पष्टीकरण करणेत यावे.

आक्षेपात नमूद केलेनुसार संबंधीत आहरण व वितरण अधिका-याना सुचना दिल्या असून माहे मार्च 2017 च्या वेतनातून कपात करण्यात येत आहे असे खात्याने कळविले आहे.

आक्षेपानुसार खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) अशंदायी निवृतीवेतन योजनेत असणा-या कर्मचा-यांच्यासाठी अशंदायी निवृतीवेतन योजनाचा वेगळा क्रमांक देण्यात आलेला नाही. त्याना भ.नि.नि. वर्गणीदाराप्रमाणे त्यापुढील क्रमांक देण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर योजनेत किती कर्मचारी आहेत याची खात्री करता येत नाही.

आक्षेपानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 56, Hmm No : 72)

## *77 रोखवही मध्ये झालेल्या अनियमिततेबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 07**

*म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

| | | 1/4/2011 to 31/3/2012 | 1193 | 12 | 14316 | 10.30% | 1475 |
| | | 1/4/2012 to 31/5/2015 | 1193 | 38 | 45334 | 12.36% | 5603 |
| | | | | | | | 9525 |

| एकूण | 1106030 |
|---|---|

उपरोक्त गाळेधारकांकडून सेवाकराची रक्कम वसूल करून शासन जमा करून आवश्यक त्या कागद पत्रांसह अनुपालन सादर करावे.

वसुलपत्र रक्कम - रु.1106030/-

DATMDSM7101 (Ref No : 122, Hmm No : 127)

## *87 लोखंडी बाकडे खरेदी निविदेबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3482700.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3482700.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2500.00/-

***सदर कामाची जाहिर निविदा पहाता जाहिरातीमध्ये लोखंडी बाकडे खरेदीचा तपशील देण्यात आलेला नाही. जाहीर निविदेमध्ये कामाचा कालावधी 3 महिने दिलेला असताना दि.28/08/2014 च्या वर्क ऑर्डर मध्ये कामाची मुदत वर्क ऑर्डर दिल्यापासून 1 वर्ष राहील असे नमूद करण्यात आले. जाहीर निविदेमध्ये कामाचा कालावधी 3 महिन्याचा असल्याने हे नियमबाह्य आहे. नगर अभियंता यांचे सूचना व आदेश पत्र क्र. जा.क्र.नाअ /3346 दि:20/03/2015 च्या पत्रात यादीतील 1 ते 45 क्रमाकानुसार मा.सदस्यांना लोखंडी बाकडे पुरवठा करण्याबाबतचे आदेश देण्यात आले. परंतु लोखंडी बाकडे पुरवठ्याची संख्या नमूद करण्यात आलेली नाही. लोखंडी बाकडे खरेदी करण्याकरिता मुख्यलेखापाल यांचे बजेट तरतुदी बाबतचे अभिप्राय नस्तीमध्ये दिसून आला नाही. मुख्य लेखापरीक्षक यांनी जा.क्र.अभि/74/ दि.16/05/2014 च्या पत्राने उपस्थित केलेल्या 5 मुद्द्याचे स्पष्टीकारण मुख्य लेखापरीक्षक यांच्याकडे सादर करण्यात आले नाही. अमरदीप कन्स्ट्रक्शन यांचे कडून वित्तीय वर्ष 2014-15 कोणत्या तारखेला किती लोखंडी बाकडे प्राप्त झाले याबाबतचे डीलीव्हरी चलन नस्तीत दिसून आलेली नाहीत. वित्तीय वर्ष 2014-15 या आर्थिक वर्षात एकूण रु. 34,82,700/- लोखंडी बाकडेची खरेदी झालेली असल्याने त्याकरिता रु.2,600/- मुदांकावर करारनामा करणे आवश्यक असताना रक्कम रु.100/- मुद्रांकावर करारनामा केल्याने कमी भरणा मुद्रांक शुल्काची रक्कम रु.2,500/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे. वर्क ऑर्डर निहाय माहिती सादर करण्यात आलेली नाही. पुरवठा केलेली लोखंडी बाकडे कोणकोणत्या जागेत बसविण्यात आलेली आहेत. याबाबतची माहिती सादर करण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून 2013-14 या वित्तीय वर्षात लोखंडी बाकडे

खरेदीसाठी मनपाने दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रामध्ये दि.24/12/2014 रोजी जाहिर निविदा मागविण्यात आले होती. निविदा सादर करण्याचा कालावधी दि.28/12/2013 ते 01/01/2014 असा होता. जाहिर निविदानुसार 3 मक्तेदाराने निविदा सादर केल्या् असून पात्र निविदाधारकाने दिलेल्या दराची तुलना करुन लघुत्तम दराचे निविदाधारक अमरदीप कन्स्ट्रक्शन सोलापूर यांचेशी वाटाघाटी करुन दर रु.1950/- प्रति नग प्रमाणे निविदा मंजूर करण्यात आली आहे. सदरची निविदा स्थायी समिती ठराव क्र.156 दि.06/08/2014 अन्वये मंजूर करुन त्यांना नगर अभियंता यांचेकडून आदेश क्र.नअ /24 दि.28/08/2014 अन्वये लोखंडी बाकडे पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत. उद्यान विभागामार्फत लोखंडी बाकडे खरेदी कामाची नस्ती तपासणी केली असता काही अनियमिता आढळुन आल्या असल्याने याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 154 दिनांक 24/04/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता, विभागाने याबाबतचे अनुपालन सादर केलेले नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप कायम करण्यात आलेले आहेत.

1) सदर कामाची जाहीर निविदा पहाता जाहिरातीमध्ये लोखंडी बाकडे खरेदीचा तपशील देण्यात आलेला नाही. उदा.लोखंडी बाकड्याचा साईज, पत्र्याचा गेज, बसवून देण्याची कार्यवाही, कोणी निविदा सादर करावी, इ. याबाबतचा तपशील देण्यात आलेला नाही.

2) जाहीर निविदे मध्ये कामाचा कालावधी 3 महिने दिलेला असताना दि.28/08/2014 च्या वर्क ऑर्डर मध्ये कामाची मुदत वर्क ऑर्डर दिल्यापासून 1 वर्ष राहील असे नमूद का करण्यात आले. या विसंगती बाबतचा खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

3) मक्तेदाराने केलेल्या दि.27/08/2014 च्या करारपत्रामधील अट क्र.12 मध्ये सदरचा मक्ता हा वार्षिक मक्ता असून सदर कामाचे वर्क ऑडर दिल्यानंतर एकूण 256 इतके नग तीन महिन्याचे मुदतीत पुरवठा करणेचा असून तद्नंतर जसजसे आपणास वर्क ऑडर देण्यात येईल, तसतसे मालाचा पुरवठा तीस दिवसात करणेचा आहे. असे नमूद का करण्यात आलेले आहे. जाहीर निविदे मध्ये कामाचा कालावधी 3 महिन्याचा असल्याने हे नियमबाह्य आहे.

4) नगर अभियंता यांचे सूचना व आदेश पत्र क्र. जा.क्र. व दिनांक नमूद न करण्यात आलेल्या आदेशामध्ये यादीतील 1 ते 13 क्रमांकानुसार मा.सदस्यांना लोखंडी बाकडे पुरवठा करण्याबाबतचे आदेश देण्यात आलेले आहे. परंतु सदर आदेशामध्ये लोखंडी बाकडे पुरवठ्याची संख्या नमूद करण्यात आलेली नाही.

5) नगर अभियंता यांचे सूचना व आदेश पत्र क्र. जा.क्र.नाअ /3346 दि.20/03/2015 च्या पत्रात यादीतील 1 ते 45 क्रमाकानुसार मा.सदस्यांना लोखंडी बाकडे पुरवठा करण्याबाबतचे आदेश देण्यात आलेले आहे. परंतु सदर आदेशामध्ये लोखंडी बाकडे पुरवठ्याची संख्या नमूद करण्यात आलेली नाही.

6) लोखंडी बाकडे खरेदी करण्याकरिता मुख्यलेखापाल यांचे बजेट तरतुदी बाबतचे अभिप्राय नस्तीमध्ये दिसून आला नाही.

7) मुख्य लेखापरीक्षक यांनी जा.क्र.अभि/74/ दि.16/05/2014 च्या पत्राने उपस्थित केलेल्या 5 मुद्द्याचे स्पष्टीकारण मुख्य लेखापरीक्षक यांच्याकडे सादर न करताच लोखंडी बाकडे खरेदी करण्यात आलेली आहे.

8) अमरदीप कन्स्ट्रक्शन,यांनी वित्तीय वर्ष 2014-15 या वर्षात खालील देयके सादर केलेली असल्याचे बिल रजिस्टर मधून दिसून येते. परंतु अमरदीप कन्स्ट्रक्शन यांचे कडून कोणत्या तारखेला किती लोखंडी बाकडे प्राप्त झाले याबाबतचे डीलीव्हरी चलन नस्तीत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे रक्कम रु.34,82,700/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | बिल नंबर व दिनांक | देयक क्र. व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | 43/27.3.2015 | 0767/11.3.2015 | 499200 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2. | 48/30.3.2015 | 0759/11.3.2015 | 497250 |
| 3. | 49/30.3.2015 | 0760/11.3.2015 | 493350 |
| 4. | 50/30.3.2015 | 0769/12.3.2015 | 499200 |
| 5. | 51/30.3.2015 | 0770/13.3.2015 | 495300 |
| 6. | 52/30.3.2015 | 0771/14.3.2015 | 499200 |
| 7. | 53/30.3.2015 | 0772/15.3.2015 | 499200 |
| | | एकूण | 34,82,700 |

9) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 अनुसूची 1 मधील तरतुदीनुसार करारनामा करतांना 10 लाखापर्यंतचे कामासाठी रु.100 व त्यापुढील प्रत्येक लाखासाठी रु.100/- याप्रमाणे करारनामा करणे आवश्यक आहे. वित्तीय वर्ष 2014-15 या आर्थिक वर्षात एकूण रक्कम रु.34,82,700/- ची खरेदी झालेली असल्याने त्याकरिता रक्कम रु.2,600/- मुदांकावर करारनामा करणे आवश्यक असताना रक्कम रु.100/- मुद्रांकावर करारनामा केला आहे. त्यामुळे रक्कम रु.2,500/- चे मुद्रांक शुल्कापोटी शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे. सदरची मुद्रांक शुल्काची रक्कम वसूल करून शासन जमा करणे आवश्यक असल्याने रक्कम रु.2,500/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

10) वित्तीय वर्ष 2014-15 या वर्षात एकूण किती लोखंडी बाकडे खरेदी करण्यात आली त्याची वर्क ऑर्डर निहाय माहिती सादर करण्यात आलेली नाही.

11) अमरदीप कन्स्ट्रक्शन यांनी पुरवठा केलेली लोखंडी बाकडे कोणकोणत्या जागेत बसविण्यात आलेली आहेत. याबाबतची माहिती लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाहीत.

FDSDKPM7201 (Ref No : 82, Hmm No : 154)

## *88 महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथील विविध प्राण्यांना पशुंखाद्य व अन्न धान्य खरेदीबाबत वार्षिक मक्ताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 10**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***निविदा मंजुर करतांना धान्यांचे दर हे कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापुर यांचेकडून प्रसिध्दी केल्या जाणा-या भावापेक्षा जास्त असुन नये यांची खात्री विभागाने केलेली नाही. बाजारभाव सोलापुर शहर पशुखाद्य व्यापारी संघटना यांचे आहे असे टिप्पनीमध्ये नमुद आहे. तथापि बाजारभाव दराचे दरपत्रक नस्तीमध्ये दिसुन येत नाही. अंदाजपत्रकिय तरतुद वित्तीय वर्ष 2014-15 मुख्य लेखापाल सोलापुर यांचे अभिप्राय नस्तीत दिसुन येत नाही. म.गांधी प्राणी संग्रहालय सोलापुर येथे कोणकोणते किती प्राणी पशु व पक्षि 2014-15 होते यांची प्रमाणित***

***माहिती सादर करावी. सदर प्राणी पशु व पक्षी यांना दयावयाच्या खाद्यान्न बाबत शासनाचे निकष काय आहेत. सदर प्राणी पशु व पक्षी यांना दररोज किती ग्रॅम/ किलो व कोणत्या प्रकारचे खाद्य लागते.मा.आयुक्त सोलापुर यांची टेंडरला दिनांक 21/01/2015 ला मंजुरी होती. तथापि वर्क ऑर्डर जा.क्र.3 प्र/06 दिनांक 01/04/2015 रोजी दिले. एवढया विलंबाने वर्क ऑर्डर देण्यांत आली आहे. तसेच करारनामा दिनांक 30-3-15 रोजी केलेला आहे. करारनामा करणेस 2 महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागला. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये किती धान्य साठा प्राप्त झाला. तसेच प्राणी पशु व पक्षी यांना किती खाद्य देण्यात आले. तसेच मार्च 2015 अखेर किती धान्य साठा शिल्लक होते. याचा तपशिल साठा रजिष्टरला घेतल्याचे दिसनु येत नाही.वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये मागणी किती होती तसेच टेंडर ऑउर्र व वार्षिक मक्ता किती रक्कमेचा होता तसेच निविदामध्ये किती माल नमुद केल्याची माहिती निरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नाही.करारनामा निरीक्षण पथकास तपासणी करिता उपलब्ध झालेली नाही.खर्चाचे प्रमाणके उपलब्ध झालेली नाहीत. त्यामुळे आयकर व इतर कर मक्तेदाराकडुन वसुल झाल्याची खात्री होत नाही.***

वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथील विविध प्राण्यांना पशुंखाद्य व अन्न धान्य खरेदीबाबत दै.संचार या वृत्तपत्रात दिनांक 14/10/2014 ला निविदा मागविण्यासाठी जाहिरात दिली आहे. निविदा दिनांक 22/10/2014 ला दुपारी 4.00 वाजता उघडेल असे ठरले. त्यानुसार खालील प्रमाणे 3 निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | धान्य प्रकार | बाजार भाव प्रती किलो/ प्रती नग | लक्ष्मी एंटरप्रायझेस यांचे निविदेतील दर प्रती किलो/ प्रती नग | नागेश एंटरप्रायझेस यांचे निविदेतील दर प्रती किलो/ प्रती नग | श्री बसेश्वर व्यवसाय ग्राहक संस्था यांचे निविदेतील दर प्रती किलो/ प्रती नग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ज्वारी (लोकल,मालदांडी) | 22 | 23 | 26 | 25.50 |
| 2 | गहू (शरबती) | 25 | 24 | 25 | 24.75 |
| 3 | तांदुळ (एच.एम.टी) | 38 | 40 | 50 | 48.50 |
| 4 | मका (भरडा) | 19 | 20 | 22 | 22.25 |
| 5 | हरभरा कळणा | 18 | 20 | 24 | 24.75 |
| 6 | शेगां पेड | 43 प्रती पेंडी | 45 | 50 | 47 |
| 7 | गहु भुसा | 18 | 19 | 21 | 22.50 |
| 8 | राळे तांदुळ सालीसह | 53 | 55 | 60 | 57.50 |
| 9 | गुळ (पिवळा) | 38 | 40 | 42 | 41 |
| 10 | हरभरा (काटाळा) | 54 | 56 | 60 | 65.50 |
| 11 | ब्रेड | 43 | 45 | 50 | 51.5 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12 | कडबा/पेडी (पांढरा) | 17 | 18 | 20 | 19.50 |
| | | | | | |

उपरोक्त बाजारभाव सोलापुर शहर पशुखाद्य व्यापारी संघटना यांचे आहेत. दिनांक 21/01/2015 ला मा. आयुक्त यांची मान्यता आहे.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 73 नुसार मक्तेदार लम्मी एंटरप्रायझेस यांनी निविदेत दिलेल्या बारभावाने खरेदी करणेस येणा-या खर्चास योग्य त्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन वर्क ऑर्डर देणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त बाबत खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1) निविदा मंजुर करतांना धान्यांचे दर हे कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापुर यांचेकडून प्रसिध्दी केल्या जाणा-या भावापेक्षा जास्त असुन नये यांची खात्री विभागाने केलेली नाही.

2) बाजारभाव सोलापुर शहर पशुखाद्यय व्यापारी संघटना यांचे आहे असे टिप्पनीमध्ये नमुद आहे. तथापि बाजारभाव दराचे दरपत्रक नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

3) बजेट तरतुद वित्तीय वर्ष 2014-15 मुख्य लेखापाल सोलापुर यांचे अभिप्राय नस्तीत दिसुन येत नाही.

4) म.गांधी प्राणी संग्रहालय सोलापुर येथे कोणकोणतेकिती प्राणी पशु व पक्षि 2014-15 होते यांची प्रमाणित माहिती नस्तीत दिसुन येत नाही.

5) सदर प्राणी पशु व पक्षी यांना दयावयाच्या खाद्यान्न बाबत शासनाचे निकष काय आहेत.

6) सदर प्राणी पशु व पक्षी यांना दररोज किती ग्रॅम/किलो व कोणत्या प्रकारचे खाद्य लागते.

7) मा.आयुक्त सोलापुर यांची टेंडरला दिनांक 21/01/2015 ला मंजुरी होती. तथापि वर्क ऑर्डर जा.क्र.3 प्र /06 दिनांक 01/04/2015 रोजी दिले. एवढया विलंबाने वर्क ऑर्डर का देण्यांत आली आहे. तसेच करारनामा दिनांक 30-3-15 रोजी केलेला आहे. करारनामा करणेस 2 महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागला. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये किती धान्य साठा प्राप्त झाला. तसेच प्राणी पशु व पक्षी यांना किती खाद्य देण्यात आले. तसेच मार्च 2015 अखेर किती धान्य साठा शिल्लक होते. याचा तपशिल साठा नोंदवहीमध्ये घेतल्याचे दिसनु येत नाही.

8) वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये मागणी किती होती तसेच निविदा आदेश व वार्षिक मक्ता किती रक्कमेचा होता. तसेच निविदामध्ये किती माल नमुद केल्याची माहिती निरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नाही.

9) करारनामा निरीक्षण पथकास तपासणी करिता उपलब्ध झालेली नाही.

10) खर्चाचे प्रमाणके उपलब्ध झालेली नाहीत. त्यामुळे आयकर व इतर कर मक्तेदाराकडुन वसुल झाल्याची खात्री होत नाही.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.165दिनांक 28/06/2018खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे

FDSJRDM6801 (Ref No : 140, Hmm No : 165)

## *89 आर्थिक वर्ष 2014-2015 मध्ये मास मंडई ( मटन मार्केट) व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) मधील ओटा/गाळे भाडेधारकाकडून रक्कमेची वसूली करण्यात आलेली नसल्याबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 19801504.00/-

***सोलापूर महानगरपालिकाकेच्या मास मंडई (मटन मार्केट) व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) या विभागाकडून आर्थिक वर्ष 2014-2015 चे डिमांड रजिष्टरचे लेखापरीक्षण केले असता ओटा/ गाळे धारकाकडील एकूण भाडे रु.1,98,01,504/-एवढी रककम थकबाकी असल्याचे दिसून येते. मागील थकबाकीचे प्रमाण जास्त असताना 2014-2015 मध्ये संबधित ओटा/ गाळे भाडेधारकाकडून अंशतः रक्कम वसूल करण्यात आलेली आढळून येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,1949 कलम 81(क)(1) नुसार ओटा/ गाळेधारकास भाडे देण्याबाबत नोटीस बजावणे आवश्यक असतांना याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आढळून येत नाही. सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीचे मंडई मधील ओटा/ गाळयाचे थकित असलेल्या भाडयाच्या रक्कमेवर ठरावानुसार अथवा करारानुसार व्याजाची आकारणी करण्यात आल्याचे आढळून येत नाही. मास मंडई (मटन मार्केट) रिकामे ओटा/ गाळे-45 व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) रिकामे ओटा/ गाळे- 434 एकून रिकामे ओटा/ गाळे- 479 आढळून येते याबाबत कार्यवाही झाल्याचे आढळून येत नाही. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असताना वसुली निरीक्षकाकडून संबधित ओटा/ गाळे भाडेधारकाकडून थकीत रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या मास मंडई (मटन मार्केट) व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) या विभागाचे आर्थिक वर्ष 2014-2015 चे डिमांड रजिष्टरचे लेखापरीक्षण केले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्र.-140 दि.28/03/2018 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून खुलासा प्राप्त झालेले नाही. त्यामुळे खालील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकाकेच्या मास मंडई (मटन मार्केट) व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) या विभागाचे आर्थिक वर्ष 2014-2015 चे डिमांड रजिष्टरचे लेखापरीक्षण केले असता 2014-2015 या वर्षात खालील मास मंडई (मटन मार्केट) व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) मधील भाडेधारकाकडून ओटा/गाळयांच्या भाडयाची रक्कम वसूली केलेली नसल्याचे निर्दशनास येते.

**(A) मास मंडई (मटन मार्केट)**

| अ. क्र. | मार्केट चे नाव | एकून ओटी | मागील भाडे थकबाकी | 2014-2015 जमा भाडे | एकूण थकबाकी | वसूल झालेली रक्कम | एकूण शिल्लक थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | जोडभावी पेठ मटन मार्केट | 20 | 76868 | 56961 | 132819 | 61098 | 71721 |
| 02 | जोडभावी पेठ ॲपल मार्केट | 58 (4 ओटे रिकामे) | 163984 | 628024 | 792008 | 58997 | 733011 |
| 03 | जोडभावी पेठ जुनी मासळी मार्केट | 24 | 57215 | 259872 | 259872 | 102317 | 157555 |
| 04 | जोडभावी पेठ नवी मासळी मार्केट | 20 | 45136 | 48200 | 93336 | 34311 | 59025 |
| 05 | जोडभावी पेठ सिक मार्केट | 10 | 28689 | 24100 | 52789 | 37648 | 15141 |
| 06 | बेगम पेठ मटन मार्केट | 11 | 318420 | 26510 | 344930 | 34052 | 310878 |
| 07 | बेगम पेठ ॲपल मार्केट | 18 (5 ओटे रिकामे) | 108000 | 35191 | 141941 | ----- | 141941 |
| 08 | साखर पेठ मटन मार्केट | 04 (2 ओटे रिकामे) | 5402 | 5403 | 10785 | ----- | 10785 |
| 09 | देगाव मटन मार्केट | 04(04) ओटे रिकामे | ------ | --------- | -------- | ------ | ------- |
| 10 | उत्तर सदर बाजार मटन मार्केट | 15 (11 ओटे | 34385 | 10828 | 44743 | ------ | 44743 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रिकामे) | | | | | |
| 11 | मोदी मटन मार्केट | 4 (2 ओटे रिकामे) | 15988 | 5414 | 33192 | ----- | 33192 |
| 12 | मुस्लिम पाछा पेठ मटन मार्केट | 24 (7 ओटे रिकामे) | 117282 | 46019 | 162331 | ----- | 162331 |
| 13 | न्यु तिऱ्हे गाव मटन मार्केट | 21 7 ओटे रिकामे | 13442 | 52272 | 171133 | 3000 | 168133 |
| 14 | न्यु तिऱ्हेगाव बिग मार्केट | 11 ओटे रिकामे | 101158 | 24363 | 124471 | ------- | 124471 |
| 15 | खुली जागा स्पेशल भाजीपाला मार्केट | 06 | 298410 | 54799 | 352709 | 24214 | 328495 |
| 16 | न्यु तिऱ्हेगाव मचछी मार्केट | 08 | 21583 | 21583 | 43146 | 11648 | 31498 |
| 17 | मक्ताबाबी (लॅटर हाउस ) | 01 | एक वर्षाचा मक्ता टेडर व्दारे देण्यात येतो | ------- | 85050 | 85050 | 000000 |
| | **एकूण थकबाकी रुपये -** | **259 (45) रिकामे** | **1405962** | **1299539** | **2845255** | **452335** | **2392920** |

**(ब) शाक मंडई (भाजीपाला मार्केट)**

| अ. क्र. | मार्केट चे नाव | एकूण ओटे | मागील भाडे थकबाकी | 2014-15 जमा भाडे | एकूण थकबाकी | वसूल झालेली रक्कम | एकूण शिल्लक थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | राणी लक्ष्मीबाई भाजी मार्केट | 837 (264) ओटे रिकामे | 3272950 | 1378720 | 4629540 | 947902 | 3681638 |
| 02 | राणी लक्ष्मीबाई खुली जागा (दोन खुली जागा ) | 4X4 | 79444 | 9808 | 89022 | 5000 | 84022 |
| 03 | राणी लक्ष्मीबाई | 31 | 375472 | 282774 | 658246 | 143970 | 514276 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नवीन इमारत | | | | | | |
| 04 | राणी लक्ष्मीबाई केळी विभाग | 32 | 439134 | 216928 | 654032 | 21230 | 632802 |
| 05 | राणी लक्ष्मीबाई भुसार विभाग | 28 | 188578 | 203667 | 390905 | 132537 | 258368 |
| 06 | राणी लक्ष्मीबाई खुली जागा | 02 | 36456 | 30664 | 70020 | 8000 | 62020 |
| 07 | क्स्तुबा भाजी मार्केट | 110 | 902535 | 1919263 | 2818148 | 1354460 | 1463688 |
| 08 | महात्मा फुले तळमजला (अ) | 16 | 556784 | 562802 | 1110226 | 192746 | 917480 |
| 09 | तळमजला (ब) | 16 | 620212 | 566073 | 1186386 | 337667 | 848719 |
| 10 | तळमजला ( क ) | 24 | 618266 | 293756 | 911212 | 106603 | 804609 |
| 11 | तळमजला ( ड ) | 21 | 330053 | 334038 | 663611 | 149877 | 513734 |
| 12 | महात्मा फुले पहिला मजला (अ ) | 16 | 876700 | 767424 | 843784 | 210605 | 633179 |
| 13 | पहिला मजल ( ब ) | 16 | 327142 | 541214 | 868046 | 576589 | 291457 |
| 14 | पहिला मजला (क ) | 16 | 704607 | 424455 | 1028492 | 142292 | 886200 |
| 15 | पहिला मजला (ड ) | 14 | 343403 | 413265 | 756388 | 88490 | 667898 |
| 16 | महात्मा फुले मध्यवर्ती | 14 | 85510 | 95648 | 180815 | 35625 | 145190 |
| 17 | महात्मा फुले तळघर | 05 | 1790200 | 1376225 | 3166282 | 552548 | 2613734 |
| 18 | जोड बसवन्ना भाजी मार्केट | 12 | 75710 | 84900 | 159990 | 72329 | 87661 |
| 19 | भगतसिंग भाजी मार्केट | 09 | 84519 | 128300 | 212406 | 83124 | 129282 |
| 20 | कस्तुरबाभाजी मार्केट मधील | 416 ओटे | 1363341 | 535857 | 1890158 | 100535 | 1789623 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ओटे | रिकामे (170) | | | | | |
| 21 | भारतीय भाजी मंडई मधील ओटे | 171 ओटे | 209675 | 52310 | 261025 | 26393 | 234632 |
| 22 | जोड बसवन्ना मधील ओटे | 105 ओटे | 105501 | 56955 | 161280 | 12928 | 148352 |
| | **एकून थकबाकी रुपये -** | **1227 (434) रिकामे** | **13386192** | **9975046** | **22710014** | **5301450** | **17408564** |

1. उपरोक्त एकत्रित गोषवा-यावरुन मास मंडई (मटन मार्केट) रुपये 23,92,920/- व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) रुपये 1,74,08,584/- ओटा/गाळे धारकाकडील एकूण भाडे रु.1,98,01,504/- एवढी रककम थकबाकी असल्याचे दिसून येते.
2. दोन्ही मंडईची एकूण चालू मागणी रक्कम रु.1,12,74,585/- असून मागील थकबाकीची रक्कम रु.1,47,92,154/-एवढी आहे. चालू मागणी पेक्षा मागील थकबाकीचे प्रमाण जास्त असताना 2014-2015 मध्ये संबधित ओटा/गाळे भाडेधारकाकडून अंशत: रक्कम वसूल करण्यात आलेली आढळून येते. त्यामुळे थकबाकीच्या रक्कमेत रु.35,17,569/- एवढी वाढ झालेली आहे.
3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,1949 कलम 81(क)(1) नुसार ओटा/गाळेधारकास भाडे देण्याबाबत नोटीस बजावणे आवश्यक असतांना याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आढळून येत नाही.
4. सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीचे मंडई मधील ओटा/गाळयाचे थकित असलेल्या भाडयाच्या रक्कमेवर ठरावानुसार अथवा करारानुसार व्याजाची आकारणी करण्यात आल्याचे आढळून येत नाही.
5. मास मंडई (मटन मार्केट) रिकामे ओटा/गाळे-45 व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) रिकामे ओटे / गाळे- 434 एकूण रिकामे ओटे/गाळे -479 आढळून येते. याबाबत कार्यवाही झाल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.
6. सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असताना वसुली निरीक्षकाकडून संबधित ओटा/गाळे भाडेधारकाकडून थकीत रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

एकूण वसूलपात्र रक्कम रु.1,98,01,504/-

DATYMKM6601 (Ref No : 93, Hmm No : 140)

***90 नागरी समुदाय विकास योजना अंतर्गत वित्तीय वर्ष 2014-2015 मधील अभिलेखे उपलब्ध न झाल्याबाबत.....***

सोलापूर महानगरपालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| |
|---|
| ***सोलापूर महानगरपालिकेतील नागरी समुदाय विकास योजना अंतर्गत वित्तीय वर्ष 2014-2015 मधील पुढील प्रमाणे नस्ती व अभिलेखे उदा. (1) आयएचएसडीपी योजना प्राप्त अनुदान नस्ती, लाभार्थीचे ओळख पत्र, लाभार्थीची यादी,बँक स्टेटमेट, कॅश बुक व इतर अनुषंगीक नस्ती. (2) सुवर्ण जयंती शहर रोजगार योजना--प्राप्त अनुदान नस्ती, लाभार्थीची यादी, बँक स्टेटमेट, प्रशिक्षण (3) युसीडी नागरी समुदाय विकास- प्राप्त अनुदान नस्ती लाभार्थीची यादी, बँक स्टेट, प्रशिक्षण कार्यक्रम व खर्च व उद्दीष्टे व साध्ये (भौतिक व वित्तीय), कॅश बुक व इतर अनुषंगीक नस्ती लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास क्र.102 दि.22/12/2017 अन्वये कळविले असता अभिलेख उपलब्ध न झाल्याबाबत आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.*** |

सोलापूर महानगरपालिकेतील नागरी समुदाय विकास योजना अंतर्गत वित्तीय वर्ष 2014-2015 मधील पुढील प्रमाणे नस्ती व अभिलेखे उदा. (1) आयएचएसडीपी योजना - प्राप्त अनुदान नस्ती, लाभार्थीचे ओळख पत्र, लाभार्थीची यादी, बँक स्टेटमेट, कॅश बुक व इतर अनुषंगीक नस्ती. (2) सुवर्ण जयंती शहर रोजगार योजना--प्राप्त अनुदान नस्ती, लाभार्थीची यादी, बँक स्टेटमेट, प्रशिक्षण (3) युसीडी नागरी समुदाय विकास- प्राप्त अनुदान नस्ती लाभार्थीची यादी, बँक स्टेट, प्रशिक्षण कार्यक्रम व खर्च व उद्दीष्टे व साध्ये (भौतिक व वित्तीय), कॅश बुक व इतर अनुषंगीक नस्ती लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास क्र.102 दि.22/12/2017 अन्वये कळविले असता सदर अभिलेख लेखापरिक्षणाकरिता उपलब्ध झालेले नसल्याने खालील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा (सुधारणा) अधिनियम 2011 मधील कलम 6 नुसार अभिलेख्याची लेखापरीक्षणसाठी मागणी करण्यात येवूनही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 2011 मधील कलम 7 नुसार अभिलेखे /कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्याची जबाबदारी स्थानिक संस्थेची असून यामध्ये कसूर झाल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी अधिनियम कलम 8 अन्वये रुपये 25000/- पर्यतची दंडाची तरतूद अर्धसमासात नमूद करण्यात आलेले आहे. वित्तीय वर्ष 2014-2015 चे अभिलेखे मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

DATYMKM6601 (Ref No : 100, Hmm No : 102)

## *91 सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतीच्या GIS सर्व्हेक्षणाबाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 12**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6348000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 250950.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील पूर्ण मालमत्ता GIS आधारित प्रत्यक्ष स्थळ सर्व्हेक्षण करून युनिक प्रॉपर्टी आयडेटी कोड (UPIC) ची नोंदणी करून नोंदवही तयार करणे, यामध्ये खालीलप्रमाणे अनियामितता खालीलप्रमाणे आढळून येते. महासभेने मंजुरी न दिल्याने आयुक्तांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण-2 क्रमांक 4 मधील (ख) मधील (2) शासनाकडे पत्र क्र./09/संगणक/301 दि.16/08/2014 नुसार मंजुरीस्तव सादर केले शासनाकडून मंजुरी मिळाली की नाही, याबाबत माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. सदर योजनेवर खर्च करताना संगणक विभागाची तांत्रिक मान्यता व त्यांचे अभिप्राय घेतल्याचे दिसून येत नाही. सदरचे दर NON-DSR आणि NON-Market Rate स्वरूपाचे असल्यामुळे शासनाच्या दरपत्रकानुसार वरील बाबीची खरेदी करण्यात आली याबाबत खात्री होत नाही. अटी व शर्ती नुसार परफॉरमन्स सिक्युरिटी ठेकेदाराकडून घेतल्याचे आढळून येत नाही. तसेच सिक्युरिटीची किती रक्कम घेतली याबाबत माहिती उपलब्ध झालेली नाही. BOQ Comparative Chart उपलब्ध झालेला नाही. पूर्वीचे मक्तेदार AILSG या कडून झालेले महानगरपालिकेचे आर्थिक नुकसानीबाबत भरपाई झाली किंवा नाही, याची खात्री होत नाही. सदरचा खर्च कोणत्या लेखाशिर्षाखाली पडणार हे नमुद केलेले नाही. मंजुर पूर्वगणकपत्र रक्कम रुपये- 6 कोटी लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 20 फेब्रुवारी 2014 भाग एक-अ मध्य उपविभाग असाधारण क्र-33 Group no II Serial No.2 All equipments for electronic communication करिता LBT 4% नुसार रुपये-2,53,920/- देयकातून कपात करणे आवश्यक होते. परंतु देयक क्र. 99/ date 08/01/2015 Rs-63,48,000/- 1st runing bill मधून 0.25% LBT रक्कम रुपये-15,870/- कपात करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम रुपये-2,38,050/- वसुल करण्यात यावी. नस्तीत Test Report आढळून येत नाही. Test Report न घेता देयक अदा केले आहे. सादर केलेल्या अनुपालनासोबत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा Thrid Patry Audit Report जोडलेला आहे परंतु त्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या तृटीबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली याची माहिती यासोबत जोडण्यात आलेली नाही. साहीत्य Specification प्रमाणे व सदरचे साहीत्य योग्य दर्जाचे असल्याबाबत नोडल ऑफिसर GIS यांचे प्रमाणपत्र नस्तीत आढळत नाही. मुद्रांक शुल्क रुपये-100/- च्या बँक गॅारन्टी घेतलेली आढळून येते. परंतू रुपये-1000/- करिता 5 रुपये याप्रमाणे रुपये-26,00,000/- बँक गॅारन्टी करिता रुपये-13000/- चे (मुद्रांक शुल्क) घेणे आवश्यक होते. त्यामुळे रक्कम रुपये-12900/- शासनास महसुल प्राप्त झाला नाही. वसूल पात्र रक्कम रु.238050+12900 = 250950/-***

सोलापूर महानगरपालिकेच्या सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील पूर्ण मालमत्ता GIS आधारित प्रत्यक्ष स्थळ सर्व्हेक्षण करून युनिक प्रॉपर्टी आयडेटी कोड (UPIC) ची नोंदणी करून नोंदवही तयार करणे, त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-122 दि.31/01/2018 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून पत्र क्र 779 दि.12/02/2018 च्या अन्वये अनुपालन प्राप्त झालेले असून त्यानुसार मुद्दा क्रमांक 01 वगळण्यात येवून उर्वरित आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील पूर्ण मालमत्ता GIS आधारित प्रत्यक्ष स्थळ सर्व्हेक्षण करून युनिक प्रॉपर्टी आयडेटी कोड (UPIC) ची नोंदणी करून नोंदवही तयार करणे, मालमत्तांचे आद्यावत स्थळदर्शक संगणीकृत नकाशे तयार कारणे, तसेच मालमत्तांच्या तांत्रिक माहितीचे विवरण तक्ता तयार करणे, प्रभाग निहाय मालमत्तांचे डीजीटल कलर फोटो काढणे, मालमत्तेच्या सर्व्हेक्षण अहवालाचे कॉपीराईट नोंदणीकृत संगणक आज्ञावलीत संगणीकरण करणे, सर्व मालमत्तांचे संगणीकृत नकाशे व डाटा बेसला जोडणे शहराचा GIS आधारीत मुल्यांकन झोन दर्शक नकाशा तयार करणे, मनपा निर्देशित दरानुसार मालमत्तेची करमूल्य निर्धारण प्रारूप यादी मालमत्ताची प्रकरणे करमुल्यांकनाची अंतीम यादी तयार करणे, आॉनलाईन मालमत्ता कर भरणा प्रणाली सो. म. न. पा. च्या संकेतस्थळी करणे, ईत्यादी कामाचा समावेश आहे.

**कामाचा तपशील**

(1) जाहीर प्रसिद्धी जा.क्र.सा.आ. स/कक्ष-1/आस्था-/329/ दिनांक 11/12/2013 नुसार जाहीर प्रसिद्दीकरण करून ई-निविदाची मागणी करण्यात आली. ई-निविदा संच्याची किंमत रु-50,000/-,बयाणा रक्कम रु-6,00,000/- कामाचा कालावधी 12 महीने दिनांक 01/01/2014 ई-निविदा सुचनेस मा. आयुक्त यांची मान्यता.

(2) दिनांक 25/01/2014 शुद्धीप्रत्रक क्रमांक-1 नुसार बयाणा रक्कम व संच किंमत भरण्याची अंतिम तारीख दिनांक 10/02/2014 दुपारी 1.00 वाजेपर्यंत.

(3) ई-निविदा उघडण्याचा कालावधी दिनांक 13/12/2014 शुद्धीप्रत्रकास मा. आयुक्त यांची मान्यता. दिनांक 25/01/2014, मानिव मान्यता दिनांक 16/08/2014

(4) Last date of Submission date 10/02/2014

(5) Bid Opening date 26/02/2014 मा. आयुक्त यांची मान्यता. दिनांक 10/02/2014

(6) फेर निविदा दिनांक 28/03/2014 पासून दिनांक 04/02/2014 ला Joint Venture Allot केले. दिनांक 04/02/2014 पर्यत एकही Bid Submit झालेले नव्हते.

(7) मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक 10/02/2014 चे Corrigendum त्यानुसार Last date of Submission date 24/02/2014 Bid Opening date 26/02/2014

(8) दिनांक 24/02/2014 पर्यत एकच Bid सादर, त्यामुळे मा.आयुक्त दिनांक 14/02/2014 रोजी निविदा स्विकृत करून 14 दिवसाची मुदत वाढ दिली.

(9) Pri Bid meeting date 16/01/2014

(10) Corrigendum no.3 नुसार tender submission date 10 March 2014 tender opening date 10

सोलापूर        महानगरपालिका

March 2014

(11) दिनांक 24/04/2014 ला दोन tender आली Opening date 24/04/2014

(12) प्राप्त निविदा 1. सायबर टेक व 2. स्टेटलाईट

(13) Third Party Audit Reporty by :- Principal Walchand Institute of Technology solapur

(14) Anuxtur-9 Qualitification Critria- (1)Orginal Profile & Project experience (2) Similar Project developed for Goverment (3)Work done for property tax assessment of two lakh property(4)Technical Proceed present of personal Solution(5)Number of total data aquisition unit (6)digitilation (7)turnover (8)Number perment Consultant / Resoures (9) 2013-2014 चे IT Returns Submit.

(15) Cyber Tech System Softwear Limited Mumbai या कंपनीला सदर कामाची पत्र क्र./MC/139 दिनांक 26/08/2014 नुसार वर्क आर्डर देण्यात आली.

| Sr. no. | Discription | Unit | Amount in Rs. |
|---|---|---|---|
| 1. | To provide world view satellite Image data of 0.5 M resolution with 0,5 M | 190 | 266855.00 |
| 2 | To carry our DGPS survey to collect GPC's required for Image rectification and to carry out processing ruquired | 200 | 280900,00 |
| 3 | Prepration Base Map Data base<br>a. Processing of satelline Image (Rectification / Geo-referencing ) and Rahtura Extraction<br>2. Extractsion of municipal Proprty Tax Ward, Zone, Sub-Ward boundries and road center line from Satellite image with ground vaerification.<br>3. Extractsion of building outlines / footprinps from Satellite image.<br>4. Preparation of Land base map with SMC limit, Election ward Administrative, Village, boundaries along with road Nala, and Water bodies from source maps provided and features extracted as above. | 190 | 400283.00 |
| 4 | Prepration Base Map Data base<br>b. Seanning Digitization , Geo-referencing and Integaration / Mosaicking of city Survey Maps | 190 | 400283.00 |
| 5 | Prepration Base Map Data base<br>c. Seanning Digitization , and Integaration / Mosaicking of Lay out Plan Maps and TP Scheme Maps. | 190 | 400283.00 |
| 6 | Prepration of Utility Maps as below<br>a. Property Tax<br>b. Road | 190 | 400283.00 |
| 7 | To prepare floor wise plan sketch of each property out line for representation purpose for individual property identification along with real floor plan sketch | 250000 | 7022500.00 |
| 8 | To prepare data base of exising properties from hard copies available at SMC | 250000 | 3511250.00 |
| 9 | To carry out field survey to prepare attribute/non spatial data base<br>a. To identify every building / property in records of proprty Tax Department and carry out attribute survey of Buildinding as par attribute sheet along with photograph of the building.<br>b. To identfy new building / properties in existing buildings / properties as per attribute sheet along with photograph of the building.<br>c. To carry out fild survey for attribute data collection for utility mapping for road.<br>d. To prepare attribute data base of all the properties with existing data transfer along with new collected in to one as required. | 250000 | 21067500.00 |
| 10 | To integrate the spetial data non spatial/attribute data and photopgaphs of the building with unique ID | 250000 | 3511250.00 |
| 11 | ESSRI Arc GIS Desk to PC (editor) software 2 licenses and Arc GIS server stlicense. | 1 | 6900000.00 |
| 12 | To Provide server M/C as required | 1 | 1035000.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | GIS Software deployment and customization /Application Development Property Tax calculation provision with 3 Year AMC | 1 | 8427000.00 |
| | Total | | 5,36,23,387.00 |

यामध्ये खालील प्रमाणे अनियमितता आढळून येतात.

(1) महासभेने मंजुरी न दिल्याने आयुक्तांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 प्रकरण-2 क्रमांक 4 मधील (ख) मधील (2) नुसार शासनाकडे पत्र क्र./09/संगणक/301दि.16/08/2014 नुसार मंजुरीस्तव सादर केले शासनाकडून मंजुरी मिळाली की नाही, याबाबत माहिती सादर केली नाही.

(2) सदर योजनेवर खर्च करताना संगणक विभागाची तांत्रिक मान्यता व त्यांचे अभिप्राय घेतल्याचे

(3) सदरचे दर NON-DSR आणि NON-Market Rate स्वरूपाचे असल्यामुळे शासनाच्या दरपत्रकानुसार वरील बाबीची खरेदी करण्यात आली याबाबत खात्री होत नाही.

(4) अटी व शर्ती नुसार परफॉरमन्स सिक्युरिटी ठेकेदाराकडून घेतल्याचे आढळून येत नाही.

(5) BOQ Comparative Chart उपलब्ध झालेला नाही.

(6) पूर्वीचे मक्तेदार AILSG या कडून झालेले महानगरपालिकेचे आर्थिक नुकसानीबाबत भरपाई झाली किंवा नाही, याची खात्री होत नाही.

(7) सदरचा खर्च कोणत्या लेखाशिर्षाखाली पडणार हे नमुद केलेले नाही.

(8) मंजुर पूर्वगणकपत्र रक्कम रुपये-6,00,00,000 कोटी लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही.

(9) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 20 फेब्रुवारी 2014 भाग एक-अ मध्य उपविभाग असाधारण क्र-33 Group no II Serial No.2 All equipments for electronic communication करिता LBT 4% नुसार रुपये-2,53,920/- देयकातून कपात करणे आवश्यक होते. परंतु देयक क्र. 99/ date 08/01/2015 Rs-63,48,000/- 1st runing bill मधून 0.25% LBT रक्कम रुपये-15,870/- कपात करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम रुपये-2,38,050/- वसुल करण्यात यावी.

(10) सादर केलेल्या अनुपालनासोबत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचा Thrid Patry Audit Report जोडलेला आहे परंतु त्यामधील मुद्दा क्र. 5.1.1 , 5.2, 6.4.1, 6.4.4, 6.6 व, दर्शविण्यात आलेल्या त्रुटीबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली याची माहिती यासोबत जोडण्यात आलेली नाही. तसेच मुद्दा क्र 7 मध्ये सॅटलाईट इमेजेस 356 sq.km. रक्कम रु. 4,93,810/- चे साहित्य महानगरपालिकेने खरेदी केलेले असल्याने सदर रक्कम मक्तेदारास अदा करण्यात येऊ नये असे स्पष्ट नमूद आहे. सदरची देयके लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने सदर रक्कम मक्तेदारास अदा केली किवा कसे याची खात्री करता आली नाही. त्यामुळे सादर केलेले अनुपालन मान्य करता येत नाही.

(11) साहीत्य Specification प्रमाणे व सदरचे साहीत्य योग्य दर्जाचे असल्याबाबत नोडल ऑफिसर GIS यांचे प्रमाणपत्र नस्तीत आढळत नाही.

(12) मुद्रांक शुल्क रु. 100/- च्या बँक गॉरन्टी घेतलेली आढळून येते.परंतू रुपये-1000/- करिता 5

रुपये याप्रमाणे रु. 26,00,000/- बँक गॉरन्टी करिता रु. 13000/- चे (मुद्रांक शुल्क) घेणे आवश्यक होते. त्यामुळे रक्कम रु. 12900/- शासनास महसुल प्राप्त झाला नाही.
वसूल पात्र रक्कम रु.238050+12900 = 250950/-

DATYMKM6601 (Ref No : 101, Hmm No : 122)

### *92 अग्निशामक दल विभागासाठी (लोकरी) निळा उलन गणवेश कापड खरेदीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 06**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 117975.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 117975.00/-

***जाहिरात प्रसिध्दी वर्तमानपत्रात देवून केलेली नाही. निविदा काढण्यापुर्वी (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजार मुल्य काढले असते तर त्याप्रमाणे निविदा मधील न्युनतम दर व बाजार मुल्य यांचेशी तुलना करुन वाटाघाटी केल्या असत्या तर महानगरपलिका निधीची बचत झाली असती. संपतकुमार सोमाणी यांची रु.715/- दराने निविदा मंजुर केलेली आहे तथापि वाटाघाटी केलेली नाही.कापड टेक्स्टाईल युनीटकडून (Test Report) तपासुन कापडाचा दर्जा कसा आहे तो प्राप्त करुन घेतलेला नाही. त्यामुळे कापडाच्या योग्यतेची खात्री पटत नाही.Test Report नसतांना बिले अदा केल्याने रक्कम रु.117975/- आक्षेपित ठेवण्यांत येत आहे.ज्या कामगारांना गणवेशाचे कापड वाटप केलेले आहे. त्याची पोहोच घेतलेली नाहीत. त्यामुळे गणवेश वाटपाची खात्री पटत नाही.***

अग्निशामक दलातील अधिकारी ,मोटार ड्रायव्हर, फायरमन क्लीनर (फायर मेकॅनिकल) यांना समारंभाकरीता उलन (विमल 4849) गणवेश दर तीन वर्षानंतर देण्यांत येते. सदराचा गणवेश हा 26 जानेवारी,15 ऑगष्ट, 14 एप्रिल, 2 ऑक्टोंबर, 1 मे परेड, व्ही आय पी बंदोबस्त, विमानतळ बंदोस्त तसेच प्रात्यक्षिकाच्या वेळेस सदर उलन गणवेशचा वापर केला जातो. एकूण पात्र सेवक 55 सेवक असुन प्रत्येकी 3 मीटर प्रमाणे एकूण 165 मीटर निळा उलन गणवेश कापड खरेदी करणे आवश्यक असुन याकामी अंदाजे रु.150000/- ची आवश्यकता असुन सदर प्रकरणाला सहाय्यक आयुक्त (स) यांची दिनांक 1/3/14 नुसार प्रशासकिय मान्यता आहे. तसेच मुख्य लेखापाल यांचे पत्र दिनांक 4/3/14 नुसार सदर प्रकरणी रक्कम रु.150000/- अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध असल्याचे नमुद आहे. सदर निविदा सोलापूर महानगरपालिकाच्या वेबसाईटवर दिनांक 13/3/14 अन्वये

देण्यांत आलेली असुन सदर निविदा दिनांक 12/3/14 अखेर दुपारी 1.00 वाजता मागविण्यांत आलेली आहे. त्याच दिवशी दुपारी 4.00 वाजता निविदा उघडण्यांत आल्या होत्या. खालीलप्रमाणे 3 निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | मक्तेदारांचे नांव | निविदेतील दर रु. (प्रती मीटरप्रमाणे) |
|---|---|---|
| 1 | नंदन फर्निसिगं | 730/- |
| 2 | संपतकुमार सोमाणी | 715/- |
| 3 | धनलक्ष्मी एंटरप्रायजेस | 775/- |

संपतकुमार सोमाणी सोलापुर यांची खालीलप्रमाणे न्युनत्तम दर असलेली निविदा मंजुर करण्यांत आली आहे.

| कापड प्रकार | संख्या | दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| निळा उलन सुटींग कापड नेव्ही ब्ल्यु पन्हा 137 से.मी.मिल 4849-3 मिटरेचे 55 नग | 165 | 715 | 117975/- |

सदरबाबत खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येते.

1) जाहिरात प्रसिध्दी वर्तमानपत्रात देवून केलेली नाही.

2) निविदा काढण्यापुर्वी (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजार मुल्य काढले असते तर त्याप्रमाणे निविदा मधील न्युनतम दर व बाजार मुल्य यांचेशी तुलना करुन वाटाघाटी केल्या असत्या तर महानगरपलिका निधीची बचत झाली असती.

3) संपतकुमार सोमाणी यांची रु.715/- दराने निविदा मंजुर केलेली आहे तथापि वाटाघाटी केलेली नाही.

4) कापड टेक्स्टाईल युनीटकडून (Test Report) तपासुन कापडाचा दर्जा कसा आहे तो प्राप्त करुन घेतलेला नाही. त्यामुळे कापडाच्या योग्यतेची खात्री पटत नाही.Test Report नसतांना बिले अदा केल्याने रक्कम रु.117975/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

5) ज्या कामगारांना गणवेशाचे कापड वाटप केलेले आहे. त्याची पोहोच घेतलेली नाहीत.त्यामुळे गणवेश वाटपाची खात्री पटत नाही. साठा रजिष्टरवरुन मार्च 2012 ला गणवेशाचा साठा किती शिल्लक होता. तसेच वाटप केलेला साठा व मार्च 2015 अखेर शिल्लक साठा याची माहीती विवरणपत्रामध्ये भरुन निरीक्षण पथकास सादर करणेस सांगितली असता ती सादर केलेली नाही.

6) खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.93 दिनांक 29/11/2017 नुसार उपरोक्त बाबत खुलासा सादर करावयास सांगितले असता विभागाने त्याचे पत्र क्र.साआस/साप्र-1/604 दिनांक 28/09/2018 रोजी खुलासा सादर केलेला आहे. खुलासा सयुक्तिक नसल्यामुळे, सदर आक्षेप कायम ठेवण्यात आलेला आहेत.

## *93 अग्निशमक सेवा सुधारणा करणेसाठी दोन नवीन गाडी खरेदी करणेसाठी झालेल्या अनियमीततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 03**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3675000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3675000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 367500.00/-

***वाहन खरेदीबाबत शासनाकडून मे विजय फायर व्हेईकल्स अॅन्ड पप्स लिमिटेड यांचेकडून बॉडी बिल्डींग करुन घेण्यास water Tender Rs.17,15,000/- तसेच Foam Tender Rs.19,60,000/- असे एकूण रु.36,75,000/- दोन वाहनावर खर्च झालेला आहे. दोन वाहने बॉडी बिल्डींग करुन महानगरपालिका यांच्या ताब्यात देण्याची मुदत ही दिनांक 03/07/2014 होती. तथापी मक्तेदारांनी सदर वाहनाचा पुरवठा हा दिनांक 08/09/2014 रोजी केल्याचे दिसुन येते. एकूण कामाच्या मुदतीपेक्षा 68 दिवस उशिरा कामाची पुर्तता झाली असल्याने एकूण खरेदी रक्कमेच्या 10 टक्के दंड आकारण्याचे आदेश मा. आयुक्त यांनी टिप्पणी द्वारे दिलेले आहे. दंडाची रक्कम रु.3,67,500/- संबधित मक्तेदार यांचेकडून वसुल करुन महानगरपालिकेच्या निधीमध्ये जमा करावी. तरतुद नसताना संबधीत मकतेदार यांना रक्कम रु.18,37,500/- अग्रिम (Advance) दिलेला आहे. रक्कम रु.18,37,500/- चे दोन प्रमाणके निरीक्षण पथकास तपासणीकरीता उपलब्ध झालेले नाहीत.***

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम 2006 आणि नियम 2009 तसेच नगरविकास विभागाचे शासन निर्णय दिनांक 31/8/2009 नुसार महानगरपालिका त्यांच्या अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यास शासनामार्फत अनुदान प्राप्त होते. तसेच वाहन खरेदी करणेबाबत शासन दरकराराप्रमाणे कॉन्ट्रॅक्टरची नेमणुक करुन त्याप्रमाणे सदर वाहन खरेदीबाबत शासनाकडून मे विजय फायर व्हेईकल्स अॅन्ड पप्स लिमिटेड यांचेकडून बॉडी बिल्डींग करुन घेण्यास water Tender Rs.17,15,000/- तसेच Foam Tender Rs.19,60,000/- असे एकूण रु.36,75,000/- मा.स्थायी समीती ठराव क्र 445 दिनांक 12/12/2013 अन्वये मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच मुख्य लेखापाल यांचे पत्र क्र.3098 दिनांक 18/01/2014 नुसार 36.75 लाख बजेट तरतुद असल्याचे त्यांचे पत्रामध्ये नमुद आहे.

सदरबाबत खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

1) दोन वाहने बॉडी बिल्डींग करुन महानगरपालिका यांच्या ताब्यात देण्याची मुदत ही दिनांक 03/07/2014 होती. तथापी मक्तेदारांनी सदर वाहनाचा पुरवठा हा दिनांक 08/09/2014 रोजी केल्याचे दिसुन येते. एकूण कामाच्या मुदतीपेक्षा 68 दिवस उशिरा कामाची पुर्तता झाली असल्याने एकूण खरेदी रक्कमेच्या 10 टक्के दंड आकारण्याचे आदेश मा. आयुक्त यांनी टिप्पणीद्वारे देणेत आलेले आहेत. त्यानुसार दंडाची रक्कम रु.3,67,500/- संबधित मक्तेदार यांचेकडून वसुल करुन महानगरपालिकेच्या निधीमध्ये जमा करावी.

2) तरतुद नसताना संबधीत मकतेदार यांना रक्कम रु 18,37,500/- अग्रिम (Advance) दिलेला आहे.

3) रक्कम रु.18,37,500/- चे दोन प्रमाणके निरीक्षण पथकास तपासणीकरीता उपलब्ध झालेले नाहीत.

अर्धसमास ज्ञापन क्र. 99 दिनांक 21/12/2017 नुसार उपरोक्त बाबतचा खुलासा सादर करावयास सांगितले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात आलेला आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 104, Hmm No : 99)

## *94 आरोग्य विभागातील डी.एस.भांडारशाखा येथील निविदा न काढता व तुकडे करुन रु.3000/- च्या आतील औषधे खरेदी करणे .*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 183591.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 183591.00/-

***उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय ब्-10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना बजेट तरतुद 2014-15 मध्ये रक्कम रु.5 लाख असताना निविदा प्रक्रिया न राबविता एकूण रु. 1,83,591/- खरेदी एकूण 25 तुकडे पाडून औषधाची खरेदी करण्यांत आलेली आहे.***

विभागातील डी.एस.भांडारशाखा येथील बजेट कन्ट्रोल/बील नोंदवहीची तपासणी केली असता सोलापुर

महानगरलिकेच्या अंतर्गत दवाखान्याकरीता तातडीची औषधे निविदा न काढता व तुकडे करुन रु.3000/- च्या आतील एकूण 25 प्रमाणकाद्वारे खरेदी रक्कम रु.1,83,591/- ची आरोग्य अधिकारी यांच्या मान्यतेने केलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 7 चे कलम 73(ग) अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेने निविदा मागवुन खरेदी करणे आवश्यक असता खरेदीचे रु.3000/- चे आत तुकडे पाडून आरोग्य अधिकारी यांच्या मान्यतेने औषधे नियमबाहयरित्या खरेदी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसुन येते.

उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय ब्-10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वार्षिक खरेदी ही रुपये 50,000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना तसेच बजेट तरतुद 2014-15 मध्ये रक्कम रु. 5 लाख असताना निविदा प्रक्रिया न राबविता एकूण
रु.1,83,591/- ची खरेदी असे 25 तुकडे पाडून औषधाची खरेदी करण्यांत आलेली आहे. हे नियमबाहय आहे.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.119 दिनांक 22/01/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 110, Hmm No : 119)

## ***95 घनकचरा व्यवस्थापन आरोग्य विभागाअतंर्गत सोलापुर शहरातील दैनदिन कचरा उचलण्यासाठी लागणा-या हेम ऐजन्सीज यांचेकडून Ape xtra LD model No.LD-DAC घंटागाडी खरेदीमधील अनियमिततेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 14**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 11620000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 11620000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 536900.00/-

***सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार सदरच्या कामाची ई-निविदा काढलेली नाही. तसेच शासन दरकरार केलेला नाही. दिनांक 01/01/2015 पासुन***

***मक्तेदारानी कचरा उचलणे बंद का करण्यांत आलेले आहे यांचे स्यंयस्पष्ट कारणे निविदा नस्तीमध्ये दिसुन येत नाही. तसेच समिक्षा कंपनी यांनी कचरा उचलण्याचे काम अचानक बंद केल्यामुळे करारपत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. पुरवठादारास रक्कम रु.1,16,20,000/- प्रदान करण्यात आलेली आहे. त्यावर व्हॅट 2 टक्के प्रमाणे रक्कम रु.2,34,400/- देयकातुन वसुल करण्यांत आलेला नाही. सदर रक्कम वसुल करुन शासनास जमा करावी. कार्यादेश दिनांक 04/01/2015 चा आहे. 70 गाडया दिनांक 22/04/15 महानगरपालिकेमध्ये प्राप्त झाल्या आहे. गाडया 60 दिवस उशिराने प्राप्त झाल्या आहेत. करारपत्रामध्ये दंडाची रक्कम ठरवलेली नाही. सांगली ते सोलापुर येथे 70 गाडया पुरवणेबाबत सदर पुरवठादाराकडुन बांधून घेणे आवश्यक होते. त्यानुसार करारपत्र न केल्यामुळे महानगरपालिकेला रक्कम रु.1,26,000/- चे नुकसान झालेले आहे. स्थानिक संस्था कर वसुल केलेला नाही. नगरविकास विभागाचे नोटीफिकेशन दिनांक फेब्रुवारी 2015 नुसार 2.5 टक्के दराने रक्कम रु.2,90,500/- संबधित मक्तेदाराकडुन वसुल करुन महानगरपालिकेच्या निधीमध्ये जमा करण्यात यावी. करारनामा करताना रु.15,800/- चे मुद्रांक शुल्क रक्कमेवर करारनामा करणे आवश्यक होते.परंतु रक्कम रु.3800/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा केला असल्याने उर्वरित रक्कम रु.12000/- वसुल करुन शासन जमा करण्यात यावी.***

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार सदरच्या कामाची ई-निविदा काढलेली नाही. तसेच शासन दरकरार केलेला नाही. दिनांक 01/01/2015 पासुन मक्तेदारानी कचरा उचलणे बंद का करण्यांत आलेले आहे यांचे स्यंयस्पष्ट कारणे निविदा नस्तीमध्ये दिसुन येत नाही. तसेच समिक्षा कंपनी यांनी कचरा उचलण्याचे काम अचानक बंद केल्यामुळे करारपत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. पुरवठादारास रक्कम रु.1,16,20,000/- प्रदान करण्यात आलेली आहे. त्यावर व्हॅट 2 टक्के प्रमाणे रक्कम रु.2,34,400/- देयकातुन वसुल करण्यांत आलेला नाही. सदर रक्कम वसुल करुन शासनास जमा करावी. कार्यादेश दिनांक 04/01/2015 चा आहे. 70 गाडया दिनांक 22/04/15 महानगरपालिकेमध्ये प्राप्त झाल्या आहे. गाडया 60 दिवस उशिराने प्राप्त झाल्या आहेत. करारपत्रामध्ये दंडाची रक्कम ठरवलेली नाही. सांगली ते सोलापुर येथे 70 गाडया पुरवणेबाबत सदर पुरवठादाराकडुन बांधून घेणे आवश्यक होते. त्यानुसार करारपत्र न केल्यामुळे महानगरपालिकेला रक्कम रु.1,26,000/- चे नुकसान झालेले आहे. स्थानिक संस्था कर वसुल केलेला नाही. नगरविकास विभागाचे नोटीफिकेशन दिनांक फेब्रुवारी 2015 नुसार 2.5 टक्के दराने रक्कम रु.2,90,500/- संबधित मक्तेदाराकडुन वसुल करुन महानगरपालिकेच्या निधीमध्ये जमा करण्यात यावी. करारनामा करताना रु.15,800/- चे मुद्रांक शुल्क रक्कमेवर करारनामा करणे आवश्यक होते.परंतु रक्कम रु.3800/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा केला असल्याने उर्वरित रक्कम रु.12000/- वसुल करुन शासन जमा करण्यात यावी.

सोलापुर महानगरपालिका क्षेत्रातील दैनदिन जमा होणारा कचरा 400 ते 420 टन उचलणेकामी समिक्षा कन्स्टक्क्षन कंपनी यांना कचरा संकलन करणे, गोळा करणे व कचरा वाहतुक करणेबाबत दिनांक 18/09/2012 ला करार झालेला होता. तथापि दिनांक 01/01/2015 पासुन मक्तेदारानी कचरा उचलणे बंद

झाल्यामुळे सोलापुर महानगरपालिका यांची कचरा नियंत्रण करणारी यंत्रणा कमी पडत असल्याने आणिबाणीची परिस्थितीस मात करणे अत्यंत गंभीर व गरजेचे होते. मा. आयुक्त यांनी पी आय जी व्हेव्हीकल्स प्रा.लि. कंपनी त्यातील मक्तेदार यांचेशी Ape xtra LD Model No LD DAC हे तीनचाकी वाहन घेणेकामी चौकशी केली असता सदर वाहनाचे दर सर्वात कमी दर करारात नमुद केल्याप्रमाणे देवून व बॉडी बिल्डीग करण्यासाठी चितांमणी मोटर्स यांच्याकडून सर्वात कमी दरात करुन देण्याकरिता येणारा खर्च हा नागरी घनकचरा व्यवस्थापन व तत्सम उपाययोजना रक्कम रु.18 कोटी या बजेट सदराखाली खर्ची घालण्यास सदरचा खर्च मा.स्थायी समिती व सर्वसाधारण सभा यांची कार्योत्तर मान्यता घेणेकामी तसेच उपरोक्त वाहन मा. प्रादेशीक परिवहन अधिकारी विभागाकडे रजिष्टर नोंदणीकामी येणा-या खर्चास व सदरचे वाहन अपघाती विमा काढणेकामी येणा-या खर्चास मान्यता घेणे. तसेच मा.मुख्य लेखा परिक्षक यांच्या अभिप्रायानुसार मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 67(3) अन्वये जाहीर प्रसिध्दीची अट शिथिल होणेकामी कलम 67(3) (क) अन्वये करारपत्र करणे तसेच चितांमणी मोटर्स यांच्याकडून बॉडी बिल्डीग करण्याकरिता वाहन खरेदी करण्यासाठी प्रति वाहन रु.166000/- प्रमाणे 70 वाहनाचे एकूण रक्कम रु.11620000/- आणि सदर वाहनावर बॉडी बिल्डीग करीता प्रती वाहन रु.74999/- प्रमाणे एकूण 70 वाहनाकरिता एकूण रक्कम रु 52,49,930/- असे एकूण रु.1,68,69.930/- खर्च येणार आहे. मा. आयुक्त यांनी चितांमणी मोटर्स यांचेसोबत दिनांक 8/01/2015 रोजी करारनामा केला आहे. तसेच मा. आयुक्त यांचे स्वाक्षरीने जा.क्र.44 दिनांक 14.01.15 रोजी कार्यादेश काढण्यात आलेला आहे.

मुख्य लेखापाल यांचे जा.क्र. 4701 दिनांक 18/03/15 नुसार 18 कोटी रुपयाची तरतुद उपलब्धते बाबत कळविलेले आहे.

गाडीचे टेक्निकल स्पेशिफिकेशन खालील प्रमाणे आहे.

Hydraulic Hopper for Garbage on APE xtra 3 WLD

1)for GarbageContainer: side & bottom panels in 1 mm G 1 sheets

2)Capacity in volume: 1.50 m3

3)Tipping angle : 84

4)Dimension: As per the volume of the Hopper container

5)Paint: Clolur shade as per customers requirement coat of Epoxy paint to inner bottom panel

6)Pump Capacity: 3.4 LPM Gear type

7)Pump operating Drive: Engine Driven

8)Oil Tank Capacity: 10 lietres

9)Direction control system: Manual DCV

10)Working pressure: 70 to 100 Bar

11)PRV setting: 110 Bar

12)Hydraulic House: 3/8 R1

13)Main lifting cylinders : Finely Honed and hard chrome ram single Acting

उपरोक्त बाबत खालील प्रमाणे त्रुटी आढळून आलेली आहे.

1 सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार सदरच्या कामाची ई-निविदा काढलेली नाही. तसेच शासन दरकरार केलेला नाही.

2) फॅक्टरी टेस्ट रिपोर्ट जोडलेला नाही.

3) टेकनिकल स्पेशिफिकेशन प्रमाणे वाहने प्राप्त झाल्याचे दिसुन येत नाही. याबाबतचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र नस्तीत नाही.

4) दिनांक 01/01/2015 पासुन मक्तेदारानी कचरा उचलणे बंद का करण्यांत आलेले आहे यांचे स्यंयस्पष्ट कारणे निविदा नस्तीमध्ये दिसुन येत नाही. तसेच समिक्षा कंपनी यांनी कचरा उचलण्याचे काम अचानक बंद केल्यामुळे करारपत्रानुसार कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

5) महानगरपालिकेच्या मालकीच्या यावेळी किती गाडया आहेत. त्यापैकी किती गाडया कार्यरत आहे. सबब 70 गाडया खरेदी करणे आवश्यक आहे काय? याबाबत नियोजन झाल्याचे दिसुन येत नाही.

6) सदर 70 वाहनाची नोंद जडसंग्रह नोंदवहीमध्ये घेतल्याचे दिसुन येत नाही.

7) डिलिव्हरी चलने उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे वाहने विहीत वेळेत पुरवठा केल्याची खात्री करता आली नाही.

8) पुरवठादारास रक्कम रु.1,16,20,000/- प्रदान करण्यात आलेली आहे. त्यावर व्हॅट 2 टक्के प्रमाणे रक्कम रु.2,34,400/- देयकातुन वसुल करण्यांत आलेला नाही. सदर रक्कम वसुल करुन शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

9) कार्यादेश दिनांक 04/01/2015 चा आहे. 70 गाडया दिनांक 22/04/15 महानगरपालिकेमध्ये प्राप्त झाले आहे. गाडया 60 दिवस उशिराने प्राप्त झाल्या आहे. करारपत्रामध्ये दंडाची रक्कम ठरवलेली नाही. सदर बाबत काय कार्यवाही केली.

10) सदर मक्तेदार कंपनीचा अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

11) सांगली ते सोलापुर येथे 70 गाडया आणण्याबाबत सदर पुरवठादाराकडुन प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. त्यानुसार करारपत्र न केल्यामुळे महानगरपालिकेला रक्कम रु.1,26,000/- चे नुकसान झालेले आहे.

12) प्रमाणके व देयकाची मागणी केली असलेले Tax Invice उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे आयकर कपातीची खात्री होत नाही.

13 ) स्थानिक संस्था कर वसुल केलेला नाही. नगरविकास विभागाचे नोटीफिकेशन दिनांक फेब्रुवारी 2015 नुसार 2.5 टक्के दराने रक्कम रु.2,90,500/- संबधित मक्तेदाराकडुन वसुल करुन महानगरपालिकेच्या निधीमध्ये जमा करण्यात यावी.

14) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 तसेच महसुल व वन विभाग अधिसुचना दिनांक 23/4/2006 अन्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक यित्रक यांचेकडील पत्र क्रमांक

12/कलम/ममुंशु/113/09दिनांक 20/7/2009 नुसार कार्य कंत्राटा सबधीत करारनामा करतांना रु.10 लक्षपर्यंतचा करारनामा 100 च्या मुद्रांकावर व पुढील प्रत्येक एका लाखावर 100 रु. जास्तीत जास्त 5 लक्ष पर्यंतच्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. सबधीत ठेकेंदारास रु.1,68,69,930/- प्रदान करणेत आले आहे. सदर रक्कमेचा करारनामा करताना रु.15,800/- चे मुद्रांक शुल्क रक्कमेवर करारनामा करणे आवश्यक होते.परंतु रक्कम रु.3800/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा केला असल्याने उव्ररि त रक्कम रु.12000/- वसुल करुन शासन जमा करण्यात यावी.

वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.146 दिनांक 28/03/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 111, Hmm No : 146)

## *96 वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत नागरी हिवताप योजना अंमलबजावणीतील अनियमितताबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 03**

*मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 3330366.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3330366.00/-

***मलेरिया विभागातील शासनमान्य एकूण 8 वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता झोन ऑफीसकडे कार्यरत असल्याचे हजेरीपत्रकातील नोंदीवरुन तसेच विभागाने दिलेल्या माहीतीवरुन दिसुन येते. वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ताकडे तीन फवारणी सेवकावर देखरेख व नियंत्रण करण्याचे काम आहे. सदर कर्मचारी वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत मलेरिया विभागातील काम न करता झोन ऑफीसमध्ये काम करतात. सदर बाबत शासन अनुदान मलेरिया विभाग व अळीनाशक फवारणी कार्यक्रमावर देखरेखसाठी शासनकडून सहाय्यक अनुदानाची प्रतीपुर्ती होत असल्याने त्यांचा वापर शासनाची मान्यता न घेता अन्य विभागासाठी नियमबाहयरित्या करीत असल्याचे स्पष्ट होते तसेच वरील नियमबाहयतेबाबत सदर कर्मचा-यावर 2014-15 मध्ये वेतनावर करणेत आलेल्या एकूण रक्कम रु.30,30,366/- शासनास भरणा करणे आवश्यक आहे.***

नागरी हिवताप योजनेकरीता शासनाने एकूण 44 पदे मंजूर केली असून, त्यापैकी 6 पदे रिक्त आहेत त्यापैकी जीवशास्त्रज्ञ 01 पद मार्च 2011 पासुन रिक्त आहे.तसेच क्षेत्र कार्यकर्ता 5 पदेरिक्त असुन सदर पदांना शासनाकडून 100 टक्के अनुदान मंजूर असताना ती पदे वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत भरणेत आलेली

नाहीत.

मलेरिया विभागातील शासनमान्य एकूण 8 वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता झोन ऑफीसकडे कार्यरत असल्याचे हजेरीपत्रकातील नोंदीवरुन तसेच विभागाने दिलेल्या माहीतीवरुन दिसुन येते. वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ताकडे तीन फवारणी सेवकास देखरेख व नियंत्रण करण्याचे काम आहे. सदर कर्मचारी वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत मलेरिया विभागातील काम न करता झोन ऑफीसमध्ये काम करतात. सदर बाबत 2014-15 शासन अनुदान मलेरिया विभाग व अळीनाशक फवारणी कार्यक्रमावर देखरेखसाठी शासनकडून सहाय्यक अनुदानाची प्रतीपुर्ती होत असल्याने त्यांचा वापर शासनाची मान्यता न घेता अन्य विभागासाठी नियमबाहयरित्या करीत असल्याचे स्पष्ट होते तसेच वरील नियमबाहयतेबाबत सदर कर्मचा-यावर वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये वेतनावर करणेत आलेल्या एकूण रक्कम रु. 33,30,366/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

वरीष्ठ क्षेत्र कार्यकर्ता व क्षेत्रीय कार्यकर्ता ही भागामध्ये फिरतीची पदे असलेने त्यांनी केलेल्या कामाची दैनंदिनी ठेवणे आवश्यक असताना ती ठेवण्यात आली नाही.

वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.142 दिनांक 28/03//2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.516 दिनांक 4/4/2018 खुलासा सादर केलेला आहे. खुलासा सयुक्तिक नसल्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 113, Hmm No : 142)

## *97 वाहनांच्या देखभाल/दुरुस्तीवर करणेत आलेल्या खर्चाबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1525046.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1525046.00/-

***उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना बजेट तरतुद 2014-15 मध्ये रक्कम रु.30 लाख असताना निविदा प्रक्रिया न राबविता एकूण रु.15,25,046/- ची खरेदी असे एकूण 83 तुकडे पाडून खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची खरेदी करण्यांत आलेली आहे.***

सोलापुर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत पथांची झाडलोट व कचरा वाहतुक या लेखाशिर्षातंर्गत वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत झालेल्या खर्चाचे लेखापरिक्षण केले असता

खालील बाबी दिसुन आल्या आहेत.

आरोग्य विभागाकडे एकूण 48 वाहने असूनवित्तीय वर्ष 2014-15 मध्ये सुटया भागावर झालेल्या खरेदीबाबतच्या नोंदी बजेट कंट्रोल नोंदवहीवरुन तपासणी केली असता तुकडे करुन एकूण 83 प्रमाणकाद्वारे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत पथांची झाडलोट व कचरा वाहतुकया सदरखाली खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची तुकडे पाडून खरेदी केलेली आहे. यावर एकूण रक्कम रु.15,25,046/- खर्च झालेला आहे

उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय 10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50,000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना बजेट तरतुद 2014-15 मध्ये रक्कम रु.30.00 लाख असताना निविदा प्रक्रिया न राबविता एकूण रु.15,25,046/- ची खरेदी असे एकूण 83 तुकडे पाडून खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची खरेदी करण्यांत आलेली आहे.

वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.161 दिनांक 31/05/2018 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 116, Hmm No : 161)

### *98 वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीमधील झोन-2 येथील आस्थापनेवर श्रीमती सुशिला शरणप्पा कांबळे , झाडुवाली यांच्या वेतनामध्ये रु.10/- चे दिनांक 21/02/2011 पासुन अतिप्रदान झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 1**

*मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीमधील झोन-2 येथील आस्थापनेवर श्रीमती सुशिला शरणप्पा कांबळे, झाडुवाली यांच्या वेतनामध्ये रु.10/- चे दिनांक 21/02/2011 पासुन अतिप्रदान झाल्याचे त्यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असता निर्दशनात आले आहे. श्रीमती सुशिला शरणप्पा कांबळे, झाडुवाली यांचे दिनांक 21/02/2011 ला वेतन 6190+ ग्रेड वेतन रु+1300 असे असणे आवश्यक असताना सेवा पुस्तकामध्ये वेतन 6200+ ग्रेड वेतन रु+1300 असे आहे. त्यामुळे वेतनमध्ये 10/- अतिप्रदान झाले आहे.***

वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीमधील झोन-2 येथील आस्थापनेवर श्रीमती सुशिला शरणप्पा कांबळे, झाडुवाली यांच्या वेतनामध्ये रु.10/- चे दिनांक 21/02/2011 पासुन अतिप्रदान झाल्याचे त्यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असता निर्दशनात आले आहे. श्रीमती सुशिला शरणप्पा कांबळे, झाडुवाली यांचे दिनांक 21/02/2011 ला वेतन 6190+ ग्रेड वेतन रु+1300 असे असणे आवश्यक असताना सेवा पुस्तकामध्ये वेतन 6200+ ग्रेड वेतन रु+1300 असे आहे. त्यामुळे वेतनमध्ये 10/- अतिप्रदान झाले आहे.

तसेच त्यांची कालबघ्द पदोन्नती दिनांक 25/3/2015 ला झालेली आहे. त्यावेळी पदोन्नतीचा विकल्प विहीत मुदतीत घेतला असल्याची माहीती लेखापरिक्षणास सादर केलेली नाही. 6 वा वेतन आयोग सोलापुर महानागरपालिकेला दिनांक 21/02/2011 ला लागु झालेला आहे. श्रीमती सुशिला शरणप्पा कांबळे, झाडुवाली वेतनामध्ये रु.10/- प्रमाणे अतिप्रदानाची वसुली दिनांक 21/02/2011 पासुन देय वेतन, दिलेले वेतन व त्यामधील फरक याप्रमाणे (Due,Drown,Difference) विवरणपत्र तयार करुन करुन अतिप्रदानाची वसुली करुन त्याबाबतची नोंद सेवापुस्तकामध्ये घेवून तसेच सुधारीत वेतनवाढीच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेवून अनुपालन सादर करावे.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.143 दिनांक 28/03/2018 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 112, Hmm No : 143)

## ***99 वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीमधील झोन-4 येथील प्रभाग क्र.38 हुडको कॉलनी मदर इंडिया येथे पोल व फिटींग बसविणे बाबत. तसेच प्रभाग क्र.41 मधील विष्णुनगर भाग-1 अंबिकानगर, शोभादेवी नगर,शिवगंगा नगर-2 लाईटची सोय करणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष : विभागीय कार्यालय झोन मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 180969.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 180969.00/-

***शासनदराप्रमाणे दरसुची उपलब्ध करुन दिलेली नाही. वस्तुचे बाजारमुल्य इलेक्ट्रीकल्स साहीत्य खरेदी करताना काढलेले नाही. तसेच बाजारमुल्याचे कोटेशन नस्तीमध्ये दिसुन येत नाही. नकाशावर दर्शविलेले लाईट स्पेशिफिकेशन नुसार संबधित ठिकाणी बसविल्याचे दिसुन येत नाही. इलेक्ट्रीकल्स साहीत्याची नोंद जडसंग्रह नोंदवहीमध्ये घेतलेली नाही. प्रमाणके निरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. साहित्याचा तपासणी अहवाल नस्तीत नाही. त्यामुळे साहित्याच्या दर्जाची खात्री होत नाही. काम पुर्णत्वाचा दाखला घेण्यात आला नाही.***

1) वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीमधील झोन-4 येथील प्रभाग क्र. 38 हुडको कॉलनी मदर इंडिया येथे पोल व फिटींग बसविणे बाबतची निविदा नस्ती तपासली असता खालील प्रमाणे कामाचा तपशिल आहे.

पुर्वगणकपत्राचा क्र.वर्ष 59/2014-15
डी.एस.आर.दराचे वर्ष 2013-14 डी.एस.आर.दर/बाजार भाव
पुर्वगणकपत्राची (एस्टीमेटची) रक्कम रु.1,99,652/-
मक्याची रक्कम रु.1,80,969/-
नगर अभियंता व सर्वसाधारण सभा यांची मान्यता दिनांक 08/03/2015 जाहिरात प्रसिध्दी संकेतस्थळावरुन.
मुदतीत 3 निविदा प्राप्त दिनांक 20/03/2015
निविदा उघडयाचा दिनांक 20/03/2015
प्राप्त निविदा
1)निलकमल इलेक्टीकल्स मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 3 टक्के जास्त दराने.
2)शंकर इलेक्टीकल्स मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 3 टक्के कमी दराने.
3)विजयप्रताप इलेक्टीकल्स मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 5 टक्के जास्त दराने.
नकाशावर दर्शविलेले काम करुन घेण्याची जबाबदारी सबधित तांत्रिक अधिकारी व खातेप्रमुखाची राहील.
नकाशावर दर्शविलेले लाईट स्पेशिफिकेशन नुसार बसविताना उत्तम दर्जाचे इलेक्टीकल्स साहीत्य वापरुन काम पुर्ण झाल्यावर डेडस्टॉक रजिष्टरला नोंद घेणे तसेच सामानाची वारंटी कालावधीची नोंद घेणेची जबाबदारी महानगरपालिकेच्या सहायक अभियंता (विदयुत) यांची राहील.
मुख्य लेखापाल यांनी जा.क्र.मुले-6/अंदाज दिनांक 7/3/15 ने भांडवली कामे या सदरी रक्कम 2 लाखाची तरतुद उपलब्ध असलेबाबत अभिप्राय देणेत आला आहे. कामाच्या बिलामध्ये 8 टक्के इटीपी रक्कम खर्ची टाकणे अनिवार्य राहील. मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 73 नुसार सर्वात कमी दराचे मक्तेदार शंकर इलेक्टीकल्स यांची मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 3 टक्के कमी दराची निविदा मान्य करुन मुख्य लेखापरिक्षक यांची मान्यता आहे.

ब) प्रभाग क्र.41 मधील विष्णुनगर भाग-1 अंबिकानगर-नगर शिवगंगा ,नगर शोभादेवी ,2 लाईटची सोय करणेबाबतची निविदा नस्ती तपासली असता खालीलप्रमाणे विवरण आहे.
पुर्वगणकपत्राचा क्र वर्ष.27/2014-15

सोलापूर महानगरपालिका

डी वर्ष दराचे.आर.एस.2013-14 डीदर.आर.एस./बाराज भाव
पुर्वगणकपत्राची (एस्टीमेटची) रक्कम रु.4,99,076/-
मक्याची रक्कम रु.4,61,467/-
नगर अभियंता व सर्वसाधारण सभा यांची मान्यता दिनांक 13/11/2014
जाहिरात प्रसिध्दी दैसमाचार. दिनांक 15/11/14 रोजी दिली आहे.
मुदतीत 3 निविदा प्राप्त दिनांक 2711/14
निविदा उघडयाचा दिनांक 27/11/14

1) निलकमल इलेक्टीकल्स मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 5 टक्के जास्त दराने.

2) शंकर इलेक्टीकल्स मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 3 टक्के कमी दराने.

3) विजयप्रताप इलेक्टीकल्स मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 3 टक्के जास्त दराने.

नकाशावर दर्शविलेले काम करुन घेण्याची जबाबदारी सबधित तांत्रिक अधिकारी व खातेप्रमुखाची राहीत . नकाशावर दर्शविलेले लाईट स्पेशिफिकेशन नुसार बसविताना उत्तम दजारचे इलेक्टीकल्स साहीत्य वापरुन काम पुर्ण झाल्यावर डेडस्टॉक रजिष्टरला नोंद घेणे तसेच सामानाची वारंटी कालावधीची नोंदघेणेची जबाबदारी महानगरपालिकेच्या सहायक अभियंता (विदयुत) यांची राहील. मुख्य लेखापाल यांनी जा.क्र. 2043 मुले-6 दिनांक अंदाज/28/08/14 ने 2014-15 च्या भांडवली कामे या सदरी रक्कम 5 लाखाची तरतुद उपलब्ध असलेबाबत अभिप्राय देणेत आला आहे. कामाच्या बिलामध्ये 8 टक्के इटीपी रक्कम खर्ची टाकणे अनिवार्य राहील. मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 73 नुसार सर्वात कमी दराचे मक्तेदार शंकर इलेक्टीकल्स यांची मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 3 टक्के कमी दराची निविदा मान्य करुन मुख्य लेखापरिक्षक यांची मान्यता आहे

उपरोक्त अ व ब बाबत खालीप्रमाणे त्रुटी आढळुन येते.

1) शासनदराप्रमाणे दरसुची उपलब्ध करुन दिलेली नाही.

2) बाजारमुल्य इलेक्ट्रीकल्स साहीत्य खरेदी करताना काढलेले नाही. तसेच बाजार मुल्याचे कोटेशन नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

3) नकाशावर दर्शविलेले लाईट स्पेशिफिकेशन नुसार संबधित ठिकाणी बसविल्याचे दिसुन येत नाही.

4) इलेक्ट्रीकल्स साहीत्याची नोंद जडसंग्रह नोंदवहीमध्ये घेतलेली नाही.

5) प्रमाणके निरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

6) साहित्याचा तपासणी अहवाल नस्तीत नाही. त्यामुळे साहित्याच्या दर्जाची खात्री होत नाही.

7) काम पुर्णत्वाचा दाखला घेण्यात आला नाही.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.147 दिनांक10/04/2018 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे

वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 117, Hmm No : 147)

## *100 झोन-4 येथील प्रभाग क्र.51 मधील संत गुलाबबाबा येथे पोल उभे करुन लाईटचही सोय करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 181211.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 181211.00/-

***डी.एस.आर. शासनदराप्रमाणे खरेदी झाल्याचे दिसुन येत नाही. बाजारमुल्य इलेक्ट्रीकल्स साहीत्य खरेदी करताना काढलेले नाही. तसेच बाजारमुल्याचे कोटेशन नस्तीमध्ये दिसुन येत नाही. नकाशावर दर्शविलेलेलाईट स्पेशिफिकेशन नुसार संबधित ठिकाणी बसविल्याचे दिसुन येत नाही. इलेक्ट्रीकल्स साहीत्याची नोंद जडसंग्रह नोंदवहीमध्ये घेतलेली नाही. प्रमाणके निरीक्षण पथकास उपलब्ध करुनदिलेली नाहीत. साहित्याचा तपासणी अहवाल नस्तीत नाही. त्यामुळे साहित्याच्या दर्जाची खात्री होत नाही. काम पुर्णत्वाचा दाखला घेण्यात आला नाही.***

वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीमधील झोन-4 येथील प्रभाग क्र.51 मधील संत गुलाबबाबा येथे पोल उभे करुन लाईटचही सोय करणे बाबतची निविदा नस्ती तपासली असता खालील प्रमाणे विवरण आहे.

पुर्वगनकपत्राचा क्र.वर्ष 63/2014-15

डी.एस.आर.दराचे वर्ष 2013-14 डी.एस.आर.दर/बाराजभाव

पुर्वगनकपत्राची (एस्टीमेटची) रक्कम रु.1,99,918/-

मक्याची रक्कम रु.1,81,211/-

नगर अभियंता व सर्वसाधारण सभा यांची मान्यता दिनांक 8/3/15 जाहिरात प्रसिध्दी संकेतस्थळावरुन.

मुदतीत 3 निविदा प्राप्त दिनांक 14/3/15

निविदा उघडयाचा दिनांक 20/3/15

प्राप्त निविदा

1) निलकमल इलेक्टीकल्स मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 5 टक्के जास्त दराने.

2) शंकर इलेक्टीकल्स मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 3 टक्के कमी दराने.

3) विजयप्रताप इलेक्टीकल्स मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 2टक्के जास्त दराने.

नकाशावर दर्शविलेले काम करुन घेण्याची जबाबदारी सबधित तांत्रिक अधिकारी व खातेप्रमुखाची राहीत. नकाशावर दर्शविलेले लाईट स्पेशिफिकेशन नुसार बसविताना उत्तम दर्जाचे इलेक्ट्रीकल्स साहीत्य वापरुन काम पुर्ण झाल्यावर डेडस्टॉक रजिष्टरला नोंद घेणे तसेच सामानाची वारंटी कालावधीची नोंद घेणेची जबाबदारी महानगरपालिकेच्या सहायक अभियंता (विदयुत) यांची राहील.

मुख्य लेखापाल यांनी जा.क्र.मुले-6/अंदाज दिनांक 7/3/15 ने भांडवली कामे या सदरी रक्कम 2 लाखाची तरतुद उपलब्ध असलेबाबत अभिप्राय देणेत आला आहे.
कामाच्या बिलामध्ये 8 टक्के इटीपी रक्कम खर्ची टाकणे अनिवार्य राहील.
मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 73 नुसार सर्वात कमी दराचे मक्तेदार शंकर इलेक्ट्रीकल्स यांची मक्त्याच्या रक्कमेपेक्षा 3 टक्के कमी दराची निविदा मान्य करुन मुख्य लेखापरिक्षक यांची मान्यता आहे.
उपरोक्त कामबाबत खालीप्रमाणे त्रुटी आढळुन येते.

1) डी.एस.आर. शासन दराप्रमाणे खरेदी झाल्याचे दिसुन येत नाही.

2) बाजारमुल्य इलेक्ट्रीकल्स साहीत्य खरेदी करताना काढलेले नाही. तसेच बाजारमुल्याचे कोटेशन नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

3) नकाशावर दर्शविलेलेलाईट स्पेशिफिकेशन नुसार संबधित ठिकाणी बसविल्याचे दिसुन येत नाही.

4) इलेक्ट्रीकल्स साहीत्याची नोंद जडसंग्रह नोंदवहीमध्ये घेतलेली नाही.

5) प्रमाणके निरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

6) साहित्याचा तपासणी अहवाल नस्तीत नाही. त्यामुळे साहित्याच्या दर्जाची खात्री होत नाही.

7) काम पुर्णत्वाचा दाखला घेण्यात आला नाही.

वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.148 दिनांक 10/04/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 118, Hmm No : 148)

## *101 झोन क्रमांक 2 मातोश्री रमाबाई आंबेडकरनगर मध्ये काँक्रीट रस्ता करणेबाबत अनियमितता...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

सोलापूर महानगरपालिका

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1199627.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1199627.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 95005.00/-

***दहा टक्के त्रयस्त पथकाकडून लेखापरिक्षण महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एस जी एस यांचेकडून करुन घेणे आवश्यक होते. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.नगर अभियंता सोलापुर महानगरपालिका यांचे जावक क्र.निरंक दिनांक 01/03/2014 नुसार वर्क ऑर्डर असुन या दिनांकापासुन 120 दिवसात मक्तेदार यांनी काम दिनांक 30/06/2014 अखेर काम पुर्ण करावयाचे असून सदर मक्तेदार यांनी मा. आयुक्त यांना मुदतवाढ मागीतली असता मा.आयुक्त यांनी दिनांक 12/04/2015 पर्यंत मुदतवाढ सदर काम पुर्ण करण्यांस दिलेली आहे. तथापि मक्तेदार यांनी सदर काम मुदतवाढ देऊन सुध्दा दिनांक 08/06/2015 ला काम पुर्ण केले. त्यामुळे मुदतवाढ देऊनसुध्दा काम 56 दिवस उशिरा झाल्यामुळे निविदा अट व शर्तीनुसार 10 टक्के प्रमाणे दंड रक्कम रु.95005 मक्तेदार एन जी कन्ट्रक्शनी यांचेकडून वसुल करणे आवश्यक होते. सदरची रक्कम रु.95005 वसुल केली नाही.***

झोन क्र.2 मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर मध्ये कॉंक्रीट रस्ता करणे बाबत खालील प्रमाणे अटी व शर्ती आहेत.

मक्त्याची रक्कम रु. 1109225/-

एस्टीमेटची रक्कम रु.1199627/-

डी.एस.आर. वर्ष 2013-14 पीड/ब्ल्युडी डीएसआर

मुख्य लेखापरिक्षक यांचे जा.क्र.2053 दिनांक 17/02/2014 नुसार मंजुरी दिली आहे. याचवेळी मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

निविदा उघडण्याचा दिवस 03/02/2014

संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यामध्ये तीन निविदा प्राप्त झालेल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मक्तेदाराचे नांव | मक्त्यामधील दर |
|---|---|---|
| 1 | श्रध्दा सबुरी कन्ट्रक्श्न | मक्त्याच्या रकमेपेक्षा 1 टक्का कमी |
| 2 | एन.जी. कन्ट्रक्श्न | मक्त्याच्या रकमेपेक्षा 3 टक्का कमी |
| 3 | इच्छा भगवंताची कन्ट्रक्श्न | मक्त्याच्या रकमेपेक्षा 2 टक्का कमी |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 नुसार एन जी कन्ट्रक्शनत यांचेकडून मक्त्याच्या 3 टक्के कमी या दराने करुन घेणेस अधिनियम क्र.73 (ड) नुसार वर्क ऑर्डर मा.स्थायी समितीकडे मुदतीत सादर करणेस मा.आयुक्तांची दिनांक 17/02/2017 ला मान्यता आहे.

मुख्यलेपाल यांचा जा.क्र.मुले-6/अंदाज 4453 दिनांक 01/02/2014 ने सन 2013-14 भांडवली कामी या सदराखाली रु.12 लाखाची तरतुद उपलब्ध असलेबाबत पत्र आहे.

उपरोक्त बाबत खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1) 10 टक्के थर्ड पार्ट टेक्नीकल ऑडीट महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एस जी एस यांचेकडून करुन घेणे आवश्यक होते. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
2) नगर अभियंता सोलापुर महानगरपालिका यांचे जावक क्र.निरंक दिनांक 01/03/2014 नुसार वर्क ऑर्डर असुन या दिनांकापासुन 120 दिवसात मक्तेदार यांनी काम दिनांक 30/06/2014 अखेर काम पुर्ण करावयाचे असून सदर मक्तेदार यांनी मा. आयुक्त् यांना मुदतवाढ मागीतली असता मा.आयुक्त यांनी दिनांक 12/04/2015 पर्यंत मुदतवाढ सदर काम पुर्ण करण्यांस दिलेली आहे. तथापि मक्तेदार यांनी सदर काम मुदतवाढ देऊन सुध्दा दिनांक 08/06/2015 ला काम पुर्ण केले. त्यामुळे मुदतवाढ देऊनसुध्दा काम 56 दिवस उशिरा झाल्यामुळे निविदा अट व शर्तीनुसार 10 टक्के प्रमाणे दंड रक्कम रु.95005/- मक्तेदार एन जी कन्ट्रक्श्नत यांचेकडून वसुल करणे आवश्यक होते. तथापि सदरची रक्कम रु.95005/- वसुल केली नाही.

अर्धसमास ज्ञापन क्र.128 दिनांक 20/02/2018 नुसार उपरोक्त बाबत खुलासा सादर करावयास सांगितले असता विभागाने त्याचे पत्र क्र 586 दिनांक 14/06/2018 रोजी खुलासा सादर केलेला आहे. खुलासा सयुक्तिक नसल्यामुळे, सदर आक्षेप कायम ठेवण्यात आलेला आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 156, Hmm No : 128)

## *102 1 ते 10 वी पर्यंतच्या मुलींना मोफत बस प्रवास या योजनेतील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 8000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8000000.00/-

***परिवहन उपक्रमाकडून प्रति विदयार्थी मासिक पास देताना मार्गनिहाय व त्याचे मासिक पास रक्कम निहाय रक्कमेची आकारणी करुन त्याची रक्कम देय असताना सरसकट प्रति महिना रु.8,00,000/-दिल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे प्रतिपूर्तीची रक्कम योग्य असल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. सदरची योजना ही मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याकरीता मुलींना घरापासून शाळेपर्यंतच्या अंतरासाठी मोफत बसप्रवास यासाठी असल्याने शाळेच्या दीर्घ सुटटीच्या वेळी सदरची रक्कम परिवहन उपक्रमास देय नसताना सरसकट प्रती महिना रक्कम रु.8,00,000/- या प्रमाणे 2014-15 मध्ये रु.80,00,000/- इतकी रक्कम अदा केली. त्यामुळे दिर्घ सुटटी कालावधीतील जादा अदा रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. हजर व गैरहजर मुलींच्या हजेरीपत्रकानुसार रक्कम अदा करणे आवश्यक असताना पटसंख्या विचारात घेवून रक्कम अदा केली आहे.***

वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत महिला व बाल कल्याण विभागातील 1 ते 10 वी पर्यंतच्या मुलींना मोफत बस प्रवास या योजनेची नस्ती तपासली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून आलेली आहे. सोलापुर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाकडील बसेसमधुन इ. 1 ते 10 वी पर्यंतच्या मुलींना घरापासुन शाळेपर्यंतच्या अंतरासाठी मोफत प्रवास दिला जातो. या योजनेसाठी वार्षिक तरतुद रक्कम रु.80,00,000/- इतकी असुन खर्च रक्कम रु.80,00,000/- झालेला आहे.

सर्वसाधारण सभा विषय क्र. 470 ठराव क्र.380 दिनांक 31-3-2011 चा आहे. जा.क्र.2044 दिनांक 09/09/2014 नुसार मुख्यलेखापाल यांचे पत्रांनुसार 80 लाख तरतुद असणेबाबत पत्र आहे.

1) एकूण 2218 मुलीला 20/- प्रमाणे 25 दिवसाचे 500/- प्रमाणे प्रती महिना प्रमाणे परिवहन विभागास रक्कम रु.11,09,000/- इतका खर्च येत आहे. तथापि महानगरपालिकेकडुन प्रति महिना रक्कम रु.8,00,000/- इतकीच रक्कम परिवहन विभागास मिळते. त्यामुळे परिवहन विभागास रक्कम रु.3,09,000/- इतका खर्चाचा भार प्रती महिना सोसावा लागतो. महाराष्ट शासन व मा.सर्वसाधारण सभा यांच्या कल्याणकारी योजना राबविणे बंधनकारक असल्याने सदरची योजनेची अतिरिक्त भार परिवहन उपक्रम सहन करुन योजना राबवित आहे.

2) परिवहन उपक्रमाकडून प्रति विदयार्थी मासिक पास देताना मार्गनिहाय व त्याचे मासिक पास रक्कम निहाय रक्कमेची आकारणी करुन त्याची रक्कम देय असताना सरसकट प्रति महिना रु 8,00,000/- दिल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे प्रतिपूर्तीची रक्कम योग्य असल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

3) सदरची योजना ही मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याकरीता मुलींना घरापासून शाळेपर्यंतच्या अंतरासाठी मोफत बसप्रवास यासाठी असल्याने शाळेच्या दीर्घ सुटटीच्या वेळी सदरची रक्कम परिवहन उपक्रमास देय नसताना सरसकट प्रति महिना रक्कम रु.8,00,000/- या प्रमाणे 2014-15 मध्ये रु.80,00,000/- इतकी रक्कम अदा केली. त्यामुळे दिर्घ सुटटी कालावधीतील जादा अदा रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. दिर्घ सुटटी कालावधीत सदरची रक्कम देणे योग्य होणार नाही.

4) हजर व गैरहजर मुलींच्या हजेरीपत्रकानुसार रक्कम अदा करणे आवश्यक असताना पटसंख्या विचारात घेवून रक्कम अदा केली आहे.

वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.139 दिनांक 27/03/2018 अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे

FDSJRDM6801 (Ref No : 114, Hmm No : 139)

## *103 जननी शिशु सुरक्षा आहार योजनामध्ये झालेल्या अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*मनापा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 999505.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 999505.00/-

***उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय ब्/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50,000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तथापि निविदा प्रक्रिया न राबविता महिला बचत गटाना खादयपदार्थाचा पुरवठा करणेबाबत आदेश देण्यांत आलेला आहे. महिला गटाची निवड करताना काय निकष लावणेत आले याचा तपशिल नस्तीमध्ये दिसुन येत नाही. मासिक अथवा त्रैमासिक आहाराचा दर्जा तपासणी आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. शासनाकडुन जे.एस.के. योजने अंतर्गत दिनांक 24-6-2013 रोजी औषधे मिळाली आहेत ती मनपाच्या औषध भांडारात जमा करण्यांत आलेली आहे. त्याची नोंद साठा रजिष्टरला घेतली असल्यास निरीक्षण पथकास उपलब्ध करुन दयावे. मा.आयुक्त (कुक) व संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान महाराष्ट्र मुंबई यांनी जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमासाठी लागणारा खर्च महिला व बाल विकास विभागासाठी राखुन ठेवलेल्या 5 टक्के बजेट तरतुदीतुन भागविणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. स्थायी समितीची मान्यता घेतल्याचे पत्र नस्तीमध्ये दिसुन येत नाही.खर्चाचे प्रमाणके उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे आयकर कपातीची खात्री करता आली नाही.***

महिला व बाल कल्याण समिती या विभागात वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत जननी शिशु सुरक्षा आहार योजनाबाबत अभिलेखे तपासले असता खालील बाबी निदर्शनात येत आहे.

जननी शिशु सुरक्षा आहार योजना ही सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील शहरातील विविध भागात असलेल्या 8 प्रसूती गृहातील प्रसूत महिलांना मोफत पोष्टिक आहार त्यामध्ये दोन वेळा जेवन,नास्ता, दोन वेळा दुध व फलहार देण्यांत येतो. दरमहा सरासरी 150 महिलांना याचा लाभ होतो. वित्तीय वर्ष 2014-15 करिता राबविणेबाबत मा.आयुक्त यांची दिनांक 28/7/2013 नुसार मान्यता आहे. नागरी समुदायविकास प्रकल्प यांचे मार्फत नोंदणीकृत बचतगटांचे दरपत्रकाची मागणी करुन पुरवठाधारक बचत गट यांनी रु.180/-प्रति लाभार्थी इतका दर दिलेला आहे व तो मान्य करण्यांत आलेला आहे. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये या योजनेवर रक्कम रु.9,99,505 /- खर्च झालेला आहे. बचत गटामध्ये रेणुका महिला बचत गट, स्वयंसिध्द महिला बचत गट, साईबाबा महिला बचत गट, जाईजुई महिला बचत गट इत्यादीचा समावेश आहे.

नागरी समुदाय विकास प्रकल्प यांचेमार्फत नोंदणीकृत बचतगटांचे दरपत्रक मागणी केले असुन पुरवठाधारक बचत गटांनी दरपत्रक सादर केले आहे.यामध्ये पुरवठाधारक बचतगट यांनी रु.180/- इतका दर दिलेले आहे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव व पत्ता | प्राप्त प्रस्तावातील जवळचा महिला | मंजुर दर | लाभार्थी संख्या | एकूण तीन दिवसांचा खर्च |
|---|---|---|---|---|---|

| | | बचतगट | | दरमहा अंदाजे | अंदाजे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | दाराशा हॉस्पीटल गांधीनगर | साईबाबा महिला बचतगट शास्त्रीनगर | 180 | -- | -- |
| | भावना अशोक चौक | साईबाबा महिला बचतगट शास्त्रीनगर | 180 | 22 | 11880 |
| 2 | साबळे हॉस्पीटल मुकूंद नगर | स्वंयसिध्द महिला बचतगट | 180 | 5 | 2700 |
| | अहिल्याबाई हॉस्पीटल डफरीन चौक | स्वंयसिध्द महिला बचतगट | 180 | 22 | 11880 |
| 3 | बाईस हॉस्पीटल साखरपेठ | जाईजुई महिला बचत गट | 180 | 33 | 17820 |
| | जिजामाता हॉस्पीटल तेलंगी पाच्छापेठ | जाईजुई महिला बचत गट | 180 | 31 | 16740 |
| 4 | चाकोते हॉस्पीटल जोडभावी पेठ | सोन्नलगी सिध्देश्वर महिला बचत गट | 180 | 19 | 10260 |
| | रामवाडी हॉस्पीटल रामवाडी | रेणुका महिला बचत गट रामवाडी | 180 | 9 | 5940 |
| | | | | | 92880 |

उपरोक्त बाबत खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1) उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय ब्/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वर्षिक खरेदी ही रुपये 50,000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तथापि निविदा प्रक्रिया न राबविता महिला बचत गटाना खादयपदार्थाचा पुरवठा करणेबाबत आदेश देण्यांत आलेला आहे.

2) महिला गटाची निवड करताना काय निकष लावणेत आले याचा तपशिल नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

3) मासिक अथवा त्रैमासिक आहाराचा दर्जा तपासणी आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) शासनाकडुन जे.एस.के.योजने अंतर्गत दिनांक 24-6-2013 रोजी औषधे मिळाली आहेत ती मनपाच्या औषध भांडारात जमा करण्यांत आलेली आहे. त्याची नोंद साठा रजिष्टरला घेतली असल्यास निरीक्षण पथकास उपलब्ध करुन दयावे.

5) मा.आयुक्त (कुक) व संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान महाराष्ट्र मुंबई यांनी जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमासाठी लागणारा खर्च महिला व बाल विकास विभागासाठी राखुन ठेवलेल्या 5 टक्के बजेट तरतुदीतुन भागविणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

6) स्थायी समितीची मान्यता घेतल्याचे पत्र नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

7) खर्चाचे प्रमाणके उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे आयकर कपातीची खात्री करता आली नाही.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र. 162 दिनांक 11/06/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 137, Hmm No : 162)

## *104 महिला व बाल कल्याण समिती टॅली (Account Assistant using Tally) (ICT-701) प्रशिक्षण घेणेमधील अनियमिततााबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1107000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1107000.00/-

***शांती टेक्नीकल इस्टिटयुट यांना रक्कम रु. 11,07,000/- प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु सदर रक्कम संस्थेस कधी अदा केली, किती टप्प्यात अदा केली, प्रशिक्षण सुरु करणेपूर्वी अदा केली आहे की, प्रशिक्षण संपल्यानंतर अदा केली आहे याबाबतची माहिती नस्तीमध्ये उपलब्ध झालेली नाही.90 लाभार्थी यांचीनिवड करण्यात आलेली आहे. परंतु लाभार्थ्यांची निवड करतेवेळी एकूण किती अर्ज प्राप्त झाले होते व या लाभार्थी निवडीसाठी कोणते निकष वापरले याबाबतचा तपशिल उपलब्ध झालेला नाही. संबधित संस्थेचा प्रशिक्षणार्थ्यांच्या स्वाक्षरीसह साप्ताहिक हजेरीचा अहवाल प्राप्त झालेला नाही. योजना राबविण्यापूर्वी अटी व शर्ती तयार करणे आवश्यक होते. अटी व शर्ती विहीत न करताच सबंधित संस्थेस काम देण्यांत आले आहे. प्रशिक्षण समाधानकाररीत्या पूर्ण केले किंवा कसे याबाबतचा महिला व बाल कल्याण अधिकारी/सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल नाही. त्यामुळे प्रशिक्षणाचा उददेश सफल झालेची खात्री करता आलेली नाही.***

महिला व बाल कल्याण समिती मार्फत टयॅली (Account Assistant using Tally) (ICT-701) प्रशिक्षण घेणेसाठी भारत टेक्नीकल ॲन्ड एज्युकेशन सोसायटी संचालित शांती टेक्नीकल इस्टिटयुंट यांचेसोबत दिनांक 13/3/15 रोजी महिला व बाल कल्याण अधिकारी यांचेसोबत करारनामा 100/- मुद्रांक शुल्कावर झालेला आहे. मा.आयुक्त यांची मान्यता 1/1/2015 ची आहे. मा.स्थयी समिती यांचा ठराव क्र.726 दिनांक 27/2/15 चा आहे.

सदरचे टयॅली(Account Assistant using Tally) (ICT-701) प्रशिक्षण घेणेकामी वर्क ऑर्डर देणेस मा. उप आयुक्त यांनीदिनांक 13/3/15 ला मान्यता दिलेली आहे. प्रत्येक प्रशिक्षर्थीना 500 तास प्रशिक्षण देण्यात येईल. सदरचे प्रशिक्षण घेणेकरीता एकूण 90 लाभार्थी आहेत. तसेच प्रशिक्षणकोर्स हा एम.ई.एस. बेसड असुन प्रशिक्षणाचा कालावधी पुर्ण झालेनंतर एम.ई.एस. चे असेसमेंट परिक्षेचे नियमानुसार आयोजन करुन प्रशिक्षण पुर्ण झालेनंतर संस्थेचे प्रमाणपत्र शेवटच्या दिवशी देणे बंधनकारक आहे.तसेच केंद्र शासनाच्या एम.ई.एस.परिक्षेस बसविण्याची जबाबदारी संस्थेची राहील. 50 टक्के रक्कम सुरवातीला संस्थेला अदा करावयाचे आहे. प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थी मुल्यांकनानुसार उर्वरित रक्क्म संस्थेला अदा करावयाची आहे. प्रशिक्षण घेणे करिता एकूण 90 लाभार्थी पात्र ठरले आहे. प्रती लाभार्थी 12300/- शुल्क इतके असुन एकूण खर्च रु.11,07,000/- झालेला आहे. प्रशिक्षणार्थी यांनी 12300/- च्या 10 टक्के रक्कम रु.1230/- असे एकूण 90 लाभार्थीची रक्क्म रु.1,10700/- मुख्य लेखापाल कार्यालयात पावती क्र.सी/9969दिनांक 23-3-15 रोजी संस्थेने जमा केली आहे.

उपरोक्त बाबत खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1 )शांती टेक्नीकल इस्टिटयुट यांना रक्कम रु. 11,07,000/- प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु सदर रक्कम संस्थेस कधी अदा केली, किती टप्प्यात अदा

केली, प्रशिक्षण सुरु करणेपूर्वी अदा केली आहे की, प्रशिक्षण संपल्यानंतर अदा केली आहे याबाबतची माहिती धारीकेत उपलब्ध झलेली नाही.

2) महानगरपालिकेतील सुवर्ण जयंती योजनेंतर्गत महिला व बालके गटाने व्यवसाय करण्याची आवश्यकता भासल्यास अशा लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देणेकरीता संस्थेची निवड कशी करावी इत्यादीबाबत सविस्तर माहितीसुवर्ण जंयती पुस्तीका, 2005 मधील पृष्ठ क्र. 23 परिच्छेद 37 मध्ये दिलेली आहे. सदर मार्गदर्शक सुचनानुसार घटकासाठी निवडली जाणारीप्रशिक्षण संस्था ही शासन मान्य संस्था असावी. हेप्रशिक्षण प्राधान्याने शासकीय संस्था/आय.टी.आय. मार्पतच देण्यात यावे. जर शासकीय संस्था उपलब्घ नसतील तर शासन मान्य संस्था व त्याही उपलब्ध नसल्यानंतरच खाजगी संस्थाचा विचार करणे योग्य आहे.त्याच धर्तीवर महिला व बाल कल्याण विभागाने प्रशिक्षण संस्थेची निवड करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

3) 90 लाभार्थी यांचीनिवड करण्यात आलेली आहे. परंतु लाभार्थ्यांची निवड करतेवेळी एकूण किती अर्ज प्राप्त झाले होते व या लाभार्थी निवडीसाठी कोणते निकष वापरले याबाबतचा तपशिल उपलब्ध झालेला नाही.

4) संबधित संस्थेचा प्रशिक्षणार्थ्यांच्या स्वाक्षरीसह साप्ताहिक हजेरीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

5) योजना राबविण्यापूर्वी अटी व शर्ती तयार करणे आवश्यक होते. अटी व शर्ती विहीत न करताच सबंधित संस्थेस यांना काम देण्यांत आले आहे.

6) किती प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्याचे उदिष्टय होते व किती साध्य झाले?

7) प्रशिक्षण समाधानकाररीत्या पूर्ण केले किंवा कसे याबाबतचा महिला व बाल कल्याण

अधिकारी/सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल नाही. त्यामुळे प्रशिक्षणाचा उददेश सफल झालेची खात्री करता आलेली नाही.

वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.166 दिनांक 28/06/2018 नुसार खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 138, Hmm No : 166)

## *105 महिला व बाल कल्याण समिती तर्फे विक्री प्रतिनिधी (Sales Retail RET-101) प्रशिक्षण कोर्स घेणेमधील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 07**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 126000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 126000.00/-

***शरणप्रभा बहुउददेशीय संस्था, एव्हरेस्ट रिटेल अॅकॅडमी सोलापुर यांना रक्कम रु. 1,26,000/- प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु सदर रक्कम संस्थेस कधी अदा केली, किती टप्प्यात अदा केली, प्रशिक्षण सुरु करणेपूर्वी अदा केली आहे की, प्रशिक्षण संपल्यानंतर अदा केली आहे याबाबतची माहिती नस्तीत उपलब्ध झलेली नाही. लाभार्थी यांचीनिवड करण्यात आलेली आहे. परंतु लाभार्थ्यांची निवड करतेवेळी एकूण किती अर्ज प्राप्त झाले होते व या लाभार्थी निवडीसाठी कोणते निकष वापरले याबाबतचा तपशिल उपलब्ध झालेला नाही. संबधित संस्थेचा प्रशिक्षणार्थ्यांच्या स्वाक्षरीसह साप्ताहिक हजेरीचा अहवाल प्राप्त झालेला नाही. योजना राबविण्यापूर्वी अटी व शर्ती तयार करणे आवश्यक होते. अटी व शर्ती विहीत न करताच सबंधित संस्थेस यांना काम देण्यांत आले आहे. प्रशिक्षण समाधानकाररीत्या पूर्ण केले किंवा कसे याबाबतचा महिला व बाल कल्याण अधिकारी/सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल नाही. त्यामुळे प्रशिक्षणाचा उददेश सफल झालेची खात्री करता आलेली नाही. खर्चाचे प्रमाणके उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे शासन करांच्या कपातीची खात्री करता आली नाही.***

महिला व बाल कल्याण समिती मार्फतविक्री प्रतिनिधी (Sales Retail RET-101) हाप्रशिक्षण कोर्स घेणेसाठी शरणप्रभा बहुउददेशीय संस्था,एव्हरेस्ट रिटेल अॅकॅडमी सोलापुरयांचेकडुन लाभार्थी यांना प्रशिक्षणदेणेबाबतठरले त्यानुसार सदर संस्थेसोबत दिनांक 13/3/15 रोजी महिला व बाल कल्याण अधिकारी

यांचेसोबत करारनामा 100/- मुद्रांक शुल्कावर झालेला आहे. मा.आयुक्त यांची मान्यता 01/01/2015 ची आहे. मा.स्थायी समिती यांचा ठराव क्र.726 दिनांक 27/2/15 चा आहे.

विक्री प्रतिनिधी (Sales Retail RET-101) घेणेकामी वर्क ऑर्डर देणेस मा. उप आयुक्त यांनी दिनांक 13/3/15 ला मान्यता दिलेली आहे. प्रत्येक प्रशिक्षणार्थीस 180 तास प्रशिक्षण देण्यात येईल. सदरचे प्रशिक्षण घेणेकरीता एकूण 30 लाभार्थी असेल तसेच प्रशिक्षण कोर्स हा एम.ई.एस. बेसड असुन प्रशिक्षणाचा कालावधी पुर्ण झालेनंतर एम.ई.एस. चे असेसमेंट परिक्षेचे नियमानुसार आयोजन करुन प्रशिक्षण पुर्ण झालेनंतर संस्थेचे प्रमाणपत्र शेवटच्या दिवशी देणे बंधनकारक आहे.तसेच केंद्र शासनाच्या

एम.ई.एस.परिक्षेस बसविण्याची जबाबदारी संस्थेची राहील. 50 टक्के रक्कम सुरवातीला संस्थेला अदा करावयाचे आहे. प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थी मुल्यांकनानुसार उर्वरित रक्कम संस्थेला अदा करावयाची आहे. प्रशिक्षण घेणे करिता एकूण 30 लाभार्थी पात्र ठरले आहे. प्रती लाभार्थी 4200/- शुल्क इतके असुन एकूण खर्च रु.1,26,000/- झालेला आहे. प्रशिक्षणार्थी यांचेकडून जमा करुन 4200/- च्या 10 टक्के रक्कम रु.420/- असे एकूण 30 लाभार्थींची रक्कम रु.12600/- मुख्य लेखापाल कार्यालयात 24-3-15 रोजी संस्थेने जमा केली आहे.

उपरोक्त बाबत खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1) शरणप्रभा बहुउददेशीय संस्था, एव्हरेस्ट रिटेल ॲकॅडमी सोलापुर यांना रक्कम रु. 1,26,000/- प्रदान करणे आवश्यक आहे. परंतु सदर रक्कम संस्थेस कधी अदा केली, किती टप्प्यात अदा केली, प्रशिक्षण सुरु करणेपूर्वी अदा केली आहे की, प्रशिक्षण संपल्यानंतर अदा केली आहे याबाबतची माहिती नस्तीत उपलब्ध झालेली नाही.

2) महानगरपालिकेतील सुवर्ण जयंती योजनेंतर्गत महिला व बालके गटाने व्यवसाय करण्याची आवश्यकता भासल्यास अशा लाभार्थ्याना व्यवसाय प्रशिक्षण देणेकरीता संस्थेची निवड कशी करावी. इत्यादीबाबत सविस्तर माहिती सुवर्ण जंयती पुस्तीका, 2005 मधील पृष्ठ क्र. 23 परिच्छेद 37 मध्ये दिलेली आहे. सदर मार्गदर्शक सुचनानुसार घटकासाठी निवडली जाणारी प्रशिक्षण संस्था ही शासन मान्य संस्था असावी. हे प्रशिक्षण प्राधान्याने शासकीय संस्था/आय.टी.आय. मार्पतच देण्यात यावे. जर शासकीय संस्था उपलब्घ नसतील तर शासन मान्य संस्था व त्याही उपलब्ध नसल्यानंतरच खाजगी संस्थाचा विचार करणे योग्य आहे.त्याच धर्तीवर महिला व बाल कल्याण विभागाने प्रशिक्षण संस्थेची निवड करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

3) लाभार्थी यांचीनिवड करण्यात आलेली आहे. परंतु लाभार्थ्यांची निवड करतेवेळी एकूण किती अर्ज प्राप्त झाले होते व या लाभार्थी निवडीसाठी कोणते निकष वापरले याबाबतचा तपशिल उपलब्ध झालेला नाही.

4) संबधित संस्थेचा प्रशिक्षणार्थ्यांच्या स्वाक्षरीसह साप्ताहिक हजेरीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

5) योजना राबविण्यापूर्वी अटी व शर्ती तयार करणे आवश्यक होते. अटी व शर्ती विहीत न करताच सबंधित संस्थेस यांना काम देण्यांत आले आहे.

6) प्रशिक्षण समाधानकाररीत्या पूर्ण केले किंवा कसे याबाबतचा महिला व बाल कल्याण अधिकारी/सक्षम प्राधिकारी यांचा अहवाल नाही. त्यामुळे प्रशिक्षणाचा उददेश सफल झालेची खात्री करता आलेली नाही.

7) खर्चाचे प्रमाणके उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे शासन करांच्या कपातीची खात्री करता आली नाही.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र. 167 दिनांक 28/06/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे

FDSJRDM6801 (Ref No : 139, Hmm No : 167)

## *106 अतिक्रमण विभागाचे आस्थापनेवर अनावश्यक खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 8610931.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8610931.00/-

***अतिक्रमण विभागाने वर्षभरात अगदी नगन्य कार्यवाही केलेली आहे. मात्र पोलिस आस्थापनेवर रक्कम रु.86,10,931/- इतका अनावश्यक खर्च झालेला आहे. सदर खर्चाचा हेतु साध्य झालेला नाही. तसेच महानगरपालिका प्रशासन अतिक्रमण मोहिम सक्षमतेने राबविली नसल्याने महानगरपालिकेचे अतिक्रमण आस्थापनेच्या वेतनावर एकूण रक्कम रु. 86,10,931/- इतका अनावश्यक खर्च झालेला आहे.***

अतिक्रमण विभागाने वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये संपूर्ण वर्षभरात अनधिकृत बांधकाम शोधून त्यांचे विरुध्द कार्यवाही करणे आवश्यक आहे. गृह विभागाचा शासन निर्णय 12 मे १९९८ नुसार महानगरपालिका कर्मचा-यांनी अतिक्रमण विरुध्द कार्यवाहीच्या वेळी पोलिस संरक्षण देण्याची जबाबदारी पोलिस दलाची आहे. परंतु अतिक्रमण विभागाने वर्षभरात अगदी नगन्य कार्यवाही केलेली आहे. मात्र पोलिस आस्थापनेवर रक्कम रु.86,10,931/- इतका अनावश्यक खर्च झालेला आहे. सदर खर्चाचा हेतु साध्य झालेला नाही. तसेच महानगरपालिका प्रशासन अतिक्रमण मोहिम सक्षमतेने राबविली नसल्याने महानगरपालिकेचे अतिक्रमण आस्थापनेच्या वेतनावर एकूण रक्कम रु. 86,10,931/- इतका अनावश्यक खर्च झालेला आहे.

शासन निर्णय क्र.एपीओ-३२९७/३११२/प्र.क्र.६४/पोल-३दिनांक१२/५/ १९९८ नुसार सोलापुर महानगरपालिकाने अतिक्रम विभागासाठी स्वतंत्र पोलिस पथक निर्माण केलेले आहे.सदर शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे पदे मंजुर आहेत.

| अ.क्र. | पद व वेतनश्रेणी | मंजुर पदे |
|---|---|---|
| 1 | पोलिस निरीक्षक 10500-30500 ग्रे.वे. 5000 | 1 |
| 2 | सहाय्यक पोलिस निरीक्षक 10500-30500 ग्रे.वे. 4800 | 3 |

| | | |
|---|---|---|
| 3 | पोलिस शिपाई 6460-20500 ग्रे.वे.2400 | 30 |

| अ.क्र. | पद व वेतनश्रेणी | सध्या कार्यरत पदे |
|---|---|---|
| 1 | पोलिस निरीक्षक 10500-30500 ग्रे.वे. 5000 | 1 |
| 2 | सहाय्यक फौजदार 6460-10500 ग्रे.वे.2800 | 5 |
| 3 | पोलिस हवालदार 6460-20500 ग्रे.वे.2400 | 9 |
| 4 | पोलिस नाईक 6460-20500 ग्रे.वे.2400 | 4 |
| 5 | पोलिस कॉन्सेबल 6460-20500 ग्रे.वे.2200 | 2 |
| | एकूण मंजूर पदे | 21 |

शासन निर्णयानुसार सोलापुर महानगरपालिकेसाठी एकूण ३४ पदे मंजुर आहेत. सदयस्थितीत महानगरपालिकेमध्ये 21 पोलिस कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत. म्हणजे 13 पदे ही पोलिस आयुक्त सोलापूर हे वापरत आहेत. सदर पदे वापरण्यासाठी शासन निर्णय क्र.एपीओ-3297/3112/प्र.क्र.64/पोल-३दिनांक 12/05/1998 मधील अ.क्र.4(ड) नुसार मा.आयुक्त सोलापूर यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापी तशी मान्यता घेतल्याचे दिसुन येत नाही.

शासन निर्णय क्रए.पी.ओ.3297/3112 प्र.क्र.64 पोल.3 दिनांक 12/5/1998 नुसार पदाची मुदतवाढ दिनांक 1/4/2002 पासुन घेतलेली नाही. त्यामुळे वेतनापोटी झालेला एकूण खर्च रु. 86,10,931/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

शासन परिपत्रक क्र.जीईएन.1096/45/प्र.क्र.15/नावि-27दिनांक 4/3/1996 नुसार महानगरपालिकेने प्रत्येक अनधिकृत विभागासाठी क्षेत्रीय अधिकारी नेमणे आवश्यक असताना तसे केल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आलेले नाही.

वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र. 158 दिनांक 03/05/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

FDSJRDM6801 (Ref No : 119, Hmm No : 158)

## *107 शासनाकडून निवृत्ती वेतनापोटी अनुदान उपलब्ध करून न घेतलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*म.न.पा. निधी*

सोलापूर महानगरपालिका

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 30352378.00 /-

***महानगरपालिका यांनी चालविलेल्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतनापोटी महानगरपालिकांना येणारा खर्च शासन निर्णय, शिक्षण क्रिडा व समाज कल्याण विभाग क्रमांक एस.एस.एन-1968/जी दिनांक 15/10/1971 व शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक एस.एस.एन 1369/9980 जी दिनांक.31/08/1972 परिच्छेद (सहा) मधील तरतुदीनुसार निवृत्तीवेतनावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या स्वरुपात 100% शासनाकडून देण्यात येतो. तथापि 1987-88 या वित्तीय वर्षापासून 31/03/2015 अखेर निवृत्तीवेतनासाठीची संपूर्ण रक्कम रुपये 30352378/- महानगरपालिका निधीमधून प्रदान केलेली आहे परंतु सदर अनुदान शासनाकडून अनुदान प्राप्त न झाल्यामुळे महापालिकेने निवृत्तीवेतनावर केलेला खर्च गुंतून पडलेला आहे.***

महानगरपालिका यांनी चालविलेल्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतनापोटी महानगरपालिकांना येणारा खर्च शासन निर्णय, शिक्षण क्रिडा व समाज कल्याण विभाग क्रमांक एस.एस.एन-1968/जी दिनांक 15/10/1971 व शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक एस.एस.एन 1369/9980 जी दिनांक.31/08/1972 परिच्छेद (सहा) मधील तरतुदीनुसार निवृत्तीवेतनावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या स्वरुपात 100% शासनाकडून देण्यात येतो. तथापि काही महानगरपालिकांच्या माध्यमिक शाळांमधुन निवृत्त झालेल्या शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांना निवृत्ती वेतन नियमित मिळत नसल्याने महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक पीईएन.1089/191 माशि-6 दि. 6 नोंव्हेंबर 1989 च्या शासन निर्णयाद्वारे प्रतिपुर्तीच्या स्वरुपात देण्यात येणारे अनुदान प्रत्यक्ष खर्चाचा चारमाही/आठमाही व अकरामाही आढावा घेऊन अग्रीम अनुदान मंजुर करण्याविषयी निर्णय घेण्यात आला आहे.

1.वित्तीय वर्षात निवृत्तीवेतनाच्या प्रदानावर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे खर्च करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | प्रशालेचे नाव | निवृत्ती वेतनाची रक्कम | निवृत्ती धारकांची संख्या | थकीत निवृत्ती वेतनाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | कॅम्प प्रशाला क्र. 1 | 7289667 | 7 | 1998-99 ते 31.03.2015 आखेर |
| 2 | प्रशाला क्र. 2 | 2033637 | 3 | 2004-05 ते 31.03.2015 आखेर |
| 3 | प्रशाला क्र. 3 | 2965197 | 4 | 2009-10 ते 31.03.2015 आखेर |
| 4 | प्रशाला क्र. 4 | 2695968 | 2 | 2011-12 ते 31.03.2015 आखेर |
| 5 | कॅम्प प्रशाला उर्दू | 4146249 | 3 | 2008-09 ते 31.03.2015 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 2 | | | आखेर |
| 6 | जय भवानी प्रशाला | 11221660 | 11 | 1987- 88 ते 31.03.2015 आखेर |
| | | 30352378 | | |

महानगरपालिकेने शासन निर्णयामध्ये सुचित केल्याप्रमाणे प्रत्यक्ष खर्चाचा प्रस्ताव सादर करुन शासनाकडून निवृत्तीवेतनाचे अनुदान प्राप्त करुन घेतलेले नाही. त्यामुळे 1987-88 या वित्तीय वर्षापासून 31/03/2015 अखेर निवृत्तीवेतनासाठीची संपूर्ण रक्कम रुपये 30352378/- महानगरपालिका निधीमधून प्रदान केलेली आहे. सदर बाबत शासनाकडून अनुदान प्राप्त न झाल्यामुळे महापालिकेने निवृत्तीवेतनावर केलेला खर्च गुंतून पडलेला आहे.

2.तसेच प्रशाला क्र. 2 वगळून इतर प्रशालेमध्ये रोख नोंदवही नुमुना क्र.11 ठेवण्यात आलेला नाही. सदर बाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखापरिक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र. 129 दिनांक 21/02/2018 अन्वये कळविलेले असताना विभागाने अनुपालन उपलब्ध करून दिलेली नाही.

DATMDSM7101 (Ref No : 121, Hmm No : 129)

## *108 महानगरपालिकेने दिलेल्या वकील फी प्रदानामधून आयकर कपात केली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : म.न.पा. म.न.पा. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 52605.00/-

***सोलापूर महानगरपालिका विधी व न्याय विभागाकडून दाखल केलेल्या याचिकांबाबत, दावे/खटले निकाली काढण्यासाठी पॅनेलवर वकीलांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पॅनेलवरील वकीलांचे नियुक्ती आदेश लेखापरीक्षणात दाखविलेले नाही. आयकर कायदा 1961 नुसार अदा केलेल्या वकील फी च्या रकमेतून प्रत्येकी 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधित वकीलांच्या देयक रकमेतून 10% आयकर रक्कम त्यांच्या देय वकील फी च्या रकमेतून वसूल करुन एकूण आयकर रक्कम रू 52605/- शासन खाती भरणा करावी.***

सोलापुरातील निरनिराळ्या कोर्टात महानगरपालिके विरुद्ध दाखल झालेले विविध खटले ,दावे,अपील, निकाली काढण्यासाठी महानगरपालिकेचे पॅनेलवर विधान सल्लागार विभागाकडून वकीलांची नियुक्ती करण्यात येते. आयकर कायदा 1961 सेक्शन 194 जे(J) नुसार व्यावसाईक सेवा / तांत्रिक सेवेसाठी

वित्तीय वर्षात रु.30000/-पेक्षा जास्त फी/मानधन अदा केले असल्यास त्या रकमेतून 10% आयकर कपातीची तरतूद आहे. तथापि विधी व न्याय विभागाकडून पॅनेल वरील नियुक्त वकीलांना अदा केलेल्या वकील फी/मानधनातून वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये 10% आयकराची रक्कम कपात केलेली दिसून येत नाही. सदर बाबत अर्धसमास पत्र क्र. 116 दि. 20.01.2018 अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. वसूलपात्र रककमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | **वकीलाचे नाव** | वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये अदा केलेली फी/मानधन रक्कम रु. | 10% आयकर कपातीची रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | **ॲडव्होकेट किल्लेदार** | 126800/- | 12680/- |
| 2 | **ॲडव्होकेट मराठे व्ही.बी.** | 120150/- | 12015/- |
| 3 | **ॲडव्होकेट दामले आर.व्ही.** | 77650/- | 7765/- |
| 4 | **ॲडव्होकेट कालेकर एस. एस.** | 30950/- | 3095/- |
| 5 | **ॲडव्होकेट धानुरे डी.जी.** | 48000/- | 4800/- |
| 6 | **ॲडव्होकेट कदम सुहास** | 32500/- | 3250/- |
| 7 | **ॲडव्होकेट बोडके दिलीप** | 90000/- | 9000/- |
| | | एकूण | 52605/- |

संबंधित वकीलांना उपरोक्तप्रमाणे वकील फी अदा केली आहे. परंतु सदर वकील फी देयकातुन आयकर कपात केलेली नाही. आयकर कायदा 1961 नुसार अदा केलेल्या वकील फी च्या रकमेतून प्रत्येकी 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त वकीलांची देय वकील फी च्या रकमेतून उपरोक्त प्रमाणे आयकर वसूल करुन एकूण आयकर रक्कम रू. 52605/- शासन खाती भरणा करावी.

वसूलपात्र रक्कम 52605/-

DATMDSM7101 (Ref No : 123, Hmm No : 116)

## *109 सन 2013-14 मधील स्थानीक संस्था कर वसूलीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : म.न.पा. म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***विक्रीकर विभाग ई रिर्टन नुमाना 231 व नमुना ड वार्षिक विवरणपत्रानुसार स्थानिक संस्था करापोटी नोंदणीकृत व्यापा-या कडून प्राप्त झालेले धनादेश व त्यापैकी न वटलेल्या धनादेशाची माहीती लेखापरीक्षणास सादर करणेबाबत कळविलेले असताना माहिति लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली नाही.***

नगर विकास विभाग शासन अधिसूचना दिनांक 25/6/2010 अन्वये मुंबई महानगरपालीका वगळता राज्यातील उर्वरीत 25 महानगरपालिकेत जकाती ऐवजी दि.1/4/2011 पासून स्थानिक संस्था कराची अंमलबजावनी करण्यात आलेली आहे. त्यानुसार व्यापा-यांना स्थानिक संस्था कराची रक्कम महानगरपालिकेत भरना करणेसाठी नगरविकास विभाग शासन अधिसूचना दिनांक 30/6/2015 अन्वये स्थानिक संस्था कर अभय योजना दि.30/6/2015 ते दि.31/6/2015 या कालावधीत लागू केली होती. अधिसूचनेतील नियम 9 (4) व (6) नुसार व्यापा-यांनी सभासद नोंदनी प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून प्राप्त करुन घेउन अधिसूचनेतीलनियम 29 (2) (ख)नुसार व्यापाऱ्याने नमुना ड-2 मध्ये वार्षीक विवरणत्र महानगरपालिकेस सादर करावयाचे आहे. नोंदणीकृत व्यापा-यांनी सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रानुसार करपात्र रक्कमेवर मालाच्या प्रकारानुसार स्थानिक संस्थाकराची रक्कम आयुक्त महानगरपालिका, सोलापूर बँक खाते क्रमांक 60069413266 वर दिनांक 31/8/2015 पुर्वी भरणा करावयाची होती. विक्रीकर विभाग ई रिर्टन नुमाना 231 व नमुना ड वार्षिक विवरणपत्रानुसार स्थानिक संस्था करापोटी नोंदणीकृत व्यापा-या कडून प्राप्त धनादेश न वटलेल्या धनादेशाची माहीती खालील नमुन्यात भरुन लेखापरीक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.89 दि.24/11/2017 अन्वये माहिति मागविण्यात आलेली होती .

सन 2014-15

| अ.क्र. | फर्म / व्यापारी संस्थेचे नांव | नमुना ड नुसार स्थानिक संस्था कराची रक्कम | कर निधार्रन आदेशा नुसार स्थानिक संस्था कराची रक्कम | जमा केलेली धनादेशाची एकूण रक्कम | दि. 31/8/2015 पुर्वी जमा केलेल्या परंतु न वटलेल्या धनादेशाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

सदर बाबत अर्धसमास पत्र क्र. 89 दि.24/11/2017 अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही.

DATMDSM7101 (Ref No : 124, Hmm No : 89)

### *110 महानगरपालिकेचे अंतर्गत लेखापरिक्षणाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 म.न.पा. निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 105(1) प्रमाणे मुख्य लेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या लेख्याची साप्ताहिक तपासणी व लेखापरिक्षा करुन त्यावरील आपला अहवाल स्थायी समितीकडे पाठविणे आवश्यक असताना वित्तीय वर्ष 2011-2012 ते 2014-2015 या वर्षाचे लेख्यावरील अहवाल अद्याप स्थायी समितीस सादर केलेले नाहीत.***

महानगरपालिकेचे अंतर्गत लेखापरिक्षण मुख्य लेखापरिक्षकामार्फत करण्यात येते. त्यामध्ये जमा रक्कमांचे तसेच खर्चाचे लेखापरिक्षण केले जाते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 106(3) प्रमाणे प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर नगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीला सादर करणे आवश्यक आहे. तथापि लेखापरिक्षणात असे आढळले की, मुख्य लेखापरिक्षकांनी 2010-2011 या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल जाक्र मुलेप 103 दिनांक 16/04/2012 अन्वये स्थायी समिती समोर सादर केला आहे तथापि वित्तीय वर्ष 2011-2012 ते 2014-2015 या वर्षाचे लेख्यावरील अहवाल अद्याप स्थायी समितीस सादर केलेले नाहीत. तसेच वित्तीय वर्ष 2011-12 मधील आक्षेपानुसार प्राप्त अनुपालन व त्यानुसार वगळलेल्या परिच्छेदाची माहिती लेखापरीक्षणास सादर करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.145 दि. 28.03.2018 अन्वये माहिती लेखापरीक्षणास सादर करणेबाबत कळविले असता सदर माहिती लेखापरीक्षण कालावधीत उपलब्ध करून दिलेली नाही.

DATMDSM7101 (Ref No : 125, Hmm No : 145)

## ***111 वाहन लॉग बुक मधील त्रुटी बाबत.....***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 47434.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 47434.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7793.00/-

***वाहनाचे लॉगबुकमध्ये काम सुरु केलेल्या वेळचे रिडींग, काम संपले वेळचे रिडींग, वापर रिडींग वाहनांसाठी घेतलेले डिझेल, वाहन चालकाची, सहा अभियंता यांची स्वाक्षरी व आवश्यक त्या नोंदी नसल्याचे आढळुन आले. लॉगबुक मध्ये मासिक गोषवारा काढण्यात आलेला नाही. TATA SUMO वाहन क्र.MH-13 AE 7272 च्या लॉगबुकमध्ये वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये सदर वाहनाचे एकूण रीडिंग 9531 एवढे झाले असून त्या करिता 1832 लि. डीझेल वापरण्यात आलेले आहे. सदर वाहनाचे प्रति कि.मी. 8 प्रमाणे वापर विचारात घेतल्यास साधारण 1191 लि. डिझेल वापरणे आवश्यक असताना 1832 लिटर डीझेल वापरण्यात आलेले असल्याने साधारण 641 लिटर डिझेल जादा वापरण्यात आले. TATA SUMO वाहन क्र.MH-13 AE 7272 दि.25/11/2014 ते दि:26/11/2014 या कालावधीत वाहन कोणी व कोणत्या कामाकरिता वापरण्यात आले याची नोंद घेण्यात आलेली नसल्याने 56 कि.मी. करिता वापरण्यात आलेल्या डीझेलची रक्कम संबधिताकडून वसूल करण्यात यावी. J.C.B. वाहन प्रत्येक दिवसी किती तास वापरण्यात आले याच्या नोंदी लॉगबुकमध्ये घेण्यात आलेल्या नाही. J.C.B. वाहन क्र. 5281 करिता रिक्वीजीशन क्र. 2827 दि.30/09/2014 अन्वये 50 लिटर डिझेल घेण्यात आलेले असून लॉगबुकमध्ये दि.03/05/2014 ते दि. 17/10/2014 पर्यंत कामा अभावी वाहन बंद असल्याची नोंद असल्याने 50 लिटर डिझेल ची रक्कम रु.3716/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. वाहन क्र.MH-13 AX करिता रिक्वीजीशन क्र. 2623 दिनांक नमूद केलेली नसून 42 लिटर डिझेल भरल्याची नोंद असून माहे मे 2014 च्या देयकामध्ये रिक्वीजीशन क्र. 2623 दिनांक 21/05/2014 ला 97 लिटर ची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामुळे 55 लिटर डिझेल चे जादा घेण्यात आलेले आहे. त्यामुळे 55 लिटर डिझेल ची रक्कम रु.4087/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे. वाहन क्र.MH-13 R-1748 च्या लॉगबुकमध्ये काही ठिकाणी फक्त लिटरची नोंद करण्यात आलेली आहे. रिक्वीजीशन क्रमांक नोंदविण्यात आलेला नाही. लॉगबुकमध्ये काही ठिकाणी फक्त लिटर ची नोंद केलेली आहे. रिक्वीजीशन क्र. व दिनांक नमूद करण्यात आलेला नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या नगर अभियंता विभागाच्या अखत्यारीत असलेल्या मशिनरी विभागाकडे असलेल्या विविध वाहनांचे वित्तीय वर्ष 2014-15 च्या लॉगबुक नोंदवहयाची तपासणी केली त्यात काही त्रुटी आढळुन आलेल्या असल्याने, याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 156 दिनांक 24/04/2018 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने दि.05/05/2018 च्या पत्रान्वये

याबाबतचा खुलासा सादर केलेला असून सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने सदरचे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

1) वाहनाचे लॉगबुकमध्ये काम सुरु केलेल्या वेळचे रिडींग, काम संपले वेळचे रिडींग, वापर रिडींग वाहनांसाठी घेतलेले डिझेल, वाहन चालकाची स्वाक्षरी सहा अभियंता यांची स्वाक्षरी या रकान्यामध्ये आवश्यक त्या नोंदी नसल्याचे आढळुन आले. लॉगबुक मध्ये मासिक गोषवारा काढला नसल्याने वाहनांचे मायलेज बाबत खात्री करता आली नाही. लॉगबुक मध्ये आवश्यक ठिकाणी सक्षम अधिकारी यांच्या सह्या नसल्याने लॉगबुक मधील प्रवासाचा तपशिल योग्य असल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) TATA SUMO वाहन क्र.MH-13 AE 7272 च्या लॉगबुकमध्ये दि.1/4/2014 रोजी मीटर रीडिंग 56228 दाखविण्यात आलेले असून दि.31/03/2015 रोजी अंतिम मीटर रीडिंग 66759 एवढे दाखविलेले आहे. त्यामुळे वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये सदर वाहनाचे एकूण रीडिंग 9531 एवढे झालेले आहे. सदर वाहनाकरिता या कालावधीत एकूण 1832 लिटर डीझेल वापरण्यात आलेले आहे. सदर वाहनाचे प्रती कि.मी. 8 प्रमाणे वापर विचारात घेतल्यास साधारण 1191 लिटर डिझेल वापरणे आवश्यक असताना 1832 लिटर डीझेल वापरण्यात आलेले असल्याने साधारण 641 लिटर डिझेल जादा वापरण्यात आलेले असल्याने 641 लिटर डिझेलची रक्कम रु.47,434/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत असल्याबाबत कळविले असता विभागाने सदर वाहनास प्रति 8.कि.मी. इतका मायलेज प्रति लिटर सरासरी मिळत नसल्याबाबत कळविले आहे. याबाबत विभागाने केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने 641 लिटर डिझेलची रक्कम रु.47,434/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहेत.

3) TATA SUMO वाहन क्र.MH-13 AE 7272 च्या लॉगबुकमध्ये दि.24/11/2014 रोजी अंतिम मीटर रीडिंग 63717 असताना दिनांक 27/11/2014 रोजी चालू मीटर रीडिंग 63773 दाखविण्यात आलेले आहे. परंतु दि.25/11/2014 ते दि.26/11/2014 या कालावधीत वाहन कोणी व कोणत्या कामाकरिता वापरण्यात आले याची नोंद घेण्यात आलेली नसल्याने 56 कि.मी. करिता वापरण्यात आलेल्या डीझेलची रक्कम संबधिताकडून वसूल करण्यात यावी.

4) J.C.B. वाहन प्रत्येक दिवसी किती तास वापरण्यात आले याबाबतच्या नोंदी लॉगबुकमध्ये घेण्यात आलेली नसून, सक्षम प्राधिकारी यांनी ते प्रमाणित केलेले नाही. J.C.B. वाहनावर सदर वर्षात केलेला डिझेल खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

5) J.C.B. वाहन क्र. 5281 करिता रिक्वीजीशन क्र. 2827 दि.30/09/2014 अन्वये 50 लिटर डिझेल घेण्यात आलेले असल्याचे देयक रजिस्टर वरून दिसून येते. परंतु लॉगबुकमध्ये दि.03/05/2014 ते दि. 17/10/2014 पर्यंत कामा अभावी वाहन बंद असल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. याबाबत विभागाने केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने 50 लिटर डिझेल ची रक्कम रु.3716/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

6) वाहन क्र.MH-13 AX च्या लॉगबुकमध्ये रिक्वीजीशन क्र. 2623 दिनांक नमूद केलेली नसून 42 लिटर डिझेल भरल्याची नोंद असून माहे मे 2014 च्या देयकामध्ये रिक्वीजीशन क्र. 2623 दिनांक 21/05/2014 ला 97 लिटर ची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यामुळे 55 लिटर डिझेल चे जादा प्रदान करण्यात आलेले आहे. याबाबत विभागाने केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने 55 लिटर डिझेल ची रक्कम रु.4087/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

7) वाहन क्र.MH-13 R-1748 च्या लॉगबुकमध्ये पुढील नोंदी घेण्यात आलेल्या असून सदर नोंदी

त्या त्या महिन्याच्या देयकात दिसून आलेल्या नाही. तसेच काही ठिकाणी फक्त लिटरची नोंद करण्यात आलेली आहे. रिक्वी्जीशन क्रमांक नोंदविण्यात आलेला नाही.

| अ.क्र. | रिक्वी्जीशन क्र. व दिनांक | लिटर | देयक प्रमाणे |
|---|---|---|---|
| 1. | निरंक दि.19/04/2014 | 50 | माहे एप्रिल 2014 च्या देयकामध्ये नोंद नाही. |
| 2. | निरंक दि. 10/08/2014 | 50 | माहे ऑगस्ट 2014 च्या देयकामध्ये नोंद नाही. |
| 3. | निरंक दि. 20/09/2014 | 50 | माहे सप्टेंबर 2014 च्या देयकामध्ये नोंद नाही |
| 4. | निरंक दि. 10/11/2014 | 50 | ऑक्टोबर 2014 च्या देयकामध्ये नोंद नाही |
| 5. | निरंक दि. 13/01/2015 | 50 | जाने. 2015 च्या देयकामध्ये नोंद नाही |
| 6. | निरंक दि. 13/01/2015 | 50 | फेब्रुवारी 2015 च्या देयकामध्ये नोंद नाही. |

8) वाहन क्र.MH-13 R-3548 च्या लॉगबुकमध्ये पुढील नोंदी घेण्यात आलेल्या असून सदर नोंदी त्या त्या महिन्याच्या देयकात दिसून आलेल्या नाही. तसेच रिक्वी्जीशन क्र. 3328 दि.22/05/2014, 50 लिटर डिझेल व रिक्वी्जीशन क्र.3077 दि.23/12/2014, 50 लिटर डिझेल देयक रजिस्टरमध्ये त्याची नोंद असून वाहन क्र.MH-13 R-3548 च्या लॉगबुकमध्ये त्याची नोंद नाही.

| अ.क्र. | रिक्वी्जीशन क्र. व दिनांक | लिटर | देयक प्रमाणे |
|---|---|---|---|
| 1 | 3029 दि.08/10/2014 | 100 | माहे ऑक्टोबर 2014 च्या देयकामध्ये नोंद नाही |
| 2 | 118 दि.26/02/2015 | 50 | माहे फेब्रुवारी 2015 देयकामध्ये वाहन क्र.1748 दाखविलेला आहे |

9) वाहन क्र.MH-13 6115 च्या लॉगबुकमध्ये रिक्वी्जीशन क्र.3937 दि.23/10/2014 ला 50 लिटर डिझेल नोंदविलेले असून माहे ऑक्टो. 2014 च्या देयकामध्ये 44 लिटर डिझेल नोंदविलेले आहे.

10) वाहन क्र.MH-13 B-12 च्या लॉगबुकमध्ये रिक्वी्जीशन क्र.3063 दि.06/12/2014 ला 25 लिटर डिझेल नोंदविलेले असून माहे डिसेंबर 2014 च्या देयकामध्ये सदर वाहनाच्या डिझेल ची नोंद नाही.

11) लॉगबुकमध्ये काही ठिकाणी फक्त लिटर ची नोंद केलेली आहे. रिक्वी्जीशन क्र. व दिनांक नमूद करण्यात आलेला नाही.

12) रोड रोलर 2000 च्या लॉगबुकमध्ये दि.01/04/2014 ते दि.31/03/2015 या कालावधीत 5 लिटर प्रमाणे एकूण 635 लिटर डिझेल भरल्याची नोंद आहे. बिल रजिस्टर मध्ये रोड रोलर 2000 करिता माहे एप्रिल 2014 ते मार्च 2015 या कालावधी प्रत्येक महिन्याला 20 लिटर डिझेल घेतले असल्याची नोंद आहे. त्यामुळे 12 महिन्यात 20 लिटर डिझेल प्रमाणे 240 लिटर डिझेल घेण्यात आले, असताना रोड रोलर 2000 मध्ये 635 लिटर डिझेल कसे भरण्यात आले. एप्रिल महिना 30 दिवसाचा असताना लॉगबुकमध्ये दि.31/04/2014 रोजी 5 लिटर डिझेल भरण्यात आलेले असल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. याबाबत विभागाने केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

FDSDKPM7201 (Ref No : 133, Hmm No : 156)

## *112 नगर अभियंता मशनरी विभागाच्या वाहनांच्या देखभाल/दुरुस्तीवरकरणेत आलेल्या खर्चामध्ये झालेल्या अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 0**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 313008.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 313008.00/-

***उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय 10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वार्षिक खरेदी ही रुपये 50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना बजेट तरतुद 2014-15 मध्ये रक्कम रु 50 लाख असताना निविदा प्रक्रिया न राबविता एकूण रु. 3,13,008/- वाहनावरील सुटे भाग खरेदीचे एकूण 34 तुकडे पाडून खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची खरेदी करण्यांत आलेली आहे.***

मशिनरी विभागाकडील अधिनस्त असलेल्या वाहनावर वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये सुटया भागावर झालेल्या खरेदीबाबतच्या नोंदी बजेट कंट्रोल नोंदवहीवरुन तपासणी केली असता तुकडे करुन एकूण 34 प्रमाणकाद्वारे महानगरपालिकेच्या मशनरी विभागाच्या अंतर्गत असणा-या वाहनावरील सुटे भाग खरेदीसाठी खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची तुकडे पाडून खरेदी केलेली आहे. यावर एकूण रक्कम रु.3,13,008/- खर्च झालेला आहे

उद्योग उर्जा व कामागार विभाग यांचेकडील शासन निर्णय 10/3/2635/उद्योग-6 दिनांक 16/7/1993 नुसार वार्षिक खरेदी ही रुपये 50000/- पेक्षा जास्त असल्यास निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.भाखंस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्र.8(3) ई नुसार वर्षामधील आवश्यकतेनुसार वस्तु खरेदी करण्यासाठी दरवर्षी संख्या करारापेक्षा दरकरार करणे आवश्यक असताना बजेट तरतुद 2014-15 मध्ये रक्कम रु 50 लाख असताना निविदा प्रक्रिया न राबविता एकूण रु. 3,13,008/- वाहनावरील सुटे भाग खरेदीचे एकूण 34 तुकडे पाडून खाजगी व्यवसायीकाकडुन वाहनाच्या सुटया भागाची खरेदी करण्यांत आलेली आहे.

वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.160 दिनांक 03/05/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाचे पत्र जा.क्र.न.अ.मंवि. 61 दिनांक 14/05/2018 नुसार खुलासा सादर केलेला आहे. खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात आलेला आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 134, Hmm No : 160)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

-------------------- **निरंक** ------------------

# <u>भाग दोन</u>

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

### ***113 8 % ईटीपी (ETP) चार्जेस वसुलीबाबत..***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सदरची रक्कम शासन निधीतून कपात केल्याने शासकीय अनुदानाच्या योजनांवर/ विकास कामांवर शासन निधीचा संपूर्णपणे 100% खर्च होत नसून केवळ 92% खर्च होत आहे. सदरचे ईटीपी (ETP) चार्जेस कोणत्या प्राधिकारानुसार कपात केले जातात, तो प्राधिकार पत्र सादर केला नाही. सदरचा निधी कोणत्या बँक खात्यात जमा केला जातो ते खातेपुस्तक व बँक विवरणपत्र सादर केले नाही. सदरचा कपातीचा निधी कोणत्या बाबींवर खर्च केला जातो? हि माहिती सादर केली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 च्या लेखापरीक्षणामध्ये शासकीय अनुदानामधून करण्यात आलेल्या सर्व योजना व विकास कामावरील खर्चामधून 8 % रक्कम ईटीपी (ETP) चार्जेस म्हणुन कपात करण्यात आलेले आहेत, याबाबत अर्धसमास क्रमांक 11 दि. 23/0/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने पत्र क्र. नअ/एचओ/465 दिनांक 03/06/2017 अन्वये अनुपालन प्राप्त झाले असून त्यामधील बाबी विचारात घेऊन लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

1) सदराची रक्कम अगोदर बिलामध्ये समाविष्ट केली जाते व नंतर ती 2% सुरक्षा रक्कम, 2% आयकर, 2% व्हट, यांबरोबर बिल्लामधून कपात केली जाते, त्यामुळे ती मक्तेदाराच्या बिलातून कपात न होता शासन निधीतून कपात होत आहे. परंतु सदरची रक्कम शासन निधीतून कपात केल्याने शासकीय अनुदानाच्या योजनांवर/ विकास कामांवर शासन निधीचा संपूर्णपणे 100% खर्च होत नसून केवळ 92% खर्च होत आहे. 8% निधी हा शासन खात्याकडून मनापा निधीत वर्ग होत आहे. विभागाने अनुपालानामध्ये 5% आकस्मिक बाबींसाठी व 3% रक्कम देखरेख (SUPERVISION) साठी तरतूद पुर्वगणकपत्रक तयार करताना करण्यात येत असल्याचे नमूद केले असून त्याबाबतचा प्राधिकर नमूद केला नाही. शासन निधीतून विकास कामे करताना ई.टी.पी. चार्जेस कपात करण्याची कार्यवाही थाबवण्याची यापुढे दक्षता घेनेत येत असल्याचे कळवले आहे.

2) सदरचे ईटीपी (ETP) चार्जेस कोणत्या प्राधिकारानुसार कपात केले जातात, तो प्राधिकार पत्र सादर सादर केला नाही.

3) सदरचा निधी कोणत्या बँक खात्यात जमा केला जातो ते खातेपुस्तक व बँक विवरणपत्र सादर करावे.

विभागाने अनुपालनामध्ये सदरचा मुद्दा लेखा विभागाशी संबंधित असलेचे कळवले आहे.
4) सदरचा कपातीचा निधी कोणत्या बाबींवर खर्च केला जातो? हि माहिती सदर केली नाही. विभागाने अनुपालनामध्ये सदरचा मुद्दा लेखा विभागाशी संबंधित असलेचे कळवले आहे.

DGPAGPM8503 (Ref No : 8, Hmm No : 11)

## *114 मनपाचे नगर अभियंता, बांधकाम विभागाकडील सर्वसाधारण कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 13**

*लेखा शीर्ष : सर्वसाधरण मनपा/शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***काम करणेपुर्वी कामाची सध्यास्थिती व आवश्यकता नमुद केली जात नाही. कामाची मोजमाप पुस्तकतील मोजमापासमोर तपासणी केल्याची तारखेसह स्वाक्षरी केली जात नाही. स्वतंत्र कामाचे आदेश नोंदवही ठेवली जात नाही. आर्थिक वर्षनिहाय काम पूर्ण नोंदवही ठेवली जात नाही.काम पूर्ण झाल्यानंतर कामाचे पूर्णत्वाचा दाखला देण्यात येत नाही. परिमाणाचे कमी/जास्त कारणासह तक्ता नस्तीमध्ये समाविष्ट केला जात नाही. मोजमाप पुस्तकामध्ये केलेल्या कामाची नोंद तारखेनुसार नमूद केली जात नाही. कामाचे देयकाचे प्रदान केलेबाबत मोजमाप पुस्तकामध्ये लाल शाईने कर्ण रेषा मारले जात नाहीत. मोजमाप पुस्तकाचे साठा नोंदवही ठेवली जात नाही.तांत्रिक मान्यतेची नोंदवही ठेवली जात नाही. बांधकाम नोंदवही व इमारत नोंदवही (स्थावर मालमत्तानोंदवही) विहित नमुन्यात ठेवल्या जात नाहीत. बांधा, वापरा व हस्तांतर मालमत्ता नोंदवही ठेवली जात नाही.***

नगर अभियंता, बांधकाम विभागाचे सन 2013-14 व 2014-15 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 57 दि.14/08/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.
1)काम करणेपुर्वी कामाची काय परस्थिती आहे ? ते किती वर्षापूर्वी काम केले आहे ? आज ते काम करणे आवश्यक आहे का ? याबाबत सविस्तर अहवाल टिपणीत नमूद केले जात नाही.
2) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली

मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

3) स्वतंत्र कामाचे आदेश नोंदवही ठेवली जात नाही. त्यामुळे आर्थिक वर्षामध्ये किती कामाचे आदेश देण्यात आले आहेत याची तपासणी करता येत नाही.

4) आर्थिक वर्षनिहाय काम पूर्ण नोंदवही ठेवली जात नाही.

5) काम पूर्ण झाल्यानंतर कामाचे पूर्णत्वाचा दाखला देण्यात येत नाही.

6) काम पूर्ण केल्यानंतर अंदाजपत्रकानुसार परिमाणाचे कमी/जास्त कारणासह तक्ता नस्तीमध्ये समाविष्ट केला जात नाही.

7) मोजमाप पुस्तकामध्ये केलेल्या कामाची नोंद तारखेनुसार नमूद केली जात नाही.

8) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियामावालीमधील परिशिष्ट क्र.24 मधील नियम क्र.8 नुसार मोजमापांच्या प्रत्येक संचाची सुरुवात मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केला जात नाही.

9) कामाचे देयकाचे प्रदान केलेबाबत मोजमाप पुस्तकामध्ये लाल शाईने कर्ण रेषा मारले जात नाहीत.

10) मोजमाप पुस्तकाचे साठा नोंदवही ठेवली जात नाही.

11) तांत्रिक मान्यतेची नोंदवही ठेवली जात नाही.

12) बांधकाम विभागामध्ये बांधकाम नोंदवही व इमारत नोंदवही (स्थावर मालमत्तानोंदवही) विहित नमुन्यात ठेवल्या जात नाहीत व त्यात नवीन रस्ते व इमारतीच्या नोंदी तसेच त्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या नोंदी ठेवल्या जात नाहीत.

13) बांधा, वापरा व हस्तांतर मालमत्ता नोंदवही ठेवली जात नाही.

DGPKVSM6101 (Ref No : 53, Hmm No : 57)

## *115 विद्युत विभागाकडील रस्त्यावरील दिवे दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष : विद्युत दिवे दुरुस्त मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3595527.00/-

***शासन निर्णय क्रमांकःमातंसं/नस्तीष–2012/प्र.क्र.273/39 दि.16 जानेवारी, 2013 ई-निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना ती प्रक्रिया राबविलेली नसल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. वरील त्रुटींच्या***

***अनुषंगाने माहिती सादर करण्यात यावी. पुरवठा करण्या त आलेल्यार विदयुत साहित्याची गर्व्हमेंट पॉलिटेक्निक, सोलापूर यांच्या कडून तांत्रिक तपासणी करण्यात आलेली नाही. वरील त्रुटींच्या अनुषंगाने माहिती व खुलासा सादर करण्यात यावा. राष्ट्रीय महापालिका लेखासंहिता मधील जोडपत्रातील एस.टी.1 ते एस.टी.3 या नमुन्यामध्ये भांडारलेखे व साठा नोंदवही राष्ट्रीय लेखासंहिता नुसार विहीत नमुन्यात ठेवले जात नाही.***

सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये रस्त्यावरील दिवे दुरुस्तीकरीता साहित्य खरेदी या लेखाशीर्षा अंतर्गत विद्युत विभाग, सोलापूर महानगरपालिका यांचेकडून रक्कम रु.35,95,527/- एवढया रकमेचे विद्युत साहित्यची खरेदी करणेत आली.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | विदयुत विभागाकडील रस्त्यावरील दिवे दुरुस्तीस लागणारे साहित्यं खरेदी |
| ठेकेदाराचे नाव | सुर्या रोशनीचे अधिकृत विक्रेते बागडी एजन्सीच सोलापूर |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्रमांक 401,दि.21/11/2014 |
| अंदाजपत्रकाची रक्कम | 60 लाख |
| निविदा कालावधी व दैनिकाचे नाव | तरुण भारत, लोकमत, सकाळ |
| इसारा रक्कम | रक्कम.रु.52,999/- |
| निविदा रक्कम | रक्कम रु.52,99,985/- |
| सुरक्षा अनामत | रक्कम रु.1,05,998/- |
| कामाचा कालावधी | 60 दिवस |
| करारनामा मुद्रांक शुल्क | 3,900/- |
| दोषदायित्व कालावधी | 1 वर्ष |
| कार्यारंभ आदेश / पहिला टप्पा | दि.19/12/2014, साहित्य प्राप्त दि.24/12/2014 |
| दुसरा टप्पा | दि.26/02/15 |
| धावते/अंतीम देयक<br>एकुण खर्च रक्कम रु. | देयक क्रमांक 1 - रक्कम रु.23,98,223/-<br>देयक क्रमांक 2 - रक्कम रु.11,97,304/- |
| एकूण | 35,95,527/- |

रस्त्यावरील दिवे दुरुस्तीकारीता साहित्य खरेदी या नस्तीची तपासणी केली असता, अनियममिततेबाबत अर्धसमास पत्र क्र. 01 दि.12/04/2017 अन्वये विचारणा करण्यात आले होती. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील

पत्र क्र.1166 दि.25/04/2017 अन्वये अनुपालन सादर करण्यात आले आहे. खात्याने सादर केलेले अनुपालन विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) विदयुत साहित्य खरेदी करणेपूर्वी तांत्रिक समितीची मान्यता सादर करणे बाबत कळविले असता, सोलापूर महानगरपालिकेकडे तांत्रिक समिती ची मान्यता घेण्यात आलेली नाही असा खुलासा केल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

2) विदयुत साहित्य खरेदी करणेपूर्वी किती साहित्याची आवश्यकता आहे. याबाबत कोणत्याही क्षेत्रिय कार्यालय (वॉर्ड) विभागाचे मागणी पत्र नस्तीमध्ये उपलब्ध नाहीत. त्यामुळे मागणी विचारात न घेता खरेदी केल्याचे दिसून येते. साहित्य आवश्यकतेबाबतचे सर्व विभागीय कार्यालयाचे मागणी पत्र अनुपालनासोबत सादर करण्यात आले नाही.

3) वाटप करणेत आलेले विदयुत साहित्य क्षेत्रिय कार्यालयाने किती वापरले आहे, किती शिल्लक आहे याबाबतचा अहवाल नस्तीमध्ये उपलब्ध नाही. खुलाशामध्ये शिल्लक साहित्याची नोंद विभागीय कार्यालयाकडे असून, या संबधित माहिती इलेक्ट्रिकल सुपर वायझर व विभागीय अधिकारी यांच्याकडे असल्याचे नमूद केले आहे. परंतु माहिती अनुपालासोबत सादर केलीली नाही.

4) राष्ट्रीय महापालिका लेखासंहिता जोडपत्रातील एस.टी.1 ते एस.टी.3 या नमुन्यामध्ये भांडारलेखे व साठानोंदवही राष्ट्रीय लेखासंहितानुसार विहीत नमुन्यात ठेवली जात नाही.

5) शासन निर्णय क्रमांकःमातंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दि.16 जानेवारी, 2013 ई-निविदा प्रक्रिया राबविणे आवश्याक असताना, आपणांकडून ती प्रक्रिया राबविलेली नसल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. वरील त्रुटींच्या अनुषंगाने माहिती सादर करण्यालत आलेली नाही.

6) मा.स्थायी समिती ठराव क्र.401,दिनांक 21/11/2014 नुसार रु. 30,99,312/- रकमेस प्रशासकीय मान्यता असताना श्री.बागडी एजन्सी, यांचा दोन टप्प्यात रक्कम रु.35,95,527/- एवढया रकमेची खरेदी कशी करण्यात आली, याबाबतचा खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

7)तिस-या टप्यातील विद्युत साहित्याची खरेदीची आवश्यकता असताना खरेदी केलेली नाही. परंतु शिल्लक असताना व साहित्याची गरज असतानाही खरेदी का केली नाही, याबाबतचा खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

8) महाराष्ट्र शासन, वित्तस विभाग, परिपत्रक क्र.विकअ/1998/प्र.क्र.43/कराधान-1 दि.5 मे1999, कार्यकंत्राट कायदयाचे कलम 16 तसेच मुल्यवर्धित कर कायदा 2002 प्रमाणे कंत्राटदाराने विक्री कर खात्यांकडून नोंदणी दाखला घेणे बंधनकारक असून, निविदेसोबतच्या सहपत्रात दाखला (नमुना 102 नियम 9) सादर केला पाहिजे. नोंदणी दाखला उपलब्ध करुन देणेत आलेला नाही.

9) पुरवठा करण्याकत आलेल्यार विदयुत साहित्याखची गव्ह2मेंट पॉलिटेक्निक, सोलापूर यांच्याक कडून तांत्रिक तपासणी करण्यात आलेली नाही.

10) सदरच्या कामाची प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाहीत, तसेच उपरोक्त आक्षेपांचा संयुक्तिक खुलासा प्राप्त होईपर्यत झालेला खर्च र.रु. 35,95,527/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. वरील त्रुटींच्याह अनुषंगाने माहिती व खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

DATVRKM8002 (Ref No : 11, Hmm No : 01)

## *116 सात रस्ता ते बेगमपेठ पोलीस चौकी इलेक्ट्रिक पोल शिफ्टींग करणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : सुवर्ण जयंती नागरोत् शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 906366.00/-

| |
|---|
| ***कामाचे ई टेंडरिंग करणेत आलेले नाही. सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपअभियंता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणेत आलेली नाही. कामाचे पुर्वगणकपत्रकातील दर तपासणेसाठी मंजूर दरसूची लेखापरीक्षणास सादर केली नाही. जादा बाबीस सक्षम प्राधिका-याची मान्यता घेण्यात आली नसल्याने त्यावर खर्च करण्यात आलेली रक्कम रु.9,06,366/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.*** |

सात रस्ता ते बेगमपेठ पोलीस चौकी इलेक्ट्रिक पोल सिफ्टिंग करणे कामाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1.अंदाजपत्रकिय रक्कम रु.1,49,56,475/-

2. निविदा रक्कम रु.1,38,61,076/-

3. निविदा मान्यता - स्थायी समिती ठराव क्र.272 दि.30/11/2013

4. लेखाशिर्ष - सुवर्ण जयंती नागरोत्थान राज्यस्तर

5. निधी - शासन.

6. ठेकेदाराचे नाव - मे. बेस्ट इलेक्ट्रिक, भोसरी.

7. कार्यारंभ आदेश क्र. 829 दि.19/12/2013 (6% कमी दराने)

8. कामाचा कालावधी - 4 महिने. (19/12/2013 ते 18/04/2014)

9. मुदतवाढ - दि.31/08/2042 पर्यंत

10. एकूण खर्च रु.1,20,86,126/-

11. मोजमाप पुस्तक क्र.129 पान क्र. 65.

सदर कामाची नस्ती, देयकाची व मोजमाप पुस्तकातील नोंदीची तपासणी केली असता अढळुन आलेल्या उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्र. 02 दि.29/04/2017 अन्वये विचारणा करणेत आले होते. त्यानुसार खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.215 दि.23/05/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे.

खात्यने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षाणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सदर कामाचे ई टेंडरिंग करणे आवश्यक होते. परंतु मनपाने कामाची निविदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दोन लिफाफा पध्दतीने निविदा निश्चित करण्यात आली आहे.

सदर कामाची निविदा ही दि.10/09/2013 ते 25/09/2013 या कालावधीत मागविण्यात आलेले आहे. नोडल ऑफिसर सोलापूर मनपा यांचेकडील जा.क्र.9/संगणक/469 दि.19/11/2013 अन्वये शासनाचे निर्देशानुसार ई टेंडरींग प्रणाली दि.19/11/2013 पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे सदर कामाची जाहिर निविदा काढणेत आली आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.संतंस/नस्ती-2012/प्र.क्र. 273/39 दि.19/01/2013 अन्वये फेब्रुवारी 2013 पासून सर्व विभागाना ई टेंडरींग कार्य प्रणाली लागू करण्यात आली असल्याने खात्याने सादर केलेले अनुपालन मान्य करता येत नाही.

2) सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ट क्र.24 नुसार मोजमाप पुस्तकामध्ये नमूद केलेली मोजमापे उपाभियांता यांनी 100 टक्के व कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के मोजमापे तपासल्याचे मोजमापासमोर तारखेसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केली नाही.

विद्युत विभागाकडे उपाभियंता व कार्यकारी अभियंता ही पदे अस्तित्वात नाहीत. त्यामुळे प्रचलित नियमानुसार कार्यवाही केली नाही असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने सादर केलेले अनुपालन संयुक्तीक नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

3) सदर कामाचे अंदाजपत्रक ही कोणत्या मंजूर दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे त्या वर्षाची दरसूची मागणी करूनही लेखापरीक्षणास सादर केली नाही. त्यामुळे कामास देण्यात आलेले दर तपासता आले नाहीत.

सदर कामाचे अंदाजपत्रक हे 2012-13 च्या मंजूर दरसुचीनुसार करणेत आलेले आहे असे खात्याने कळविले आहे. परंतु अंदाजपत्रकातील दर तपासणीसाठी दरसुची सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) खाली नमूद केलेल्या बाबी पुर्वगणकपत्रकातील बाबी व्यतरिक्त करण्यात आल्या आहेत. सदर जादा बाबीस सक्षम प्राधिका-याची मान्यता घेण्यात आली नाही. त्यामुळे सदर बाबीवर खर्च करण्यात आलेली रक्कम रु.9,06,366/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | परिमाण | दर रु. | खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1. | L.T. मिनी फिडर पिलर | 18 नग | 8250/- | 148500/- |
| 2. | 11 KV व क्रास आर्य | 3 नग | 1151/- | 3453/- |
| 3. | Lx6 sq.mm Cable | 220 मी. | 124/- | 27280/- |
| 4. | Lx4 sq.mm Cable | 3920 मी. | 104/- | 407680/- |
| 5. | b/2x70 sq.mm Cable | 200 मी. | 472/- | 94400/- |
| 6. | 3x16 sq.mm Cable | 597 मी. | 168/- | 100296/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7. | 4 Core 16 sq.mm cable | 57 मी. | 195/- | 11115/- |
| 8. | b/L Core 185 sq.mm cable | 90 मी. | 1025/- | 92250/- |
| 9. | Dismentling Pole | 18 नग | 615/-+300/- | 14070/- |
| 10. | Dismentling Conductor | 5788 मी. | 0.816+2600/- | 7322/- |
| | एकूण | | | 906366/- |

वरील बाबीचे खर्चास दि/12/09/2014 अन्वये मा.आयुक्त यांचे महानगरपालिका अधिनियम 1949 च्या तरतुदीनुसार कलम 73(ड) नुसार अदा करणेस मान्यता घेण्यात आलेले आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने अनुपालनासोबत सादर केलेले कागदपत्रांची तपासणी केली असता Dismaentling ची बाब मुळ पुर्वगणकपत्रकामध्ये घेण्याचे राहिले असल्याने त्याचे पुर्वगणकपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे खात्याने आक्षेपात नमूद केलेले जादा बाबीस मान्यता घेतल्याचे कागदपत्रे सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 85, Hmm No : 02)

## *117 अनधिकृत इमारत बांधकाम, गुंठेवारी विकास क्षेत्र व महापालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवर्सना परवानगी बाबत अभिलेखे व माहिती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :नगर रचना मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 18202522.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 18202522.00/-

***सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत इमारत बांधकामासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 124 क(3) नुसार दंडनीय रक्कम वसूल करण्यात येत असल्यास वित्तीय वर्ष 2013-2014 व 2014-15 मध्ये एकूण किती दंडनीय रक्कम वसुली केली आहे. तसेच अंदाजपत्रक सन 2013-14 मध्ये र.रु.1,07,48,473/- व 2014-15 मध्ये 74,53,809/- अशी एकूण र.रु.18202522/- रक्कम जमा झाली असून त्याबाबत जमेचे व जमा रक्कमेतून करण्यात आलेल्या विकास कामांची अभिलेखे व माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाहीत.***

1)सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत इमारत बांधकामासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 124 क(3) नुसार दंडनीय रक्कम वसूल करण्यात येत असल्यास वित्तीय वर्ष 2013-2014 व 2014-15 मध्ये एकूण किती दंडनीय रक्कम वसुली केली आहे या बाबत लेखपरिक्षणास अभिलेखे व माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाहीत.

2)महाराष्ट्र गुंठेवारी विकास ( नियमन,सुधारणा व नियंत्रण ) अधिनियम 2001 मधील कलम 3 नुसार अस्तित्वातील अनधिकृत गुंठेवारी जागा व इमारतीचे ले आउट जागा मालकाकडून शुल्क आकारून नियमित करण्याची तरतूद आहे. अधिनियमातील कलम 6 नुसार आकारणी केलेल्या शुल्काच्या रक्कमेतून गुंठेवारी क्षेत्रात पायाभूत विकास कामे हाती घेण्याची तरतूद आहे. अंदाजपत्रक सन 2013-14 मध्ये र.रु.1,07,48,473/- व 2014-15 मध्ये 74,53,809/- एवढी रक्कम जमा झाली असून त्याबाबत जमेचे व जमा रक्कमेतून करण्यात आलेल्या विकास कामांची अभिलेखे व माहिती उपलब्ध करून देण्यात देण्यात आली नाहीत.

3) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील परिशिष्ट W मधील अट क्र.15 नुसार जमीन मालकाला TDR मंजूर करण्यात येतो. TDR च्या मोबदल्यात महापालिकेस हस्तांतरीत करावयाच्या जागेभोवती 1.5 मीटर उंचीचा कंपाऊंड वॉल,नामफलक व गेट विकासकाने स्वखर्चाने पूर्ण करून जागा हस्तांतरित करावयाची आहे. त्याप्रमाणे मनपा कडे हस्तांतरित झालेल्या जागांबाबत केलेल्या कार्यवाहीसह सविस्तर माहिती व संबधित रजिस्टर लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात देण्यात आली नाहीत.

4) महापालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवर्सना परवानगी नगर रचना विभागामार्फत देण्यात येते का?. महापालिका क्षेत्रात एकूण किती मोबाईल टॉवर्स आहेत यापैकी अधिकृत, अनधिकृत किती?, परवानगी दिलेले, न दिलेले किती? त्यांवर विकास कराची एकूण किती रक्कम वसुली केली आहे? किती रक्कम वसुली करणे बाकी आहे? याची माहिती संबंधित अभिलेख्यांसह उपलब्ध करून मोबाईल टॉवर्सचा ताळमेळ महानगर टेलिफोन विभागाकडील नोंदी/आकडेवारीसोबत घेतला आहे का? याबाबतची माहिती सादर करण्यात आली नाही.

5)नगर रचना विभागाने त्यांच्याकडील अग्रिम रजिस्टर लेखपरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाहीत.

वरील अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.43 दि.04/08/2017 अन्वये विभागास कळविले असता, लेखापरीक्षणाचे अंतिम तारखेपर्यंत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत, त्यामुळे वरील बाबीचे लेखापरीक्षण करता आले नाही. अंदाजपत्रक सन 2013-14 मध्ये र.रु.1,07,48,473/- व 2014-15 मध्ये 74,53,809/- अशी एकूण र.रु.18202522/- जमा झाली असून त्याबाबत जमेचे व जमा रक्कमेतून करण्यात आलेल्या विकास कामांची अभिलेखे व माहिती उपलब्ध न झाल्याने आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 कलम 4 अन्वये लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण 3

मधील नियम 6 (1)(2) अन्वये लेखापरीक्षणासाठी सर्व प्रमाणके, कागदपत्रे व स्पष्टीकरणे उपलब्ध करून देण्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. परंतु त्याचे पालन झाले नाही.

DATVRKM8002 (Ref No : 20, Hmm No : 43)

## *118 सोलापूर महानगरपालिकेच्या 2014-15 या आर्थिक वर्षाच्या कर्ज नोंदवहीतील अनियमततेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : कर्ज निवारण निधी मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेने कर्ज परतफेडीसाठी कर्ज निवारण निधीची निर्मिती केली नसून निधीबाबत रोखवही ठेवण्यात आली नाही. कर्ज नोंदवहीतील अनेक नोंदी अपूर्ण दिसत असून काही नोंदी मुख्य लेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्या नाहीत. कर्जाची मुद्दल रक्कम 3,09,37,910/- व व्याजाची रक्कम 12,31,005/- इतक्या रक्कमेची परतफेड 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये केली असून अद्याप रक्कम रु.26,43,03,212/- इतकी रक्कम व त्यावरील व्याज थकित असताना महापालिकेकडे कर्ज निवारण निधीचे खाते ठेवले नसून परतफेडीची तरतूद केली नसल्याचे आढळून आले. मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियमातील नियम 126 (2) प्रमाणे कर्ज निवारण निधीची वार्षिक विवरण पत्रे मा.आयुक्त यांनी दरवर्षी महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये केली नसल्याचे दिसते. महानगरपालिकेने 1972-73 ते 2010-11 पर्यंतच्या लेखापरीक्षण अहवालातील किती परिच्छेदाचे अनुपालन सादर केले? व किती परिच्छेद निरक झाले? याची माहिती उपलब्ध केली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेकडील कर्ज नोंदवहीची 2014-15 करीता तपासणी केली असता आढळुन आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास क्रमांक 71 दि.25/10/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने कोणतेही अनुपालन सादर केले नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय कायम करण्यात येत आहे.

10) सोलापूर महानगरपालिकेने कर्ज परतफेडीसाठी कर्ज निवारण निधीची निर्मिती केली नसून निधीबाबत रोखवही ठेवण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 142 प्रमाणे नमुना नं.1 मध्ये सदर बाबतची रोखवही ठेवणे आवश्यक असुनही व

स्थानिक निधी लेखा परीक्षा विभागाच्या लेखापरीक्षण अहवाल मध्ये याबाबत वेळोवेळी आक्षेप नोंदवून ही अशा प्रकारची रोखवही 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये ठेवली नाही.

11) कर्ज नोंदवहीतील अनेक नोंदी अपूर्ण दिसत असून काही नोंदी मुख्य लेखापाल यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केल्या नाहीत. उदा.पृष्ठ क्र.60,149,159,162,191 वरील नोंदी.

3) महानगरपालिकेने विविध शहर विकास कामासाठी, पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व खुल्या बाजारातून (वित्तीय संस्थाकडुन) घेतलेल्या कर्जाची व व्याजाची मार्च 2015 अखेर खालील प्रमाणे थकबाकी असल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | कर्जबाब | कर्ज रक्कम | सन 2014/15 मधील परतफेड | | मार्च 2015 अखेर थकबाकी . |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुद्दल रु. | व्याज रु. | मुद्दल रु. |
| 1 | राज्य शासन कर्जे | 50600000/- | 0 | 0 | 0 |
| 2 | अग्निशामक दल सुधारणा | 2050000/- | 0 | 0 | 513340/- |
| 3 | म.जी.प्रा. आयुर्विमा महामंडळ | 10317000/- | 9,37,910/- | 12,31.005/- | 32,82,675/- |
| 4 | म.जी.प्रा. मुंबई, सोलापूर | 185900000/- | 30000000/- | 0 | 10,84,00,000/- |
| 5 | आयुर्विमा महामंडळ कर्जावरील ग्यारंटी फी | 776085/- | 0 | 0 | 0 |
| 5 | महाराष्ट्र शासन हुडको | 128500000/- | 0 | 0 | 128500000/- |
| 6 | जिल्हास्तरीय विकास योजना | 22219497/- | 0 | 0 | 22219497/- |
| 7. | हुडको | 2251,700/- | 0 | 0 | 13,87,700/- |
| | **एकूण** | **402614282/-** | **3,09,37,910/-** | **12,31,005/-** | **26,43,03,212/-** |

वरील कर्ज रक्कमेपैकी कर्जाची मुद्दल रक्कम 3,09,37,910/- व व्याजाची रक्कम 12,31,005/- इतक्या रक्कमेची परतफेड 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये केली असून अद्याप रक्कम रु.26,43,03,212/- इतकी रक्कम व त्यावरील व्याज थकित असताना महापालिकेकडे कर्ज निवारण निधीचे खाते ठेवले नसून परतफेडीची तरतूद केली नसल्याचे आढळून आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम 1949 (प्रकरण 10)

कलम 112(1) प्रमाणे चक्रवाढ व्याजाच्या संचित रकमासह जी रक्कम मान्य केलेल्या कालावधीत कर्ज चुकते करण्यासाठी पुरेशी होईल अशी रक्कम अशा कर्ज निवारण निधीत भरली पाहिजे परंतु अशी कार्यवाही महानगरपालिकेने केलेली नाही. तसेच कर्जाची मुद्दल रक्कम वेळीच न फेडल्याने महानगरपालिकेस मोठया प्रमाणात व्याजाचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे आढळून येत आहे. वरील कर्जाची परतफेड करण्यासाठी मनपाने पुरेसा कर्ज निवारण निधी उभा केला नसल्याचे आढळुन आले.

4) मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियमातील नियम 126 (2) प्रमाणे कर्ज निवारण निधीची वार्षिक विवरण पत्रे मा.आयुक्त यांनी दरवर्षी महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही सन 2014-15 आर्थिक वर्षामध्ये केली नसल्याचे दिसते.

5) कर्ज निवारण निधीचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग, सोलापूर यांनी 2010-11 पर्यंत केले होते. सदर विभागाच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद खालील प्रमाणे प्रलंबित असल्याचे आढळुन आले.

| कालावधी | प्रलंबित परिच्छेद क्र . | प्रलंबित परिच्छेदची एकूण संख्या |
|---|---|---|
| 1972-73 ते 94-95 | ---- | माहिती उपलब्ध नाही |
| 1995-96 ते 98-99 | ---- | एकूण 9 |
| 1999 ते 2001-02 | 3 ते 8 | 6 |
| 2002 ते 2003 | 1 ते 13 | 13 |
| 2003-04 ते 2004-05 | 3 ते 21 | 19 |
| 2005-06 ते 2010-11 | 1 ते 16 | 16 |

परंतु महानगरपालिकेने 1972-73 ते 2010-11 पर्यंतच्या लेखापरीक्षण अहवालातील किती परिच्छेदाचे अनुपालन सादर केले? व किती परिच्छेद निरक झाले? याची माहिती उपलब्ध केली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 40, Hmm No : 71)

## *119 भविष्य निर्वाह निधी विभागाकडील नोंदीच्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : भ.नि.नि. महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीची खतावणीमध्ये वर्षाखेरीस हिशोब परिपूर्ण करून सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का उमटविणेत आलेला नाही. अग्रीमाचे परतफेडीचा ही किती हप्त्यापैकी कितवा हप्ता वसूल केला आहे त्याचा क्रमांक नमूद करणेत आलेला नाही. 2014-15 या वर्षात कर्मचाऱ्यांचे खात्यामध्ये जमा केलेली व कर्मचाऱ्यांचे वेतनातून वसूल केलेली रक्कम यामध्ये रक्कम रु.24,94,682/- इतकी तफावत आहे. भ.नि.नि. खात्यामध्ये रक्कम रु. 56,204/- इतकी रक्कम संबधीताच्या खात्यामध्ये जमा केल्याचे दिसून येत नाही. सन 2014-15 या अर्थिक वर्षामध्ये वसुल केलेल्या रकमा ह्या 6 ते 17 महिने उशिरा वर्ग केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कर्मचा-याना देण्यात आलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले जाते याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. 56 कर्मचा-यांचे 2014-15 या आर्थिक वर्षाचे भ.नि.नि. खात्याचे लेखे लेखापरिक्षण कालावधी माहे सप्टेंबर 2017 पर्यंत पुर्ण केलेले नाहीत.***

मनपा सोलापूर लेखा अंतर्गत असणारे भविष्य निर्वाह निधीचे अभिलेखेचे तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.80 दि.17/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मुले6/लेखा परिक्षण/80/2017 दि.26/12/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)सोलापूर मनपाचे अंतर्गत असणारे लेखा विभागाने कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीची खतावणी ठेवण्यात आले आहे. खतावणीमध्ये दरमहाचे कर्मचाऱ्याचे वेतनातून वसूल केलेल्या रकमेच्या नोंदी घेऊन वर्षाखेरीस हिशोब करून लेखे परिपूर्ण करून बंद करणेत आले आहेत. सदर लेखेचे खाली सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का उमटविणेत आलेला नाही.

आक्षेपात नमूद केलेनुसार वर्षाखेरीस हिशोब करून लेखे परिपूर्ण करून बंद करणेत आले आहेत. सदर लेखेचे खाली सक्षम प्राधिकाऱ्याचे स्वाक्षरीने प्रमाणीत केल्याचे खात्याने अनुपालन सादर केले आहे. परंतु लेखा परीक्षणास अभिलेखे सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) भ.नि.नि.चे वजातीचे तक्त्यामध्ये कर्मचाऱ्याने घेतलेल्या अग्रीमाचे परतफेड ही किती हप्त्यापैकी कितवा हप्ता वसूल केला आहे त्याचा क्रमांक नमूद करणेत आलेला नाही.

याबाबत आहरण व वितरण अधिका-याना सुचना देण्यात आल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

3) सन 2014-15 या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांचे भ.नि.नि.च्या खात्यामध्ये जमा केलेली रक्कम व व्याजाच्या रकमेचा हिशोब करून वर्षाखेरीस शिल्लक दर्शविणाऱ्या तक्त्याची (Brad Sheet) तपासणी केली असता सन 2014-15 या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्यांचे खात्यामध्ये जमा केलेली रक्कम रु.27,57,08,235/- इतकी आहे. कर्मचाऱ्यांचे वेतनातून वसूल केलेली रकमांची गुंतवणुक रु.22,88,38,248/-, रोखवहीतील शिल्ल्क रक्कम रु.2,38,977/- व मनपाकडुन वित्तीय वर्ष 2014-15

मधील येणे रक्कम रु.4,91,25,692/- इतकी असून एकुण रक्कम रु.27,82,02,917/- इतकी आहे. तफावत रक्कम रु.24,94,682/- इतकी आहे. तफावतीबाबत तपशीलासह स्पष्टीकरण करणेत यावे.

2014-15 मध्ये जमा न केलेल्या व अपुर्ण असलेल्या खात्याचा शोध घेऊन जमा न केलेली रक्कम रु. 24,94,682/- इतकी जमा घेण्यात येऊन सर्व खाते पुर्ण करुन लेखा परीक्षणास दाखविण्यात येत आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे. खात्याने अनुपालन केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

4) माहे फेब्रुवारी पेड इन मार्च 2015 चे कर्मचाऱ्यांचे वेतनातून वसूल केलेल्या तक्त्यातील रक्कम त्यांचे भ.नि.नि. खात्यामध्ये जमा केल्याची तपासणी केली असता रक्कम रु.56,204/- इतकी रक्कम संबधीताच्या खात्यामध्ये जमा केल्याचे दिसून येत नाही. तरी योग्य ती दुरुस्ती करून संबंधीताचे भ,नि.नि.चे लेखे पुर्ण केल्याचे दर्शविण्यात यावेत. खात्यामध्ये जमा न केलेली रक्कम ही महिना नमूद करून यादीसह तपशील देऊन निलंबन लेख्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. तदनंतर ज्यावेळी ती रक्कम संबंधीताचे खात्यामध्ये रक्कम जमा केली जाईल त्यावेळी तेवढी रक्कम निलंबन खात्यामधून कमी करणे आवश्यक आहे. परंतु मनपाने तसे निलंबन लेखे ठेवलेले नाही व त्याप्रमाणे कार्यवाही करीत नसल्याचे दिसून येत नाही.

आक्षेपानुसार कार्यवाही करणेत असल्याचे खात्याने कळविल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

5) कर्मचा-याचे वेतनातुन वसुल केलेली रक्कम ही वेतन प्रदान केलेनंतर त्वरीत भ.नि.नि. खात्याकडे रक्कम वर्ग केली जात नाही. सन 2014-15 या अर्थिक वर्षामध्ये वसुल केलेल्या रकमा ह्या 6 ते 17 महिने उशिरा वर्ग केल्याचे दिसून येत आहे. वसुल केलेल्या भ.नि.नि.चे रकमेवर कर्मच-याना व्याज द्यावे लागत असल्याने सदरच्या रकमा ह्या त्वरीत वर्ग करुन त्या वेळीच गुंतवणुक करणे आवश्यक आहे. मनपाने वेतनातुन वसुल केलेल्या रकमा ह्या संबंधीत कर्मचा-याच्या खात्यात व्याजासहीत जमा केल्याचे नोंदी केल्या आहेत. वसुल केलेल्या रकमा वेळीच गुंतवणुक केल्या असत्या तर त्यावर मिळणारे व्याजाची रक्कम कर्मचा-याना व्याज देणे सुकर झाले असते. परंतु मनपाने सदरच्या रकमा वेळीच गुंतवणुक केली नसल्याने त्यावरील व्याजाची रक्कम मनपास मिळलेले नाही. त्यामुळे व्याजाच्या रकमेचा भार मनपा निधीवर पडत आहे. तरी कर्मचा-याना देण्यात आलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले जाते याचे स्पष्टीकरण करणेत यावे.

मनपाची आर्थिक परिस्थीती बिकट झाल्याने कपातीच्या रकमा उशीराने देण्यात आलेल्या आहेत यापुढे कपातीच्या रकमा दर महा देण्यात येत आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

खात्याने भ.नि.नि.च्या संपुर्ण रकमा जमा केल्याचे व कर्मचा-याना देण्यात आलेल्या व्याजाच्या रकमाचे कसे समायोजित केले याचे स्पष्टीकरण केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 58, Hmm No : 80)

## *120 शासकीय निधीचे रोख नोंदवहीतील नोंदीच्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान रस्ते अनुदानचे व मलनि: सारण योजनेचे बँक ताळमेळपत्रकात लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम गुंतवणुक केली आहे ते नमुद करण्यात आलेली नाही.***

शासकीय निधीचे रोख नोंदवहीतील नोंदीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र. 73 दि.02/11/2017 अन्वये विचारणा केली होती. खात्याने त्यांचेकडील पत्र क्र.मुले6/लेखा परिक्षण/73/2017 दि.26/12/2017 अन्वये अनुपालन सादर केले आहे. खात्याने सादर केलेल्या अनुपालनाचा विचार करता लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान रस्ते अनुदानचे रोख वहीतील नोंदीची तपासणी केली असता माहे मार्च 2015 पर्यंत बँक ताळमेळपत्रक तयार केले आहे. परंतु त्यामध्ये बँकेत लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम गुंतवणुक केली आहे ते नमुद करण्यात आले नाही. त्यामुळे बँकेत लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम आहे याची खात्री करता आली नाही. त्यामुळे ताळमेळ योग्य असल्याची खात्री पटत नाही.

बँक ताळमेळ पुर्ण करणेत आलेले असून लिंक डिपॉझिटची रक्कम त्यात नमूद करण्यात आलेली आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

बँक ताळमेळ पुर्ण केलेचे अनुपालनासोबत सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

2) मलनि:सारण योजनेचे बँकेत लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम गुंतवणुक केली आहे ते बँक तळमेळ पत्रकात नमुद करण्यात आले नाही. त्यामुळे बँकेत लिंक डिपाँझिटपोटी किती रक्कम आहे याची खात्री करता आली नाही व ताळमेळपत्रक सदोष असून त्यात लिंक डिपॉझीटची रक्कम नमूद करुन ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

बँक ताळमेळ पुर्ण करणेत आलेले असून लिंक डिपॉझिटची रक्कम त्यात नमूद करण्यात आलेली आहे असे खात्याने अनुपालन सादर केले आहे.

बँक ताळमेळ पुर्ण केलेचे अनुपालनासोबत सादर केले नसल्याने आक्षेप कायम करणेत येत आहे.

DGPKVSM6101 (Ref No : 72, Hmm No : 73)

## *121 वित्तीय वर्ष 2014-15 या वर्षातील सेवानिवृत्ती /मयत / स्वेच्छा निवृत्ती सेवापुस्तकातील त्रृटीचीपुर्तता करण्याबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***श्री.बाबू अप्पाराव शिंगाडे, रोड रोलर डायव्हर हे दि. 30/04/2014 रोजी से.नि. झालेले असून यांच्या रजा लेख्यात सन 2001 ते 2014 अखेर 13 वर्ष 4 महीनेची एकूण अर्जित रजा प्रती वर्ष 7 दिवस प्रमाणे 99 दिवसांची अर्जीत रजा जमा केलेली आहे.मा.आयुक्त यांचे दि.21/2/1989 चे आदेश हे सोलापूर महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मुर्ती मंदिर नाट्यगृहाकडील आस्थापनासूचीवर काम करणाऱ्या तांत्रिक व बिगर तांत्रिक कर्मचाऱ्याकरिता लागू आहे. कोणत्या आदेशाने अर्जित रजा श्री.बाबू अप्पाराव शिंगाडे, रोड रोलर डायव्हर त्यांच्या खाती जमा करण्यात आल्या. एकूण 99 दिवसांची अर्जीत रजाएकाच वेळेला जमा का करण्यात आली. याबाबत लेखापरीक्षणास अवगत करण्यात आले नाही.***

सोलापूर महानगरपालिकेतील पेन्शन विभागातील वित्तीय वर्ष 2014-15 या वर्षातील सेवानिवृत्ती /मयत / स्वेच्छा निवृत कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता श्री.बाबू अप्पाराव शिंगाडे, रोड रोलर डायव्हर हे दि. 30/04/2014 रोजी से.नि.झालेले असून यांच्या रजा लेख्यात सन 2001 ते 2014 अखेर 13 वर्ष 4 महीनेची एकूण अर्जित रजा प्रती वर्ष 7 दिवस प्रमाणे 99 दिवसांची अर्जीत रजा जमा केलेली आहे. याबाबत पेन्शन विभागात विचारणा केली असता ज्या कर्मचाऱ्याना आठवड्याच्या सुट्ट्या व इतर सुट्ट्या मिळत नाही अशा कर्मचाऱ्याच्या अर्जित रजा खात्यात माहे मार्च मध्ये प्रती वर्ष 7 दिवस रजा जमा करण्यात येत असल्याचे कळविलेले आहे. यासंदर्भात अर्धसमास पत्र क्रमांक 59 दिनांक 20/09/2017 अन्वये विभागास विचारणा केली असता विभागाने दि.17/11/2017 च्या पत्रान्वये मा.आयुक्त यांचे दि.21/2/1989 च्या आदेशान्वये दर वर्षी 7 दिवस अर्जित रजा जमा घेण्यात येत असल्याबाबत कळविलेले आहे. सदरचा खुलासा संयुक्तीक नसल्याने पुढील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

1. मा.आयुक्त यांचे दि.21/2/1989 चे आदेश हे सोलापूर महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मुर्ती मंदिर नाट्यगृहाकडील आस्थापनासूचीवर काम करणाऱ्या तांत्रिक व बिगर तांत्रिक कर्मचाऱ्याकरिता असल्याने सदर आदेश श्री.बाबू अप्पाराव शिंगाडे, रोड रोलर डायव्हर यांना लागू होत नाही.
2. कोणत्या आदेशाने अर्जित रजा श्री.बाबू अप्पाराव शिंगाडे, रोड रोलर डायव्हर त्यांच्या खाती जमा करण्यात आल्या. याबाबत माहिती व अभिलेख सादर केले नाहीत.
3.श्री.बाबू अप्पाराव शिंगाडे, रोड रोलर डायव्हर यांना वेगळ्या आदेशान्वये प्रती वर्ष 7 दिवस रजा जमा

करण्याबाबतचे आदेश असल्यास प्रतीवर्ष 7 दिवस अर्जित रजा त्यांच्या खाती जमा नकरता एकूण 99 दिवसांची अर्जीत एकाच वेळेला रजा जमा का करण्यात आली ? याबाबत लेखापरीक्षणास अवगत करण्यात आले नाही.

FDSDKPM7201 (Ref No : 75, Hmm No : 59)

## *122 वित्तीय वर्ष 2014-15 या वर्षातमक्तेदाराच्या देयकामधून वसूल करण्यात आलेल्या स्थानिक संस्थाकराची (LBT)वसूलीबाबतची अभीलेख उपलब्ध करुन न दिल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेच्या हद्दीत विविध कामे मक्तेदारांकडून करण्यात येतात. मक्तेदांकडून करण्यात आलेल्या कामांची देयके संबधीत खात्यांकडून लेखाशाखेकडे प्राप्त होत असून लेखा शाखेकडून त्याचे प्रदान करण्यात येते. मक्तेदांकडून करण्यात आलेल्या काही कामाच्या देयकांतून स्थानिक संस्था कराची नियमाप्रमाणे कपात करण्यात येते असल्याने वसूल करण्यात आलेल्या रक्कमांबाबतची देयके, कपातीची चलने, नोदवहया, जमा करण्यात आलेल्या रक्कमांची चलने तसेच इतर नोंदवहया व बँक स्टेटमेंट व रोखवही लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.***

महानगरपालिकेच्या हद्दीत विविध कामे मक्तेदारांकडून करण्यात येतात. मक्तेदांकडून करण्यात आलेल्या कामांची देयके संबधीत खात्यांकडून लेखा शाखेकडे प्राप्त होत असून लेखा शाखेकडून त्याचे प्रदान करण्यात येते. मक्तेदांराकडून करण्यात आलेल्या काही कामाच्या देयकांतून स्थानिक संस्था कराची नियमाप्रमाणे कपात करण्यात येते.

वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये स्थानिक कर (LBT) याखाली वसूल करण्यात आलेल्या रक्कमांबाबतची देयके,कपातीची चलने, नोदवहया, जमा करण्यात आलेल्या रक्कमांची चलने तसेच इतर नोंदवहया व बँक स्टेटमेंट व रोखवही उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 65 दिनांक 04/10/2017 अन्वये विभागास कळविले असता विभागाचे दि.17/11/2017 अन्वये स्थानिक संस्था कराच्या रक्कमांची चलने, बँक स्टेटमेंट व रोखवही तसेच आवश्यक त्या नोंद वहया लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे कळविले आहे. परंतु प्रत्यक्षात सदरची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याने सदरचा आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

## *123 आश्वासित प्रगती योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटीबाबत........*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***शासन निर्णय क्र वेतन 1999/प्रक्र-2/99/सेवा दिनांक 20 जुर्ले 2001 मधील परिच्छेद 2(2) नुसार कर्मचा-याच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन 12 वर्षाचा कालावधी नियमित असणे अभिप्रेत आहे. या योजनेचा लाभ संबधीत पदावरील 12 वर्षाच्या नियमित सेवेनंतरच अनुज्ञेय होतो. 12 वर्षाची (एकाच पदावरील) नियमित सेवा झाल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ अभिप्रेत आहे. परंतू हंगामी सेवा कायम सेवेतंर्गत नियमित केली आहे असे आढळून येत नाही. त्यामुळे कालबध्द पदोन्न्तीचा लाभ अनुज्ञेय होत नाही. सेवा पुस्तकात कायम सेवेऐवजी हंगामी स्वरुपात नियुक्ती अशा प्रकारच्या नोंदी आढळून येतात.*** |

सोलापूर महानगरपालिकेने आश्वासित प्रगती योजनेच्या अंमलबजावणीतील तृटीबाबत (लेखापरिक्षण वर्ष-2014-2015) निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-79 दि.15/11/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून अनुपालन प्राप्त प्रत्र क्र.79 दि.16/01/2018 च्या पत्रान्वये अनुपालन प्राप्त झालेले असून सादर केलेले अनुपालन संयुक्तिक नसल्याने खालीलप्रमाणे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे

सेवेमध्ये गट क व ड संवर्गातील पदोन्न्तीच्या संधी उपलब्ध असल्या तरी 12 वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ पदाची वेतन श्रेणी देण्याबाबत आदेश शासन निर्णय सा.प्र.वि.एस.आर.व्ही/1095/ प्रक्र 1/95 बारा दिनांक 8 जून 1995 या व्दारे निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार लागू केलेल्या आश्वासित प्रगती योजने अंतर्गत खालील तृटया आढळून येतात.

1. शासन निर्णय क्र वेतन 1999/प्रक्र-2/99/सेवा दिनांक 20 जुर्ले 2001 मधील परिच्छेद 2(2) नुसार कर्मचा-याच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासुन 12 वर्षाचा कालावधी नियमित असणे अभिप्रेत आहे. या योजनेचा लाभ संबधीत पदावरील 12 वर्षाच्या नियमित सेवेनंतरच अनुज्ञेय होतो. 12 वर्षाची (एकाच पदावरील) नियमित सेवा झाल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ अभिप्रेत आहे. परंतू हंगामी सेवा कायम सेवेतंर्गत नियमित केली आहे असे आढळून येत नाही. त्यामुळे कालबध्द पदोन्न्तीरचा

लाभ अनुज्ञेय होत नाही. सेवा पुस्तकात कायम सेवे ऐवजी हंगामी स्वरुपात नियुक्ती अशा प्रकारच्या नोंदी आढळून येतात. उदा खालील प्रमाणे आहे.

| अनु क्रमांक | सेवाकाचे नाव व पदनाम | सेवेत रुजू दिनांक | 12 वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेमध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या आकृतीबंधाबाबत मुंबई प्रांतिक आकृतीबंध नियम 1949 मधील 51 (4) नुसार व शासन निर्णय संकीर्ण- 1005 /वर्गीकरण/ प्रक्र/ 379/05/अवि-24 दि.04/05/2006 एकूण पदाबाबत विभागवार नवीन कृतीआराखडा तयार करून त्यास शासनाची मंजुरी घेण्यात आली असल्यास मंजुर आकृतीबंध व त्यानुसार कार्यरत व रिक्त पदे याची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत कळविले असता ती उपलब्ध केली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेमध्ये सामान्य प्रशासन विभागाची वित्तीय वर्ष 2014-2015 आकृतीबंधाची पडताळणी केली असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-113 दि.05/01/2018 अन्वये याबाबत खुलासा मागविला असता लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेचे कार्यरत कर्मचारी/अधिकारी, वर्ग 1,2,3,4 या पदांची संख्या खालील प्रमाणे आहे. त्यामध्ये खालील त्रुटी आढळून येतात सोलापूर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्गनिहाय कार्यरत अधिकारी/कर्मचारी पदाची माहीती

| अ.क्र. | वर्ग | स्थाई | अस्थाई | एकून पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | अ | 24 | 17 | 41 |
| 2 | ब | 111 | 127 | 238 |
| 3 | क | 1141 | 518 | 1659 |
| 4 | ड | 1321 | 283 | 3504 |
| | एकूण पदांची संख्या | 4497 | 945 | 5442 |

01.आकृतीबंधाबाबत मुंबई प्रतिक आकृतीबंध नियम 1949 मधिल 51 (4) नुसार व शासन निर्णय संकीर्ण- १००५/वर्गीकरण/प्रक्र/३७९/०५/अवि-२४ दि.04 मे 2006 एकूण पदाबाबत विभागवार नवीन कृतीआराखडा तयार करून त्यास शासनाची मंजुरी घेण्यात आली असल्यास मंजुर आकृतीबंध व

त्यानुसार कार्यरत व रिक्त पदे याची माहिती उपलब्ध करुन देणे बाबत कळविले असता ती उपलब्ध केली नाही.

02.अस्थायी पदांबाबतची माहिती व पदे पुढे चालू ठेवण्याकरिता शासनाकडील मंजुरी आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही.

03. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१००५/वर्गीकरण/प्र क्र/३७९/०५/अवि-२४ दि.04 मे 2006 नुसार कोणतीही कार्यवाही आकृतीबंधाबाबत झाल्याचे आढळून येत नाही.

04. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१००५/वर्गीकरण/प्र क्र/३७९/०५/अवि-२४ दि.04 मे 2006 मधिल परिछेद २(१)नुसार आस्थापनावरील खर्चाची मर्यादा ३५% एवढी आहे. त्याअनुषगाने वित्तीय वर्षे 2014-2015 मधिल आस्थापनावरील खर्चाची माहिती ज्यामध्ये वेतन, निवृत्तीवेतन, कार्यालयीन खर्च, वाहन, इधन, स्टेशनरी, बैठकीवरील खर्च, दुरूस्ती, महानगरपालिकेस आऊट सोर्सिंग मार्फत होणारी कामे यासाठी महानगरपालिकेस येणारा खर्च याचा समावेश राहील. वित्तीय वर्ष 2014-2015 मध्ये आस्थापनेवर झालेल्या खर्चाची माहिती टक्केवारीसह उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे आस्थापना खर्च 35% च्या मर्यादेत झाल्याबाबतची खात्री करता आलेली नाही.

DATYMKM6601 (Ref No : 70, Hmm No : 113)

## *139 2014-15 या वित्तीय वर्षात सोलापूर महानगरपालिकेमध्ये वार्षिक स्टेशनरी खरेदी मधील अनियमिततेबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 12**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 8163.00/-

***मक्तेदाराचे महानगरपालिकेकडून मुंबई दुकान कायदा 1948 नुसार दुकानाचे नोंदणी केल्याचे दाखला नाही. तसेच व्हॅट रजिष्ट्रेशन व नंबर प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच आयकर विवरणपत्र घेणे आवश्यक आहे. परंतु ती घेण्यात आलेली नाहीत. निविदा मंजुर करणेपुर्वी बाजारभावानुसार वस्तुची/ मालाची किंमत काढणे आवश्यक होती. परंतु बाजारभाव दराची तुलना निविदा दराशी करून दराबाबत वाटाघाटी केली नाही. मक्तेदारांचा अनुभवाचा दाखला निविदेसोबत जोडला नाही शासन निर्णय क्र/2512/ 1088/ भाखस उद्योग 6- दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद (3)8 आवश्यकतेनुसार वस्तू खरेदी करण्याकरिता दरवर्षी संख्या करार करण्यापेक्षा दरकरार करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. शासन निर्णय***

| |
|---|
| ***क्र/2512/1088/भाखस उद्योग 6- दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद-6 परिशिष्ट-4 नुसार मध्यवर्ती संघटनेमार्फत वस्तू खरेदीची कार्यवाही झाल्याचे आढळून येत नाही. मुल्यवर्धीत कर प्रमाणपत्र नसल्यामुळे देयकातुन 5% दराने व्हॅट कपात करणे आवश्यक असताना, 2% दराने कपात केलेला आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम रुपये-2355/- संबधीत ठेकेदार यांचे कडून वसुल करावी*** |

सोलापूर महानगरपालिकेतील 2014-15 या वित्तीय वर्षात वार्षिक स्टेशनरी खरेदी बाबतचे लेखापरीक्षण केले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-106 दि. 29/12/2017 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून अनुपालन प्राप्त क्र 608 दि.09/02/2018 च्या पत्रान्वये अनुपालन प्राप्त झालेले असून सादर केलेले अनुपालन संयुक्तिक नसल्याने खालील आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

अ) रंगीत फाईल व कंम्पलीशन फाईल खरेदी खर्च रक्कम रुपये-78500/- बाबत महानगरपालीकेच्या संकेत स्थळावरुन दिनांक 16/07/2014 निविदा मागविण्यात आली. त्यामध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत त्यामुळे फेर निविदा काढण्यात आली परंतू त्याबाबत जाहीरात नोटीस वृत्तपत्रात दिल्याची आढळत नाही. प्राप्त झालेल्या निविदेनुसार सोलापूर महानगरपालिका येथे रंगीत फाईल व कंम्पलीशन फाईल याकरीता प्राप्त तीन निविदा दि. 20/08/2014 ला वेळ 5.10 वाजता मुख्यलेखापरीक्षक यांचे समक्ष उघडण्यात आल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | मक्तेदाराचे नांव | रंगीत कव्हर वरील बाजूस छपाई ऑफीस नमुन्या प्रमाणे निविदा दर | खाली कम्प्लिशन कव्हर वरील बाजूस छपाई अस्तर लावून ऑफीस नमुन्या मध्ये निविदा दर |
|---|---|---|---|
| 1 | अंजली प्रिंटर्स | रुपये-17 प्रती नग | रुपये-14 प्रती नग |
| 2 | रमण एजन्सीस | रुपये-16 प्रती नग | रुपये-12.50 प्रती नग |
| 3 | श्री लक्ष्मी एंटरप्राईजेस | रुपये-28 प्रती नग | रुपये-14 प्रती नग |

01) नस्तीत मक्तेदाराचे महानगरपालिकेकडून मुंबई दुकान कायदा 1948 नुसार दुकानाची नोंदणी केल्याचा दाखला नाही. तसेच व्हॅट रजिष्ट्रेशन व नंबर प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच आयकर विवरणपत्र आवश्यक आहे. परंतु ती घेण्यात आलेली नाहीत.

02) निविदा मंजुर करणेपुर्वी बाजारभावानुसार वस्तुची/मालाची किंमत काढणे आवश्यक होती परंतु बाजारभाव दराची तुलना निविदा दराशी करून दराबाबत वाटाघाटी केली नाही.

03) मक्तेदारांचा अनुभवाचा दाखला निविदेसोबत जोडला नाही.

04) तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र/2512/1088/भाखस उद्योग 6- दि. 02/01/1992 मधील परिच्छेद (3)8 आवश्यकतेनुसार वस्तू खरेदी करण्याकरिता दरवर्षी संख्या करार करण्यापेक्षा दरकरार करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही.

05) उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र/2512/1088/भाखस उद्योग 6- दि.02/01/1992 मधील परिच्छेद-6 परिशीष्ट-4 आवश्यकतेनुसार मध्यवर्ती संघटनेमार्फत वस्तू खरेदीची

कार्यवाही झाल्याचे आढळून येत नाही.

06) मुल्यवर्धीत कर प्रमाणपत्र नसल्यामुळे देयकातुन 5% दराने व्हॅट कपात करणे आवश्यक असताना 2% दराने कपात केलेला आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम रुपये-2355/- संबधीत ठेकेदार यांचेकडून वसुल करावी.

(ब) संगणक विभागाकरिता वार्षिक स्टेशनरी खरेदी रुपये-4,17,750/- महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरुन दिनांक 29/05/2014 रोजी सुचना/नोटीस प्रसारण करण्यात आली व तसेच खालील संदर्भाप्रमाणे बंधू प्रेम व सुराज्य या स्थानिक वृत्तप्रत्रात प्रसिध्दी देण्यात आली होती.

1.सोलापूर महानगरपालिका जा.क्र./सआस/साप्र-1/69/सोलापूर दि.29.5.2014.

2.सोलापूर महानगरपालिका जा.क्र./सआस/साप्र-1/111/सोलापूर दि.18.6.2014.

3.सोलापूर महानगरपालिका जा.क्र./सआस/साप्र-1/138/सोलापूर दि.1.7.2014.

या नुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन निविदा मागवीण्यात आल्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदेनुसार सोलापूर महानगरपालिका येथे संगणक विभागाकरिता वार्षिक स्टेशनरी खरेदी या करीता प्राप्त तीन निविदा दि.11/07/2014 ला वेळ 4.00 वाजता मुख्यलेखापरीक्षक यांचे समक्ष उघडण्यात आल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | मक्तेदाराचे नांव | A-4 झेराक्स पेपर निविदा दर | A-3 झेराक्स पेपर निविदा दर | F S झेराक्स पेपर निविदा दर | हिरवा लेजर पेपर A-4 साईज 90 GMS निविदा दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री समर्थ् सव्हीसेस | 247/123400 | 590/147500 | 337/67400 | 627/125400 |
| 2 | महेश प्रिटंर्स | 252/126000 | 577/144250 | 335/67000 | 635/127000 |
| 3 | नागेश एटरप्राईजेस | 250/125000 | 580/145000 | 330/66000 | 630/126000 |

1. निविदेसोबत मक्तेदाराचे महानगरपालिकेकडून मुंबई दुकान कायदा 1948 नुसार दुकानाची नोंदणी केलेली नाही. तसेच व्हॅट रजिष्ट्रेशन व नंबर प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच आयकर विवरणपत्र आवश्यक आहे. परंतु ती घेण्यात आलेली नाही.

2. मक्तेदारांचा अनुभवाचा दाखला निविदेसोबत नाही.

3. उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र/2512/1088/भाखसउद्योग6-दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद (3)8 अन्वये आवश्यकतेनुसार वस्तू खरेदी करण्याकरिता दरवर्षी संख्या करार करण्यापेक्षा दरकरार करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. कामाचे तुकडे पाडून खरेदी केली आहे.

4. उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र/2512/1088/भाखसउद्योग6-दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद-6 परिशीष्ट-4 आवश्यकतेनुसार मध्यवर्ती संघटने मार्फत वस्तू खरेदीची कार्यवाही झाल्याचे आढळून येत नाही.

5. मुल्यवर्धीत कर प्रमाणपत्र श्री समर्थ् सव्हीसेसचे असून देयक रुपये-2,15,380/- क्रमाक 84/ दि. 02/12/2014 व्यतिरिक्त उर्वरित दुकानदाराचे मुल्यवर्धीत कर प्रमाणपत्र नसल्याने देयक क्रमाक 83/ दि.

02/12/2014 व देयक क्रमाक 88/दि.29/12/2014 या देयकातुन 5% व्हॅट कराने कपात करणे आवश्यक असताना 2% दराने कपात केलेली आहे. त्यामुळे उर्वरित रक्कम रु. 4068/- व रु.1740/-संबधीत ठेकेदार यांचेकडून वसुल करावी.

6. निविदा मंजुर करणेपुर्वी बाजारभावानुसार वस्तुची मालाची किंमत काढणे आवश्यक होती, परंतु त्याप्रमाणे कार्यावाही केली नाही.

एकत्रित वसूलपात्र रक्कम रु.8163/-

DATYMKM6601 (Ref No : 94, Hmm No : 106)

## *140 वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीत सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेकडील लेखे/नोंदवहया नियमानुसार अद्यावत न ठेवलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***. सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेमार्फत मुख्यालय तसेच अन्य प्रशासकीय विभाग व पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदी, स्त्री सेवकांसाठी गणवेश खरेदी तसेच सोलापुर महानगरपालिका मधील सेवकासांठी पादत्राणे खरेदी, स्टेशनरी साहित्य खरेदी, अग्निशामक दल विभागासाठी निळा (लोकरी) उलन गणवेश कापड खरेदी तसेच विभागीय कार्यालये यांचेरीता वर्ग-4 कर्मचा- यांचे गणवेश, झेरॉक्स पेपर,फाईल कव्हर्स व तत्सम दैनदिन उपभोग्य भांडार साहित्याची खरेदी केली आहे. नोंदवहया/ लेखे विहीत नमुन्यात ठेवण्यांत आलेले नाही.***

सामान्य प्रशासन विभागाच्या भांडार शाखेमार्फत मुख्यालय तसेच अन्य प्रशासकीय विभाग व पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदी, स्त्री सेवकांसाठी गणवेश खरेदी तसेच सोलापुर महानगरपालिका मधील सेवकासांठी पादत्राणे खरेदी, स्टेशनरी साहित्य खरेदी, अग्निशामक दल विभागासाठी निळा (लोकरी) उलन गणवेश कापड खरेदी तसेच विभागीय कार्यालये यांचेरीता वर्ग-4 कर्मचा-यांचे गणवेश, झेरॉक्स पेपर,फाईल कव्हर्स व तत्सम दैनदिन उपभोग्य भांडार साहित्याची खरेदी केली आहे. नोंदवहया/लेखे ठेवयाबाबत पुढील अनियमितता आढळुन आल्या आहेत.

1) महाराष्ट्र नगरपरीषद लेखा सहिता 1971 च्या नियम क्र.145(1) नुसार नोंदवही नमुना क्र.116 व 117 उपभोग्य भांडार साहित्याच्या नोंदी ठेवणे आवश्यक असताना सदर नमुन्यात नोंदवहया ठेवण्यात आलेल्या

नाहीत. तसेच जरुरीप्रमाणे प्रत्येक प्रकारच्या वस्तु मालाकरीता स्वतंत्रे पृष्ठे वापरण्यात आलेली नाहीत.
2) नियम क्र.145(2) अन्वये प्रत्येक महिनाअखेर लेखा पुर्ण करुन वस्तुमालाची शिल्लक पडताळणी करुन पुढील महिन्याची प्रांरभिक शिल्लक म्हणुन नोंद घेतली पाहिजेत. अशी कार्यपध्दती वापरण्यात येत नाही.
3) महानगरपालिकेकडे ठेवण्यात आलेल्या नोंदवहयांमध्ये पुरवठा प्राप्त वस्तुंची फक्त संख्या नोंदविण्यांत येते. अशा वस्तुची नोंद घेताना त्याचा चलन क्रमांक, बीजक क्रमांक ,वस्तुची प्रतीनग किंमत, बीजकाची एकूण रक्कम नोंदविणे आवश्यक आहे. तथापि अशा पध्दतीने नोंदी घेण्यात येत नाहीत.
4) शासन निर्णय क्र.लेखास-102004/71/प्र.क्र.5/नवि-31 दिनांक 6/7/2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा सहितेमधील (राष्ट्रीय महानगरपालिका लेखासंहिता) जोडपत्रातील एसटी 1 ते एसटी 3 या नमुन्यात भांडार लेखे ठेवणे आवश्यक आहे. ही कार्यपध्दती वापरण्यात येत नाही.

वरील त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.117 दिनांक 22/01/2018खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने त्यांचे जा.क्र.सआस/साप्र.1/609दिनंक 9/02/2018 नुसार खुलासा सादर केंलेला आहे. खुलासा सयुक्तिक नसल्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 107, Hmm No : 117)

## *141 गलिच्छ वस्ती सुधारणा विभागातील 2014-15 मधील पावती पुस्तकातील रक्कम व प्रत्यक्ष जमा करण्यात आलेल्या रक्कमेतील अनियमिततेबाबत व पावती पुस्तक साठा नोंदवही अद्यावत नसल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00*

*अनियमितता कलम : 9ड*

***गलिच्छ वस्ती सुधारणा विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही तपासली असता त्यामध्ये पावती पुस्तक व त्यासमोर वाटप केलेल्या निरिक्षकाचे नावं नमूद केलेले आहे. तथापि मागील वर्षातील शिल्लक पावती पुस्तके, चालू वित्तीय वर्ष 2014-15 मधील पावती पुस्तके यांची नोंद नसल्याने अभिलेख विभागाकडून किती पावती पुस्तके उपलब्ध झाली, किती पुस्तके वाटप केली, किती पुस्तके वापरली व किती पुस्तके शिल्लक राहीली याची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही. किती पावती पुस्तकाच्या छपाईचा आदेश दिला, त्यापैकी किती पावती पुस्तकाच्या छपाईचे देयके अदा केली व छपाईद्वारे प्राप्त पावती पुस्तकांची चलने (Delivery Challan) व***

***पुस्तक पावतीची पोच इत्यादी अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुण देण्यात आले नाहीत. पावती पुस्तक कमांक 179 श्री.व्ही. टी. देशमुख,क.श्रे.ली. यांचे नावे नोंद असल्याचे कळविलेले आहे. परंतु याबाबतचे कोणतेही अभिलेख सादर केलेले नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेच्या गलिच्छ वस्तीं सुधारणा (वसूली) विभागातील 2014-15 या वित्तीय वर्षाचे मालमत्ता कर बाबतची पावती पुस्तके, किर्दनोंदी, चलने, बँक विवरणपत्र व लेखाशाखेतील रोखपालाकडील जमाकीर्द याचे लेखापरीक्षण केले असता पावती पुस्तकातील रक्कम व किर्दनोंदवहीमध्ये नोंदविलेली रकक्म यामध्ये तफावत दिसून आल्याने अर्धसमास पत्र क्र. 111 दि.05/01/2018 अन्वये विभागास कळविले असता विभागाने दि.16/04/2018 च्या पत्रान्वये अनुपालन सादर केलेली असून सदरचे अनुपालन विचारात घेवून लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

1. गलिच्छ वस्ती सुधारणा विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही तपासली असता त्यामध्ये पावती पुस्तक व त्यासमोर वाटप केलेल्या निरिक्षकाचे नावं नमूद केलेले आहे. तथापी मागील वर्षातील शिल्लक पावती पुस्तके, चालू वित्तीय वर्ष 2014-15 मधील पावती पुस्तके यांची नोंद नसल्याने अभिलेख विभागाकडून किती पावती पुस्तके उपलब्ध झाली, किती पुस्तके वाटप केली, किती पुस्तके वापरली व किती पुस्तके शिल्लक राहीली याची लेखापरीक्षणास खात्री झाली नाही. विभागाकडून एकूण 100 पुस्तके छपाई करून संपूर्ण पावती पुस्तके वापरात आलेले आहे. एवढेच उत्तर प्राप्त झालेले आहे. पुराव्या दाखल कोणतेही अभिलेश सादर केलेला नाहीत. पावती पुस्तकांचे वापराचे ताळमेळ न घेतल्याने पावती पुस्तकाचा दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2. विभागाने सदर वित्तीय वर्षात किती पावती पुस्तकाच्या छपाईचा आदेश दिला त्यापैकी किती पावती पुस्तकाच्या छपाईचे देयके अदा केली व छपाईद्वारे प्राप्त पावती पुस्तकांची चलने (Delivery Challan) व पुस्तक पावतीची पोच इत्यादी अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्याने छपाई केलेली पावती पुस्तके व वापरात आणलेली पावती पुस्तके यांचा ताळमेळ घेता आला नाही. याबाबत विभागाकडून 100 पुस्तके छपाई करून देयके अदा केलेली असल्याचे नमूद केले आहे. याबाबतचा कोणतेही अभिलेख सादर केलेली नाही.

3. दिनांक 9/9/2014 रोजी चलानाने रकक्म रु.24,748/- एवढी रक्कम रोख स्वरुपात बँकेत जमा केलेली असल्याची चलनावर नोंद आहे. परंतु बँक विवरणपत्रात रकक्म रु.24,748/-जमा झाल्याची नोंद दिसून येत नसल्याचे तसेच धनादेश वटलेले व न वटलेले धनादेश यांचा ताळमेळ घेण्याबाबत कळविले असता . याबाबत विभागाकडून दि.09/09/2014 रोजी रोख स्वरुपात रक्कम रु.24,748/- बँकेत भरणा केल्याची पावती सादर केलेली आहे. परंतु सदर रक्कमेची नोंद असलेले बँक विवरणपत्र सादर केलेले नाही. तसेच धनादेश वटलेले व न वटलेले धनादेश यांचा ताळमेळ घेतल्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

4. पुस्तक साठा नोंदवहीमध्ये पावती पुस्तक कमांक 179 कोणत्या वसुली निरीक्षकास देण्यात आलेली आहे, याची नोंद पावती पुस्तक साठा नोंदवही मध्ये घेण्यात आलेली नाही. याबाबत विभागाकडून सदरचे पावती पुस्तक श्री. व्ही. टी. देशमुख , क.श्रे.ली. यांचे नावे नोंद आहे. एवढेच नमूद केलेले असून याबाबतचे कोणतेही अभिलेख सादर केलेले नाहीत.

### *142 वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली) कार्यालयामधील इष्ठांकानुसार कर संकलन न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये गलिच्छ वस्ती सुधारणा (वसुली) कार्यालय वार्षिक उदिष्टानुसार रक्कम रु.4,40,00,000/- दिलेले असता 11 वसुलकर्ता अधिकारी यांनी रक्कम रु. 2,13,68,269/- वसुली करुन महानगरपालिकेच्या लेख्यात जमा केली आहे . वसुली ही फारच कमी प्रमाणात झाली आहे. उददीष्टानुसार उर्वरित रक्कम रु.2,26,31,731/- कर वसुली करण्यात आली नाही.*** |

गलिच्छ वस्ती सुधारणा विभागामध्ये वित्तीय वर्ष 2014-15 या कालावधीमधील 11 वसुलकर्ता अधिकारी यांना नेमुन दिलेल्या उदिष्टानुसार कर संकलनाबाबत तसेच संबधित अधिका-यांनी गोळा केलेल्या कराची एकत्रित ताळमेळ घेतले असता वार्षिक उदिष्ट रक्कम रु. 4,40,00,000/- दिलेले असता त्यांनी रक्कम रु. 2,13,68,269/- कर संकलनाची रक्कम महानगरपालिकेच्या लेख्यात जमा केली आहे. कर संकलनाची रक्कम कमी प्रमाणात झाली असल्याचे निरीक्षण पथकाच्या निदर्शनात येत आहे. एकूण कर वसुलीपैकी 75 टक्के वसुली होणे आवश्यक आहे.

वरील असलेल्या त्रुटीबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन क्र.110 दिनांक 5/01/2018 खुलासा सादर करण्याबाबत कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.गवसु/499 दिनांक 31/01/2018 नुसार कर संकलनाची वित्तीय वर्ष 2014-15 ची माहिती निरीक्षण पथकास सादर केलीली असुन कर संकलनाची रक्कम रु. 2,26,31,731/- कमी जमा झाली आहे. वरील आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 106, Hmm No : 110)

## *143 आर्थिक वर्ष 2014-15 मध्ये मेजर शॉपिंग सेंटर कडून सेवा कराची वसूली करण्यात आलेली नसल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 05**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1410457.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 174332.00/-

***सोलापूर महानगरपालिकेच्या आर्थिक वर्ष 2014-15 अभिलेख्याचे लेखापरीक्षण केले असता मेजर शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या भाड्याच्या रक्कमेवर सेवा कर आकारून सेवा कराची वसूली करण्यात आलेली नसल्याचे निर्देशनास आले त्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये उपरोक्त शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रकक्म रु.14,10,457/- वर रक्कम रु.1,74,332/- एवढा सेवा कर आकारण्यात आलेला नाही. वरील शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून सेवाकराची रु.1,74,332/- एवढी रक्कम वसूल करण्यात येऊन शासन खाती भरणा करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे उर्वरित शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून सेवा कर आकारण्यात आलेला नसल्यास त्यांच्याकडून 12.36 टक्के दराने सेवाकर आकारण्यात यावा. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये गाळे भाडेधारकाकडून एकूण किती भाडयाची रक्कम वसूल करण्यात आली व त्या रक्कमेवर एकूण किती सेवा कर वसूल करण्यात आलेला आहे. याची माहिती उपलब्ध झालेली नाही. आर्थिक वर्ष 2014-2015 मध्ये गाळे धारकाकडून भाडयाच्या रक्कमेसह वसूल करण्यात आलेला सेवा कर कोणत्या बँक खात्यात जमा करण्यात आलेला आहे, त्या बॅकेचे स्टेटमेंट लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही. वसूल करण्यात आलेला सेवा कर शासनाकडे कोणकोणत्या तारखेस, किती सेवा कर शासनाकडे जमा करण्यात आलेला आहे त्याबाबतची चलने लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाहीत.***

सोलापूर महानगरपालिकेच्या आर्थिक वर्ष 2014-15 अभिलेख्याचे लेखापरीक्षण केले असता मेजर शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या भाडयाच्या रक्कमेवर सेवा कर आकारून सेवा कराची वसूली करण्यात आलेली नसल्याचे निर्देशनास आले, त्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्र.133 दि.27/03/2018 अन्वये खुलासा मागविला असता याबाबत लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्त्ता विभागाकडून आर्थिक वर्ष 2014-15 चे मेजर शॉपिंग सेंटर डिमांड रजिष्टर लेखापरीक्षणाकरीता प्राप्त झाले असून सदर मेजर शॉपींग सेंटर डिमांड (मागणी,वसूली,थकबाकी) रजिष्टरचे लेखापरीक्षण केले असता 2014-15 या वित्तीय वर्षात खालील शॉपिंग

सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून गाळे भाडेच्या वसूल करण्यात आलेल्या रक्कमेवर सेवा कर वसूल केला नाही. केंद्र शासनाकडील दि.22/5/2007 च्या अधिनियमानुसार ज्या मिळकती व्यापारी तत्वावर भाड्याने दिल्या जातात, त्या भाडेच्या रक्कमेवर 12.36 टक्के दराने सेवा कर वसूल करुन ती रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक आहे, त्यानुसार खालील शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रक्कमेवर सेवा कर आकारण्यात आलेला नाही.

| अ. क्र. | शॉपिंग सेंटर चे नांव | गाळे / भाडे धारकाचे नाव | वसूल केलेली रक्कम | वसूल केलेल्या रक्कमेवरील 12.36 % प्रमाणे सेवाकराची रक्कम | वसूल न केलेला सेवाकरची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्रीमेती प्रती इरेश आहुजा | 135000 | 16686 | 16686 |
| 2 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री चंद्रकांत अमृतलाल दोशी | 95246 | 11772 | 11772 |
| 3 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री रमेश अमृतलाल दोशी | 117163 | 14481 | 14481 |
| 4 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री नरेंद्र अमृतलाल दोशी | 95246 | 11772 | 11772 |
| 5 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री उमेश गोविदराव राळवे | 90112 | 11139 | 11139 |
| 6 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री रमेश अमृतलाल दोशी | 95246 | 11772 | 11772 |
| 7 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री नरेश खियालदास गुरुबाणी | 55000 | 6798 | 6798 |
| 8 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री नरेश खियालदास गुरुबाणी | 55000 | 6798 | 6798 |
| 9 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री दिपक खियालदास गुरुबाणी | 55000 | 6798 | 6798 |
| 10 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री सुरेश खियालदास गुरुबाणी | 55000 | 6798 | 6798 |
| 11 | लालबहादूर शॉपिंग सेंटर | श्री सुरेश खियालदास गुरुबाणी | 55000 | 6798 | 6798 |
| 12 | अंगोळीकर शॉपिंग सेंटर | सौ कांचन रवि बाकळे | 75000 | 9270 | 9270 |
| 13 | अंगोळीकर शॉपिंग सेंटर | सौ रेश्मा अनिल आहुजा | 115000 | 14214 | 14214 |
| 14 | अंगोळीकर शॉपिंग सेंटर | सौ कौसल्या गोविंद घळवी | 35000 | 4326 | 4326 |
| 15 | अंगोळीकर शॉपिंग सेंटर | श्री अनिल लालचंद वाघवाणी | 90000 | 11124 | 11124 |
| 16 | अंगोळीकर शॉपिंग सेंटर | श्री सर्वश विद्यानंद शहा | 40000 | 4944 | 4944 |
| 17 | अंगोळीकर शॉपिंग सेंटर | श्री अनिल रामचंद्र अन्ने | 40000 | 4944 | 4944 |
| 18 | डॉ.कोटणीस शॉपिंग सेंटर | श्री अनिल गोपाल नागणे | 40000 | 4944 | 4944 |
| 19 | हुतात्मा शॉपिंग सेंटर | सौ संजीवनी हरीदास कदम | 56432 | 6975 | 6975 |
| 20 | चैतन्य शॉपिंग सेंटर | श्री जगन्नाथ मा पाटील | 10000 | 1236 | 1236 |
| 21 | चैतन्य शॉपिंग सेंटर | महाराष्ट्र सेवा संघ | 6012 | 755 | 755 |
| | | **एकूण बेरीज-** | **1410457** | **174332** | **174332** |

1.वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये उपरोक्त शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून वसूल करण्यात

आलेल्या रककम रु. 14,10,457/-वर रक्कम रु.1,74,332/- एवढा सेवा कर आकारण्यात आलेला नाही. वरील शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून सेवाकराची रु.1,74,332/- एवढी रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

2. त्याचप्रमाणे उर्वरित शॉपिंग सेंटर मधील गाळे भाडेधारकाकडून सेवा कर आकारण्यात आलेला नसल्यास त्यांच्याकडून 12.36 टक्के दराने सेवाकर आकारूण शासन खाती भरणा करण्यात यावा.

3.वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये गाळे भाडेधारकाकडून एकूण किती भाडयाची रक्कम वसूल करण्यात आली व त्या रक्कमेवर एकूण किती सेवा कर वसूल करण्यात आलेला आहे. याची माहिती उपलब्ध झालेली नाही.

4.आर्थिक वर्ष 2014-2015 मध्ये गाळे धारकाकडून भाडयाच्या रक्कमेसह वसूल करण्यात आलेला सेवा कर कोणत्या बँक खात्यात जमा करण्यात आलेला आहे, त्या बॅकेचे स्टेटमेंट लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही.

5.वसूल करण्यात आलेला सेवा कर शासनाकडे कोणकोणत्या तारखेस, किती सेवा कर शासनाकडे जमा

करण्यात आलेला आहे. त्याबाबतची चलने लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

DATYMKM6601 (Ref No : 88, Hmm No : 133)

## *144 वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भूमी व मालमत्ता मधील गाळेधारकाकडून भाडयाच्या रक्कमेची वसूली करण्यात आलेल्या पावती पुस्तकाच्या हस्तांतरण नोंदवहीबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 06**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये पावती पुस्तकाबाबतचा गोषवारा काढण्यात न आल्यामुळे व वर्ष अखेर पावती पुस्तकांचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये छापलेली पावती पुस्तके किती अथवा***

***भांडारपालाकडून प्राप्त झालेली पावती बुकाची संख्या याबाबतची खात्री होत नाही. पावती पुस्तक हस्तांतरण नोंदवहीवर पावती पुस्तके हस्तांतरित केल्याबाबत वसुली करणा-या कर्मचा-याची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. रद्द केलेल्या पावत्यावर ठळक अक्षरात रद्द असे नोंदवून संबधित अधिका-याची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. पावती पुस्तकांची अनुक्रमांक निहाय छपाई करण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भूमी व मालमत्ता मधील गाळेधारकाकडून भाडयाच्या रक्कमेची वसूली करण्यात आलेल्या पावती पुस्तकाच्या हस्तांतरण नोंदवहीबाबतचे लेखापरीक्षण केले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्र.135 दि.27/03/2018 अन्वये खुलासा मागविला असता, याबाबत लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे. वित्तीय वर्ष 2014-15 यामधील सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्ता मधील गाळेधारकाकडून भाडयाच्या रक्कमेची वसूली करण्याकरिता वापरण्यात आलेल्या पावती पुस्तकांच्या हस्तांतरण नोंदवहीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून येते.

| अनु क्र | पावती पुस्तक क्रमांक | पावती पुस्तकाचा कालावधी | पावती पुस्तक स्विकारणा-या कर्मचा-यांचे नाव |
|---|---|---|---|
| 01 | 105 | 07/06/2014 | श्री पेद्दीटी |
| 02 | 106 | 18/06/2014 | श्री गंदम |
| 03 | 107 | 15/07/2014 | श्री धोत्रे |
| 04 | 108 | 02/08/2015 | श्री पेद्दीटी |
| 05 | 109 | 05/08/2014 | कर्मचा-याचे नाव नमूद नाही |
| 06 | 157 | 23/12/2014 | कर्मचा-याचे नाव नमूद नाही |
| 07 | 158 | 26/02/2015 | श्री पेद्दीटी |
| 08 | 172 | 04/09/2014 | श्री चौधरी |
| 09 | 173 | 18/09/2014 | श्री पेद्दीटी |
| 10 | 175 | 30/09/2014 | श्री गंदम |
| 11 | 176 | 29/10/2014 | श्री जन्ने |
| 12 | 220 | 03/11/2014 | श्री यादव |
| 13 | 228 | 13/11/2014 | श्री पेद्दीटी |
| 14 | 230 | 26/11/2014 | श्री जन्ने |
| 15 | 231 | 11/12/2014 | श्री चौधरी |
| 16 | 232 | 15/12/2014 | श्री चौधरी |
| 17 | 256 | 12/12/2014 | श्री पेद्दीटी |
| 18 | 258 | 03/01/2015 | श्री गंदम पा क्र(025769 to |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 025800) च्या पावत्या रद्द |
| 19 | 259 | 09/01/2015 | श्री पेद्दीटी |
| 20 | 260 | 07/01/2015 | कर्मचा-याचे नाव नमूद नाही |
| 21 | 280 | 16/01/2015 | कर्मचा-याचे नाव नमूद नाही |
| 22 | 283 | 06/02/2015 | कर्मचा-याचे नाव नमूद नाही |
| 23 | 284 | 28/02/2015 | श्री जन्ने पा क्र.(28368 to 28400) च्या पावत्या रद्द |
| 24 | 313 | 01/04/2014 | कर्मचा-याचे नाव नमूद नाही, पावती क्र. (31204 to 31300) च्या पावत्या रद्द |
| 25 | 323 | 04/03/2014 | श्री चौधरी |
| 26 | 324 | 26/05/2014 | श्री पेद्दीटी |
| 27 | 325 | 20/03/2015 | कर्मचा-याचे नाव नमूद नाही |
| 28 | 375 | 02/04/2014 | श्री धोत्रे |
| 29 | 376 | 01/04/2014 | श्री पेद्दीटी |
| 30 | 377 | 03/04/2014 | कर्मचा-याचे नाव नमूद नाही |
| 31 | 378 | 02/04/2014 | श्री पेद्दीटी |
| 32 | 379 | 04/04/2014 | श्री यादव |
| 33 | 381 | 04/04/2014 | कर्मचा-याचे नाव नमूद नाही |

1. वित्तीय वर्ष 2014-2015 मध्ये हस्तांतरण नोंदवहीत पावती पुस्तकाबाबतचा गोषवारा काढण्यात न आल्यामुळे मागील वर्षाची अखेरची शिल्लक किती? याची खात्री होत नाही. तसेच वर्षअखेर पावती पुस्तकांचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही.

2. वित्तीय वर्ष 2014-2015 मध्ये छापलेली पावती पुस्तके किती अथवा भांडारपालाकडून प्राप्त झालेली पावती पुस्तकांची संख्या याबाबत खात्री होत नाही.

3. पावती पुस्तक हस्तांतरण नोंदवहीवर पावती पुस्तके हस्तांतरित केल्याबाबत वसुली करणा-या कर्मचा-याची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

4. पावती पुस्तक हस्तांतरण नोंदवहीवर वसुली करणा-या कर्मचा-यांनी वापरलेली पावती पुस्तके परत केल्याबाबत पावती पुस्तके संकलित करणा-या कर्मचा-यांची/अधिकारी यांची दिनांकासह आद्याक्षरी घेण्यात आलेली नाही.

5. रद्द केलेल्या पावत्यावर ठळक अक्षरात रद्द असे नोंदवून संबधित अधिका-याची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

6. पावती पुस्तकांची अनुक्रमांक निहाय छपाई करण्यात आलेली नाही.

DATYMKM6601 (Ref No : 90, Hmm No : 135)

## ***145 भूमी व मालमत्ता मधील भाडेतत्वावर देण्यात आलेल्या मेजर गाळयामधील अनियमितेबाबत....***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 04**

*मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) अन्वये आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतेही स्थावर किंवा जंगम मालमत्ता भाडे पट्याने देता येईल, विकता येईल अशी तरतुद असतांना व सदरचे अधिकार महासभेस असतांना स्थायी समितीच्या मान्यतेने नियमबाह्य सदरची जागा भाडयाने देण्यात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) नुसार जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतेही मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, भाडेपट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांणतरीत करता येईल, तो मोबदला चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये, त्यानुसार कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. करारावर लिहून घेणार व लिहून देणार यांची स्वाक्षरी नसणे, हस्तांतरण फी भरण्याची नोंद नाही, करारानुसार गाळे भाडयाच्या कालावधीची मुदत दिनांक 28/02/2010 पर्यंत आढळून येते. त्यानंतर मुदत वाढीबाबत व भाडे वाढीबाबत करार झालेला आढळून येत नाही, गाळा भाड्याने देताना गाळाधारकाकडून करारपत्र करून घेण्यात आलेले असून, त्यातील अट क्रमांक 5 अन्वये सदर गाळ्याचे भाडे मुदतीत न भरल्यास भाड्याची रक्कम भरेपर्यंत द.स.द.शे.15 टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम आकारण्यात येईल अशी अट आहे. त्याप्रमाणे वित्तीय वर्ष 2013-2014 मध्ये आरंभीच्या शिल्लक रक्कमेवर 15% प्रमाणे व्याजाची आकारणी करून पुढील वित्तीय वर्षात 2014-2015 मध्ये तशी नोंद डिमांड रजिस्टरला घेतलेली आढळून येत नाही.*** |

सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्ता मधील भाडेतत्वावर देण्यात आलेल्या मेजर गाळयाच्या अभिलेख्याचे लेखापरीक्षण केले असता त्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्र.136 दि.27/03/2018 अन्वये खुलासा मागविला असता याबाबत लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

01) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) अन्वये आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतेही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्याने देता येईल, विकता येईल अशी तरतुद असतांना व सदचे अधिकार महासभेस असतांना स्थायी समितीच्या मान्यतेने नियमबाह्य सदरची जागा भाडयाने देण्यात आलेली आहे. उदा (i) हुतात्मा

शॉपिंग सेंटर गाळा क्र-5 सरडा सेल्स कॉपोरेशन तर्फे पांडूरंग सारंगी कारपेठ एरिया 21.42 चौ.मी. व आतील गाळा 8.54 चौ.मी मुदत 9 वर्ष 11 महिने स्थायी समितीचा ठराव क्र.55 दिनांक 14/04/1981

(ii) हुतात्मा शॉपिंग सेंटर गाळा क्रमांक-10 श्री खुशालचंद डोंगरराव भंडारी स्थायी समितीचा ठराव क्र. 109 दि. 09/05/1980 नुसार मान्यता देण्यात आली आहे.

02) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) नुसार जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतेही मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल पट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांणतरीत करता येईल तो मोबदला चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये, अशी तरतूद असतांना गाळेभाडेधारकांनी परस्पर केलेल्या हस्तांणतरास स्थायी समितिची नियमबाह्यरित्या मान्यता घेतल्याने महानगरपालिकेची (accupancy) ऑक्युपंसी प्राईज नुसार जाहिरातीव्दारे गाळे लिलाव करणे त्यानुसार कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. उदा (i) हुतात्मा शॉपिंग सेंटर गाळा क्र-5 ठराव क्रमाक 1807 दिनांक 30/12/2000 नुसार गाळा धारक सेल्स कॉपोरेशन तर्फे ब्रिजलाल सुंदरलाल सारडा सदर गाळा श्री विष्णू आत्माराम पाटील यांचे नावे हस्तांतरण केलेला आहे. (ii) हुतात्मा शॉपिंग सेंटर गाळा-8 श्री मनोज चंद्रकांत गाडेकर यांचा दि 20/03/1995 अर्ज श्री रामचंद्र सुभाष लिमकर यांचा हस्तांतर अर्ज दि 20/03/1995 स्थायी समितीचा ठराव क्र.109 दि 09/05/1980 नुसार श्री रामचंद्र सुभाष लिमकर यांना हस्तांतरणास मान्यता देण्यात आली.

03) करारावर लिहून घेणार व लिहून देणार यांची स्वाक्षरी नसणे, हस्तांतरण फी भरण्याची नोंद नाही, करारानुसार गाळे भाडयाच्या कालावधीची मुदत दिनांक 28/02/2010 पर्यंत आढळून येते. त्यानंतर मुदत वाढीबाबत व भाडे वाढीबाबत करार झालेला आढळून येत नाही. गाळाभाडेची मुदत संपल्यानंतर महानगरपालिकेने सदरचे गाळे ताब्यात घेवून नव्याने जाहिरातीव्दारे लिलाव करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

04) गाळा भाड्याने देताना त्यांचेकडून करारपत्र करून घेण्यात आलेले असून, त्यातील अट क्रमांक 4 प्रमाणे गाळे धारकांनी दरमहा 10 तारखेपर्यंत भाडे भरणे आवश्यक आहे व अट क्रमांक 5 अन्वये सदर गाळ्याचे भाडे मुदतीत न भरल्यास भाड्याची रक्कम भरेपर्यंत द.स.द.शे. 15 टक्के प्रमाणे व्याजाची रक्कम आकारण्यात येईल अशी अट आहे. त्याप्रमाणे वित्तीय वर्ष 2013-2014 मध्ये आरंभीच्या शिल्लक रक्कमेवर 15 % प्रमाणे व्याजाची आकारणी करून पुढील वित्तीय वर्षात 2014-2015 मध्ये तशी नोंद डिमांड रजिस्टरला घेतलेली आढळून येत नाही.

DATYMKM6601 (Ref No : 91, Hmm No : 136)

## ***146 भूमी व मालमत्ता विभागामधील भाडेतत्वावर देण्यात आलेल्या मिनी गाळयामधील अनियमितेबाबत...***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 03**

*मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) अन्वये आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्याने देता येईल, विकता येईल अशी तरतुद असतांना व सदरचे अधिकार महासभेस असतांना स्थायी समितीच्या मान्यतेने नियमबाह्यपणे सदरची जागा भाडयाने देण्यात आलेली आहे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) नुसार जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतेही मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल पट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांणतरीत करता येईल तो मोबदला चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतूद असतांना गाळेभाडेधारकांनी परस्पर केलेल्या हस्तांतरास स्थायी समितिची नियमबाहयरित्या मान्यता घेतल्याने महानगरपालिकेची (accupancy) ऑक्युपंसी प्राईज नुसार जाहिरातीव्दारे गाळे लिलाव करणे त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. करारावर लिहून घेणार व लिहून देणार यांची स्वाक्षरी नसणे, हस्तांतरण फी भरण्याची नोंद नाही, भाड्याने गाळयाची मागणी करणा-या संबधिताचा अर्ज नस्तीत आढळून येत नाही, करारनाम्यावर कोणताही मजकूर व ठरावची नोंद नाही. करारानुसार गाळे भाडयाच्या कालावधीची मुदत दिनांक 28/02/2010 पर्यंत आढळून येते. त्यानंतर मुदत वाढीबाबत व भाडे वाढीबाबत करार झालेला आढळून येत नाही, गाळाभाडेची मुदत संपल्यानंतर महानगरपालिकेने सदरचे गाळे ताब्यात घेवून नव्याने जाहिरातीव्दारे लिलाव करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. हस्तांतरण फी भरल्याची नोंद आढळत नाही.*** |

सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्ता विभागामधील भाडेतत्वावर देण्यात आलेल्या मिनी गाळयाबाबतचे अभिलेख्याचे लेखापरीक्षण केले असता त्या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्र.138 दि.27/03/2018 अन्वये खुलासा मागविला असता याबाबत लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदरचे आक्षेप खालीलप्रमाणे कायम ठेवण्यात येत आहे.

01) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) अन्वये आयुक्तास महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतेही स्थावर किंवा जंगम मालमत्ता

पट्याने देता येईल,विकता येईल अशी तरतुद असतांना व सदचे अधिकार महासभेस असतांना स्थायी समितीच्या मान्यतेने नियमबाह्य सदरची जागा भाडयाने देण्यात आलेली आहे उदा. (i) संत तुकाराम चौक गाळा क्र.1 क्षेत्रफळ 48 चौ फुट सौ वैजयंता दत्तात्रय गायकवाड यांना दर महा भाडे रुपये 150/- 5 वर्ष मुदतीने स्थायी समितीचा ठराव क्रमांक 371 दिनांक 17/10/1990 मान्यता देण्यात आली आहे (ii) संत तुकाराम चौक गाळा क्र.2 क्षेत्रफळ 48 चौ फुट श्री सय्यद सलाउद्दीन अ. सलीम यांना दर महा भाडे रुपये 150/- 5 वर्ष मुदतीने स्थायी समितीचा ठराव क्रमांक 871 दिनांक 17/10/1990 मान्यता देण्यात आली आहे. (iii) संत तुकाराम चौक गाळा क्र.4 क्षेत्रफळ 48 चौ फुट श्री पी एस कलकेरी यांना दर महा भाडे रुपये 150/- 5 वर्ष मुदतीने स्थायी समितीचा ठराव क्रमांक 871 दिनांक 17/10/1990 मान्यता देण्यात आली आहे. (iv) संत तुकाराम चौक गाळा क्र. 5 क्षेत्रफळ 48 चौ फुट श्री एस एम भोसले यांना दर महा भाडे रुपये 150/- 5 वर्ष मुदतीने स्थायी समितीचा ठराव क्रमांक 871 दिनांक 17/10/1990 मान्यता देण्यात आली आहे.

02) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) नुसार जो मोबदला घेवून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतेही मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल पट्ट्याने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांणतरीत करता येईल तो मोबदला चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतूद असतांना, गाळेभाडेधारकांनी परस्पर केलेल्या हस्तांतरास स्थायी समितिची नियमबाह्यरित्या मान्यता घेतल्याने महानगरपालिकेची (accupancy) ऑक्युपंसी प्राईज नुसार जाहिरातीव्दारे गाळे लिलाव करणे त्यानुसार कार्यवाही न झाल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. उदा. (i) संत तुकाराम चौक गाळा क्र.1 क्षेत्रफळ 48 चौ फुट सौ. वैजयंता दत्तात्रय गायकवाड यांचेकडून सदर गाळा श्री तांबोळी मुर्तुजा चॉदसाब यांना हस्तांतरित केला हस्तांतरणास स्थायी समीतीचा ठराव क्र.184 दिनांक 20/05/1994 नुसार मान्यता देण्यात आली आहे. (ii) संत तुकाराम चौक गाळा क्र.2 क्षेत्रफळ 48 चौ फुट श्री सय्यद सलाउद्दीन अ. सलीम यांचेकडून सदर गाळा श्री म.शफी हुसेनसाब शिकलगर यांना हस्तांतरित केला आहे. हस्तांतरणास स्थायी समितीचा ठराव क्रमांक 494 दिनांक 02/08/1994 नुसार मान्यता देण्यात आली आहे. (iii) संत तुकाराम चौक गाळा क्र.4 क्षेत्रफळ 48 चौ फुट श्री पी.एस.कलकेरी यांचेकडून सदर गाळा श्री जयकुमार दत्तात्रय कारवे यांना हस्तांतरित केला आहे, हस्तांतरणास स्थायी समितीचा ठराव क्र.1079 दिनांक04/02/1993 नुसार मान्यता देण्यात आली आहे.

03) करारावर लिहून घेणार व लिहून देणार यांची स्वाक्षरी नसणे, हस्तांतरण फी भरण्याची नोंद नाही, भाड्याने गाळयाची मागणी करणा-या संबधीताचा अर्ज नस्तीत आढळून येत नाही, करारनाम्यावर कोणताही मजकूर व ठरावची नोंद नाही. करारानुसार गाळे भाडयाच्या कालावधीची मुदत दिनांक 28/02/2010 पर्यंत आढळून येते. त्यानंतर मुदत वाढीबाबत व भाडे वाढीबाबत करार झालेला आढळून येत नाही, गाळाभाडेची मुदत संपल्यानंतर महानगरपालिकेने सदरचे गाळे ताब्यात घेवून नव्याने जाहिरातीव्दारे लिलाव करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. हस्तांतरण फी

भरल्याची नोंद आढळत नाही.

DATYMKM6601 (Ref No : 92, Hmm No : 138)

***147 आर्थिक वर्ष 2014-15 हुतात्मा स्मृती मंदिर सभागृह व शुभराय कला दालन मधील सभागृहचे भाडे वसूल करताना भाडेधारकाकडून सेवाकराची वसूली करण्यात आली नसल्याबाबत...***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 6584.00/-

***आर्थिक वर्ष 2014-2015 मध्ये हुतात्मा स्मृती मंदिर व शुभराय कला दालन मधील सभागृहचे भाडे वसूल करतांना भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेली रककम रु.1,05,000/- वर 12.36 टक्के दराने रक्कम रु.12969/- एवढया सेवाकराची गणना होते. परतू या रक्कमेपैकी रु.6584/- एवढी रक्कम भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेली नाही. हुतात्मा स्मृती मंदिर सभागृह व शुभराय कला दालन या सभागृहाच्या परिसरामधील खुल्या जागा भाडे तत्वावर भाडयाने दिल्या जातात परंतु भाडयाच्या रक्कमेवर भाडेधारकाकडून केंद्र शासनाच्या दि.22/5/2007 च्या अधिनियमानुसार भाडयाच्या रक्कमेवर 12.36 टक्के सेवा कर आकारण्यात येत नसल्याचे अभिलेख्यावरून आढळून येते.***

सोलापूर महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मृती मंदिर व शुभराय कला दालन डिमांड रजिष्ट्ररचे लेखापरीक्षण केले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-152 दि.13/04/2018 अन्वये याबाबत खुलासा मागविला असता लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या हुतात्मा स्मृती मंदिर व शुभराय कला दालन डिमांड रजिष्ट्ररचे लेखापरीक्षण केले असता 2014-15 या वर्षात खालील भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रक्कमेवर केंद्र शासनाकडील दि. 22/5/2007 च्या अधिनियमानुसार ज्या मिळकती व्यापारी तत्वावर भाडयाने दिल्या जातात, त्या भाडे रक्कमेवर 12.36 टक्के दराने सेवा कर वसूल करुन ती रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक असताना खालील भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रक्कमेवर सेवाकर आकारण्यात आलेला नाही.

**सेवाकर वसूल न केल्याबाबतचे विवरण**

| अ.क्र. | सभागृहाचे नाव | दिनाक | वसूल केलेली रक्कम | वसूल केलेल्या रक्कमेवरील सेवा कर | वसूल न केलेला सेवा कर |
|---|---|---|---|---|---|
| 01 | शुभराय कलादालन | 15/04/2014 | 10000 | 1236 | 1236 |
| 02 | शुभराय कलादालन | 22/04/2014 | 5000 | 618 | 618 |
| 03 | शुभराय कलादालन | 26/05/2014 | 1000 | 124 | 124 |
| 04 | हुतात्मा स्मृती मंदिर | 31/12/2014 | 10000 | 1236 | 1236 |
| 05 | हुतात्मा स्मृती मंदिर | 27/01/2015 | 2500 | 309 | 309 |
| 06 | हुतात्मा स्मृती मंदिर | 30/01/2015 | 5000 | 618 | 618 |
| 07 | हुतात्मा स्मृती मंदिर | 13/02/2015 | 16000 | 1978 | 118 |
| 08 | हुतात्मा स्मृती मंदिर | 20/02/2015 | 500 | 62 | 62 |
| 09 | हुतात्मा स्मृती मंदिर | 21/02/2015 | 500 | 62 | 62 |
| 10 | हुतात्मा स्मृती मंदिर | 21/02/2015 | 600 | 74 | 74 |
| 11 | हुतात्मा स्मृती मंदिर | 21/02/2015 | 500 | 62 | 62 |
| 12 | हुतात्मा स्मृती मंदिर | 21/02/2015 | 500 | 62 | 62 |
| 13 | हुतात्मा स्मृती मंदिर | 22/02/2015 | 600 | 62 | 62 |
| 14 | हुतात्मा स्मृती मंदिर | 22/02/2015 | 700 | 87 | 87 |
| 15 | हुतात्मा स्मृती मंदिर | 22/02/2015 | 500 | 62 | 62 |
| 16 | हुतात्मा स्मृती मंदिर | 22/02/2015 | 500 | 62 | 62 |
| 17 | हुतात्मा स्मृती मंदिर | 22/02/2015 | 800 | 99 | 99 |
| 18 | हुतात्मा स्मृती मंदिर | 22/02/2015 | 700 | 87 | 87 |
| 19 | हुतात्मा स्मृती मंदिर | 25/02/2015 | 2500 | 309 | 309 |
| 20 | हुतात्मा स्मृती मंदिर | 02/03/2015 | 23500 | 2905 | 675 |
| 21 | हुतात्मा स्मृती मंदिर | 02/03/2015 | 6500 | 803 | 58 |
| 22 | हुतात्मा स्मृती मंदिर | 05/03/2015 | 6600 | 816 | 196 |
| 23 | हुतात्मा स्मृती मंदिर | 06/03/2015 | 10000 | 1236 | 306 |
| | एकूण वसूल रक्कम रुपये. | | 105000 | 12969 | 6584 |

1. आर्थिक वर्ष 2014-2015 मध्ये उपरोक्त हुतात्मा स्मृती मंदिर व शुभराय कला दालन मधील सभागृहचे भाडे वसूल करतांना भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेली रककम रु.1,05,000/- वर 12.36 टक्के दराने रक्कम रु.12,969/-एवढया सेवाकराची गणना होते. यापैकी रु.6,384/- सेवाकराची वसुली करण्यात आल्याचे अभिलेख्यावरून आढळून येते. परंतु एकूण सेवाकराच्या रक्कमेपैकी रु.6,584/- एवढी रक्क्म भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेली नाही. सदर सेवाकराची रक्कम रु.6,584/-वसूल करून शासन भरणा करण्यात यावी.

2. त्याच प्रमाणे हुतात्मा स्मृती मंदिर सभागृह व शुभराय कला दालन या सभागृहाच्या परिसरामधील खुल्या जागेच्या भाडयाच्या रक्कमेवर भाडेधारकाकडून केंद्र शासनाच्या दि.22/5/2007 च्या अधिनियमानुसार ज्या मिळकती व्यापारी तत्वावर भाडयाने दिल्या जातात त्या भाडे रक्कमेवर 12.36

टक्के सेवा कर आकारण्यात येत नसल्याचे अभिलेख्यावरून आढळून येते. याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

DATYMKM6601 (Ref No : 95, Hmm No : 152)

## *148 वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये मास मंडई ( मटन मार्केट ) व शाक मंडई ( भाजीपाला मार्केट) मधील ओटा/गाळे भाडेधारकाकडून भाडयाच्या रक्कमेची वसूली करण्यात आलेल्या पावती पुस्तकाच्या हस्तांतरण नोंदवहीबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये मास मंडई ( मटन मार्केट) व शाक मंडई ( भाजीपाला मार्केट) मधील ओटा/ गाळे भाडेधारकाकडून भाडयाच्या रक्कमेची वसूली करण्यात आलेल्या पावती पुस्तकांच्या हस्तांतरण नोंदवहीची तपासणी केली असता पावती पुस्तकाबाबतचा गोषवारा काढण्यात न आल्यामुळे मागील वर्षाची अखेरची शिल्लक किती आहे याची खात्री होत नाही. तसेच वर्षाअखेर पावती पुस्तकांचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये छापलेली पावती पुस्तके किती अथवा भांडारपालाकडून प्राप्त झालेली पावती बुकाची संख्या याबाबत खात्री होत नाही. पावती पुस्तक हस्तांतरण नोंदवहीवर वसुली करणा- या कर्मचा- यांनी वापरलेली पावती पुस्तके परत केल्याबाबत पावती पुस्तके संकलित करणा- या कर्मचा- यांची/ अधिकारी यांची दिनांकासह आद्याक्षरी घेण्यात आलेली नाही. रद्द केलेल्या पावत्यावर ठळक अक्षरात रद्द असे नोंदवून संबधित अधिका- याची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही, पावती पुस्तकांची अनुक्रमांकनिहाय छपाई करण्यात आलेली नाही.***

सोलापूर महानगरपालिकेच्या मास मंडई (मटन मार्केट) व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) 2014-15 या वित्तीय वर्षात ओटा/गाळे भाडेधारकाकडून भाडयाच्या रक्कमेची वसूली करण्यात आलेल्या पावती पुस्तकाच्या हस्तांतरण नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता त्याअनुषंगाने निदर्शनास आलेल्या उणीवाबाबत अर्धसमास क्रमांक-150 दि.13/04/2018 अन्वये खुलासा मागविला असता विभागाकडून याबाबत लेखापरीक्षणास खुलासा प्राप्त झालेला नाही त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये मास मंडई ( मटन मार्केट ) व शाक मंडई (

भाजीपाला मार्केट) मधील ओटा/गाळे भाडेधारकाकडून भाडयाच्या रक्कमेची वसूली करण्यात आलेल्या पावती पुस्तकाच्या हस्तांतरण नोंदवहीबाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील सोलापूर महानगरपालिकेच्या मास मंडई ( मटन मार्केट ) व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) मधील ओटा/गाळे भाडेधारकाकडून भाडयाच्या रक्कमेची वसूली करण्याकरिता वापरण्यात आलेल्या पावती पुस्तकांच्या हस्तांतरण नोंदवहीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून येते.

| अनु क्र | पावती पुस्तक क्रमांक | पावती पुस्तकाचा कालावधी | पावती पुस्तक स्विकारणा-या कर्मचा-यांचे नाव |
|---|---|---|---|
| 01 | 06 | 02/04/2014 | श्री वडतीले |
| 02 | 07 | 02/04/2014 | श्री जगताप |
| 03 | 08 | 02/04/2014 | श्री खान |
| 04 | 09 | 02/04/2014 | श्री शेख |
| 05 | 10 | 20/04/2014 | श्री यलमुलावर |
| 06 | 11 | 20/04/2014 | श्री तांबोळी/ पावती पुस्तक परत जमा केल्याची नोंद नाही |
| 07 | 12 | 29/05/2014 | श्री खान/ पावती पुस्तक परत जमा केल्याची नोंद नाही |
| 08 | 13 | 11/06/2014 | श्री यलमुलावर/ पावती पुस्तक परत करण्यात आले परतु कार्यालयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची दिनांकासह आद्याक्षरी घेण्यात आलेली नाही. |
| 09 | 14 | 24/06/2014 | श्री खान |
| 10 | 15 | 07/07/2014 | श्री जगताप |
| 11 | 16 | 17/07/2014 | श्री कुलकर्णी |
| 12 | 17 | 30/07/2014 | श्री शेख |
| 13 | 18 | 08/08/2014 | श्री यलमुलावर |
| 14 | 19 | 18/08/2014 | श्री खान |
| 15 | 20 | 21/09/2014 | श्री वडतीले |
| 16 | 21 | 30/09/2014 | श्री मूनगाललु |
| 17 | 22 | 14/10/2014 | श्री जगताप/ पावती पुस्तक परत जमा केल्याची नोंद नाही |
| 18 | 23 | 21/10/2014 | श्री शेख |
| 19 | 24 | 27/10/2014 | श्री कुलकर्णी |
| 20 | 25 | 27/10/2014 | श्री यलमुलावर |
| 21 | 26 | 14/11/2014 | श्री खान |
| 22 | 27 | 17/11/2014 | श्री शेख |
| 23 | 28 | 09/12/2014 | श्री खान |
| 24 | 29 | 12/12/2014 | श्री मूनगाललु |
| 25 | 30 | 02/01/2015 | श्री यलमुलावर |

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | 31 | 07/01/2015 | श्री खान |
| 27 | 32 | 14/01/2015 | श्री जगताप/ पावती पुस्तक परत जमा केल्याची नोंद नाही |
| 28 | 33 | 21/01/2015 | श्री शेख |
| 29 | 34 | 2701/2015 | श्री वडतीले |
| 30 | 35 | 31/01/2015 | श्री खान |
| 31 | 36 | 27/02/2015 | श्री कोळी |
| 32 | 37 | 05/03/2015 | श्री कणगीरी |
| 33 | 38 | 11/03/2015 | श्री खान |
| 34 | 39 | 19/03/2015 | श्री पठाण |
| 35 | 40 | 20/03/2015 | श्री गंदम |
| 36 | 41 | 28/03/2015 | श्री कणगीरी |

1.वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये पावती पुस्तकाबाबतचा गोषवारा काढण्यात न आल्यामुळे मागील वर्षाची अखेरची शिल्लक किती ? याची खात्री होत नाही. तसेच वर्षअखेर पावती पुस्तकांचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही.

2.वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये छापलेली पावती पुस्तके किती ? अथवा भांडारपालाकडून प्राप्त झालेली पावती बुकाची संख्या किती ? याबाबत खात्री होत नाही.

3.पावती पुस्तक हस्तांतरण नोंदवहीवर वसुली करणा-या कर्मचा-यांनी वापरलेली पावती पुस्तके,परत केल्याबाबत पावती पुस्तके, संकलित करणा-या कर्मचा-यांची/अधिकारी यांची दिनांकासह आद्याक्षरी घेण्यात आलेली नाही.

4.रद्द केलेल्या पावत्यावर ठळक अक्षरात रद्द असे नोंदवून संबधित अधिका-याची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

5.पावती पुस्तकांची अनुक्रमांकनिहाय छपाई करण्यात आलेली नाही.

DATYMKM6601 (Ref No : 96, Hmm No : 150)

### *149 आर्थिक वर्ष 2014-15 मास मंडई ( मटन मार्केट ) व शाक मंडई ( भाजीपाला मार्केट) मधील ओटा/गाळे भाडेधारकाकडून सेवाकराची वसूली करण्यात आलेली नसल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष :00 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सोलापूर महानगरपालिकेच्या मास मंडई (मटन मार्केट) व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) 2014-15 या वित्तीय वर्षात डिमांड (मागणी,वसूली,थकबाकी) रजिष्टर चे लेखापरीक्षण केले असता 2014-15 या वित्तीय वर्षात खालील गाळे/ओटे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रकमेवर केंद्र शासनाकडील दि.22/5/2007 च्या अधिनियमानुसार ज्या मिळकती व्यापारी तत्वावर भाडयाने दिल्या जातात त्या भाडे रक्कमेवर 12.36 टक्के दराने सेवा कर वसूल करुन ती रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक असताना खालील मास मंडई (मटन मार्केट) व शाक मंडई (भाजीपाला मार्केट) मधील गाळे/ओटे भाडेधारकाकडून वसूल करण्यात आलेल्या रक्कमेवर सेवा कर आकारण्यात आलेला नाही.***

